SPEAK | READ | WRITE



# माय मराठी ४
# My Marathi 4

अभ्यासपुस्तक | WORKBOOK FOR COMMUNICATIVE MARATHI



दृकश्राव्य डीव्हीडी सहित
INCLUDING AUIDO-VISUAL DVD


SUHAS LIMAYE
MADHURI PURANDARE



UNIVERSITY OF MUMBAI

RAJYA MARATHI VIKAS SANSTHA

सुहास लिमये / SUHAS LIMAYE
माधुरी पुरंदरे / MADHURI PURANDARE

# माय मराठी ४
# My Marathi 4

अभ्यासपुस्तक / Workbook for Communicative Marathi

**संपादक / EDITORS**
विभा सुराणा / VIBHA SURANA
आनन्द काटीकर / ANAND KATIKAR

**संकल्पना आणि निर्मिती / CONCEPT & PRODUCTION**
जर्मन विभाग, मुंबई विद्यापीठ
Department of German, University of Mumbai

राज्य मराठी विकास संस्था, मुंबई
**RAJYA MARATHI VIKAS SANSTHA, MUMBAI**

मुंबई विद्यापीठ
**UNIVERSITY OF MUMBAI**

**ISBN No.: 978-93-5361-726-4**

**FIRST EDITION 2020**
**पहिली आवृत्ती २०२०**

क्रिएटिव्ह कॉमन्स ॲट्रिब्यूशन - शेअरअलाईक लायसन्स (CC BY-SA 4.0) ह्याअन्वये उपलब्ध
Published under Creative Commons Attribution - ShareAlike license (CC BY-SA 4.0)
https://creativecommons.org/licenses/by-sa/4.0/

- **प्रकल्प समन्वयक / PROJECT CO-ORDINATOR**
  विभा सुराणा / VIBHA SURANA

- **लेखक / AUTHORS**
  सुहास लिमये / SUHAS LIMAYE, माधुरी पुरंदरे / MADHURI PURANDARE
  ज्योत्स्ना भिडे / JYOTSNA BHIDE, जमीर कांबळे / ZAMEER KAMBLE
  सोनाली गुजर / SONALEE GUJAR, कृत्तिका भोसले / KRUTTIKA BHOSALE
  गिरिषा टिळक / GIRISSHA TILAK, सायली थारळी / SAYALI THARALI

- **संपादक / EDITORS**
  विभा सुराणा / VIBHA SURANA
  आनन्द काटीकर / ANAND KATIKAR

- **संपादकीय मंडळ / EDITORIAL TEAM**
  मेहेर भूत / MEHER BHOOT
  प्र. ना. परांजपे / P.N. PARANJAPE

- **मराठीसाठी तांत्रिक साहाय्य / TECHNICAL SUPPORT FOR MARATHI**
  वूडस्टॉक स्टुडिओ / WOODSTOCK STUDIO, कन्फ्युशिअस इन्स्टिट्यूट, मुंबई विद्यापीठ / CONFUCIUS INSTITUTE, UNIVERSITY OF MUMBAI
  गुरुनाथ कलमकर (मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ) / GURUNATH KALAMKAR (DEPARTMENT OF MARATHI, UNIVERSITY OF MUMBAI), पूजा चितळे / POOJA CHITALE, सौरभ भोसले / SAURABH BHOSALE

- **कला, मांडणी, चित्रे / छायाचित्रे / अक्षर जुळणी**
  **LAYOUT DESIGN / PHOTOS / TYPESETTING**
  नागेश सिरसाल / NAGESH SIRSAL
  दत्तात्रय पाडेकर / DATTATRAYA PADEKAR
  प्राची जाधव / PRACHI JADHAV
  सुभाष गोपाळे / SUBHASH GOPALE

- **प्रकाशन / PUBLICATION**
  मुंबई विद्यापीठ / UNIVERSITY OF MUMBAI,
  राज्य मराठी विकास संस्था, मुंबई / RAJYA MARATHI VIKAS SANSTHA, MUMBAI

- **ई-पत्ता / E-MAIL**
  rmvs_mumbai@yahoo.com
  deptofgerman@mu.ac.in

- **संकेतस्थळ / WEBSITE ADDRESS**
  https://www.learn-marathi.com, www.mu.ac.in
  www.rmvs.marathi.gov.in

Online access link: https://mu.ac.in/mymarathi4

**TEXTBOOK, WORKBOOK AND 1 FREE DVD ₹ 1250 | $ 25 | € 20**

# प्रस्तावना

भारतीय अन्यभाषक, त्याचप्रमाणे परदेशी तरुण आणि प्रौढ व्यक्तींना मराठी भाषा शिकण्यासाठी ‘माय मराठी’ हे चौथ्या पातळीचे पाठ्यपुस्तक आहे. सर्वसमावेशक सामग्रीतून संवादात्मक, कृतिशील आणि निर्मितिक्षम अशा पायाभूत आधारावर ह्या अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली आहे. मराठी भाषेचे काटेकोर पण परिणामकारक अध्ययन करण्याकरता हा एक अद्ययावत पद्धतीने भाषा शिकवण्याचा प्रयत्न आहे. विद्यार्थ्यांना आकलन, संवाद, वाचन तसेच लिखाण यांद्वारे मराठी भाषेतून योग्य रीतीने आणि परिणामकारक संवाद कसा साधावा याचे शिक्षण दिले जाते.

ह्या अभ्यासक्रमाच्या अध्ययन सामग्रीत प्रामुख्याने दोन पुस्तके आहेत, १) डीव्हीडी, ध्वनिमुद्रित उताऱ्यांचे लिखित मजकूर आणि मराठी - इंग्रजी आणि हिंदी, अशा शब्दसंग्रहासहित पाठ्यपुस्तक आणि २) सराव, चाचणी आणि उत्तरसंच असणारे अभ्यासपुस्तक.

‘माय मराठी पातळी ४’ च्या ह्या खास पाठ्यपुस्तकात विषयानुरूप छायाचित्रे, रेखाचित्रे, मजकूर, कविता आणि गाणी, म्हणी आणि वाक्प्रचार, व्याकरण, साचेबद्ध सराव, ‘करा आणि शिका’ स्वाध्याय आहेत. तसेच खेळाद्वारे शिकवणी, समर्पक अर्कचित्रे, विषयानुसार येणारी अतिरिक्त शब्दसंपदा आणि दृष्टिक्षेप, सराव करण्यास उपयुक्त श्राव्य आणि दृक्श्राव्य चित्रफिती आहेत. तसेच सर्वच धड्यांची रचना विद्यार्थ्यांना समजेल अशी आहे. सोबत विनामूल्य दिल्या गेलेल्या दृक्श्राव्य डीव्हीडीसह हे पाठ्यपुस्तक वापरायचे आहे.

‘माय मराठी पातळी ४’च्या अभ्यासपुस्तकात १) पाठ्यपुस्तकातील प्रत्येक धड्यासाठी स्वाध्याय आहेत. त्यासोबतच २) पातळी ३च्या उजळणीसाठी ‘मागील भागात’ हा सरावाचा धडा, ३) प्रत्येक दोन धड्यांसाठी चाचणी प्रश्नावली, शेवटी ४) संपूर्ण पातळी ४च्या अभ्यासक्रमाची एकत्रित चाचणी, आणि ५) उत्तरे यांचा समावेश आहे.

शब्दसंग्रहात (ग्लॉसरी) किंवा शब्दसंग्रहात कठीण शब्दांची लिंगानुसार, तिन्ही वचनांनुसार आणि सामान्यरूपांनुसार विस्तृत माहिती समाविष्ट केलेली आहे.

संवादात्मक मराठी - पातळी ४चा संपूर्ण अभ्यासक्रम म्हणजे साधारणपणे १२० तासांची शिकवणी आहे. तथापि, ह्याचे अध्ययन करताना शिक्षकाला ह्यातील प्रत्येक धड्यासाठी साधारणपणे १२ तासांचा अवधी लागेल. ह्या सामग्रीत सराव आणि चाचणीसाठी पुरेशी सामग्री समाविष्ट केलेली असली तरी प्रत्यक्ष शिकवताना संबंधित शिक्षकाला अभ्यासक्रमाव्यतिरिक्त अवांतर माहितीही द्यावी लागणार आहे. विद्यार्थ्यांसाठीही एक सूचना आहे की, योग्य तऱ्हेने मराठी बोलण्यासाठी त्यांनी एकवचन, अनेकवचन, सामान्यरूप तसेच लिंगानुसार नामांचा अभ्यास करण्याचा सराव करावा. सदर पुस्तके ही वर्गात शिक्षकांकडून समजून घेऊन शिकण्याच्या स्वरूपाची असली तरी स्वयं-अध्ययन करणाऱ्यांना दिलेल्या सामग्रीतील विस्तृत शब्दसंग्रहाच्या आधारे ती समजून घेऊन शिकता येईल.

सोबत जोडलेली दृक्‌श्राव्य डीव्हीडी ह्या अध्ययन सामग्रीसोबत विनामूल्य देण्यात येणार आहे कारण हा प्रकल्प पूर्णपणे शैक्षणिक हेतूने राबवला जात आहे. परिपूर्णपणे भाषा शिकण्यास मदत व्हावी ह्या हेतूने ह्या सीडीमध्ये श्राव्य ध्वनीफिती तसेच निरनिराळ्या माध्यमांतून निवडलेल्या वैविध्यपूर्ण दृक्‌श्राव्य चित्रफिती समाविष्ट केल्या आहेत. शिक्षकांनी सुचवलेल्या उत्तरांसहची प्रश्नावली घेताना तसेच इतर प्रश्नोत्तरांच्या वेळी ह्या डीव्हीडीची मदत घेणे अपेक्षित आहे.

हा अभ्यासक्रम शिकवणाऱ्या शिक्षकांसाठी असा सल्ला आहे की, त्यांनी शिक्षकांसाठी असणाऱ्या भाषा-प्रशिक्षण वर्गांना उपस्थित राहावे; तसेच, ह्या संदर्भात त्यांनी संपादक वा राज्य मराठी विकास संस्थेशी संपर्क साधावा.

प्रकल्पातील इथवरची ही अध्ययन सामग्री तयार करण्यासाठी कष्ट घेऊन हे सारे पूर्णत्वास नेण्यास साहाय्य करणाऱ्या सर्वांचे आभार.

इंग्लिश आणि जर्मनप्रमाणे मराठीदेखील संपन्न आणि पूर्वपरंपरा असणारी इंडो-युरोपियन भाषा आहे. ह्या भाषेचे अध्ययन करून त्यात सर्वसामान्य निजभाषकाइतके प्रभुत्व येण्याकरता किमान सहा पातळ्यांची म्हणजेच अंदाजे ८०० तासांची आवश्यकता आहे. उर्वरित दोन पातळ्यांसाठी यथायोग्य सामग्री तयार करणे हे आमचे पुढील उद्दिष्ट आहे. या प्रकल्पाअंतर्गत स्वयं-अध्ययन करणाऱ्यांसाठी संगणक आणि सहध्वनीद्वारे वापरली जाणारी मोबाईल ॲप्लिकेशन्सही बनवली जाणार आहेत.

त्या कामात बहुमोल साहाय्य करणाऱ्या सुपर्णा कुलकर्णी यांचेही आभारी आहोत.

कुलगुरू सुहास पेडणेकर आणि प्र-कुलगुरू रवींद्र कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली कार्यशील अशा मुंबई विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांचे आम्ही आभारी आहोत. हा प्रकल्प सुरळीत चालण्यासाठी साहाय्य करणाऱ्या सर्वांचे आम्ही अत्यंत आभारी आहोत.

विभा सुराणा आणि आनन्द काटीकर
संपादक

# प्रस्तावना । Preface

My Marathi Level 4 is a Marathi course book particularly meant for non-native teens and adults, for both Indian and foreign Marathi language learners. It is prepared using an integrated communicative, task and production based approach. It is a modest attempt to apply latest language teaching tools to facilitate the learning of the Marathi language systematically and effectively. It teaches the learners how to communicate correctly and effectively in Marathi by imparting understanding, speaking, reading as well as writing skills.

This course material consists of two books, namely 1) a Textbook with transcripts, a Marathi Glossary in English and Hindi and a *DVD* 2) a Workbook with exercises, tests and answer keys.

This particular Textbook of 'My Marathi Level 4' consists of units such as thematic images and illustrations, texts, poems and songs, idioms and proverbs, grammar, pattern drills (saraav), 'do and learn' exercises, learning games, cartoons, audios and audio-visual components with their transcripts and exercises, vocabulary as per chapters (*drishtikshep*), as well as learner self-evaluation in all chapters. The textbook is to be used along with the free audio-visual *DVD* attached to it.

The Workbook of 'My Marathi Level 4' consists of 1) exercises for each chapter as well as the following regular tests 2) a comprehensive test for level 3 after mageel bhagat, 3) a test after every two chapters 4) a comprehensive test for level 2 and 5) answerkeys.

The Glossary or *shabdasangraha* gives a detailled list of difficult words with their gender in singular and plural forms as well as their oblique forms. English and Hindi word meanings are given.

The entire Communicative Marathi Level 4 Course is designed for approximately 120 teaching hours. Thus, the teacher may take about 12 hours for each of the 10 chapters. Though enough exercises and tests have been given, the teacher is expected to give not only regular dictations but also more exercises as and when required. The learners are advised to learn the nouns along with their gender with singular and plural forms as well as the oblique forms in order to learn to speak correct Marathi. Though the book is meant for classroom teaching, self-learners too can make use of it with the help of the comprehensive glossary.

The audio-visual DVD at the end comes free with the book and is meant purely for educational purpose. It consists of the audio section and a wide spectrum of audiovisual clips from the media

which have been collated in accordance with the language proficiency level of the learners. The teachers are expected to use audio-visual material along with specific MCQs and other questions (written & oral).

The teachers using this book are advised to undergo rigorous teachers' training for the integrated communicative approach and may contact the editor or Rajya Marathi Vikas Sanstha for the same. We are extremely thankful to the entire team for making this level happen.

Like English and German, Marathi too is a rich and old Indo-European Language and similarly requires at least 6 levels of language learning, i.e. approx. 800 hours for near native language proficiency. Preparing standardized material for remaining 2 levels for learning Marathi is a daunting task ahead of us and requires resources. Computer and Mobile applications (Apps) for self learners are also being prepared under this project. Such enterprises require expert inputs from diverse domains.

We are extremely thankful to Suparna Kulkarni from Rajya Marathi Vikas Sanstha for her valuable inputs.

We thank the authorities of the University of Mumbai led by the Vice Chancellor Suhas Pednekar and Pro-Vice Chancellor Ravindra Kulkarni to facilitate the smooth running of this project.

Vibha Surana and Anand Katikar

Editors

# अनुक्रमणिका


| पाठ | विषय | संभाषणकौशल्य | व्याकरण | शब्दसंपदा | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|---|
| | मागील भागात | मराठी भाषेत बोलण्याच्या आपल्या क्षमता आणि अडचणी<br>चांगल्या सवयी<br>उद्याची बात<br>नकाशा समजावून सांगणे<br>अपेक्षा व्यक्त करणे | परिमाणवाचक विशेषणे<br>सामान्यरूप<br>काळ<br>शब्दयोगी पदे<br>धातुसाधिते, धातुसाधित विशेषणे<br>स्थलवाचक विशेषणे व त्यांची साधित रूपे<br>भाववाचक नामे<br>वाक्यांची जोडणी सर्वनामांच्या वापराने<br>पुरता, पुरेसा<br>प्रयोजक क्रियापदे<br>शक्य क्रियापदे<br>क्रियापद-नामाची षष्ठी | फार, पुष्कळ, थोडा, किंचित, निम्मा, दुप्पट, दुपदरी, चौपट इ.<br>खालून, वरून, पुढून, आतून, जवळून इ.<br>हा-असा, असला, इतकासा, एवढासा, अमुक, अमका, तो-तसा, तसला, छोटासा, लहानसा इ.<br>असलेला, करणारा इ.<br>जितके-तितके, जेवढे-तेवढे इ.<br>खालची पायरी, मधली भिंत, जिथली वस्तू<br>दाखवण्याची गरज, चालण्याचा कंटाळा... | १२ |
| १ | चित्रपट<br>व्यक्तिमत्त्व : दादासाहेब फाळके | चित्रपट या विषयावर बोलणे, वाचणे, लिहिणे<br>चित्रपट परीक्षणे<br>चित्रपटाविषयी अभिप्राय देणे<br>कलाविश्वातील घडामोडींविषयी बोलणे / स्वत:चे मत व्यक्त करणे<br>चित्रपटविश्वातील बदलते ट्रेंडस् | संयुक्त क्रियापदे | चित्रपटक्षेत्रातील संज्ञा<br>करू शकणे / लागणे..., करून पाहणे / ठेवणे..., करता येणे..., करावे लागणे...<br>नाम + क्रियापद जोड्या<br>समानार्थी, विरुद्धार्थी शब्द | ३२ |

| पाठ | विषय | संभाषणकौशल्य | व्याकरण | शब्दसंपदा | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|---|
| २ | विरंगुळा<br>व्यक्तिमत्त्व : शिल्पकार म्हात्रे | सवड, विरंगुळा यांची गरज व महत्त्व यांविषयी चर्चा करणे<br>फावल्या वेळात काय करू शकतो - विविध पर्याय सुचवणे<br>फावल्या वेळात काय करायला आवडेल - इच्छा व्यक्त करणे | 'लागणे'चे विविध प्रयोग<br>क्रियापद + सप्तमी - करणे-करण्यात<br>'तर'चे विविध उपयोग<br>नामसाधित कालवाचक विशेषणे व क्रियाविशेषणे<br>उद्देशार्थक काळ | सवड मिळणे, सवड काढणे<br>तर, तरच, तरी, तरीही, असेल / नसेल तर...<br>आलास मोठा, लागून गेला मोठा...<br>सकाळी / सकाळचा, संध्याकाळी / संध्याकाळचा<br>नाम + क्रियापद जोड्या<br>समानार्थी, विरुद्धार्थी शब्द | ५१ |
| | चाचणी – पाठ १ - २ | | | | ६६ |
| ३ | भेटीगाठी | भेटीगाठींचे महत्त्व<br>लक्षात राहिलेली भेट<br>औपचारिक / अनौपचारिक भेट<br>पत्रांद्वारे होणाऱ्या भेटी ते आजच्या आभासी भेटी | क्रियापद + द्वितीया प्रयोग- (कर्तरी, कर्मणी, भावे - फक्त मुख्य प्रकार)<br>परिणामबोधक उभयान्वयी अव्यये<br>कालवाचक क्रियाविशेषणे | पहिली भेट<br>भेटू लवकरच<br>कधी भेटायचं?<br>भेट देणे<br>भेट घडवून आणणे<br>म्हणून, त्यामुळे इ.<br>आता, अजून, आजही, गेल्याच आठवड्यात इ.<br>नाम + क्रियापद जोड्या<br>समानार्थी, विरुद्धार्थी शब्द | ७१ |
| ४ | 'श' शिक्षणाचा<br>व्यक्तिमत्त्व : महात्मा फुले सावित्रीबाई फुले | महाराष्ट्रातील शैक्षणिक व्यवस्था<br>चालू घडामोडींविषयी बोलणे<br>उपलब्ध संधी<br>शालेय शिक्षणाचे माध्यम<br>विविध प्रकल्प : नवनवीन प्रयोगांविषयी माहिती मिळवणे व स्वतःला आवडलेल्या प्रयोगावर सादरीकरण करणे | आत्मवाचक सर्वनामे व त्यांची विभक्तिरूपे<br>संकेतदर्शक उभयान्वयी अव्यये<br>पेक्षा, हून- तुलनात्मक शब्द<br>'असो', 'असोत'चे विविध उपयोग<br>विशेषणांचा नामांसारखा वापर | शिक्षण, संशोधन - विविध क्षेत्रे<br>आपण, स्वत: इ.<br>म्हणजे, तर, की<br>-पेक्षा, -हून<br>मध्ये, सर्वात<br>स्पर्धा, स्पर्धापरीक्षा<br>नाम + क्रियापद जोड्या<br>समानार्थी, विरुद्धार्थी शब्द | ८८ |
| | चाचणी – पाठ ३ - ४ | | | | १०५ |

| पाठ | विषय | संभाषणकौशल्य | व्याकरण | शब्दसंपदा | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|---|
| ५ | अतुल्य भारत<br>व्यक्तिमत्त्व : महात्मा गांधी | प्रसिद्ध भारतीय कला, परंपरा यांबद्दल जाणून घेणे<br>भारत आणि जग परस्परसंबंध, सांस्कृतिक देवाणघेवाण - चर्चा करणे | उद्देशदर्शक उभयान्वयी अव्यये<br>'म्हणून'चे विविध उपयोग<br>क्रमवाचक संख्याविशेषणे<br>शब्दयोगी पदे – -भर, -आधी, -पूर्वी | भारतीय नृत्य, संगीत, प्रसिद्ध साहित्यिक व त्यांच्या कलाकृती, प्रसिद्ध पर्यटनस्थळे, दूरचित्रवाणीवरील कार्यक्रम, अध्यात्म<br>म्हणून, यासाठी, याकरिता, यास्तव<br>अठरावे शतक इ.<br>अठराव्या शतकात इ.<br>जन्मभर इ.<br>नाम + क्रियापद जोड्या<br>समानार्थी, विरुद्धार्थी शब्द | ११९ |
| ६ | घरकुल | कुटुंबपद्धतीबद्दल चर्चा करणे (एकत्र, विभक्त) - फायदे, तोटे<br>बदलत्या काळातील घरे<br>राजवाडा, वाडा, बंगला, इमारत, चाळ<br>घरातील खोल्या | समुच्चयबोधक उभयान्वयी अव्यये<br>प्रयोजक क्रियापदे | घर पाहावे बांधून<br>व, आणि, शिवाय, अन्, न, नि, आणखी, आणिक<br>घराचे भाग आणि घरसजावटीच्या वस्तू<br>आधीच ... तशात त्यात<br>नाम + क्रियापद जोड्या<br>समानार्थी, विरुद्धार्थी शब्द | १२६ |
| | चाचणी – पाठ ५ - ६ | | | | १३६ |
| ७ | दगडांच्या देशा<br>व्यक्तिमत्त्व : शिवाजी महाराज | महाराष्ट्रातील विविध किल्ल्यांविषयी जाणून घेणे<br>किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व, किल्ल्यांचे संवर्धन<br>किल्ला कसा पाहावा?<br>महाराष्ट्रातील लेणी | विरोधसूचक उभयान्वयी अव्यये<br>'म्हणजे'चे विविध उपयोग<br>चढतो / चढून जातो चढला / चढून गेला<br>तृतीयेचा प्रत्यय '-ने', शब्दयोगी पद '-मुळे' क्रियापद+ने, -मुळे<br>नाम+ने, -मुळे | पण, परंतु, परि<br>किल्ल्यांचे प्रकार- गिरीदुर्ग, भुईकोट, जलदुर्ग<br>किल्ला - संरचना<br>केल्याने, केल्यामुळे<br>कष्टाने, आपुलकीने, घाईघाईने इ.<br>नाम + क्रियापद जोड्या<br>समानार्थी, विरुद्धार्थी शब्द | १४२ |

| पाठ | विषय | संभाषणकौशल्य | व्याकरण | शब्दसंपदा | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|---|
| ८ | खाद्यसंस्कृती<br>व्यक्तिमत्त्व :<br>विठ्ठल कामत | महाराष्ट्रातील खाद्यसंस्कृतीतील विविधता<br>प्रांतिक पदार्थ व स्वभाववैशिष्ट्ये<br>म्हणी व वाक्प्रचार यांच्यावर चर्चा करणे<br>कशात काय येते | नामसाधित विशेषणे<br>धातुसाधित विशेषणे<br>ध्वन्यानुकारी, नादानुकारी विशेषणे<br>विकल्पबोधक उभयान्वयी अव्यये<br>चतुर्थी-क्रियापद समजणे, आवडणे इ॰ | तऱ्हेतऱ्हेचे प्रांतिक पदार्थ<br>पिकलेला आंबा, तळलेले पदार्थ इ॰<br>झणझणीत, कुरकुरीत इ॰<br>स्वयंपाकाशी संबंधित क्रियापदे<br>कशाबरोबर काय खातात<br>की, किंवा, अथवा, अगर, नाहीतर<br>खाद्यसंस्कृतीवर आधारित म्हणी व वाक्प्रचार<br>नाम + क्रियापद जोड्या<br>समानार्थी, विरुद्धार्थी शब्द | १५४ |
| | चाचणी – पाठ ७ - ८ | | | | १७१ |
| ९ | नागपूर आणि नाशिक<br>व्यक्तिमत्त्व :<br>आमटे कुटुंबीय | नागपूर आणि नाशिक या महाराष्ट्रातील प्रमुख शहरांचा अभ्यास करणे<br>या दोन जिल्ह्यांच्या बोलीभाषांबद्दल बोलणे | -तील, -तले<br>पूरक केवलप्रयोगी अव्यये<br>'की'चे विविध उपयोग | म्हणे, आपला / आपली, बेटे / बेटा, बापडा / बापडी, असं का!, होऽका!, आत्ता!, जळलं मेलं!, काय कळलं!<br>इतका ... की इ॰<br>तसा ... पण इ॰<br>चालणार नाही, चालवून घेणार नाही<br>नाम + क्रियापद जोड्या<br>समानार्थी, विरुद्धार्थी शब्द<br>बोलीभाषा | १७६ |

| पाठ | विषय | संभाषणकौशल्य | व्याकरण | शब्दसंपदा | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १० | बोधकथा<br>व्यक्तिमत्त्व : गौतम बुद्ध | मराठीतील निवडक बोधकथा<br>बोधकथा ऐकून घडलेल्या पिढ्या<br>जातककथा<br>पंचतंत्र<br>इसापनीती<br>परदेशी बोधकथा | जोडशब्द<br>कालवाचक क्रियाविशेषणे<br>एकाच केवलप्रयोगी अव्ययाचा वेगवेगळे भाव दर्शवण्यासाठी वापर<br>मौनदर्शक केवलप्रयोगी अव्यये<br>शक्य क्रियापदे: भूतकाळ, भविष्यकाळ<br>तीव्रतादर्शक विशेषणे<br>संख्यावाचक विशेषणे<br>अकर्तृक / भावकर्तृक क्रियापदे | बोधकथांचे प्रकार<br>जडणघडण, फुलेबिले<br>लगेच, एकदम इ.<br>चूप, गप<br>चालवते-चालवत नाही - चालवले-चालवले नाही / चालवेना - चालवेल-चालवणार नाही<br>निळाशार, काळाभोर इ.<br>सर्व, एकेक इ.<br>उजाडणे, अंधारणे इ.<br>नाम + क्रियापद जोड्या<br>समानार्थी, विरुद्धार्थी शब्द | १९० |
| | चाचणी – पाठ ९ - १० | | | | २०३ |
| | अंतिम परीक्षा | | | | २०७ |
| ११ | उत्तरे | | | | २२१ |

## १ शक्य तेवढे शब्द शोधा. बघू कोणाला सर्वात जास्त शब्द सापडतात.

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| स | म | स्या | र | स्प | र्श | पू | र्वी | क्ष | न्या | य | व्य | व | स्था | न |
| का | मृ | दु | अ | र्धा | प | र्व | र्ण | म | या | था | त्य | न | प्र | क्षि |
| ळ | बु | द्धी | क | व | आ | ग्र | ह | ता | ल | त | य | ण | वा | ति |
| द | ग | द | ग | ह | नं | ह | ति | जी | य | था | ळी | स | ह | ज |
| नै | वे | द्य | बा | सुं | दी | क | र | व | चां | का | म | गा | र | अ |
| वि | ध | सु | वि | धा | ता | म | स्का | न | गु | टि | प | ण | क | र्ज |
| घ | ळा | धी | हा | व | भा | व | र | शौ | ल | ण | ऋ | षी | का | र |
| ट | व्या | र | अ | के | र | वा | रा | ली | प | रं | तु | ल | ना | आ |
| न | भू | ल | स | क | ण | ख | र | प | णा | ग | च | व | बा | व |
| बु | द्धि | म | त्ता | ण | अ | स | हि | ष्णु | ता | व | क्र | खा | ण | डी |
| सि | द्धां | त | नि | र | क्ष | र | ता | म | ऊ | र्जा | मं | त्री | था | नि |
| शो | ष | ण | नि | वा | र | ण | ग | खा | ब | यं | त्र | मा | न | व |
| का | र्य | प्र | णा | ली | रा | लिं | ग | भे | द | भा | व | ना | सा | डी |

## २ रिकाम्या जागा भरा.

**पुरेशी, दुप्पट, किंचित, दुपदरी, मोजके, पुष्कळ, पटींनी, प्रमाणात, इतका**

उदा. मिताली आणि कल्याण, दोघांनी लग्नात वायफळ खर्च करायचा नाही असं ठरवलं, म्हणून त्यांनी मोजक्या लोकांनाच आमंत्रण दिलं.




क. सरकारच्या प्लास्टिक बंदीच्या निर्णयामुळे कागदी पिशव्यांच्या दरात .................................. वाढ झाली.

ख. परदेशात नोकरी करण्यापूर्वी तेथील लोक, संस्कृती, ठिकाणे, त्यांची वैशिष्ट्ये याविषयी .................................. माहिती करून घेणे आवश्यक आहे.

ग. तो .................................. काही चांगला अभिनेता नसला तरी त्याचे .................................. चाहते आहेत, हे विसरून चालणार नाही.

घ. नाटक चांगले आहे, परंतु अनुवादित असल्यामुळे त्याची भाषा .................................. खटकते.

च. कोल्हापूर, सांगली, इचलकरंजी मार्गावर मोठ्या .................................. वाहतूक असते; पण येथे एकच .................................. उड्डाणपूल आहे.

छ. "तू माझ्यापेक्षा कित्येक .................................. हुशार आणि कर्तृत्ववान आहेस, म्हणून माझ्याऐवजी तुला ही नोकरी मिळाली, याचा मला आनंदच आहे."

## ३ खालील वाक्यांमधील संख्याविशेषणांची जागा चुकली आहे. त्यांची योग्य जागा सांगा.

उदा॰ श्रोत्यांचे मोजके काही आवडते कार्यक्रम पुन्हा प्रक्षेपित होणार आहेत.

क. काळानुसार अधिक पुढे थोडे जाऊन विचार करण्याची जबाबदारी साहित्यकारांची असते, असे माझे मत आहे.

ख. तो इतका लहान आहे, पण तरीही आपल्या जास्त वयापेक्षा मोठ्या माणसांशीच त्याची मैत्री होते.

ग. त्याची उंची मध्यम उंचीपेक्षा जास्त किंचित होती.

घ. मला गाण्यातलं काही समजतं फार असं नाहीये, पण तरीही शास्त्रीय संगीत नेमाने ऐकतो मी.

## ४ ऋ, क्ष, ज्ञ असलेले शब्द योग्य अक्षरे आधी, मध्ये किंवा नंतर जोडून तयार करा.

र तू अ ण षी र न न प ण वि ने श्व ...

| | | | |
|---|---|---|---|
| ऋ | उदा॰ ऋण | क) | ख) |
| क्ष | ग) | घ) | च) |
| ज्ञा | छ) | ज) | झ) |




## ५ 'र्'चे जोडाक्षर करून योग्य शब्द तयार करा.

| | | | |
|---|---|---|---|
| अधा | उदा॰ अर्धा | समुद | उदा॰ समुद्र |
| कुती | क) | पदाथ | ख) |
| पयाय | ग) | धुवतारा | घ) |
| महाराष्ट | च) | तहा | छ) |

## ६ योग्य उत्तर निवडा.

| | | | |
|---|---|---|---|
| उदा. दुकान – दुकानदार | १) दुकानकार | २) दुकानदान | ३) दुकानदार |
| क. जीव – | १) जीवदान | २) जीवकार | ३) जीवदार |
| ख. नाटक – | १) नाटकदान | २) नाटककार | ३) नाटकदार |
| ग. धार – | १) धारदार | २) धारकार | ३) धारदान |
| घ. शिल्प – | १) शिल्पदान | २) शिल्पकार | ३) शिल्पदार |
| च. काम – | १) कामगार | २) कामदान | ३) कामदार |

## ७ चित्रातील आकडेवारी पाहून रिकाम्या जागा भरा.

**पुष्कळ, दुप्पट, काही, कित्येक पटींनी, निम्म्याहून अधिक, किंचित, दुप्पट, सर्वाधिक**

उदा. पुढील पाच वर्षांत भारतातील इंटरनेट वापरकर्त्यांची संख्या जवळ जवळ दुप्पट होणार आहे.




क. भारतात मोबाईल इंटरनेटचा .............................. वापर हा सोशल मीडियामध्ये सक्रिय राहण्यासाठी आणि .............................. वापर माहिती शोधण्यासाठी केला जातो.

ख. संगीतासाठी जितका इंटरनेटचा वापर होतो, जवळ जवळ त्याच्या .............................. वापर हा उत्पादने पाहण्यासाठी व विकत घेण्यासाठी होतो.

ग. .............................. लोक सोशल मीडियासाठी इंटरनेटचा वापर करतात, तर .............................. लोक संगीतासाठीही इंटरनेटचा वापर करतात.

घ. ॲप्समध्ये ॲपल ॲप स्टोअरपेक्षा गुगल प्लेचा वापर .............................. वाढला आहे.

च. २०१७च्या तुलनेत २०२२पर्यंत भारतात मोबाईल इंटरनेटचा वापर .............................. वाढणार आहे.

## ८ कंसातील शब्दांना प्रत्यय / शब्दयोगी पद योग्य रीतीने जोडून रिकाम्या जागा भरा.

तशी (मुख्याध्यापक + ना) मुख्याध्यापकांना (वर्ग (अ॰व॰) + वर) वर्गांवर प्रत्यक्ष शिकवायला जायची (फार – सा) फारशी वेळ येत नाही. **(क)** (ते (अ॰व॰) + ची) ........................ देखरेख (महत्त्व + ची) ........................ असते. **(ख)** (ते + नी) ........................ नेमलेले शिक्षक (आपण + ले) ........................ काम चांगल्या रीतीने पार पाडत असतात. **(ग)** पण (हाड + चा) ........................ शिक्षक असलेला कोणताही मुख्याधापक वर्गावर जायच्या संधीची वाटच पाहत असतो. **(घ)** (आपण + ले) ........................ ज्ञान (तो + ला) ........................ परत आजमावून पाहायचे असते, जुने अनुभव परत घ्यायचे असतात, वर्गातील लाडक्या (मंडळी + ना) ........................ परत भेटायचे असते, (आपण + ल्या) ........................ मनाप्रमाणे शिकवायचे असते.



**(च)** तर काल (आम्ही + च्या) ........................ (वर्ग + त) ........................ नेहमीच्या बाई काही आल्या नाहीत. कधी त्या सांगूनसवरून रजा घेतात तर कधी अचानक दांडी मारतात. कालची दांडी अचानक होती.

**(छ)** शेवटी पदर खोचून (मुख्याध्यापिका + ला) ........................, म्हणजे (मी + ला) ........................ (वर्ग + त) ........................ शिरायला लागलं. मी **(ज)** आधी सिंकमधे वाकुल्या दाखवत (असणे + लेल्या) ........................ खरकट्या ताटं-वाट्या घासून पुसून लख्ख केल्या. **(झ)** एकूण बारा (चमचे + पैकी) ........................ दोन चमचे बरेच दिवस गैरहजर आहेत (हे + ची) ........................ (मन + ने) ........................ नोंद घेतली. **(ट)** सगळ्या (कप (अ॰व॰) + चे) ........................ कान पकडून (ते + ना) ........................ आतून ब्रशने साफ केले. **(ठ)** काही डाव, (चमचे + च्या) ........................ खोबणीत काही दिवस घाण साचत होती, हे गेले अनेक दिवस (वर्ग + बाहेर) ........................ फेरी मारताना दिसत होतं, आज (ते + ना) ........................ (प्रत्यक्ष + त) ........................ चकाचक केलं. **(ड)** नेमलेले शिक्षक (आपण + ले) ........................ काम करून निघून जातात, (ते + ना) ........................ (इकडे तिकडे + ची) ........................ धूळ कुठे दिसते, असं पुटपुटत मग (ओटा + मागे + ची) ........................ जागा, सिंकवरील खिडकीपण लख्ख केली.

**(ढ)** (शाळा + त + ले) ........................ दोन विद्यार्थी (मी + झे) ........................ विशेष लाडके आहेत. एक आईने (हो हो! आहे माहेरचं, म्हणून आहे लाडकं!) दिलेलं ठोक्याचं पातेलं आणि एक आजेसासूबाईंपासून वापरात असलेला (छोटा + सा) ........................ हंडा. **(त)** (ते + च्या + वरून) ........................ प्रेमाने हात फिरवला. **(थ)** एक परात, मोठी ताटं उगाचच आगाऊपणे

(पुढे + च्या) ........................ बाकावर येऊन बसली होती, त्यांना ट्रॉलीत शेवटच्या (रांग + त) ........................ बसवलं. तिथे ती जास्त खूश दिसतात. **(द)** (बाकी + च्या + ना) ........................ पण मग छान जागा होते.

**(ध)** काही विद्यार्थी मुळातच प्रतिभावान असतात, पण (ते + ची) ........................ चमक हरवलेली असते. **(न)** (ते + ना) ........................ पावडरने घासून अजून चमकवलं. **(प)** त्यांना वरचेवर (घासणे + ची) ........................ आठवण नेमलेल्या (शिक्षिका + ला) ........................ करायला हवी (हे + ची) ........................ मनाने नोंद केली. **(फ)** एका ट्रॉलीच्या (मागे + च्या) ........................ बाजूला काही डबे आणि त्यांची झाकणं अस्ताव्यस्त पडून उगाचच भांडत होती, (ते + ना) ........................ एकमेकात नीट बसवून गप्प केलं. **(ब)** वर्गात एकच माठ विद्यार्थी आहे. पावसाळ्यामुळे (तो + ची) ........................ रवानगी तात्पुरती (माळा + वर + च्या) ........................ वर्गात केली.

सगळं काम झाल्यावर मी वर्गाकडे एकवार नजर फिरवली. **(भ)** तास (मन + सारखा) ........................ झाला होता. **(म)** नेमलेल्या बाई काम तसं बरं करतात, पण शाळा (मी + झी) ........................ असल्याने त्यांना माझ्याइतकी आत्मीयता नक्कीच वाटत नाही. त्यामुळे आजचा तास खचितच वेगळा झाला होता. **(य)** (तिथे + ली) ........................ सगळी भांडी, सगळ्या वस्तू, जणू मला म्हणत होत्या, "मालकीणबाई, येत जा अधूनमधून. तुमचा तास आवडतो आम्हाला."

## ९ वरीलप्रमाणे शाळा, विद्यार्थी यांच्याऐवजी नोकरीतल्या कामांचे वर्णन वापरून घरकामाबद्दल लिहा.

## १० कंसातील शब्दांना 'तून' हा प्रत्यय लावून गाळलेल्या जागी भरा.

उदा॰ लहान बाळांना शक्यतो प्लास्टिकच्या बाटलीतून दूध देऊ नये. (बाटली)

क. थंड पाणी देतेस का? खूप ........................ चालून आले आहे. (उन्ह)

ख. ............... बाहेर पडताना पाण्याचे सगळे नळ बंद आहेत की नाहीत ते एकदा तपासा. (घर)

ग. माझी बहीण ........................ उपयुक्त वस्तू बनवण्याची कला शिकवते. (कचरा)

घ. वड्या करण्यासाठी मिश्रण ........................ ताटात काढून घ्यावे. (कढई)

च. त्याच्या ........................ स्पष्ट कळत होतं, की तो रागावला आहे. (बोलणे)

छ. चार नंबरच्या पेशंटला ........................ विषबाधा झालेली आहे. (अन्न)

ज. माझ्या ........................ एक गुलमोहोराचं सुंदर झाड दिसतं. (खिडकी)

झ. पक्षी ........................ उडून गेले. घरटं ओकंबोकं झालं. (घरटे)



ट. सारखं या ........................ त्या खोलीत करू नकोस. जरा शांत बस. (खोली)

ठ. ........................ येताना काय काय आणायचं आहे? – फक्त केळी आणि तांदूळ, बाकी काही नको. (बाजार)

ड. या ........................ मला नीट दिसत नाहीये. दुसरा चष्मा द्या. (चष्मा)

ढ. तिची कहाणी ऐकून त्याला गहिवरून आले. ........................ शब्दच फुटेना. (घसा)

त. समुद्राच्या ........................ काय मिळते? – मीठ. (पाणी)

थ. नदीकाठच्या ........................ रात्रीअपरात्री आवाज येतात. (बंगला)

द. ........................ आल्यावर तू लगेच अभ्यासाला बसतोस का? - मुळीच नाही. (शाळा)

## ११ योग्य विशेषण निवडून त्याचे योग्य रूप करून खालील संवाद पूर्ण करा.

**क. मुलगा**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **कसला** | **कसा** | **तसला** | **असा** | **असला** | **तसला** | **एवढा** |

आई : काय रे सम्या, एवढा का चिडलास रे? ........................ काय चुकीचं बोलले बाबा?

सम्या : म्हणजे काय! राग येणारच! ........................ बोलले ते, ऐकलंस ना तू? त्यांना काय मी ........................ मुलगा वाटतो का?

आई : काहीतरीच तुझं. हे ........................ काही मनात आणू नकोस. तुझे बाबा तुझ्या भल्यासाठीच बोलतात. आणि ........................ म्हणजे काय रे? तुझ्याच मनात ........................ तरी पूर्वग्रह आहेत, ते तपासून घे आधी.

**ख. सहकारी**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **अमका** | **असा** | **इतका** | **तसा** | **बरा** | **तमका** |

गीता : अक्षय, तू सारखा काय रे तुझ्या सहकाऱ्यांवर खार खाऊन असतोस? इतके का वाईट आहेत ते?

अक्षय : ..................... नाही रे. पण मी इतरांकडून त्यांच्याबद्दल ऐकलं आहे आणि .....................च जणांना त्रास दिलाय त्यांनी, काय सांगू तुला?

गीता : ह्याला काय अर्थ आहे? तुझा स्वतःचा अनुभव आहे का हा? ........................ एक माणूस म्हणाला, ........................ माणसाला त्रास झाला, म्हणून तुझं मत बदललं? ........................ ऐकीव माहितीवर विश्वास ठेवत जाऊ नकोस.



**ग. ज्योतिषी**

| कसला तसला इतका तसला असला जो तसा ज्याचा हा अमका असा |
|---|

वैभव : हे असं अचानक ज्योतिष्याकडे जाण्याचं काय सुचलं तुला? तुझा तर विश्वास नाही ना ह्या ...................... गोष्टींवर.

सुव्रत : विश्वास नाहीच आहे अजून. मला ...................... सगळे भोंदू वाटतात. पण माझी एक मैत्रीण आहे, ...................... मला चांगलं ओळखते, ती म्हणाली, "हा ...................... नाहीये. एकदा जाऊन तर पाहा!"

वैभव : अच्छा, म्हणजे ...................... एक मैत्रीण म्हणाली म्हणून तू जातोयस. अशी कोण आहे रे ती, ...................... तू ...................... ऐकतोयस.

सुव्रत : नाही रे दादा, तुला वाटतंय ...................... काही नाहीये. ती माझी फक्त चांगली मैत्रीण आहे, आमच्यात ...................... काही नाही.

वैभव : आता मला काय माहीत; तुमचं ........................... नातं आहे? असो, एकदा भेटव तरी तुझ्या त्या मैत्रिणीला.

**घ. घर**

| असा तसा कसा इतका असा |
|---|

विवेक : तुला कसं घर हवंय?

अशोक : भरपूर जागा, किमान एक मोठी बाल्कनी असेल ...................... घर हवंय.



विवेक : .......................... घर आता .......................... मोठ्या शहरात मिळणं अवघड आहे. भरपूर जागा नाही, पण एक छोटी बाल्कनी असलेलं घर आहे. हवंय का?

अशोक : मला नको ...................... घर. राहू दे, मी शोधतो अजून.

**च. बायको**

| तसा असा कसा असा |
|---|

अजय : तुला ...................... बायको हवीय?

अतुल : खूप शिकलेली, नोकरी करणारी, घरातील मोठ्यांचा आदर करेल ................ हवीय.

अजय : ...................... एक आहे माझ्या ओळखीत. परंतु तिची एक अट आहे; तिला नवरा बायकोचं स्वतंत्र घर हवंय.

अतुल : मला नको ...................... राहू दे, मी शोधतो.

## १२ योग्य काळातील क्रियापद निवडा व चुकीच्या क्रियापदावर काट मारा.

मिशिगनमधला एक शिक्षक बराच काळ एकटा राहत ~~आहे~~ / होता. **(क)** त्याने लग्नासाठी मुलगी शोधण्याचा खूप प्रयत्न केला / केला होता, **(ख)** पण हवी तशी बायको त्याला सापडलीच नाही / नव्हती. **(ग)** म्हणून तो पार पन्नाशी गाठेपर्यंत एकटाच आयुष्य रेटत आहे / होता. **(घ)** पण त्याच्या मनाची अस्वस्थता इतकी वाढत चालली आहे / होती, **(च)** की त्याने शेवटी एक मोठी मोहीमच



सुरू केली आहे / केली, **(छ)** त्याने निरनिराळ्या वृत्तपत्रांमध्ये आणि नियतकालिकांमध्ये जाहिरात प्रसिद्ध केली / केली होती. **(ज)** त्याला पुष्कळ स्त्रियांचा प्रतिसादही मिळाला / मिळाला होता. **(झ)** परंतु त्यातल्या बहुतेक जणी लांबच्या शहरात राहात होत्या / राहायच्या. **(ट)** तसा तो कित्येकींना डेटवर घेऊन गेला / गेला होता खरा, **(ठ)** पण ना त्याला आपलं शहर सोडवत आहे / होतं, ना त्या स्त्रियांना. **(ड)** शेवटी त्याला एक युक्ती सुचली / सुचत होती. **(ढ)** त्याने आपल्या घरासमोरील रस्त्यावर एक मोठी पाटी उभी केली आहे / केली. **(त)** पाटीवर लिहिलं आहे / होतं : 'घरासोबत आयुष्यभराची सोबत फुकट.'

## १३ उदाहरणाप्रमाणे लिहा.

उदा॰ (तुम्ही) जेवणे – बोलणे
"हे काय, तुम्ही अजून जेवताय का? चालू दे, त्यानंतर बोलू या."

क. काम करणे – चहा प्यायला जाणे

ख. गप्पा मारणे – बाहेर पडणे

ग. खेळणे – अभ्यासाला बसणे

घ. बोलणे – खेळणे

च. वाचणे – गप्पा मारणे

छ. उठणे – चर्चा करणे

## १४ उदाहरणात दाखवल्याप्रमाणे आधी काय घडले होते ते लिहा.

उदा॰ सायली खूप रडत होती, (मैत्रिणीला अपघात होणे) कारण तिच्या मैत्रिणीला अपघात झाला होता.




क. मयूरी खूप खूश होती, (परीक्षेत उत्तीर्ण होणे) ..............................................
..............................................................................................

ख. धनेश खूप नाराज होता, (मित्राने फसवणे) ..............................................
..............................................................................................

ग. प्राध्यापक दामले खूप चिडले होते, (विद्यार्थ्यांनी गृहपाठ न करणे) ..............................
..............................................................................................

घ. त्या अनोळखी शहरात तो फार गोंधळला होता, (रस्ता चुकणे) ..........................................
..........................................................................................

च. पिंटू आनंदाने उड्या मारत होता, (आज शाळा लवकर सुटणे) ..........................................
..........................................................................................

## १५ उदाहरणात दाखवल्याप्रमाणे नंतर काय घडले ते लिहा.

उदा॰ नील त्या वृत्तपत्राचा उपसंपादक झाला होता, (मित्रांसोबत बढती साजरी करणे) म्हणून त्याने मित्रांसोबत आपली बढती साजरी केली.

क. मृण्मयी संसाराला फार कंटाळली होती, (शेवटी घटस्फोट घेणे) ..........................................
..........................................................................................

ख. काही तरी नवीन शिकावं, असं मेहरुन्निसाला वाटत होतं, (एका नाट्यकार्यशाळेसाठी आपले नाव नोंदवणे) ..........................................
..........................................................................................

ग. विकी रात्रभर पार्टीत नाचत होता, (दुसऱ्या दिवशी पाय दुखायला लागणे) ..........................................
..........................................................................................

घ. शेजाऱ्यांच्या घराला आग लागली होती, (अग्निशामक दलाला फोन करून बोलावणे) ..........
..........................................................................................

च. त्याच्या मित्राला लेखनासाठी मोठा पुरस्कार मिळाला होता, (मित्रासाठी एक मोठा फुलांचा गुच्छ घेऊन येणे) ..........................................
..........................................................................................

## १६ उदाहरणात दाखवल्याप्रमाणे सल्ला द्या.




उदा॰ बाळ खूप रडतंय. काय करू?
अगं, त्याला थोडं बाहेर फिरायला ने. तू लहान असताना मीही तुला बाहेर फिरायला न्यायचे.

**क. मुलगा ऐकत नाहीये. काय करू?**
अरे, त्याला थोडं स्वातंत्र्य दे. ..........................................

**ख. मला वाटतं, माझ्या मुलीने शिक्षिका व्हावं. काय करू?**
अगं, तुझ्या इच्छा लादू नकोस तिच्यावर. ..........................................

**ग. मुलगा सारखा खोटं बोलतोय. काय करू?**
अरे, मग रागाव त्याला थोडं. ..........................................

**घ. मुलगा स्वयंपाक शिकायचं म्हणतोय. काय करू?**
अरे, मग तूच शिकव की त्याला स्वयंपाक! ..........................................................................................

**च. बाळ रात्रभर झोपू देत नाहीये. काय करू?**
अगं, त्याच्यासोबत रोज संध्याकाळी भरपूर खेळ. ................................................................................

## १७ खालील संवाद पूर्ण करा.

(मागवणे, पाठवणे, भरणे, येणे, लिहिणे, पडणे, विसरणे, करणे, वाचणे)

बॉस : मिसेस शेख, त्या ई-मेलचं उत्तर पाठवलंत का?
शेख : नाही, सर.
बॉस : माझं फ्रान्सचं तिकीट बुक (क) .............................. का?
शेख : नाही, सर.
बॉस : माझ्यासाठी टॅक्सी (ख) .............................. का?
शेख : नाही, सर.
बॉस : सगळी बिलं (ग) .............................. का?
शेख : नाही, सर.
बॉस : मेमो तरी (घ) .............................. का?
शेख : नाही, सर.
बॉस : मिसेस शेख, तुम्ही सगळंच (च) .............................. का?
शेख : नाही, सर. पण तुम्ही आजचं वर्तमानपत्र (छ) .............................. नाहीत का?
बॉस : नाही.
शेख : आज बातमी छापून (ज) .............................. आहे. आपली कंपनी बंद (झ) .............................. आहे.



## १८ वरीलप्रमाणे आणखी संवाद लिहा.

क. शिक्षक – विद्यार्थी    ख. बँक मॅनेजर – कर्मचारी    ग. बायको – नवरा

## १९ खालील नामांची अनेकवचनी रूपे लिहा. मग त्याखालील वाक्यांतील रिकाम्या जागी या नामांचे योग्य रूप (एकवचनी किंवा अनेकवचनी) लिहा.

उदा. तो किनारा, ते किनारे
महाराष्ट्राला बरेच सुंदर समुद्रकिनारे लाभले आहेत.

क. ते व्यक्तिमत्त्व, ..........................................................................
किती प्रसन्न .......................................................................... आहे तुमचं.

ख. तो उद्योगधंदा, ...........................................................
पोटापाण्यासाठीच करतो मी हे सगळे ............................................................. .

ग. ते स्थलांतर, .............................................................
मागील काही वर्षांत मी बरीच ............................................................. केली.

घ. ते धोरण, .................................................................
सरकारचं अल्पसंख्याकांबाबतचं नवं ................................................. कसं वाटतं तुला?

च. तो लोंढा, .................................................................
ग्रामीण भागातून लोकांचे ............................................................. शहरात येतात.

**२० खालील नामांची एकवचनी / अनेकवचनी रूपे लिहा. मग त्यापुढील रिकाम्या जागी त्या नामाचे योग्य रूप (एकवचनी किंवा अनेकवचनी) लिहा.**

क. ती रीत, ............................................. वागण्याबोलण्याची .........................................

ख. ..................................., त्या घडामोडी दिवसभरातील .................................................

ग. ..........................................., त्या मैफली गाण्याची .....................................................

घ. ते जुळे, .............................................. ताईची ......................................................

च. ..........................................., त्या राशी धान्याच्या ......................................................

**२१ खालील नामांची एकवचनी / अनेकवचनी रूपे लिहा. मग त्याखालील रिकाम्या जागी या नामांचे योग्य रूप (एकवचनी किंवा अनेकवचनी) लिहा.**



क. ..........................................., त्या वाटण्या
समान .......................................... कशा करायच्या?

ख. ती गार, ..........................................
किती ........................................ पडल्यात बघ अंगणात!

ग. ती नोकरी, ..........................................
सुमेध अजून किती ...................................... बदलणार आहे कुणास ठाऊक.

घ. ती बाजारपेठ, ..........................................
शहरातील जवळपास सगळ्या ...................................... पालथ्या घातल्या, पण तुला हवी तशी नथ नाही मिळाली.



च. ................................, त्या खुर्च्या
आमच्या आजोबांकडे एक नक्षीदार लाकडी
............................ होती.

छ. ती कळशी, ..............................................
अजून किती .......................................... भरायच्या बाकी आहेत?

## २२ राजू झोपेत सतत जागा बदलत राहतो. योग्य शब्दयोगी पद वापरून तो नेमका कुठे आहे ते लिहा.

(पलंगाखाली मागे - पलंगापाशी उभा - पलंगाशेजारी - पलंगावर डाव्या कुशीवर - पलंगाखाली मध्ये - पलंगावर उताणा (पाठीवर) - पलंग आणि खुर्चीच्या मध्ये - पलंगाच्या वर झोक्यामध्ये)




उदा॰ राजू पलंगासमोर झोपलाय.

क. ..........................................................................................................

ख. ..........................................................................................................

ग. ..........................................................................................................

घ. ..........................................................................................................

च. ..........................................................................................................

छ. ..........................................................................................................

ज. ..........................................................................................................

झ. ..........................................................................................................

## २३ योग्य शब्दयोगी पद वापरून 'गिल्टू' मांजर नेमकी कुठे आहे ते लिहा.



उदा॰ कार्पेटखाली



क. वॉशिंग मशीनच्या ----------



ख. दिव्या --------------



ग. फ्रिज ------------------



घ. टीव्ही ---------------



च. कॉम्प्यूटर ---------------




छ. नियतकालिकांच्या ----------



ज. फ्रिज --------------------



झ. छता --------------------

## २४ 'पुरते' की 'पुरेसे'?

उदा॰ पुरेसे पुरावे न मिळाल्यामुळे जजसाहेबांनी आरोपीला तेवढ्यापुरती तंबी देऊन सोडून दिले.

क. तसं मी बरंच काही करतो, पण आत्ता ………………… एवढी ओळख ………………… आहे.

ख. गेले काही दिवस पाण्याचा ………………… साठा नसल्यामुळे सोसायटीतल्या लोकांची ………………… तारांबळ उडाली.

ग. तेवढी एकच गोष्ट त्याचे डोळे उघडण्यास ………………… होती. त्याने त्याच्या ………………… तरी ठरवले, की आपण आता पुन्हा त्या वाटेला जायचे नाही.

छ. तिच्या ………………… म्हणायचे झाल्यास, या प्रवासासाठी तिने ………………… पैसे साठवले आहेत.

च. माझ्या ………………… काम मी केलं, पण ते ………………… नव्हतं.

## २५ कंसातील धातूला योग्य प्रत्यय जोडून धातुसाधिते रिकाम्या जागी भरा.




उदा॰ विमानात (बस) बसताना सर्व प्रवाशांना आपला मोबाईल 'एअरप्लेन मोड'वर **(क)** (ठेव) ………………… सांगितले जाते. अनेकांना आपला फोन चालू ठेवण्याची इच्छा होते. परंतु असे **(ख)** (कर) ………………… खूप धोकादायक असते. विमान चालू **(ग)** (अस) ………………… मोबाईल सुरू **(घ)** (राह) ………………… त्यातून निघणाऱ्या लहरी विमानाच्या यंत्रणेमध्ये अडथळा निर्माण **(च)** (कर) ………………………… शकतात, ज्यामुळे विमान **(छ)** (कोसळ) ………………………… अपघात होऊ शकतो.

## २६ उदाहरणाप्रमाणे योग्य सर्वनाम आणि धातुसाधित विशेषण लिहा.

उदा॰ जे मासे उडतात, ते उडणारे मासे. जी छत्री मी विसरलो, ती विसरलेली छत्री.

क. ………………… पाणी उकळत असतं, ते ………………… पाणी.

ख. ………………… मेणबत्ती जळत असते, ती ………………… मेणबत्ती.

ग. ………………… खिडकी मी चुकून उघडी ठेवली, ती चुकून उघडी ………………… खिडकी.

घ. ………………… हवा दूषित झालीये, ती दूषित ………………… हवा.

च. ………………… जखम झोंबते, ती ………………… जखम.

छ. ………………… वाद चालू राहतो, तो चालू ………………… वाद.

ज. ………………… झाड आज उन्मळून पडले, ते उन्मळून ………………… झाड.

झ. ………………… सूर्य मावळतो, तो ………………… सूर्य.

ट. ………………… ताप वाढतो, तो ………………… ताप.

ठ. ………………… भिंतीं रंगवल्या आहेत, त्या ………………… भिंती.

ड. ………………… नेत्याचा खून झाला, तो खून ………………… नेता.

## २७ पुढे दिलेल्या वाक्यांतील रिकाम्या जागी धातुसाधित विशेषणाचे योग्य रूप लिहा.

उदा० (करणे)
बँकेने जप्त केलेले फ्लॅट स्वस्तात मिळवून देतो, असे म्हणून लोकांची फसवणूक करणाऱ्या भामट्याला पोलिसांनी अखेरीस पकडले.

क. (देणे)
चित्रपटात मुलांनी टाकून .................... आई-बाबांची अंतर्मुख करणारी, मनाला वेदना .................... गोष्ट सांगितली आहे.

ख. (पडणे)
दिव्याचा बाहेर .................... मिणमिणता उजेड आणि त्या उजेडात भिंतीवर .................... सावल्या! एखाद्या हॉरर सिनेमाची आठवण करून देणारं दृश्य होतं ते!

ग. (राहणे)
शिक्षणापासून वंचित .............................. मुलांसाठी काम करणाऱ्या तरुणांच्या एका गटाने फुटपाथ व प्लॅटफॉर्मवर .......................... मुलांसाठी 'चला, घरी जाऊ' हा प्रकल्प सुरू केला आहे.

घ. (लिहिणे)
जन्माने कन्नड असून मराठीतून .................... त्या लेखिकेचे खूप कौतुक झाले. तिने .................... 'आनंदाचे झाड' ही कादंबरी समीक्षकांना खूप आवडली.

च. (खाणे)
नेहमी कमी .................... त्या मॉडेलला सणाच्या दिवशी .................... गोड पदार्थ आठवला आणि तिला वाटलं, आता आपलं वजन वाढणार.

## २८ योग्य स्थलवाचक शब्द वापरून खालील म्हणी पूर्ण करा.

(तिकडे, इथून, मागून, दुरून, तिथे, तिथून, वरून (२), शेजारी, कुठं, इकडे)

उदा० कानामागून आली आणि तिखट झाली

क. शिता .................... भाताची परीक्षा

ख. अगं अगं म्हशी, मला .................... नेशी?

ग. निंदकाचे घर असावे ....................

घ. अति .................... माती

च. .................... आड .................... विहीर

छ. .................... डोंगर साजरे

ज. .................... .................... सगळे सारखे

झ. त .................... ताक भात



## २९ कंसातील स्थलवाचक शब्दाचे योग्य रूप देऊन वाक्ये पूर्ण करा.

उदा. (दूर – जवळ)
आजीला आता दूरचं दिसत नाही. जवळ गेल्यावरच ती आपल्याला ओळखते.

क. (मागे – पुढे)
काय हो, बाबा! ............................ खेपेला तुम्ही किती मस्त भेटवस्तू आणल्या होत्या! आता ...................... कधी पुन्हा अमेरिकेला गेलात तर मी सांगितलेल्या वस्तू नक्की आणा.

ख. (तिथे – समोर)
आज मी एका गाण्याच्या कार्यक्रमाला गेलो होतो. .................... परत घरी येत असताना मला ...................... एक गाडी माझ्या दिशेने येताना दिसली, म्हणून मी बाजूला झालो, तर तेवढ्यात माझा पाय चिखलात पडला.

ग. (इकडे – तिकडे)
हल्ली .................... येणं होत नाही का तुझं? इतका कामात असतोस का? .................... काय खबरबात? सगळे ठीक आहेत ना?

घ. (वर – खाली)
.................... उदाहरणाप्रमाणे .................... वाक्यांतील रिकाम्या जागा भरा.

च. (वर – इथे)
आमच्या ......................... मजल्यावर एक मुलगी राहते. ती रोज सकाळी मोठमोठ्याने गात असते, तेही बेसूर. तिचा आवाज पार .......................... पर्यंत येत असतो.




## ३० 'जो'...'तो'ची योग्य रूपे वापरून खालील संवाद पूर्ण करा. आवश्यक तिथे सर्वनामाला योग्य प्रत्यय किंवा शब्दयोगी पदही जोडा.

उदा. अ : ऐक ना, माझ्याकडे एक पुस्तक आहे...
ब : जे तुला कचऱ्याच्या पेटीत सापडलं होतं तेच पुस्तक ना?

क. अ : ऐक ना, मी एक मोठा दगड पाहिलाय.
ब : .................... वरून पाणी वाहतं तोच दगड ना?

ख. अ : ऐक ना, तुला एक गोष्ट सांगायची आहे...
ब : .................... तो राजा शेवटी भिकारी होतो, तीच गोष्ट ना?

ग. अ : ऐक ना, तुझ्याशी आपल्या एका मित्राबद्दल बोलायचं आहे...
ब : .................... शी मी बोलणं सोडून दिलंय, त्याच्याबद्दलच ना?

घ. अ : ऐक ना, मी तुला एक प्रश्न विचारू?
ब : .................... माझ्याकडं काही उत्तर नाही, तोच प्रश्न ना?

च. अ : ऐक ना, तुला एक गोड बातमी सांगायची आहे...
ब : .................... ऐकण्यासाठी मी आतुर झालोय तीच बातमी ना?

३१ **खाली दिलेली वाक्ये नीट अभ्यासा, मग त्यातील कर्ता बदलून, प्रयोजक क्रियापद वापरून वाक्य तयार करा. नामांच्या सामान्यरूपांकडे विशेष लक्ष द्या.**

| | |
|---|---|
| प्राध्यापक | सिद्धांत |
| शिकणे | शिकवणे |
| मार्क्सवादाचा | विद्यार्थी |

विद्यार्थी प्राध्यापकांकडून मार्क्सवादाचा सिद्धांत शिकले.

उदा॰ प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना मार्क्सवादाचा सिद्धांत शिकवला.

क.

| | |
|---|---|
| झोपलेले लोक | कुत्रे |
| उडणे | उडवणे |
| गोंधळ | दिशेने |

झोपलेल्या लोकांच्या दिशेने धावत आलेल्या या कुत्र्यामुळे साऱ्या उद्यानात गोंधळ उडाला.



ख.

| | |
|---|---|
| पाण्याचे महत्त्व | रहिवासी |
| समजणे | समजावणे |
| सामाजिक कार्यकर्ता | चांगले |

त्या सामाजिक कार्यकर्त्यामुळे तेथील रहिवाशांना पाण्याचे महत्त्व चांगले समजले.



ग.

| | |
|---|---|
| अभिनेत्री | नको ते |
| ऐकणे | ऐकवणे |
| काढलेल्या सेल्फीमुळे | बरेच लोक |

काल काढलेल्या सेल्फीमुळे त्या अभिनेत्रीने बऱ्याच लोकांकडून नको ते ऐकले.

घ.

| | |
|---|---|
| प्रकाश | आम्ही |
| वळणे | वळवणे |
| स्तुती | मान |

आम्ही प्रकाशची स्तुती करू लागलो तर त्याची मान लगेच आमच्याकडे वळली.

## ३२ खालील काही संवादांमध्ये क्रियापदांची अदलाबदल झाली आहे. उदाहरणात दाखवल्याप्रमाणे शक्य क्रियापदाची योग्य जागा ठरवा व संवाद दुरुस्त करा.

उदा.

अ : काय गं, मी इतक्या प्रेमानं तुझ्यासाठी शिरा केला होता, तू खाववला नाहीस?

ब : खरं सांगू, तू शिऱ्यात चुकून साखरेऐवजी मीठ टाकलं होतंस, म्हणून माझ्याच्याने खाल्ला नाही.

अ : काय गं, मी इतक्या प्रेमानं तुझ्यासाठी शिरा केला होता, तू खाल्ला नाहीस?

ब : खरं सांगू, तू शिऱ्यात चुकून साखरेऐवजी मीठ टाकलं होतंस, म्हणून माझ्याच्याने खाववला नाही (खाल्ला गेला नाही).

क.



अ : आणखी एक चहा घेववशील ना?

ब : उशीर होईल घरी जायला. आणि जास्त चहा नाही घेत मला.

ख.

अ : तुझी आजीसुद्धा आरामात गड चढवत होती. तुला काय झालं होतं?

ब : अरे, माझा पाय लचकला होता. कितीही प्रयत्न केले तरी माझ्याच्याने गड चढतच नव्हता.



ग.



अ : काय रे, तुझी बहीण एवढ्या प्रेमानं गात होती. तू का ऐकवत नव्हतास?

ब : अगं आई, ती किती वाईट गात होती. मला तर तिचं गाणं ऐकत नव्हतं.

घ.

अ : अरे, घसा खराब आहे ना? मग पिववत ना तो काढा मुकाट्याने.

ब : नको ना प्लीज, फार कडू आहे हा काढा, मला नाही पी.



च.



अ : अरे ए, अजून किती लांब आहे तुझं घर? तू तर नुसता पुढे चालवत आहेस.

ब : का, काय झालं? तुला अजून चालत नाहीये का? बघ, आलंच घर.

## ३३ खालील तक्ता पूर्ण करा.

**क्रियापद-नामाची षष्ठी**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| उदा. चालणे (मार्ग / सवय / साधन) | षष्ठी रूप (ए.व.) | चालण्याचा मार्ग | चालण्याची सवय | चालण्याचे साधन |
| | षष्ठी रूप (अ.व.) | चालण्याचे मार्ग | चालण्याच्या सवयी | चालण्याची साधने / साधनं |
| क. गाणे (सराव / शैली / वळण) | षष्ठी रूप (ए.व.) | | | |
| | षष्ठी रूप (अ.व.) | | | |
| ख. लिहिणे (सराव / पद्धत / शिक्षण) | षष्ठी रूप (ए.व.) | | | |
| | षष्ठी रूप (अ.व.) | | | |
| ग. वाचणे (छंद / सोय / साधन) | षष्ठी रूप (ए.व.) | | | |
| | षष्ठी रूप (अ.व.) | | | |
| घ. चित्र काढणे (वर्ग / शिकवणी / तंत्र) | षष्ठी रूप (ए.व.) | | | |
| | षष्ठी रूप (अ.व.) | | | |
| च. भावगीते ऐकणे (छंद / जागा / स्थळ) | षष्ठी रूप (ए.व.) | | | |
| | षष्ठी रूप (अ.व.) | | | |
| छ. चित्रपट पाहणे (मार्ग / प्रेरणा / स्वरूप) | षष्ठी रूप (ए.व.) | | | |
| | षष्ठी रूप (अ.व.) | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ज. पोहणे (व्यायाम / क्षमता / समाधान) | षष्ठी रूप (ए॰व॰) | | | |
| | षष्ठी रूप (अ॰व॰) | | | |
| झ. नाचणे (वर्ग / शिकवणी / वय) | षष्ठी रूप (ए॰व॰) | | | |
| | षष्ठी रूप (अ॰व॰) | | | |

**३४ खालील संवादामध्ये रिकाम्या जागी 'नाचणे' ह्या क्रियापद-नामाच्या षष्ठीचे योग्य रूप वापरून संवाद पूर्ण करा.**

अनुपम : सलील, ही यू-ट्यूबवरची चित्रफीत पाहिलीस का?

सलील : नाही रे. कोण आहेत हे काका?



अनुपम : अरे, सध्या जगभर गाजताहेत हे 'डान्सिंग अंकल'! त्यांच्या ह्या उत्कृष्ट नृत्यामुळे सगळ्यांना नाचण्याचं वेड लागलंय.

सलील : अरे वा, भारी! कोण आहेत हे?

अनुपम : प्राध्यापक संजीव श्रीवास्तव. एका लग्नसमारंभात लोकांनी त्यांना (क) .................... आग्रह केला, आणि त्यांच्या एका विद्यार्थ्याने त्यांची ही चित्रफीत यू-ट्यूबवर टाकली. तेव्हापासून हे 'डान्सिंग अंकल' सोशल मीडियामध्ये चर्चेत आहेत.

सलील : तो बॉलीवूडचा अभिनेता गोविंदा, अगदी हुबेहूब त्याच्यासारखे नाचताहेत ते.

अनुपम : हो. गोविंदाचा नाच बघूनच त्यांच्या मनात (ख) .................... आवड निर्माण झाली. एकदा गोविंदासारखे (ग) .................... प्रबळ इच्छा झाली आणि हळूहळू ते हुबेहूब गोविंदासारखे नाचू लागले. आता तर त्यांच्या प्रसिद्धीमुळे एका टीव्ही शोमध्ये त्यांना (घ) .................... आमंत्रण मिळालंय. तिथे त्यांना खुद्द गोविंदा भेटायला येणार आहे. गोविंदासोबत (च) .................... त्यांचं स्वप्न सत्यात उतरणार आहे.

सलील : मस्तच. नाचायला वयाचं बंधन नसतं हेच खरं.

अनुपम : गोविंदाचं जुनं गाणं ह्या डान्सिंग अंकलमुळे पुन्हा गाजतंय. गोविंदा म्हणतो, "आम्ही कलाकार कितीही प्रसिद्ध असलो तरी डान्सिंग अंकल हे खरे कलाकार आहेत, कारण ते मनापासून नाचतात. त्यांच्यासोबत (छ) .................... संधी मला मिळतेय ही खरं तर माझ्यासाठी खूप आनंदाची गोष्ट आहे."

सलील : खरंय. ए, मलासुद्धा अशी हौस आहे. चल, आपणसुद्धा माझा नाच रेकॉर्ड करू या.

**१ खाली दिलेल्या शब्दांतून योग्य ते दोन शब्द जोडून चित्रपटक्षेत्राशी निगडित शब्द उदाहरणाप्रमाणे तयार करा.**

उदा॰ आशयसूत्र

समीप ~~आशय~~ उप कार कथा चित्र ध्वनि पट दृश्य कार
दूर पट कथा दृश्य छाया कृष्ण चित्र मंद शीर्षक
योजना पट लघु कार सूत्र गती वेषभूषा नेपथ्य करण छायाचित्र
चित्रण निर्मिती कथा बोल मूक प्रकाश पट संकलन
सूत्र कार धवल कार संकल्पन

## २ शब्दकोडे

खाली चित्रपट निर्मितिप्रक्रियेशी संबंधित काही इंग्रजी शब्द दिले आहेत. उदाहरणाप्रमाणे त्यांचे मराठी प्रतिशब्द शोधा आणि ते योग्य जागी लिहून शब्दकोडे पूर्ण करा.

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ पा | र्श्व | २ सं | गी | त | | | | | ३ | | | |
| | | | | | | | ४ | | | | | |
| | | | | ५ | | | | | | | | ६ |
| | | | | | | | | | | | | |
| ७ | | | | ८ | | | | | | | | |
| | | | | | | | | | | ९ | | |
| १० | | ११ | | | | | १२ | | | | | |
| | | | | | | | | | | | १३ | |
| | | | १४ | | | | १५ | | १६ | | | |
| | १७ | | | | | | | | | | | |
| १८ | | | | | | १९ | | | | | | २० |
| | | | | | | | | | | | २१ पॅ | न |

आडवे शब्द – १. बॅकग्राउंड म्युझिक ८. फिल्म ९. प्रोड्यूसर १०. स्क्रिप्ट रायटर १२. स्क्रीन प्ले १५. क्लोजअप १८. डिस्ट्रिब्यूटर १९. डिरेक्टर २१. पॅन

उभे शब्द – २. म्युझिक ३. ब्लॅक अँड व्हाईट ४. टॉकी ५. फोटोग्राफर ६. ॲक्टर ७. सायलेंट मूव्ही ११. स्टोरी १३. इमेज १४. सिंगर १६. स्क्रिप्ट १७. साँग २०. अँगल

## ३ खालील शब्दांचे वर्गीकरण करू या.

विनोदी – छायाचित्रकार – थरारपट – प्रतिमा – संज्ञापन – प्रसंग – संगीतकार – बालचित्रपट – लोकप्रिय – निर्माता – प्रेक्षक – पटकथा – वितरण – भीतिदायक – रंगभूषा – दिग्दर्शक – दर्जेदार – सूडकथा – खेळ – आशयसूत्र – उपकथानक – संकलन – रंगभूषाकार – गंभीर – कलाटणी – सुमार – रटाळ – भूमिका – कलादिग्दर्शक – उत्कंठावर्धक – संगीतमय – पार्श्वगायिका – राजकीय चित्रपट – नृत्यदिग्दर्शन – अविस्मरणीय – वास्तववादी – संकलक – पारितोषिकविजेता – भयपट – चित्रीकरण – अभिनेत्री

| कोण? | कसे? |
|---|---|
| | |
| **काय?** | **चित्रपटांचे प्रकार** |
| | |

## ४ खाली चित्रपटांचे काही प्रकार व त्यांचे वापरात असलेले इंग्रजी प्रतिशब्द दिले आहेत. योग्य जोड्या लावा.

| | |
|---|---|
| माहितीपट | हॉरर |
| वृत्तपट | डॉक्युमेंटरी |
| भयपट | न्यूज |
| व्यंगपट | कार्टून |
| थरारपट | मेनस्ट्रीम सिनेमा |
| मुख्यधारा चित्रपट | थ्रिलर |

## ५ उदाहरणात दाखवल्याप्रमाणे व्याख्या लिहा.

उदा॰ ऐतिहासिक चित्रपट : ऐतिहासिक विषय हाताळणारा चित्रपट

भयपट : प्रेक्षकांच्या मनात भय निर्माण करणारा चित्रपट

सामाजिक चित्रपट – बालचित्रपट – जाहिरातपट – अनुबोधपट – हास्यपट / विनोदी चित्रपट – राजकीय चित्रपट – ग्रामीण चित्रपट – गुन्हेगारीपट – प्रचारपट – रोमँटिक चित्रपट

-----------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------



## ६ नामांसाठी योग्य क्रियापद निवडा आणि या जोडीचा वाक्यात उपयोग करा.

| | | |
|---|---|---|
| क. | पटकथा | वठवणे |
| ख. | वास्तव | करणे |
| ग. | भूमिका | लिहिणे |
| घ. | जाहिरात | मांडणे |
| च. | निर्मितीमूल्ये | राखणे |

उदा॰

क. पटकथा – लिहिणे : दिग्दर्शकाच्या विनंतीवरून कथाकारानेच चित्रपटासाठी पटकथाही लिहिली.

ख. -----------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------

ग. -----------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------

घ. -----------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------

च. -----------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------

## ७ दादासाहेब फाळके यांच्या आयुष्यावरील 'हरिश्चंद्राची फॅक्टरी' ह्या चित्रपटाचा ट्रेलर पाहू या.

दादासाहेब फाळके ह्यांना भारतात चित्रपटांची निर्मिती करणे सोपे गेले का? त्यांना कोणत्या अडचणी आल्या?

## ८ खालील उताऱ्यात कंसातील क्रियापदाचे योग्य रूप वापरून पूर्ण करा.

दादासाहेब फाळक्यांनी इंग्लंडमध्ये (राहणे) राहून भारतीय चित्रपटांची निर्मिती (करणे) करावी असा आग्रह सेसिल हेपवर्थ ह्या मान्यवर ब्रिटिश निर्मात्याने **(क)** (धरणे) ------------. सहकुटुंब इंग्लंडमध्ये राहून काम **(ख)** (करणे) ------------ची आणि भरपूर पैसे **(ग)** (कमावणे) ------------ची ही संधी होती. पण दादासाहेबांनी ती नम्रपणे **(घ)** (नाकारणे) ------------. 'हा व्यवसाय माझ्या देशातच **(च)** (होणे) ------------ म्हणून मी झटलो, **(छ)** (धडपडणे) ------------. माझ्या कुटुंबियांचे हाल केले. भारतात ह्या माध्यमातून लोकरंजनाबरोबर लोकशिक्षण **(ज)** (होणे) ------------, शिवाय भारतीय संस्कृतीची ओळख येथील लोकांना **(झ)** (होणे) ------------ आणि शक्य **(ट)** (होणे) ------------ तर परकीय लोकांनाही व्हावी हाच माझा ध्यास आहे. आपले म्हणणे मी मान्य **(ठ)** (करणे) ------------ तर मी माझ्या ध्येयापासून, तत्त्वापासून दूर **(ड)** (जाणे) ------------, त्यामुळे मी ते मान्य करू शकत नाही ह्याबद्दल क्षमा **(ढ)** (असणे) ------------,' असे त्यांनी हेपवर्थ ह्यांना सांगितले.



बऱ्याच काळानंतर 'द मूव्हिंग पिक्चर्स' ह्या मासिकाच्या संपादकांनी आपल्या रौप्यमहोत्सवी अंकात **(त)** (लिहिणे) ------------ : 'भारतीय चित्रपट-व्यवसायाच्या दृष्टीने १९१७ हे वर्ष सर्वांत महत्त्वाचे होते, कारण ह्या वर्षी फाळके ह्यांचा 'लंकादहन' हा चित्रपट तयार झाला. देशात जिथे जिथे तो प्रदर्शित झाला तिथे तिथे त्याला प्रचंड यश मिळाले आणि व्यवसाय म्हणून चित्रपट ह्या कलेचे भारतातील भविष्य निश्चित झाले.'



**नववास्तववादी चित्रपट**

माणसाचा चिवटपणा आणि त्याची शोध घेण्याची वृत्ती या थक्क करणाऱ्या गोष्टी आहेत. अलीकडेच, दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात इटलीमध्ये निर्मिलेले नववास्तववादी चित्रपट परत एकदा माझ्या पाहण्यात आले. हे चित्रपट साक्षात्कार घडवणारे आहेत. या चित्रपटांमध्ये दिसणारी आयुष्यं ही जणू आज तिसऱ्या जगातल्या शहरांमध्ये राहणाऱ्या अक्षरशः कोट्यवधी लोकांची आयुष्यं आहेत – खरं तर, 'बायसिकल थीव्ज' हा चित्रपट त्याच्यात कुठलेही फेरफार न करता बँकॉक, पुणे, जाकार्ता अशा आशिया खंडातल्या शंभरएक शहरांमध्ये सहज चित्रित करता येऊ शकेल... माझ्या दृष्टीनं त्या काळातला इटली हा विकसनशील देशाचा एक महत्त्वाचा एक नमुना होता, जसा महात्मा गांधींचा भारत किंवा माओचा चीन आहे.

**– चार्ल्स कोरिया (वास्तुशिल्पी)**

## ९ वरील उद्धरण नीट वाचा.

क. चार्ल्स कोरिया यांनी 'नववास्तववादी' चित्रपटाची कोणती वैशिष्ट्ये मांडली आहेत ते लिहा.
ख. तुम्ही स्वतः असे चित्रपट पाहिले आहेत का? त्या चित्रपटांबद्दल थोडक्यात लिहा.

## १० भालचंद्र नेमाडे लिखित 'बिढार' ह्या कादंबरीतील एक उतारा वाचा.

(कादंबरीचा नायक चांगदेव पाटील हा ग्रामीण भागातून शहरात शिक्षणासाठी आलेला संवेदनशील तरुण आहे. शहरातील नवे जग तो सर्व अंगांनी समजून, अनुभवून, तपासून पाहत आहे. एकोणीसशे साठ-सत्तरच्या काळातील बदलणारे, घुसळणारे अस्वस्थ जग, माणसे, कला, कलावंत, जुन्या-नव्यातील संघर्ष असे सगळेच तो अंगावर घेत आहे. तो आणि त्याचा मित्र शंकर चित्रपटाचे चाहते आहेत.)

खरं म्हणजे सिनेमाचा अस्सल शोकिन चांगदेवच होता. मध्ये सगळंच उलटसुलट झाल्यानं आणि पैसे नसल्यानं सिनेमे बंदच होते. पण आता त्या दोघांच्या पूर्वी पाहिलेल्या चांगल्या चांगल्या सिनेमावर चर्चा सुरू झाल्या. बाकीच्या मित्रांनाही त्यात हळूहळू रस यायला लागला. कुठे चांगला इंग्रजी, इटालियन, जपानी, बंगाली सिनेमा असला की कोणी तरी कळवायचं. शंकर आणि चांगदेव रिकामेच असल्यानं नेमक्या वेळी मुंबईत कुठल्याही सिनेमाला बरोबर हजर व्हायचे. दुसरेही कोणी मोकळे असले तर हजर राहायचे. मग सिनेमा सुटल्यावर चहा पीत चर्चा. (...)

हिंदी सिनेमेही अधूनमधून चांगले निघायचे. त्यावेळी बर्मनदादाही* जोरात होते. किशोरकुमार* तर फॉर्मातच होता. वहिदा रेहमानही* बेहद्द जोरात होती. तशात नव्यानंच फेलिनीचा* *ला डोल्शे व्हिटा*ही लागून गेला होता. चांगदेवला आता खऱ्याखोट्या जगाची सरमिसळ फार अद्भुत वाटायला लागली. सगळ्या जगाचा तिटकारा येण्याचं काहीच कारण नव्हतं. कारण शेवटी ह्याच जगात चार्ली चॅप्लिन आहे, सत्यजित* आणि ऋत्विक* आहेत. किशोरकुमार आणि आय॰ एस॰ जोहर आहेत. वहिदा आणि गुरुदत्त आहेत. अली अकबर आणि बडे गुलाम आहेत. अगदी आत्ता ह्या घटकेला जिवंत आहेत. ह्या लोकांनीही आपल्यासारख्याच जीवनाच्या सीमा नक्कीच जाणल्या असतील. शेवटी हे आयुष्य फेलिनीच्या सिनेमासारखं गोड आयुष्य आहे. जगत राहावं. आहे तितके दिवस गोड मानून घ्यावं. गाणी ऐकत, पुस्तकं वाचत, सिनेमे पाहत, हातभट्टीची पीत, सिग्रेटी फुंकत त्या आणि ह्या जगाची सरमिसळ करून जगत राहावं. नूरजहाँसारखं 'मुहब्बत करे, खुश रहे, मुस्कराये' असं म्हणून नाचल्यासारखा, गायल्यासारखा, प्रत्येक क्षण आहे तसा भोगत राहावा. कडूपणा काही मनावर घेतल्यानं पातळ होत नाही. कडूपणा आत दाबून वरती अशी फुलं फुलवत राहावं. शेवटी आहेत तरी किती दिवस? खरं म्हणजे ठरावीक मर्यादेपर्यंतचा कडूपणा ज्यानं त्यानं पचवल्याशिवाय हे आयुष्य इतकं गोड होतच नाही. त्याशिवाय मोठमोठ्या अनुभवांचं आकलनही होत नाही. म्हणून युद्धातून पार पडलेले लोक महाभारत, इलियड लिहून बसले. सगळ्याच कलाकारांना काही तरी दुःखं असतील. आपल्यालाही आहे. म्हणून ह्या कलाकृतींचं पुरतं आकलन होतं.

**– भालचंद्र नेमाडे (कादंबरी – 'बिढार')**

*बर्मनदादा : सचिन देव बर्मन (१९०६-१९७५) सचिन देव बर्मन हे पन्नास ते सत्तरच्या दशकांमधील हिंदी चित्रपटसृष्टी गाजवणारे प्रतिभावंत संगीतकार आणि गायक.

*किशोरकुमार : (१९२९-१९८७) चित्रपट अभिनेता आणि मुख्यतः गायक. आजही त्यांची लोकप्रियता किंचितही कमी झालेली नाही.

*वहिदा रेहमान : (१९३८) संवेदनशील, बुद्धिमान आणि नृत्यकुशल अभिनेत्री. दिग्दर्शक गुरुदत्त ह्यांच्या सर्वात गाजलेल्या चित्रपटांची नायिका.

*फेदेरिको फेलिनी : (१९२०-१९९३) प्रतिभावंत इटालियन चित्रपट दिग्दर्शक. माणूस हा त्यांच्या कामाचा केंद्रबिंदू होता. मानवी जीवनातील चैतन्याचे जणू महाकाव्यच त्यांनी पडद्यावर उतरवले. सर्व बऱ्यावाईट अनुभवांमधून जाऊनही जीवनावर उत्कट प्रेम करणाऱ्या त्यांच्या कलाकृती आहेत.



*सत्यजित राय : (१९२१-१९९२) प्रतिभावंत भारतीय चित्रपट दिग्दर्शक, लेखक, चित्रकार, पार्श्वसंगीतकार. आधुनिक भारतीय चित्रपटकलेची पायाभरणी त्यांनी केली. भारतीय चित्रपट जागतिक स्तरावर नेला. त्यांना 'भारतरत्न' 'ऑस्कर जीवनगौरव', 'मॅगसेसे अवॉर्ड', ऑक्सफर्ड विश्वविद्यालयाचा 'डी॰लिट॰' बहुमान, फ्रान्सचा 'लेजिआँ दोनर' असे अनेक सन्मान देऊन गौरवण्यात आले.

*ऋत्विक घटक : (१९२५-१९७६) तीव्र संवेदनाशील आणि उत्कट भावाविष्कार करण्याची जबरदस्त ताकद असलेले घटक हे आणखी एक बंगाली चित्रपट दिग्दर्शक होते. लेखक, शिक्षक असणाऱ्या घटक ह्यांचा मोठा प्रभाव नंतरच्या अनेक चित्रपट दिग्दर्शकांवर पडला.

**क. चित्रपट माध्यमाची इथे कोणती वैशिष्ट्ये सांगितली आहेत ते लिहा.**

**ख. तुम्हाला चित्रपटातून काय मिळते? तुमचा अनुभव लिहा.**

## ११ ह्या छोट्याशा प्रसंगातील गाळलेला भाग तुमच्या कल्पनेने पूर्ण करा.

"अवंती, उठणार का आता? शिरा करतेय मी."
आईने शिऱ्याचे नाव काढल्याबरोबर अवंती उठलीच. पलंगावरून टुणकन उडी मारून स्वयंपाकघरात आली.
"कुठाय शिरा?" आईच्या पायांना हाताचा विळखा घालत अवंती पुटपुटली.
"मिळणार आहे. पण आधी काय करायचंऽऽ?"
उत्तर न देता आळसावलेल्या पावलांनी अवंती बेसिनपाशी गेली. टाचा उंचावून तिने नळ सोडला. तोंडावर पाण्याचे शिंतोडे उडवले. तोंडात पाणी घेऊन चूळ भरली आणि परत येऊन आईच्या पदराला तोंड पुसले.
आईने बशी भरून दिलेला शिरा घेऊन अवंती अंगणातल्या पायरीवर येऊन बसली आणि शिरा खाऊ लागली. इतक्यात तिचे लक्ष पायरीच्या कडेने धावणाऱ्या मुंग्यांच्या रांगेकडे गेले... ... ...
... ... ... आई धावत आली. तिने अवंतीला उचलून घरात आणले. तिच्या पायांवरच्या मुंग्या झटकल्या. मग तिला थंड पाण्याने भरलेल्या बादलीत उभे केले आणि म्हणाली, "त्रास दिलास ना तू मुंग्यांना? अं? म्हणूनच चावल्या त्या तुला. असं करू नये बाळा!"

**क. मग ह्या प्रसंगावर आधारित एक ते दोन मिनिटांचा लघुपट करण्यासाठी पटकथा लिहा. कथेचे महत्त्वाचे टप्पे निवडून ते पडद्यावर कसे सादर होतील ते डोळ्यांसमोर आणा आणि त्यानुसार पटकथा लिहा.**

उदा॰ **दृश्य १ : दुपारची उन्हे उतरतानाची वेळ. पलंगावर तीन-चार वर्षे वयाची अवंती गाढ झोपली आहे. परिसरातून दिवस मावळताना येणारे आवाज ऐकू येत आहेत.**
**दृश्य २ : स्वयंपाकघर. अवंतीची आई ओट्यापाशी उभी राहून काम करत आहे. ...**

## १२ क. खालील उतारा वाचा आणि त्यातील संयुक्त क्रियापदांची यादी करा.

(एक गुणी अभिनेता आणि यशस्वी दिग्दर्शक म्हणून टिनू आनंद ह्यांचे हिंदी चित्रपटसृष्टीत नाव आहे. काही वर्षांपूर्वी त्यांनी आकाशवाणीला दिलेल्या मुलाखतीमधील हा एक संपादित अंश –)

इंदर राज आनंद हे माझे वडील. एकोणीसशे पन्नास ते ऐंशी ह्या दशकांतल्या अत्यंत यशस्वी ठरलेल्या दोन-तीन डझन चित्रपटांचे पटकथाकार आणि संवादलेखक म्हणून ते प्रसिद्ध होते. त्यामुळे चित्रपटाची भाषा ऐकत आणि लहान-मोठ्या कलाकार-तंत्रज्ञांना जवळून पाहतच मी लहानाचा मोठा झालो. महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केल्यानंतर ह्याच क्षेत्रात काम करण्याचा मी निर्णय घेतला. माझ्या वडिलांना तो फारसा पसंत पडला नाही. त्यांनी मला समजावण्याचा प्रयत्न करून पाहिला, पण मी माझ्या निर्णयावर ठाम होतो. मला दिग्दर्शक व्हायचं होतं. वडील म्हणाले, “ठीक आहे. मी काही तुला अडवत नाही. पण जे काम करायचंय त्याचं रीतसर शिक्षण घे. एखाद्या चांगल्या दिग्दर्शकाच्या हाताखाली काही काळ काम कर आणि मगच ह्या क्षेत्रात ये.”

“तुम्हीच एखादं नाव सुचवा,” मी म्हटलं.

“दोन प्रतिभावंत दिग्दर्शक माझे चांगले मित्र आहेत. तुझी इच्छा असेल तर मी त्यांना विचारून बघतो.”

“कोण?”

“सत्यजित राय आणि फेदेरिको फेलिनी. तुला कोणाबरोबर काम करायला आवडेल?”

“फेलिनींबरोबर, अर्थातच!”

विसाव्या शतकातल्या त्या महान इटालियन दिग्दर्शकाकडे शिकायला मिळणार ह्या कल्पनेनंच मी हवेत तरंगायला लागलो.

वडिलांनी फेलिनींना पत्र लिहिलं. त्यांचं तत्पर उत्तरही आलं – “आनंदानं! तुझ्या मुलाला जरूर पाठवून दे. फक्त त्याला म्हणावं, इटालियन भाषा शिकून घे आणि मगच ये. इकडे कोणालाही इंग्रजी येत नाही.”

मी निराश झालो. मी इटालियन शिकणार कधी, फेलिनींकडे उमेदवारी करणार कधी आणि स्वतःचा चित्रपट करणार कधी... . मग वडिलांनी रायसाहेब कोलकात्यात आहेत ह्याची खात्री करून घेतली आणि त्यांनाही पत्र पाठवलं. उत्तराची वाट पाहण्याइतका धीर माझ्यापाशी नव्हता. मी सरळ कोलकात्याच्या गाडीत बसलो. दोन दिवसांचा प्रवास करून मुक्कामाच्या ठिकाणी पोहोचलो आणि वडिलांचा फोन आला : “अरे, कालच रायसाहेबांचा निरोप आलाय. त्यांच्या नव्या चित्रपटाचं काम सुरू झालंय, पण तुला देण्यासारखं काम त्यांच्याकडे नाहीये. पुढच्या चित्रपटासाठी ते तुझा नक्की विचार करतील. त्यामुळे तू परत ये, पण येण्यापूर्वी त्यांना भेट. ओळख करून घे त्यांच्याशी.”

मी अगदी निराश झालो. आल्या पावली परत जावंसं वाटत होतं, पण वडिलांना वाईट वाटेल म्हणून रायसाहेबांना भेटायचं ठरवलं. त्यांना फोन केला. ते आश्चर्यानं म्हणाले, “अरे! तू

आलायस होय! बरं, मग उद्या दुपारी घरी ये, मी वाट बघतो.”

दुसऱ्या दिवशी, थोडं मनाविरुद्धच, मी ठरल्या वेळेला त्यांच्या घरी पोहोचलो. दरवाजा प्रत्यक्ष रायसाहेबांनीच उघडला. म्हणाले, “ये, बैस. हातातलं काम पुरं करून मी आलोच.” असं म्हणून ते आतल्या खोलीत गेले. आतून टाइपरायटरची खडखड कानी पडू लागली. ती ऐकत मी बसून राहिलो. दहा मिनिटं गेली...वीस मिनिटं...अर्धा तास गेला. मी पुरता वैतागलो. वेळ लागणार होता तर मला आधी कशाला बोलावून ठेवलंय? ही मोठी माणसं म्हणजे... .

मनातल्या मनात असं चडफडत असतानाच टाइपरायटरचा आवाज थांबला आणि काही क्षणांत रायसाहेब बाहेर आले. त्यांच्या हातात कागदांचा लहानसा गठ्ठा होता.

“सॉरी, तुला थांबावं लागलं. इतक्या दुरून आलायस तू, तर तसंच परत जाऊ नयेस असं मला वाटतं. आमच्याबरोबर तू काम कर. मी तुला पगार देऊ शकणार नाही, माझ्याकडे तेवढं बजेट नाहीय. पण आम्ही आपापल्या घरून जेवणाचे डबे आणतो, त्यातून तुझी दोन वेळच्या जेवणाची सोय होईल, चालेल?”

मला काय बोलावं काही सुचेना.

“चित्रपटाची पटकथा बंगालीत आहे आणि सेटवर सगळं कामही बंगालीतच चालणार. तुला काही कळणार नाही. म्हणून पहाटे चार वाजता उठून पटकथेचा इंग्रजी अनुवाद टाइप करत बसलो होतो. हा घे.”

त्यांनी पुढे केलेले कागद मी यांत्रिकपणे घेतले. माझ्या तोंडातून शब्दच फुटेना.

आजही जेव्हा मनात निराशा दाटून येते, चारही बाजूंनी अंधारून आल्यासारखं वाटतं, तेव्हा त्या पटकथेचे कागद मी पांघरून घेतो. मला मग शांत झोप लागते.

(सत्यजित राय ह्यांच्या ‘गोपी गायने बाघा बायने’, ‘अरण्येर दिनरात्री’, ‘प्रतिद्वंदी’, ‘आशनी शोंकेत’ अशा काही महत्त्वाच्या चित्रपटांचे साहाय्यक दिग्दर्शक म्हणून टिनू आनंद ह्यांनी काम केले. ‘कालिया’, ‘शहनशाह’, ‘मेजरसाब’, ‘यह इश्क नही आसान’ हे त्यांनी दिग्दर्शित केलेले आणि गाजलेले काही हिंदी चित्रपट.)

**ख. काही लहान वाक्ये एकत्र गुंफून पुढील वाक्ये तयार झाली आहेत. ती लहान वाक्ये पुन्हा सुटी करून लिहा.**

अ. एकोणीसशे पन्नास ते ऐंशी ह्या दशकांतल्या अत्यंत यशस्वी ठरलेल्या दोन-तीन डझन चित्रपटांचे पटकथाकार आणि संवादलेखक म्हणून ते प्रसिद्ध होते.

आ. विसाव्या शतकातल्या त्या महान इटालियन दिग्दर्शकाकडे शिकायला मिळणार ह्या कल्पनेनंच मी हवेत तरंगायला लागलो.

**ग. शब्दजोड्या - उदाहरणात दाखवल्याप्रमाणे प्रत्येक जोडीचा अर्थ लिहा.**

उदा॰ लहानाचा मोठा = जो लहान होता तो मोठा होणे / करणे

तंत्रज्ञानाच्या मदतीने प्रतिमा लहानाची मोठी, आडव्याची उभी, तिरप्याची सरळ करणे फारच सोपे झाले आहे.

अ. काळ्याचा गोरा = ------------------------------------------------

“प्रकाशक म्हणाले, की तुम्ही चित्रात सगळे कावळे काळे दाखवले आहेत, त्यामुळे कावळ्यांच्या भावना दुखावल्यात असा आरोप होऊ शकतो. तेव्हा ते सगळे काळ्याचे गोरे करून द्या.



आ. पांढऱ्याचा काळा = ..............................................................

माझ्या वयाची सत्तरी होऊन गेली आहे. आता डोक्यावरचे केस पांढऱ्याचे काळे करून कुणाला खुश करू?



इ. हिरव्याचा पिवळा = ..............................................................

सकाळी खिडकी उघडून बाहेर पाहिले, तर सगळा परिसर हिरव्याचा पिवळा झाला होता. एका रात्रीत ऋतू बदलला होता.

ई. जाड्याचा बारीक = ..............................................................

कामोदला आम्ही सगळे 'जाड्या' म्हणून चिडवायचो. तो त्या सुमो पहिलवानाशेजारी उभा राहिल्यावर जाड्याचा बारीक, किंवा खरं तर जाड्याचा हडकुळाच दिसायला लागला.

**घ. पुढील लहान वाक्ये एकत्र गुंफा आणि मूळ अर्थ न बदलता त्याचे एकच वाक्य तयार करा.**

उदा॰ फक्त त्याला म्हणावं, इटालियन भाषा शिकून घे आणि मगच ये. इकडे कोणालाही इंग्रजी येत नाही.

उदा॰ फक्त त्याला म्हणावं, इकडे कोणालाही इंग्रजी येत नसल्यामुळे इटालियन भाषा शिकून घेऊन मगच ये.

अ. उत्तराची वाट पाहण्याइतका धीर माझ्यापाशी नव्हता. मी सरळ कोलकात्याच्या गाडीत बसलो.

आ. आतून टाइपरायटरची खडखड कानी पडू लागली. ती ऐकत मी बसून राहिलो.

इ. काही क्षणांत रायसाहेब बाहेर आले. त्यांच्या हातात कागदांचा लहानसा गठ्ठा होता.

**च. रिकाम्या जागा भरा.**

उदा॰ (वीस) ............................ शतकातल्या त्या महान दिग्दर्शकाकडे ...

विसाव्या शतकातल्या त्या महान दिग्दर्शकाकडे ...

अ. (पाच, रांग, सतरा) ............................ ............................ ............................

मुलाचं (आकाश) ............................ घारीकडे लक्ष गेलं. (चौदा) ............................

मुलानं ते हळूच पाहिलं आणि तो गालात हसला.

आ. (एकोणतीस, कविता) ............................ ............................ काही शब्द आमच्या ओळखीचे नव्हते.

इ. आज विसूकाकाने (पासष्ट) ............................ वर्षात प्रवेश केला.

**छ. पुढील अधोरेखित शब्दांऐवजी त्याच अर्थाचे वेगळे शब्द वापरून वाक्ये पुन्हा लिहा.**

अ. ... मी लहानाचा <u>मोठा झालो</u>.

आ. ... ह्याच क्षेत्रात काम करण्याचा मी <u>निर्णय घेतला.</u>

इ. ... वडिलांना तो फारसा <u>पसंत पडला नाही</u>.

ई. ... मी माझ्या निर्णयावर <u>ठाम होतो</u>.

उ. ... जे काम करायचंय त्याचं <u>रीतसर</u> शिक्षण घे.

## १३ पुढे दिलेल्या वाक्यांमधील क्रियापदांच्या जोड्या शोधा. त्या संयुक्त असण्याची किंवा नसण्याची कारणे स्पष्ट करा.

क. चोरण्यासारखे काही सापडले नाही म्हणून चोराने पलंगावरच्या चादरीच फाडून टाकल्या.
ख. "परवा मी अन्वरला जरा रागावून बोलले, तर अजून तेच डोक्यात घेऊन बसला आहे."
ग. "मी दुधाची बाटली आणते, तोपर्यंत बाळाला मांडीवर घेऊन बस."
घ. "आई, आज डब्यात पोळी नको ना गं! काहीतरी वेगळा खाऊ दे, प्लीज!"
च. "त्यांच्या आजाराचा खाण्याशी काही संबंध नाहीये. त्यांना जे आवडेल ते खाऊ द्या."
छ. "मला वाटतं, हा फोटो त्या टेबलावर शोभून दिसेल. ठेवून बघ तर!"
ज. "आईच्या कपाळावर ओल्या कापडाच्या घड्या ठेवून बघ, ताप उतरेल."
झ. राघवने सोडलेला दोर दिपूने घट्ट पकडून ठेवला आणि राघवने त्याला वर खेचून घेतले.





## १४ पुढील वाक्यांमधील रिकाम्या जागेत कोणते क्रियापद वापराल?

सांगणे, टाकणे, घेणे, बघणे, जाणे (३), बोलणे, पाहणे, लावणे, लागणे

क. "मंदिरा अशी अचानक का निघून ..........? तिचा फोन लावून .........."
ख. "मुलं आता मोठी झाली आहेत. बाहेर जाताना सांगून .......... नाहीत. विचारलं तर तोडून ........... समजावून .........., रागावून .........., पण काही परिणाम होत नाही."
ग. शिकारीला आलेल्या बिबट्याला दोन गायींनी पळवून ...........
घ. "बाबा, एवढीशीच भाजी उरली आहे. ती संपवून ........... तोपर्यंत मी ओटा पुसून .........."
च. तीन-चार दिवसांत पाऊस पडला नाही, तर पिके जळून .......... आणि शेतकऱ्यांना पुन्हा कर्जासाठी सावकाराच्या दारात जावे ...........

## १५ पुढील संवादातील रिकाम्या जागेत योग्य धातुसाधित क्रियापद वापरा.

करणे, होणे, पाठवणे, समजणे, लावणे, वाढवणे, दिसणे, लागणे (२)

**आगाशे :** सर..., सर, माझा पगार थोडा वाढवू शकाल का? घरी पैसे (क) .......... लागतात, त्यामुळे...

**साहेब :** आगाशे, तुम्ही नोकरीला (ख) .......... सहा महिनेही झालेले नाहीत. लगेच पगारवाढ कशी होईल? तुमचं काम तरी आम्हाला (ग) .......... पाहिजे की नाही? मन (घ) .......... काम करा, पगारवाढ यथावकाश होईलच. तीस वर्षांपूर्वी मला नोकरी (च) .........., तेव्हा पहिले सहा महिने पगारच मिळाला नव्हता.

**आगाशे :** सर, काहीच (छ) .......... शकणार नाही का?

**साहेब :** नाही. कंपनीचे काही नियम असतात, हे (ज) .......... घ्या, आगाशे. उगाच भलत्या अपेक्षा (झ) .......... जाऊ नका. निघा आता.

## १६ पुढील संवादातील रिकाम्या जागेत योग्य साहाय्यक क्रियापद वापरा.

ठेवणे, बसणे, जाणे, देणे (२), घेणे, पाहिजे, टाकणे, लागणे (४)

**आगाशे :** हॅलो, बावकर? अरे, मी एक घोडचूक करून बसलोय. करायला (क) ---------------- एक आणि झालं भलतंच.

**बावकर :** झाली का तुझ्या दिवसाची सुरुवात? आज काय नवा घोळ घालून (ख) ---------------- आहेस?

**आगाशे :** अरे, साहेबांनी बँकेला पाठवण्यासाठी दिलेल्या पत्राच्या पाकिटावर मी बायकोच्या माहेरचा पत्ता लिहिला आणि तिला पाठवण्याच्या पाकिटावर बँकेचा. ती माहेरी गेलीय ना! आता काय होईल?

**बावकर :** विशेष काही नाही, फक्त साहेब तुला कच्चा खाऊन (ग) ----------------. आगाशे, पत्र पाकिटात घालण्यापूर्वी नीट बघून (घ) ----------------, एवढंही तुला कळत नाही का रे?

**आगाशे :** कळतं रे, पण वेळेवर आठवतच नाही. आता काय करावं (च) ----------------?

**बावकर :** ताबडतोब पोस्टात जावं (छ) ----------------, पोस्टमास्तराचे पाय धरावे (ज) ---------------- आणि दोन्ही पत्रं परत आणावी (झ) ----------------.

**आगाशे :** पोस्टात? पोस्टात कशाला?

**बावकर :** कशाला! प्रश्न चांगला आहे. नसेल जायचं पोस्टात, तर मग तुझं प्रेमपत्र बँकेला मिळू (ट) ----------------; माझ्या काकाचं काही जात नाही.

**आगाशे :** अरे, पण पत्रं अजून पोस्टात टाकलेलीच नाहीयेत! तरीही मी जायला (ठ) ----------------?

**बावकर :** देवा! आगाशे, एक काम कर. माझ्या केबिनमध्ये ये. मला तुझे पाय धरू (ड) ----------------. ताबडतोब!

## १७ योग्य संयुक्त क्रियापद वापरून रिकाम्या जागा भरा.

**क. चिमणीचं पिल्लू**

उठू पाहत, पडून राहिलं, सांगत आला, ओढायला लागला, रडायला लागला, जाऊ शकेल, घाबरून गेलंय, मरून गेलंय, उडू शकेल, करायला लागलंय

छोटा चिंतन रडवेल्या आवाजात सांगत आला, "मामा, चिमणीचं पिल्लू पडलंय. बघ ना, कसं करायला लागलंय ते! चल ना!"

माझा शर्ट पकडून तो मला (अ) ---------------- ----------------. हातातलं काम सोडून मी उठलो. बाल्कनीत जाऊन पाहिलं, तर खरंच एक चिमुकलं पिल्लू कोपऱ्यात (आ) ---------------- ---------------- होतं. काही हालचाल करत नव्हतं.

"मामा, ते (इ) ---------------- ---------------- का?" चिंतन आता (ई) ---------------- ----------------.

"त्याला काही झालेलं नाहीय, चिंतू, ते दमलंय आणि (उ) ---------------- ----------------."

"का?"

"कारण त्याचं घर दूर राहिलंय."

तेवढ्यात त्या पिल्लानं पंखांची किंचित फडफड केली. ते (ऊ) ---------- ---------- होतं. "मामा, ते बघ!" चिंतन आनंदानं ओरडला, "आता ते (ए) ---------- ---------- आणि आपल्या घरी (ॲ) ---------- ----------, हो नं?"

**ख. सकाळचा चहा**

करता येत, आणावा लागला, निघायला हवं, घ्यायला पाहिजे, ऐकावं लागतंय, शोधायला पाहिजे, मिळू शकणार, करावेच लागतात, निघायला हवं, करावा लागतो, चढावे लागतात

"चला, निघायला हवं."

"एवढ्यात?"



"नऊ वाजले की लेका! दुकानं बंद होण्याआत दूध (अ) ---------- ----------, नाही तर सकाळचा चहा कुणालाच (आ) ---------- ---------- नाही. आपल्याला लवकर उठणं जमत नाही ना! मागच्या आठवड्यात एकदा कोपऱ्यावरच्या हॉटेलातून चहा (इ) ---------- ----------, त्यावरून अजूनही (ई) ---------- ----------."

"फारच लाड करतोस बाबा तू घरच्या माणसांचे."

"(उ) ---------- ----------, अवी! माझ्या घरात दोन म्हातारे, एक अपंग आई आणि मी एकुलता एक धडधाकट तरुण, एवढेच राहतो. पाच रुपयांची कोथिंबीर आणायची तरी आईला तीन मजले उतरावे आणि (ऊ) ---------- ----------. नोकरीच्या निमित्तानं मला सारखा प्रवास (ए) ---------- ----------. मला स्वयंपाक (ॲ) ---------- ---------- नाही. दुसरी नोकरी (ऐ) ---------- ----------. बघू! आत्ता तरी दुधाच्या शोधात (ओ) ---------- ----------. भेटू उद्या!"

## १८ खालील वाक्यांमधील नको असलेले क्रियापद खोडू या. रिकाम्या जागी अचूक संयुक्त क्रियापद लिहू या.

उदा॰ चांगले यश मिळण्यासाठी मेहनत **करावी** **पाहिजे** **लागते.** करावी लागणे

क. चल, पटकन सगळं दूध **खाऊन / पिऊन टाक.** ----------

ख. मला जरा शांतपणे **बसू / करू दे.** ----------

ग. माझ्या बोलण्याचा चुकीचा अर्थ **घेतला / म्हटला गेला.** ----------

घ. खरं काय ते आज **कळून / जाऊन चुकलं** मला. ----------

च. तो काहीही करून अधिक पैसे **कमवू / आणावं पाहतोय.** ----------

छ. वजन कमी करण्यासाठी नियमितपणे **चाललं / आलं पाहिजे.** ----------

## १९ एका उत्तम अभिनेत्याने काय केले पाहिजे?

उदा॰ (त्याला मिळालेल्या भूमिकेचा खोलवर अभ्यास करणे) एका उत्तम अभिनेत्याने त्याला मिळालेल्या भूमिकेचा खोलवर अभ्यास केला पाहिजे.

क. (वाचिक आणि कायिक अभिनयाची जाण असणे) ------------------------------------------------

ख. (स्वतःच्या प्रत्येक अनुभवाची अभिनेता म्हणून नोंद ठेवणे) ------------------------------------------------

ग. (पुस्तकांव्यतिरिक्त माणसेही वाचता येणे) ------------------------------------------------

## २० चित्रपटाचा संकलक काय करू शकतो?

उदा॰ (चित्रपटाची गतिमानता ठरवणे) संकलकाला चित्रपटाची गतिमानता ठरवता येते.

क. (प्रसंगांचे तुकडे एकत्र करून नवीन अर्थ साधणे) ------------------------------------------------

ख. (अनावश्यक प्रसंग वगळून कथा अधिक परिणामकारक करणे) ------------------------------------------------

ग. (प्रयोग म्हणून कथेला वेगळे वळण देणे) ------------------------------------------------

## २१ रिकाम्या जागी 'वाजवणे' ह्या क्रियापदाचे योग्य रूप लिहा.

उदा॰ मला तबला वाजवायला आवडते.



क. मी तबला ------------------ इच्छितो.

ख. तबला ------------------ माझी इच्छा आहे.

ग. मी तबला ------------------ उत्सुक आहे.

घ. आता माझ्या मुलाला तबला ------------------ येतो.

च. मी माझ्या मुलाला तबला ------------------ देतो.

छ. आठ वर्षांच्या मुलाने परदेशी पाहुण्यांसमोर तबला ------------------ दाखवला.

ज. मी माझ्या मुलाला तबला ------------------ ऐकतो.

झ. त्याने तबला ------------------ सुरुवात केली.

ट. मला रोज तबला ------------------ लागेल.

## २२ रिकाम्या जागी कंसातील क्रियापदाचे योग्य धातुसाधित रूप लिहा.

**माझा नवरा आणि आमचे मित्र.**



आम्ही जेव्हा आमच्या मित्रांना (नाचणे) नाचताना पाहतो, तेव्हा आम्हालाही वाटतं, कधीतरी आपल्यालाही त्यांच्यासारखं (क) (नाचणे) ------------------ येईल. ते जेव्हा आम्हाला पियानो (ख) (वाजवणे) ------------------ ऐकतात, तेव्हा ते नेहमी (ग) (नाचणे) ------------------ लागतात, पियानो ऐकला की ते शांत (घ) (बसणे) ------------------ शकत नाहीत. आम्हीही सध्या (च) (नाचणे) ------------------ शिकतोय. दर शनिवार-रविवारी आम्ही एका नृत्यशाळेत नाच (छ) (शिकणे) ------------------ जातो. आम्हाला खात्री आहे, आम्ही आमचं स्वप्न लवकरच पूर्ण (ज) (करणे) ------------------ शकू.

## २३ रिकाम्या जागी 'देणे' किंवा 'घेणे' ह्या क्रियापदांचा साहाय्यक क्रियापद म्हणून वापर करा.

उदा॰ माझ्या मुलांना हल्ली सारखे कॉम्प्युटरगेम्स खेळायचे असतात. त्यांचा गृहपाठ तर मी रोज जबरदस्तीने करून घेतो.

क. “आजोबा जेवताहेत ना? त्यांना त्रास देऊ नकोस, शांतपणे जेवू ------------------.

ख. मुलांनी मांजराचं पिल्लू गावाबाहेर सोडून ------------------.

ग. माझ्या मित्राला मी दिलेलं ब्रेसलेट फारसं आवडलं नाही, म्हणून त्यानं ते सोनाराकडून त्याला हवं तसं पुन्हा बनवून ------------------.

घ. “गरजेच्या वेळी तू एकटाच का रे सगळं करतोस? इतरांनाही मदत करू ----------- की कधी!

च. पाहुणे येण्याआधी आईने मुलांकडून घर स्वच्छ आवरून ------------------.

## २४ खालील वाक्ये संयुक्त क्रियापदे वापरून पुन्हा लिहा. काही वेळा सर्वनामांचे रूपही बदलावे लागेल.

उदा॰ श्रीमंती माणसाला कधी कधी उद्धट बनवते. (वागणे-लागणे)
श्रीमंतीमुळे माणसं कधी कधी उद्धट वागू लागतात.

क. जुन्या मित्रांबद्दल बोलताना समीरला रडूच फुटले. (रडणे-लागणे)

ख. “काय? तुझी मांजर तुझ्यासोबत बेडवर झोपते?” (झोपणे-देणे)

ग. अचानक कमरेत दुखू लागलं त्यामुळे तिला अंथरुणातून उठणंच जमेना. (उठणे-येणे)

घ. माणसांचा स्वभाव बदलणं अवघड असतं. (बदलणे-न शकणे)

च. “आज सुट्टी असल्यामुळे आम्ही सगळे बाहेर जाणार आहोत आणि फिरणार आहोत. (फिरणे-जाणे)

## २५ योग्य धातू + ता + 'येणे' वापरून प्रश्न लिहा.

उदा॰ गाणं – तुला गाणं म्हणता येतं का?

क. इंग्रजी
ख. गाडी
ग. फारसी लिपी
घ. गिटार
च. चांगली माणसं
छ. ध्यान
ज. लेख

## २६ उदाहरणात दाखवल्याप्रमाणे प्रतिक्रिया लिहा.

उदा॰ मी उद्या पत्र लिहीन, चालेल ना? – तुला आज लिहायला जमणार नाही का?

क. तुझं काम मी उद्या करीन, चालेल ना?
ख. तो उद्या बॉसला विचारेल, चालेल ना?
ग. तुझा निरोप ती उद्या देईल, चालेल ना?
घ. मी तुझी सायकल उद्या आणून देईन, चालेल ना?
च. आम्ही तुला उद्या भेटू, चालेल ना?

## २७ उदाहरणात दाखवल्याप्रमाणे प्रतिक्रिया लिहा.

उदा॰ किती सुंदर नदी आहे! – इथे पोहायला आवडेल मला.





क. किती अस्वच्छ कॅफे आहे!
ख. किती स्वादिष्ट जेवण मिळतं इथे!
ग. किती मस्त समुद्रकिनारा आहे!
घ. केवढी प्रशस्त कंपनी आहे!
च. किती थंड खोली आहे ही!
छ. किती कडक गादी आहे!
ज. केवढी हिरवळ आहे या बागेत!
झ. कसला विक्षिप्त बॉस आहे!
ट. केवढा पाऊस पडतो इथे!
ठ. केवढं मोठं शहर आहे!
ड. कसला छान डिस्को आहे!
ढ. केवढं नावाजलेलं विद्यापीठ आहे!

## २८ पुढील चित्रपट परीक्षणे वाचा.

दादासाहेब फाळक्यांच्या चित्रपटामधील प्रसंगांच्या रचनेवर, पात्रांच्या वेशभूषेवर त्या काळच्या मराठी नाटकांचा प्रभाव होता असे जाणवते. पण आपण नाटकच पाहतो आहोत असे मात्र वाटत नाही. प्रत्येक शॉटमध्ये नेपथ्याची मांडणी कशी असावी, पात्रांच्या हालचाली, त्यांचे नेमके हावभाव कसे असावेत ह्याचा विचार केलेला दिसतो. तेव्हाच्या नाटकातील अभिनय भडक, ठसठशीत असे. चित्रपटात अशा भडकपणाची गरज नाही हे फाळक्यांना चांगले उमजले होते. त्यांच्या कॅमेऱ्यानेही एका जागी स्थिर न राहता गरज असेल तेव्हा हालचाल केली आहे आणि घडणाऱ्या प्रसंगात प्रेक्षकालाही आपल्याबरोबर घेतले आहे. त्यामुळेच चित्रपट म्हणजे नाटक नव्हे, चित्रपटाची स्वतःची वेगळी भाषा असते ह्याचे त्यांना भान होते, हे त्यांच्या कामातूनच स्पष्टपणे जाणवते.

यासुजिरो ओझू ह्यांच्या 'ॲन ऑटम आफ्टरनून' (शरद ऋतूतील एक दुपार) ह्या चित्रपटात अत्याधुनिक जपानी घरे, बार, हॉटेले अशा औद्योगिक शहरी संस्कृतीच्या खुणा जागोजागी दिसतात. चित्रपट रंगीत आहे आणि त्यातील प्रत्येक शॉटची चित्रचौकट अत्यंत रेखीव आहे. ओझूंच्या इतर काही चित्रपटांप्रमाणेच ह्याही चित्रपटाचा कॅमेरा कुठलीही हालचाल करत नाही. जमिनीवर बसून ध्यानधारणा करणाऱ्या एखाद्या साधकाला स्थिर नजरेने जग जसे दिसत असेल तसे ह्या कॅमेऱ्याला दिसते. ओझू मुख्यतः विस्तृतभिंगाचा वापर करतात, त्यामुळे चित्रचौकटीला सखोलता मिळते. ती सपाट वाटत नाही. कथेमधील नाट्य प्रभावी करण्यासाठी वेगवान संकलन, समीपदृश्ये ह्यांचा सतत खेळ करून काही तरी घडवत राहण्याचे तंत्र इथे दिसत नाही. त्यामुळे चित्रपटाला तत्त्वज्ञानाची बैठक आणि निसर्गाची स्वाभाविक लय मिळाली आहे.



– अनिल झणकर

**'पैसे वसूल'**

'पैसे वसूल' सिनेमांच्या परंपरेत फिट्ट बसणारा हा चित्रपट आहे. तो प्रेक्षकाला विचार करण्यासाठी वेळच मिळू देत नाही. नयनरम्य स्थळे दाखवत अर्धे जग फिरवून आणणारी कथा, लोकप्रियतेच्या शिखरावर असणारे लाडके कलाकार, धुवाधार ॲक्शन, खमंग प्रेमकथा, टाळ्या-शिट्ट्याखेचक संवाद आणि खुर्चीतच नाचायला लावणारे संगीत. कपड्यांपासून गाड्यांपर्यंत आणि भव्य महालांपासून पात्रांच्या हातातल्या मोबाइलपर्यंत सगळे कसे चकाचक! प्रेक्षकाला आणखी काय हवे असते? चित्रपटगृह क्षणाक्षणाला उसळत ठेवण्याची करामत दिग्दर्शकाला उत्तम जमलेली आहे. सामाजिक समस्या, अन्याय-अत्याचार, ढासळणारे पर्यावरण असल्या सुतकी विषयांमध्ये रस असणाऱ्यांनी इकडे फिरकूच नये आणि इतरांच्या आनंदात मिठाचा खडा टाकू नये.

- तिसरा डोळा

**हरिश्चंद्राची फॅक्टरी : काही उल्लेखनीय पैलू**

(...) छायाचित्र आणि चित्रपट या दोन नव्या कला प्रचंड प्रमाणात तंत्रावर अवलंबून आहेत. त्यामुळेच त्या खऱ्या अर्थानं विसाव्या शतकातल्या आधुनिक कला आहेत. अशा एका कलेवर प्रभुत्व मिळवायचं असेल, तर भारतीयांनाही आधुनिकता ही संकल्पना डोळे उघडे ठेवून आणि विचारपूर्वक स्वीकारावीच लागेल, असं दिग्दर्शक परेश मोकाशी ह्या चित्रपटाच्या माध्यमातून स्पष्ट करतात. भारतीय समाजाला जुन्या, बुरसटलेल्या रूढींच्या आणि परंपरांच्या विळख्यातून बाहेर काढणं महत्त्वाचं आहे; केवळ राजकीय स्वातंत्र्य मिळवण्याचा उपयोग होणार नाही, असं तेव्हाच्या समाजसुधारकांचं मत होतं. त्या मताशी फाळक्यांच्या विचारांचीही नाळ जुळली होती, हे मोकाशींनी ओळखले आहे.

याच विचाराचा प्रत्यय मोकाशी चित्रपटीय भाषेतूनही देतात. सहज एखादी झुळूक यावी, तशी चित्रपटात अधूनमधून केशवसुतांची 'एक तुतारी द्या मज आणुनि' ही कविता येत राहते. केशवसुतांना आधुनिक मराठी कवितेचा जनक मानलं जातं.

आधुनिकता स्वीकारणं म्हणजे केवळ स्वतःच्या स्वार्थापुरताच विचार करणं नव्हे, हेही मोकाशींना उमजलेलं आहे. त्यांनी चित्रपटात फाळक्यांच्या बरोबरीनं त्यांच्या पत्नीला – सरस्वतीबाईंना – स्थान दिलेलं आहे. पतीला मानसिक आधार देणं, त्यानं घेतलेल्या जगावेगळ्या ध्यासापायी गरीबी, हालअपेष्टा सोसणं अशी पारंपरिक, सोशीक पत्नीची कर्तव्यं तर ती चोख पार पाडतेच; पण त्याहून पुष्कळ अधिक आणि सक्रिय असा सहभाग ती प्रत्यक्ष चित्रपटाच्या निर्मितीमध्ये घेते. चित्रफीत प्रोजेक्टरमधून सरकण्यासाठी तिला भोकं पडण्यापासून ते फिल्म स्टॉकवर रासायनिक प्रक्रिया करण्यापर्यंतची अनेक तांत्रिक कामं ती आत्मसात करते. फाळके भारतीय चित्रपटाचे जनक होते, हे सामान्य ज्ञान आहे. पण भारतीय चित्रपटाच्या या जननीला न्याय देऊन मोकाशींनी फार महत्त्वाचं काम केलेलं आहे.

**– अभिजित रणदिवे**

**क. पुढे दिलेल्या शब्दांच्या विरुद्ध अर्थाचे शब्द कंसातील शब्दांतून निवडा आणि योग्य जागी भरा.**

(नेमका, वेगवान, स्थिर, आधुनिक, रेखीव, भडक, सपाट, उदास, टापटीप, सखोलता)

| शब्द | विरुद्ध अर्थाचा शब्द |
|---|---|
| सौम्य | |
| बटबटीत / ओबडधोबड | |
| बुरसटलेला | |
| उंचसखल | |
| अस्थिर | |
| संथ / धिमा | |
| प्रसन्न | |
| उथळपणा / पसरटपणा | |
| चुकीच्या मापाचा | |
| गचाळ | |



**ख. कंसातील क्रियापदांचे योग्य रूप वापरून वाक्ये पूर्ण करा.**

अ. उंच (उसळणे) ------------------------------ लाटांमधून वाट काढत नाव किनाऱ्याकडे चालली होती.

आ. कालच्या पावसात जुन्या वाड्याची भिंत (ढासळणे) ------------------------------ आणि दोन जण जखमी झाले.

इ. आई आजारी आहे हे कळूनही तू तिला भेटायला (फिरकणे) ------------------------------ नाहीस.

**ग. शब्दकोशाच्या मदतीने पुढील वाक्प्रचारांचा अर्थ लिहा.**

अ. उमेदवारी करणे

आ. तोंडातून शब्द न फुटणे

इ. मिठाचा खडा टाकणे

ई. नाळ जुळणे

## २९ 'मी जिंकलो, मी हरलो' ह्या नाटकातील एक प्रवेश वाचा.

(नाटकाचा नायक संवेदनशील आणि विचारी आहे. त्याला अभिनेता व्हायचे आहे, पण ज्या प्रकारची नाटके करायची आहेत ती पैसे देत नाहीत. आर्थिक परिस्थिती कठीण असल्याने तो पत्नीच्या माहेरीच राहतो आहे. अखेर तिच्या आग्रहामुळे तो एका सामान्य, लोकप्रिय, बाजारू चित्रपटात भूमिका करतो. पहिल्या खेळानंतर दादा – माधवचे सासरे आणि मेहुणा मधुकर, असे दोघे त्या चित्रपटाबद्दल चर्चा करत आहेत.)

**दादा** : मधुकर –

**मधू** : काय दादा?



**दादा** : काल रात्रीचा चित्रपट तुला कसा वाटला? तू नेहमी पाहतोस म्हणून विचारतो.

**मधू** : भिकार वाटला. रात्रीपासून सांगायला पाहतोय, पण कुणी ऐकायला तयार नाही.

**दादा** : जावयांचं काम?

**मधू** : त्याबद्दल न बोललेलंच बरं. पण बोलायचंच तर, भयंकर झालं. पण बोलून काय उपयोग? ते आता पॉप्युलर झालं म्हणजे – संपलंच. (...)

**दादा** : एकूण तू तरी सुबुद्ध आहेस.

**मधू** : म्हणूनच दादा, मला वाटतं, मी निरुपयोगी आहे.

**दादा** : माणसानं निरुपयोगी असणं हा गुन्हा नव्हे. (...) त्यानं निर्बुद्ध असणं हा मात्र फार गंभीर स्वरूपाचा गुन्हा आहे. इंडियन पीनल कोडाखाली दंडनीय ठरवायला हवा तो. पण ते शक्य नाही. तेव्हा ठीकच आहे.

**मधू** : पण मला एका दृष्टीनं कौतुक वाटतं आपल्या भाईंचं. (...)

**दादा** : ते कशाबद्दल?

**मधू** : कालच्या सबंध पिक्चरमध्ये पी॰ दत्ता या उजेड आणि अंधार देणाऱ्या, तसंच रोजचा घास देणाऱ्या इसमाच्या इच्छेबरहुकूम त्यांनी उड्या मारल्या, तोंडं वेडीवाकडी केली, घसरून तीनदा आपटले, कंबर हलवून एक भयंकर नाच सबंध तीन मिनिटं कोणाच्या तरी गाण्यावर केला, उघडेबंब कॅमेऱ्यासमोर आले, किमान पन्नास हास्यास्पद वाक्यं बोलले. (...) प्रेमाचे सीन केले. आणि वर पुन्हा हे सारं आपल्याबरोबर बसून काल रात्री शांतपणे पाहत होते! आज सकाळपासून त्या मुलाखती. 'आपली महत्त्वाकांक्षा भारताचे चार्ली चॅप्लिन होण्याची आहे की डॅनी के होण्याची?' 'आपण भारताचे गृहमंत्री झालात तर प्रथम काय कराल?' 'आपल्या आयुष्याचं तत्त्वज्ञान साधारणतः सात विनोदी वाक्यांत सांगा.' 'पी॰ दत्ता यांच्या कुशल आणि कल्पक दिग्दर्शनाची आपल्याला आपल्या उत्कृष्ट भूमिकेच्या यशात किती मदत झाली?'...आणि ते फोटो, डोक्यावर दोन हात धरून नाचताना, दाढीचा साबण फासलेल्या तोंडानं हसताना, शीर्षासन घालताना, स्वैपाक करताना...हॅंः! आपण तर निदान दोन खून केले असते.

**दादा** : कुणाचे?

**मधू** : एक पी॰ दत्ताचा – आणि दुसरा स्वतःचा.

**दादा** : तरीपण आणखी अनेक पी॰ दत्ता राहणारच – फार झालेले दिसतात ते हल्ली.

**मधू** : हो. ते खरंच.

**दादा** : तरीपण एकंदरीने तू बराच सुबुद्ध दिसतोस, मधुकर.

**मधू** : पण उपयोग काय! मी निरुपयोगी आहे.

**- विजय तेंडुलकर**

**क. मधुकरने केलेल्या वर्णनाशी जुळणारा एखादा चित्रपट तुम्ही पाहिला आहे का? असल्यास त्या चित्रपटाविषयी थोडक्यात लिहा.**

**ख. खालील मुद्द्यांच्या मदतीने आपल्याला सर्वात जास्त आवडलेल्या एका चित्रपटाचे परीक्षण लिहा.**

कथेची मांडणी – विषयाची हाताळणी – दिग्दर्शकाची समज – छायाचित्रण – अभिनय – संगीत – संकलन – इतर तांत्रिक बाजू



**१** **आत्तापर्यंत 'विरंगुळा' ह्या विषयाला अनुसरून तुम्ही जे जे शब्द शिकलात ते छोट्या गोलात लिहा. एक उदाहरण दिले आहेच.**




**२** **वाचा.**

**कंटाळा आला!**

आमच्या चिंगीला सारखा कंटाळाच आलेला असतो. तिला काहीही करायला सांगितलं तरी 'नको गं, कंटाळा आलाय आत्ता' असंच उत्तर असतं. मग ते 'जेवायला ये गं' अशी हाक असो किंवा 'सिनेमाला जाऊ या का?' असा प्रश्न असो. लहानपणी ती खूपच चेंगट होती, म्हणून तिला 'चिंगी' असं नाव पडलं. आता ह्या सततच्या आळसाला आणि कंटाळ्याला साजेल असं कोणतं नाव तिला द्यावं, असा विचार मला पडलाय.

बरं, तिचा हा कंटाळा जावा म्हणून आम्ही काहीच उपाय केले नाहीत असं नाही हं! तिच्या बरोबरीच्या मुली कशा शाळेव्यतिरिक्त इतर कित्येक गोष्टींत स्वतःला अडकवून घेतात! किती वेगवेगळे छंद असतात त्यांना! कोणी नाचाच्या क्लासला जाते, कोणी चित्रकलेत रस घेते, कोणाला गायनात गती असते तर कोणी कोणत्या तरी खेळात प्रावीण्य मिळवते. आमची चिंगी मात्र शाळेतून घरी येते आणि 'कंटाळा आला' अशी भुणभुण करत घरभर फिरत राहते. तिला कसली तरी आवड निर्माण व्हावी, कशाचा तरी नाद तिला लागावा, कोणत्या तरी ध्यासानं ती अगदी वेडी होऊन जावी आणि तिच्या ह्या वेडात मी तिला बरोबरीने साथ द्यावी, असं मला किती किती वाटतं म्हणून सांगू!



चिंगी काही न करता आकाशाकडे बघत राहते हे माझ्या लक्षात आल्यावर तिला आकाशनिरीक्षण करायला आवडत असेल, असा विचार करून मी लगेच एक दुर्बीण आणि ग्रह-ताऱ्यांची माहिती देणारी पुस्तकं आणली. हा छंद तिनं जोपासावा म्हणून कोणते क्लास लावावेत ह्याची माहिती काढायला सुरुवात केली. अगदी तिच्याबरोबर मीही ह्या क्लासला नाव घालण्याची तयारी केली. पण कसलं काय! 'मला नाही जायचं ह्या क्लासला, मला कंटाळा येतो' असं म्हणून तिनं जो सूर लावला ना! हात टेकले आम्ही तिच्यापुढे. नेहमीच्या रूढ गोष्टी तिला आवडत नसतील, तर तिनं वेगळं काही करावं – भाषा शिकाव्यात, प्रवास करावेत, पोस्टाची तिकिटं, नाणी – असा कसला तरी संग्रह करावा म्हणून आम्ही जंगजंग पछाडलं, पण नाही. सगळं पालथ्या घड्यावर पाणी.



अगदी कळस झाला तो आम्ही तिला जबरदस्तीनं गाण्याच्या क्लासला घातलं तेव्हा. आमच्याच बिल्डींगमध्ये खालच्या मजल्यावर नुकताच गाण्याचा क्लास निघाला होता. चिंगीचा आवाज बरा आहे, म्हणून मी तिला न विचारताच तिचं नाव घातलं. क्लासच्या पहिल्या दिवशी वही, पेन वगैरे वस्तू देऊन तिला खाली पिटाळलं. अर्धा तास मी अगदी खुशीत होते. तिचा फोन आला नाही, 'मला घरी यायचंय' म्हणून. रमली वाटतं. साधारण अर्ध्या तासानं घराच्या दारात काही तरी चाहूल लागली म्हणून मी दार उघडून पाहिलं, तर ही पट्ठी दाराबाहेरच मुसमुसत उभी होती. गेलीच नव्हती खाली. मी दार उघडलं तशी गळ्यात पडली माझ्या. "मला नको ना गं पाठवू क्लासला. मला नाही आवडत. कंटाळा येतो."

आता मात्र चिंगीच्या वाटेला जायचं नाही असंच मी ठरवलंय. तिच्या कंटाळण्याचा अगदी कंटाळा आलाय मला. पण मी आशा सोडलेली नाहीय. आत्ता कुठे बारा-तेरा वर्षांची आहे चिंगी. होईल तिला आवड निर्माण कशाची तरी. मग विरंगुळा म्हणून ती त्यात रमेल, सवय लागेल तिला, छंदच होईल तो तिचा, अगदी नादावेल ती. आणि मी असेनच ना तिला साथ द्यायला!

**क. वरील उताऱ्यातील नाम आणि क्रियापदांच्या जोड्या खालील तक्त्यात दिल्या आहेत. त्या शोधून खालील तक्ता पूर्ण करा आणि उदाहरणादाखल एक वाक्य बनवा.**

| | नाम | क्रियापद |
|---|---|---|
| अ. | आशा | जाणे |
| आ. | नाद | सोडणे |
| इ. | गळ्यात | लागणे |
| ई. | वाटेला | लागणे |
| उ. | चाहूल | देणे |
| ऊ. | सवय | पडणे |
| ए. | साथ | टेकणे |

| जोडी | वाक्य |
|---|---|
| आशा सोडणे | प्रयत्न केला तर मी नक्कीच चांगली गायिका होईन. मी आशा सोडलेली नाही. |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ॲ. | छंद | पछाडणे | | |
| ऐ. | गती | होणे | | |
| ओ. | कळस | जोपासणे | | |
| ऑ. | हात | असणे | | |
| औ. | जंगजंग | लागणे | | |

**ख. वरील उताऱ्यात चिंगी, तिची आई आणि चिंगीचा कंटाळा जावा म्हणून तिच्या आईची होणारी धडपड ह्याविषयी बरीच माहिती आपल्याला मिळाली. ह्या उताऱ्यातील काही शब्द खाली दिले आहेत. खालील तक्त्यात योग्य जागी योग्य शब्द भरून हा तक्ता पूर्ण करा.**

कंटाळा, नको गं, नाच, आवड, चेंगट,
आळस, गती असणे, चित्रकला, खेळ, नाद, मुसमुसणे,
नाही आवडत, आकाशनिरीक्षण, ध्यास, गायन,
अन्य भाषाशिक्षण, प्रवास, नाणेसंग्रह, छंद



| | 'चिंगी' ह्या व्यक्तीविषयी माहिती देणारे शब्द | 'विरंगुळा' ह्या शब्दाला पर्यायी शब्द | आईने शोधलेले विरंगुळ्याचे उपाय |
|---|---|---|---|
| अ. | कंटाळा | छंद | नाच |
| आ. | | | |
| इ. | | | |
| ई. | | | |
| उ. | | | |
| ऊ. | | | |
| ए. | | | |
| ॲ. | | | |

**ग. चिंगी आणि तिची आई ह्यांच्या भूमिका आता आपण बदलणार आहोत. म्हणजे चिंगीची आई विनया सतत कंटाळलेली असते. तिला कशातच रस वाटत नाही. ह्याउलट चिंगीला असं वाटतंय की आईनं काही तरी विरंगुळा शोधावा, घराबाहेर पडावं. चिंगीच्या दृष्टिकोनातून तिच्या आईवर वरीलप्रमाणे एक छोटासा उतारा लिहा. तुम्हीच शोधलेले शब्द आणि वाक्प्रचार तुमच्या मदतीला आहेतच!**

### ३ ऐका.

**कंटाळा - संदीप खरे**

### ४ हा छंद सोड सोड!

कमीजास्त प्रमाणात छंद प्रत्येकालाच असतात किंवा असावेत. ही विरंगुळ्याची छानशी वाट रोजच्या आयुष्यातील दगदगीतून आणि कंटाळ्यातून बाहेर पडण्यासाठी शोधलेली असते. पण केवळ विरंगुळा म्हणून सुरू झालेली ही वाटचाल कधीकधी संपूर्ण आयुष्यच व्यापून टाकते. छंदाचा अतिरेक झाला तर छंदच व्यसन बनतो. मग हे छांदिष्ट लोक घर-दार, कुटुंब, संसार ह्यांचा विचारही करत नाहीत. ही वेडावलेली माणसे झपाटल्यासारखी आपल्या छंदाच्या मागे लागतात. त्यासाठी प्रकृतीची हेळसांड करतात, पाण्यासारखा पैसा खर्च करतात. हा छंदच त्यांच्या आयुष्याचा ताबा घेतो.

जयंत हा असाच एक झपाटलेला माणूस. त्याला असणारी पुरातन गोष्टींची आवड सर्वांनाच माहीत होती. त्याच्या आजोबांकडे काही दुर्मीळ नाणी होती. त्यामुळे ते गेल्यानंतर ती १५-२० नाणी जयंतला मिळाली. तेव्हा तो होता अवघ्या बारा वर्षांचा. त्याने ती नाणी आपल्याजवळच्या एका छोट्या पेटीत ठेवली. मधूनमधून तो ती पाहत असे आणि खूश होत असे. मग जवळच्या मंडळीपैकी कोणी तरी कधी तरी स्वतःजवळ असलेले एखादे जुने नाणे त्याला देई. जयंतचा नाण्यांचा संग्रह असाच हळूहळू वाढत गेला. त्याच्या ह्या आवडीचे, छंदाचे घरात कौतुक होत राहिले.

पुढे तो कॉलेजमध्ये असताना दुर्मीळ नाण्यांच्या संग्रहाविषयीचा एक लेख त्याच्या वाचनात आला आणि त्याचे जगच बदलून गेले. ज्या वृद्ध गृहस्थांनी हा लेख लिहिला होता त्यांना भेटायला जयंत स्वतःजवळची नाणी घेऊन गेला. ती दुर्मीळ नाणी पाहून म्हातारबुवा फारच खूश झाले. त्यांनी आपल्याला असणारी त्या नाण्यांविषयीची बरीच माहिती जयंतला दिली आणि शिवाय काही पुस्तकेही वाचायला दिली. म्हातारबुवांना भेटायला जयंत मग वरचेवर जात राहिला आणि हळूहळू त्याचे जीवनच बदलून गेले. शिक्षणाला रामराम ठोकून दुर्मीळ नाण्यांविषयीची माहिती आणि प्रत्यक्ष नाणी मिळवण्यासाठी तो भटकत राहिला. इथवर तसं ठीक होतं. पण जेव्हा तो नाण्यांच्या शोधापायी गुप्त खजिन्यांच्या मागे लागला तेव्हा मात्र गोष्टी अगदी हाताबाहेर गेल्या. आज जयंत सतत कोणत्या तरी भोंदूबाबांच्या मागे असतो. त्यांच्या मागे फिरतो. जादूटोणा, जंतर मंतर करतो. घर त्याने कधीच सोडले आहे. कुठे राहतो, काय खातो-पितो कोण जाणे! गुप्त खजिने शोधणे हा एकच ध्यास त्याला आहे.



जयंतचे म्हातारे आई-वडील नेहमी डोळ्यात पाणी आणून सर्वांना सांगत : 'बाबांनो, छंद अवश्य असू दे, पण त्याचा अतिरेक नसू दे. नाद करा, पण नादावून जाऊ नका. तुमच्या छंदाचा,

नादाचा जगाला फायदा होऊ दे. छंदासाठी स्वतःचं आयुष्य उधळून देऊ नका, फार मौल्यवान आहे ते!'

आणि ... आणि अचानक अघटित घडले. एका अतिशय दुर्गम भागातील जुन्या किल्ल्यावर शोधाशोध करताना जयंतला खरोखरच एक पुरातन काळातील नाण्यांचा खजिना सापडला. झालं! जयंतला रातोरात प्रसिध्दी मिळाली. अनेक वार्ताहर त्याची मुलाखत घ्यायला त्याच्यामागे लागले.

**क. तुम्ही 'महाराष्ट्र वार्तापत्र' ह्या साप्ताहिकाचे वार्ताहर आहात आणि जयंतची मुलाखत घेत आहात. वरील उताऱ्याच्या आधारे जयंतची मुलाखत प्रश्नोत्तर स्वरूपात लिहा.**

## ५ खालील क्रियापद-नामांचे सप्तमीचे रूप वापरून वाक्ये पूर्ण करा.

(रडणे, बघणे, वाचणे, बोलणे, सोडवणे, आपटणे, पाहणे, करणे)

उदा० काय? चार डोक्यांचा माणूस? काहीही छापतात हे वर्तमानपत्रवाले. असा विचित्र प्रकार अजून तरी माझ्या पाहण्यात आलेला नाही.



क. गीता पत्र ---------------- इतकी मशगूल झाली होती, की सोनूच्या रडण्याचा आवाज तिला ऐकूच आला नाही.

ख. हे बघा, राजू आणि पिंटू, आता ---------------- आणि हातपाय ---------------- काही अर्थ नाही. बाबांचा पक्का निर्णय झालाय आता. आइस्क्रीम मिळणार नाही.

ग. गणिते ---------------- मंजूला अगदीच गती नाही. तिला नाच ---------------- फार रस आहे.

घ. फोनवर ---------------- आणि टीव्ही ---------------- नानांचा सगळा दिवस जातो.

## ६ योग्य क्रियापद-नामाचे सप्तमीचे रूप करून रिकाम्या जागा भरा.

(करणे (३), ठेवणे, ऐकणे (२), बघणे, शिकणे)

क. "जवळपास एखादा गाण्याचा चांगला क्लास तुमच्या ---------------- आला आहे का? आमच्या लेकीला आवड आहे गाण्याची ...."

ख. काल मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत तीन पुस्तकांचे प्रकाशन ---------------- आले. त्या प्रसंगी तिन्ही पुस्तकांच्या लेखकांचे सत्कारही ---------------- आले. संबंधित प्रकाशनसंस्थांची इतरही पुस्तके विक्रीसाठी ---------------- आली होती.

ग. घरात बसून टीव्ही ---------------- वेळ घालवण्यापेक्षा बाहेर पडावं असं मला वाटतं. मला भाषा ----------------, वेगवेगळ्या विषयांवरची व्याख्यानं ---------------- रस आहे. स्वयंपाक, घरकाम, शेजाऱ्यांशी गप्पा अशा गोष्टी ---------------- मी रमत नाही.

७ **कोणाला कशात रस आहे? व्यक्तीचे नाव, चित्र आणि क्रियापद ह्यांच्या जोड्या लावा आणि क्रियापदाचे योग्य ते रूप करून वाक्ये लिहा.**

१. रवी २. विशाखा ३. झिनिया ४. आलिया ५. शाहरुख ६. सलील

समुद्रात पोहणे, शास्त्रोक्त संगीत गाणे, अभ्यास करणे, बुद्धिबळ खेळणे, पुस्तक वाचणे, सायकल चालवणे



उदा॰ झिनियाला पुस्तक वाचण्यात रस आहे.

क. ----------

ख. ----------

ग. ----------

घ. ----------

च. ----------

८ **काय करण्यात आलं आहे ते लिहा.**

(हाकलणे, सुट्टी देणे, शांत करणे, पंखे चालू करणे, आवरणे)

उदा॰ आधी सभागृहात खूप उकडत होतं, म्हणून मग पंखे चालू करण्यात आले.

क. शाळेतली लहान मुलं खूप रडत होती. त्यामुळे त्यांना खाऊ देऊन ---------- ----------.

ख. घरातलं सामान फार अस्ताव्यस्त होतं. तेव्हा सगळ्यांच्या मदतीनं आधी सामान ---------- ----------.

ग. चार दिवस पोलीस कार्यालयाबाहेर उपोषणाला बसलेल्या आंदोलनकर्त्यांना शेवटी बळजबरीने तिथून ----------.

घ. परीक्षेच्या आधी निदान एक महिना ---------- यावी अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली.

## ९ 'तर' किंवा 'तरी' योग्य जागी भरा.



क. तू काहीही म्हणालास .................... मी आज पोहायला जाणार म्हणजे जाणार!

ख. ऋषभ फक्त चार वर्षांचा आहे .................... सोहम अकरा वर्षांचा. त्या दोघांची बरोबरी काय करताय?

ग. बाबांनी पार्टीला जायची परवानगी दिली नव्हती .................... मिहीर गेलाच.



घ. मला खूप गोड खावंसं वाटतंय. मी गुलाबजाम .................... खाईन किंवा जिलबी .................... खाईन.

च. सेकंडहँड .................... सेकंडहँड, मला स्वतःची स्कूटर .................... मिळतेय ना?

छ. मुली कशाही वागल्या .................... समाज त्यांच्याकडे चिकित्सक दृष्टीनेच पाहतो. त्यांनी साडी नेसली .................... 'काय जुनाट राहणी' म्हणून हसणारे आहेत, आणि जीन्स घातली .................... 'हे काय पाश्चात्त्यांचे अंधानुकरण' अशी टीका करणारेही आहेत.

ज. 'आता परत बाबा मला रागावले .................... मी घर सोडीन', अशी धमकी तो देत असतो.

झ. कौशल इंजिनीअर .................... झाला. आता पुढे काय करायचं ठरवलंय त्यानं?

## १० तर, तरी, तर तर वापरून रिकाम्या जागा भरा.

**कृतार्थ** : हे बघ सिद्धार्थ, उद्या आपला दोघांचा वाढदिवस. तर बाबा नक्कीच काही तरी भेटवस्तू आणणार. बहुधा ते एक लॅपटॉप आणि एक स्कूटर आणतील. त्यांनी लॅपटॉप आणला (क) .................... तो माझा हं. तू स्कूटर घे.

**सिद्धार्थ** : (ख) .................... (ग) .................... ! मोठा शहाणाच लागून गेलास. तुला का देऊ मी लॅपटॉप? बाबा ठरवतील काय ते!



**कृताथ** अरे, तुझ्याकडे आयपॅड (घ) .................... आहे. शिवाय लॅपटॉप कशाला हवाय तुला?

**सिद्धार्थ** : आयपॅड ते आयपॅड आणि लॅपटॉप तो लॅपटॉप. आयपॅड असलं (च) .................... लॅपटॉपची गरज पडतेच.

**कृतार्थ** : ठीक आहे, ठरवू दे बाबांना काय ते. पण लक्षात ठेव, जर तुला लॅपटॉप मिळाला आणि मला स्कूटर, (छ) .................... मी तुला कधीही स्कूटरवर बसू देणार नाही. अगदी तू कितीही विनवणी केलीस (ज) .................... .

**सिद्धार्थ** : बरं बरं. आपण आत्ता कशाला भांडतोय? आधी बाबा काय आणतायत ते (झ) .................... बघू! भांडायला खूप वेळ आहे नंतर.

## ११ लागून गेला मोठा / लागून गेली मोठी, आला मोठा / आली मोठी, मोठा लागून गेलास की नाही / गेलीस की नाही ह्यापैकी योग्य तो शब्दसमूह वापरून वाक्ये पूर्ण करा.



क. "काय शोधतोयस दादा?"
"तुला काय करायचंय? शोधतोय एक टाचणी!"
"मी शोधू? जगातली हरवलेली कुठलीही गोष्ट मी झटक्यात शोधू शकतो."
"हॉ! शेरलॉक होम्सचा बापच -------- -------- -------- --------!"




ख. "तन्वी, अगं किती गोंधळ करतेस आकड्यांचा! ये, मी तुला अंकगणित शिकवतो."
"काही नको! -------- -------- गणित शिकवणारा. एकोणिस आठे किती, सांग बरं पटकन!"
"तू तरी कुठं टाटा-बिर्लांची लेक -------- -------- --------!
एक कोटी लिहिताना एकावर किती शून्यं द्यायची, माहीत आहे का?"



ग. "नितू, ते चाफेकरकाका आहेत ना, ते म्हणत होते की नितू एकदम धांदरट मुलगी आहे."
"मी? शहाणेच -------- -------- --------! तुमचा अभिलाष चौथीत गेला तरी त्याचं नाक गळत असतं, ते आधी पुसा म्हणावं."
"आणि म्हणाले, कुणाला चांगला आकाशकंदील हवा असेल तर मी देईन करून ..."
"-------- -------- टिकोजीराव, कंदील करणारे! आपला कंदील आपणच करू, हो ना रे?"

## १२ अधोरेखित शब्द विशेषण आहे की क्रियाविशेषण ते सांगा.

उदा. पुण्यातली संध्याकाळची हवा छान असते. दुपारी कितीही उकडलं तरी संध्याकाळी गार वारा सुटतो आणि रात्री तर अंगावर चादर घ्यावीशी वाटते.

संध्याकाळची : विशेषण दुपारी : क्रियाविशेषण रात्री : क्रियाविशेषण

क. दुपारची झोप मला हवीशी वाटते, पण मग मी रात्री झोपू शकत नाही आणि रात्रीचं जागरण मला मानवत नाही.

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

ख. पहाटे अभ्यासाला उठण्याची माझी सवय कधीच मोडली. रात्रीचं जागरण आता मला सवयीचं झालंय.

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

ग. पहाटे उठून बाहेर पडलो तर थंडीच वाजायला लागली. थोड्या वेळानं सकाळचं ऊन अंगावर आलं तेव्हा बरं वाटलं. पण आता ही दुपारच्या उन्हाची तलखी सहन होत नाहीये.

---------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------

घ. थोड्या वेळानं सूर्य खाली जाईल आणि संध्याकाळचा गारवा जिवाला सुखावेल.

---------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------



## १३ पुढील तक्ता उदाहरणाप्रमाणे पूर्ण करा.

वेळ, तास, क्षण, सेकंद, घटका, अवधी, मिनिट, मिनिटं, तास (अ.व.)

| | दिवस | दिवसाचा भाग | वाक्य |
|---|---|---|---|
| क. | दिवसाचा | | |
| ख. | दिवसाची | | |
| ग. | दिवसाचे | | |
| घ. | दिवसाचा | दिवसाचा क्षण | आजच्या दिवसाचा प्रत्येक क्षण मी अभ्यास करण्यात घालवणार आहे. |
| च. | दिवसाचे | | |
| छ. | दिवसाचा | | |
| ज. | दिवसाचा | | |
| झ. | दिवसाची | | |
| ट. | दिवसाचा | | |

## १४ खालील वर्तुळातील शब्द दिवसाच्या चक्रानुसार योग्य क्रमाने लावा.

संध्याकाळ
झुंजूमुंजू
सकाळ
दुपार
रात्र
पहाट
मध्यान्ह
मध्यरात्र





झुंजूमुंजू ---------------- ---------------- ----------------

---------------- ---------------- ---------------- ----------------

## १५ जोड्या जमवा.

| | कोणता काळ | कोणती वेळ |
|---|---|---|
| क. | सूर्योदयापूर्वी | सूर्य माथ्यावर येण्याची वेळ |
| ख. | सूर्य उगवत असताना | मावळतीची वेळ, कातरवेळ, दिवेलागणीची वेळ |
| ग. | मध्यान्ह | काकडआरतीची वेळ (जुना हिंदू विधी) |
| घ. | तिन्हीसांज | उगवतीची वेळ |

## १६ पुढीलपैकी कोणत्या गोष्टी तुम्ही दिवसाच्या कोणत्या वेळी करता? खाली दिलेल्या नामांपासून योग्य कालवाचक क्रियाविशेषण बनवून वाक्ये तयार करा आणि दिनक्रम लिहा.

सकाळ, दुपार, संध्याकाळ, रात्र, पहाट, मध्यरात्र

दात घासणे, अंघोळ करणे, नाश्ता करणे, जेवणे, अभ्यास करणे, खेळणे, टीव्ही बघणे, कॉलेजात जाणे, झोपणे, झोपून उठणे

उदा. मी पहाटे ५ वाजता झोपून उठतो.



**१७ प्रतीक्षाच्या कॉलेजचे आज स्नेहसंमेलन आहे. त्यातील सौंदर्यस्पर्धेत तिने भाग घेतलाय. त्यासाठी तयारी म्हणून ती आज काय काय करणार आहे? क्रियापदाचे उद्देशार्थक रूप करून वाक्ये बनवा आणि योग्य त्या अनुक्रमाने लिहा. ती सकाळी, दुपारी, संध्याकाळी काय करणार आहे? अधोरेखित केलेली ही नामसाधित कालवाचक क्रियाविशेषणे जिथे जमेल तिथे वापरा.**



खरेदी करणे, मेकअप करणे, नवे कपडे घालून पाहणे, मैत्रिणींकडून सल्ला घेणे, ब्युटीपार्लरमध्ये जाणे, कपड्यांना इस्त्री करणे, मॅचिंग कपडे आणि पादत्राणे शोधणे, सर्व वस्तू नीट एकत्र ठेवणे, चांगली केशरचना करून घेणे, स्वतःविषयी माहिती देणारे चांगले भाषण तयार करणे, कॅटवॉकचा सराव करणे.



उदा॰ प्रतीक्षा सकाळी खरेदी करणार आहे.

**१८ क. खालील परिच्छेदात साहाय्यक क्रियापदाविना उद्देशार्थक वापर केलेली क्रियापदे अधोरेखित करा.**

**शुभाकाकूंचा त्रागा**

“हा पोरटा कुठल्या नक्षत्रावर जन्माला आलाय तेच कळत नाही. कंटाळलेय मी ह्याच्या त्रासाला. ठरलंच आहे माझं, की तीन-चार वर्षांत मी त्याचं लग्न लावून देणार, त्याला त्याच्या बायकोच्या ताब्यात देणार आणि मी सुटणार. त्यांना घरसुद्धा वेगळं करून देणार. पण असल्या मुलाशी लग्न कर, असं एखाद्या मुलीला सांगू तरी कोणत्या तोंडानं?” बाल्कनीत कपडे वाळत घालता घालता शुभाकाकूंची बडबड चालू होती.



“काय झालं काकू? सकाळी सकाळी का वैतागल्याहात अशा?” शेजारच्या स्वातीनं विचारलं.

ख. काकूंनी काय उत्तर दिले असेल? कल्पना करून उद्देशार्थक काळात लिहा.

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

## १९ खाली कोणत्यातरी एकाच उद्देशार्थक काळात दिलेली वाक्ये उरलेल्या दोन्ही उद्देशार्थक काळात लिहा.

उदा. आदित्य हे पुस्तक वाचणार आहे. आदित्य हे पुस्तक वाचणार होता. आदित्य हे पुस्तक वाचणार असेल.

क. मिनी आंबा खाणार असेल. ------------------ ------------------

ख. अशोक परदेशी जाणार आहे. ------------------ ------------------

ग. रसिका दिलेले काम पूर्ण करणार होती. ------------------ ------------------

घ. जीवन आळस झटकणार आहे. ------------------ ------------------

च. नंदिनी पोहणे शिकणार होती. ------------------ ------------------

## २० तुम्हीही नवीन वर्षासाठी काही दृढनिश्चय केला आहे का? वर्गातील आपल्या जोडीदाराला २-३ वाक्यांत सांगा.

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

## २१ मनीषाताईंच्या दैनंदिनीत काही क्रियापदांच्या जागा मोकळ्या आहेत. कंसात दिलेल्या क्रियापदाचे उद्देशार्थक काळात रूप करून ह्या मोकळ्या जागा भरा.

**मनीषाताईंची दैनंदिनी**

**१५ ऑगस्ट**

आजपासून पहाटे उठून फिरायला (क) (जाणे) ------------------. गजरही लावून ठेवला होता, पण झालाच नाही. स्वातंत्र्यदिनाचा मुहूर्त चुकला. उद्या मात्र नक्की (ख) (जाणे) ------------------.



**१९ ऑगस्ट**

आदित्य घड्याळ दुरुस्त (ग) (करणे) ---------------- ----------; अजून केलेलं नाही. संध्याकाळी तो ऑफिसमधून आल्यावर (घ) (विचारणे) ---------------- ----------, पण नेमक्या त्याच वेळी साठे नवरा-बायको येऊन बसले होते. म्हटलं, त्यांच्यासमोर नको. आदित्यचा मूड बरा नसला तर? नंतर मीच विसरले. उद्या सकाळी मंडईत (च) (जाणे) ---------------- ----- ----------. वंदनाही बरोबर (छ) (येणे) ---------------- ----------.

**२३ ऑगस्ट**

अखेर आज जमलं! म्हणजे घड्याळ नाहीच दुरुस्त झालेलं, पण शलाका मुंबईला (ज) (जाणे) ----------------, त्यामुळे तिच्याबरोबरच मीही उठले. शलाका टॅक्सी (झ) (बोलावणे) ---------------- ----------, पण तळमजल्यावरचे थोरात विमानतळावर जाण्यासाठी गाडी (ट) (काढणे) ----------च ----------. म्हणाले, दोघींनाही सोडतो. मग मला टेकडीपर्यंत आणि शलाकाला स्टेशनपर्यंत लिफ्ट मिळाली. थोरात विमानतळावर का चालले होते ते मी (ठ) (विचारणे) ---------------- ----------, पण शलाकानं डोळे मोठे केले. आपल्याला काय करायचंय म्हणा! (ड) (येणे) ---------------- ---------- कुणी तरी.

**२७ ऑगस्ट**

आज घरातले सगळे जण हॉटेलात गेलेत. तिथे ते (ढ) (जेवणे) ---------------- ---------- मग सिनेमाला (त) (जाणे) ---------------- ----------. नंतर आइस्क्रीम वगैरे (थ) (खाणे) ---------------- ----------. केवढा खर्च! मीही (द) (जाणे) ---------------- ----------, पण आज नवी मालिका सुरू (ध) (होणे) ---------------- ---------- टीव्हीवर. पहिलाच एपिसोड चुकला की पुढे पंचाईत होते. ट्रेलर बरा वाटला, पण त्यात तो कडेकर दिसला नाही. नंतर (न) (येणे) ---------------- ----------. चला, दहा वाजले, वेळ झाली कार्यक्रमाची ...!



**२२ चौकटीतील शब्दांना 'सु', 'ना' किंवा 'अ' ह्यांपैकी योग्य तो उपसर्ग जोडून शब्द तयार करा.**

**मन, लायक, रेख, पसंत, सभ्य, मान्य, लिखित, पास गंध, खंड, दिन, खूश**

उदा. सुवास

| | |
|---|---|
| क. सु---------- | ख. अ---------- |
| ग. ना---------- | घ. सु---------- |
| च. अ---------- | छ. ना---------- |
| ज. सु---------- | झ. अ---------- |
| ट. ना---------- | ठ. सु---------- |
| ड. अ---------- | ढ. ना---------- |

## २३ अनुस्वाराची मजा

**पुढील शब्दांतील पहिल्या अक्षरांवर अनुस्वार देऊन त्यांचे नवे रूप तयार करा. शब्दांचा अर्थ कळला नसेल तर शब्दकोशात पहा आणि दोन्ही शब्दांचे अर्थ लिहा.**

**ढग =**  **Cloud / बादल** **ढंग =**  **Style / तरीका**

| | शब्द | अर्थ, इंग्रजी / हिंदी | शब्द | अर्थ, इंग्रजी / हिंदी |
|---|---|---|---|---|
| क. | ढग | Cloud / बादल | ढंग | Style / तरीका |
| ख. | चिता | | | |
| ग. | सध्या | | | |
| घ. | कद | | | |
| च. | वदन | | | |
| छ. | दगा | | | |
| ज. | राग | | | |
| झ. | कड | | | |
| ट. | कप | | | |
| ठ. | कबर | | | |

## २४ टिंब

एकदा एक टिंब
इकडे तिकडे हिंडलं
शब्दांच्या बागेत
उगीचच हुंदडलं!!




शेडी झाली शेंडी
"अग" झाले अंग
भाडे बनले भांडे
अन् रग बनला रंग!!




नदीचा केला नंदी
माडीची केली मांडी
बाबूचा झाला बांबू
अन् कुडी झाली कुंडी!!




हिंडून हिंडून असे
पार दमून गेले
वाक्याच्या शेवटी गेले
अन् पूर्णविराम बनले!

**- नीलिमा गुंडी**

## २५ आज काहीच घडलं नाही - उजव्या रकान्यातील शब्द योग्य त्या जागी भरून कविता पूर्ण करा.

| | |
|---|---|
| **क.** आज काहीच घडलं नाही :<br>आजचा ------------------- अगदी सरळ ------------------- गेला;<br>एकही ------------------- पडली नाही<br>आजच्या दिवसाच्या -------------------. | सुरकुती, दिवस,<br>सुतासारखा,चेहऱ्यावर |
| **ख.** आज -------------------<br>समोरच्या झाडावरचे पक्षी<br>------------------- होते.<br>आज ------------------- झाडावर<br>जीवघेणा कलकलाट झाला नाही.<br>------------------- एकदाही<br>एखादा नाग ------------------- घरट्याकडे<br>------------------- गेला नाही. | किलबिलत, दिवसभर,<br>एकदाही, पक्ष्यांच्या,<br>आज, सळसळत |
| **ग.** आज वाऱ्याने<br>वारं अंगात आल्यागत<br>------------------- पिंजारून<br>थयथयाट केला नाही<br>आणि कलथूनही ------------------- नाही<br>एखादं झाड<br>किंवा ------------------- छप्परही<br>------------------- नेलं नाही टोपीसारखं.<br>आज ------------------- अगदी ------------------- वागला :<br>वाहत राहिला<br>------------------- शेतांवरून<br>लाटा उठवीत हळुवार. | टाकलं, केस,<br>उडवून, झोपडीवरचं,<br>शहाण्यासारखा,<br>साळीच्या, वारा |
| **घ.** आज ------------------- दुःख<br>------------------- झोपून होतं.<br>------------------- दिवसभर<br>माझे डोळे<br>------------------- होते.<br><br>- **उत्तम कोळगावकर** | थकूनभागून, दिवसभर,<br>आज, कोरडे |

पाठ १-२

## तोंडी परीक्षा

एकूण गुण २०

### १. संवाद

**पुढीलपैकी कोणताही एक विषय निवडून तुमच्या सहाध्यायाबरोबर चर्चा करा. तुम्ही विषयाखाली हिरव्या पट्टीत दिलेले शब्द वापरू शकता. (गुण ६)**

**क.** आताच नव्याने प्रदर्शित झालेला 'अ ब क' हा चित्रपट तुम्हाला अगदी आवडला नाही. तुमच्या सहाध्यायाला तो फारच आवडला आहे.

कलाकार, अभिनय, कथा, चित्रीकरणाचे स्थळ, छायाचित्रण, संकलन, संगीत, पटकथा

**ख.** चित्रपट पाहण्यापेक्षा कथा-कादंबऱ्या वाचणे तुमच्या सहाध्यायाला अधिक आवडते. तुम्ही मात्र आवडीने चित्रपटच पाहता.

घरबसल्या करमणूक, स्वस्त, स्वतःच्या कल्पनाशक्तीला वाव, खर्च एकदाच, परत परत वाचता येते, लेखनाला / लेखकाला उत्तेजन

जास्त मनोरंजन, मित्र-मैत्रिणी आणि परिवारासोबत आनंद लुटता येतो, एकाच जागी बसून वेगवेगळी स्थळे पाहता येतात, कलाकार आणि कलाकृतींना उत्तेजन ----

**ग.** विराजला सतत काम करायला आवडतं. नाच-गाणे, वाचन, सिनेमा-नाटके ह्यांना तो 'वेळेचा अपव्यय' असे मानतो. तुम्ही मात्र कामाचा उत्साह वाढावा म्हणून विरंगुळा हवाच ह्या मताचे आहात.

काम हाच आराम, जो सतत काम करतो त्यालाच यश मिळतं. कामाव्यतिरिक्त इतर गोष्टी म्हणजे कामचुकारपणा

नव्या हुरुपाने काम करता येते, जीवन अधिक समृद्ध होते, मन आनंदी होते, आजारपण दूर पळते.

**घ.** मनीषाची तक्रार आहे, की तिला मोकळा वेळ मिळत नाही. तिची मैत्रीण मानसी तिला समजावून सांगते आहे की वेळ काढावा लागतो.

घरकाम, नोकरी, मुलांचे प्रश्न, नवऱ्याची मदत, जबाबदाऱ्या

वेळेचे महत्त्व, वेळेचे नियोजन, कामाचे योग्य वाटप, सर्वांचे सहकार्य

## २. चित्रवर्णन

**खालीलपैकी कोणतेही एक चित्र निवडून त्या चित्राचे सविस्तर वर्णन करा.** **(गुण ५)**






## ३. वाचन आणि आकलन

**क. खालील उतारा मोठ्याने वाचून दाखवा.** **(गुण ३)**

ज्या कोणी शाळांना सुट्ट्या देण्याची प्रथा सुरू केली, तो जर मला भेटला, तर अशी हजेरी घेईन ना त्याची, की त्याला जन्मभर याद राहील. मुलांची सुट्टी म्हटले, की माझी दिवसाची बसलेली घडी पार विस्कटून जाते. परीक्षेचा शेवटचा पेपर टाकला, की त्यांच्या कानात वारेच भरते. पायावर नक्षत्र पडल्यासारखी ती दिवसभर उधळलेली असतात.

सध्या तर माझी दोन, बहिणीचे एक आणि मैत्रिणीची दोन, अशी पाच मुले घरात – किंवा घराबाहेर असेच म्हणायला हवे – आहेत. क्षणभरही त्यांचा पाय घरात ठरत नाही. जणू काही घर त्यांना खायलाच उठत असते. त्यांना उन्हाची पर्वा नसते, खाण्यापिण्याची शुद्ध नसते, आजारी पडण्याची भीती नसते. समजावून सांगावे, तर सरळ कानाआड करतात. पाचही जण धडपणे घरात परतलेले पाहीपर्यंत काळजीने माझा जीव अर्धा झालेला असतो. दामटून घरात बसवावे, तर दंगा करून घर डोक्यावर घेतात. पाठ मोडेपर्यंत खपून नीटनेटके लावलेले घर काही क्षणांत होत्याचे नव्हते करतात. पुन्हा, आपला तोल जाऊ देऊन चालत नाही, कारण 'सुजाण पालक' ना आम्ही! मग मनातल्यामनात दातओठ खात मी मनातल्यामनातच एकेकाला चांगले चारसहा रट्टे मारून घेते.

**ख. पुढे काही वाक्ये दिली आहेत.** **(गुण ४)**
**त्या अर्थाचे वाक्प्रचार वरील उताऱ्यात शोधा आणि सांगा.**

१. खूप गोंधळ आणि गोंगाट करणे.
२. उद्ध्वस्त करणे, नष्ट करणे.
३. घालून दिलेली पूर्वीची व्यवस्था किंवा पद्धत बिघडणे.
४. सांगितलेले ऐकूनही तिकडे दुर्लक्ष करणे.

**ग. तुम्हाला माहीत असलेले वाक्प्रचार वापरून दोन वाक्ये करा.** **(गुण २)**

# लेखी परीक्षा

(एकूण गुण ३०)

## १. वाचन आणि आकलन (एकूण गुण १०)

**पुढील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे द्या. (प्रत्येकी २ गुण)**

**मराठी चित्रपट**

गेल्या काही वर्षांत मराठी चित्रपटांची निर्मितिसंख्या वाढली आणि त्याचबरोबर निर्मितिमूल्यातही वाढ झाली. गेल्या पाच-दहा वर्षांवर नजर टाकल्यास असे दिसते की, मराठीत दर्जेदार आणि आशयघन चित्रपटांची निर्मिती होते आहे. राष्ट्रीय स्तरावरच नव्हे, तर मराठी चित्रपटांनी आंतरराष्ट्रीय स्तरावरसुद्धा झेप घेतल्याचे दिसते. कल्पक दिग्दर्शकांची नवी फळी तयार झाली आहे. कलाकारांचीही नवीन पिढी पडद्यावर आली आहे. एकूणच काय, मराठी चित्रपट वाढतो आणि बहरतो आहे. तांत्रिकदृष्ट्याही तो उत्तम असतो; शिवाय त्यांचे विषयही विविधांगी असतात. 'श्यामची आई', 'श्वास' आणि त्यानंतर २०११मध्ये आलेल्या 'देऊळ' या चित्रपटांनी सर्वोत्कृष्ट चित्रपटाचे सुवर्णकमळ पटकावले आणि अन्य भाषकांचे लक्ष मराठी चित्रपट व्यवसायाकडे वेधले गेले.

मराठी चित्रपटांचे उत्पन्नाचे मार्ग मर्यादित असल्याची अडचण खूप काळ सांगितली जात होती. चित्रपटांचा गल्ला कोटीचा पल्ला अपवादानेच गाठत होता. पण 'काकस्पर्श', 'बालक पालक', 'दुनियादारी' अशा चित्रपटांनी कोट्यवधींची कमाई केली. रितेश देशमुखचा 'लई भारी' आला आणि व्यवसायाची गणितेच बदलली. नागराज मंजुळेच्या 'सैराट'ला मिळालेले यश दणदणीतच होते. त्याची कमाई ही मराठी चित्रपटसृष्टीच्या इतिहासातील सर्वाधिक ठरली. त्याला केवळ मराठी प्रेक्षकांनीच डोक्यावर घेतले असे नाही, तर बिगरमराठी प्रेक्षकांनीही चांगले स्वागत केले. आजही या चित्रपटाचा आणि गाण्याचा झिंगाट 'हँग ओव्हर' उतरलेला नाही.

महाराष्ट्र किंवा भारतातच नाही, तर परदेशातील मानाच्या 'कान', 'व्हेनिस', 'बर्लिन', 'टोरांटो' महोत्सवांत मराठी चित्रपटांनी हजेरी लावली. तेथील समीक्षक आणि प्रेक्षकांनीही त्यांचे कौतुक केले. राष्ट्रीय पुरस्कार सोहळ्यावरही वर्चस्व गाजवले. 'श्वास', 'हरिश्चंद्राची फॅक्टरी' आणि 'कोर्ट' हे मराठी चित्रपट भारतातर्फे ऑस्करसाठी पाठवण्यात आले.

सर्जनशीलतेच्या दृष्टीने पाहिले तर मराठी चित्रपटसृष्टीत बरेच बदल घडले. ग्रामीण विषय हाताळणारा मराठी चित्रपट आपल्या चौकटीतून बाहेर पडला आणि शहरी विषयांकडे वळू लागला. काही ग्रामीण विषयही नवीन पद्धतीने हाताळले गेले. तांत्रिकदृष्ट्या, म्हणजे संकलन, छायाचित्रण, ध्वनिलेखन या विभागांत, मराठी चित्रपटाने प्रचंड झेप घेतली. हिंदीच्या तोडीस तोड चित्रपट येऊ लागले. हिंदी सिनेसृष्टीने मराठी चित्रपटाला 'कंटेंट ड्रिवन' अशी उपाधी देऊन पाठ थोपटली. मराठी अस्मितेकडे मराठी चित्रपटाला जागतिक पातळीवर नेण्याची क्षमता आहे, यात वाद नाही.

मार्केटिंग आणि प्रमोशन्समध्ये मराठी चित्रपटसृष्टीत अजून काहीशी उदासीनता दिसते. मार्केटिंगसाठी नव्या तंत्राचा अवलंब केला जात नाही. निर्मात्यांमधला समन्वयही वाढायला हवा. मराठी चित्रपटांना थिएटर-मल्टिप्लेक्समध्ये प्राइम टाइम मिळण्याच्या सनातन संघर्षावर कायमस्वरूपी मार्ग गरजेचा आहे. मराठी चित्रपटांचे पाऊल अडवणाऱ्या या त्रुटी दूर झाल्या तर येणारा काळ उज्ज्वलच आहे.

१. मराठी चित्रपटसृष्टीत गेल्या दशकात कोणकोणते चांगले बदल घडले?
२. आंतरराष्ट्रीय स्तरावर मराठी चित्रपटांनी कोणते यश मिळवले?
३. मराठी चित्रपटांना होणाऱ्या 'कमाई' विषयी ह्या लेखात काय सांगितले आहे?
४. तांत्रिकदृष्ट्या मराठी चित्रपट कमी पडतात का? कुठे?
५. मराठी चित्रपट चांगले चालावेत ह्यासाठी आणखी कोणती पावले उचलणे आवश्यक आहे?

## २. व्याकरण (एकूण गुण २०)

**क. योग्य त्या साहाय्यक क्रियापदाचे बरोबर रूप करून योग्य जागी लिहा आणि उतारा पूर्ण करा. (गुण ५)**

**(न देणे (३), बसणे (३), काढणे, न घेणे, टाकणे, शकणे)**



माझा पहिला नंबर यावा अशी आईची खूप इच्छा आहे. त्यासाठी मी सारखा अभ्यासच करत .......... असं तिला वाटतं. ती मला खेळायला जाऊ .......... .........., टीव्ही पाहू .......... ........... ती म्हणते की मी एकदा परवानगी दिली, तर तू टीव्हीच बघत .......... ........... अभ्यास कसाबसा उरकून .......... आणि परत टीव्हीपुढे जाऊन ........... मी कितीही सांगितलं तरी ती माझं ऐकून .......... ........... माझा पहिला नंबर यावा म्हणून माझी आई काहीही करू ........... बाबांनी तिला कितीदा समजावून सांगायचा प्रयत्न केला, पण ती कोणालाच काही बोलू .......... ........... मला अगदी कंटाळा आलाय. आईच्या पहाऱ्यातून सुटण्यासाठी आता काही तरी युक्ती शोधून .......... हवीय.

**ख. उजव्या रकान्यातील शब्द डाव्या रकान्यात योग्य जागी भरून वाक्ये पूर्ण करा. (गुण ३)**

| | |
|---|---|
| **नितीन** : वडिलांचं ऐकलं असतंस .......... काय झालं असतं? ते प्रेमाने सांगत होते, .......... तू काही त्यांची बाजू ऐकून घेतली नाहीस.<br>**विनीत** : .......... ..........! तुला बोलायला काय जातंय! तुझं काम .......... अडलं नाहीये ना पैशावाचून? बाबा मला नेहमी उपदेशच करतात. पैशांची मदत कधीच करत नाहीत. .......... बरं, मी त्यांचा एकुलता एक मुलगा आहे. आणखी चार मुलं असती .......... काय केलं असतं त्यांनी? | **तर, तर तर, तरी, तर, तर, तरी** |

## ३. योग्य त्या क्रियापद-नामाचे सप्तमीचे रूप लिहून वाक्ये पूर्ण करा. (गुण ४)

**(भरणे, देणे, सांगणे, करणे, घेणे, समजावणे, भागवणे, ठेवणे)**

मेधाला स्वयंपाक .......... अजिबात रस नाही. तिला आयतं जेवायला आवडतं. शिवाय तिला नटण्याची फारच आवड आहे. त्यामुळे तिच्या पगारातील बरेचसे पैसे हॉटेलची बिलं .......... आणि मेकअपचे सामान विकत .......... खर्ची पडतात. तिला समाजसेवेचीही फार आवड

आहे. त्यामुळे गरीब, गरजू मुलांची फी ---------------------------- आणि त्यांना इतर आर्थिक मदत ---------------------------- ती तिचा बराच पगार खर्च करते. मग उरतात अगदीच थोडे पैसे. इतके थोडे पैसे बँकेत ---------------------------- काय अर्थ आहे, असा विचार करून ती ते पैसेही उडवून टाकते. मेधाच्या आईला तिच्या ह्या बेफिकीर वृत्तीचा अगदी कंटाळा आला आहे. पण मेधाला ---------------------------- आणि ---------------------------- काही अर्थ नाही, हे कळल्यामुळे त्यांनीही काही बोलणे सोडून दिले आहे.

**४. नामसाधित कालवाचक विशेषण / क्रियाविशेषण ह्यांपैकी योग्य ते रूप भरून वाक्ये पूर्ण करा. (गुण ४)**

**(पहाटे, संध्याकाळी, दुपारची, तिन्हीसांजेला, सकाळची, मध्यरात्री, रात्री, पहाटेपर्यंत)**

क. ---------------------------- सात वाजताची गाडी पकडायची असेल तर मला ---------------------------- चार वाजताच उठावे लागेल.

ख. ---------------------------- झोप झाली नाही की छोटा केतन ---------------------------- सारखी किरकिर करतो.

ग. ---------------------------- माझी आजी न विसरता तुळशीपाशी दिवा लावत असे.

घ. परीक्षा ऐन तोंडावर आली आहे आणि रोज ---------------------------- दिवे जातायत. अभ्यास होणार कसा?

च. ---------------------------- फोनची घंटा वाजली आणि मला जाग आली. तोवर फोन बंद झाला आणि मग हा फोन कुणाचा असेल ह्या विचारात मी ---------------------------- जागीच राहिले.

**५. योग्य त्या क्रियापदाचे उद्देशार्थक रूप वापरून रिकाम्या जागा भरा. साहाय्यक क्रियापदाचा वापरही करता येईल. (गुण ४)**

**(करणे (२), नेणे, घेणे, आणणे, बनवणे, ठरवणे, साठवणे)**

शिक्षक – मुलांनो, आज मातृदिन आहे. तो तुम्ही कसा साजरा करणार आहात?

पहिला विद्यार्थी – मी आज आईला घरकामात मदत ---------------------------- ----------------------------.

दुसरा विद्यार्थी – मी बाजारातून भाजी आणि वाणसामान ---------------------------- ----------------------------.

तिसरा विद्यार्थी – मी आईच्या आवडीचा एक पदार्थ ---------------------------- ----------------------------.

चौथा विद्यार्थी – मी आईला सिनेमाला ---------------------------- ---------------------------- आणि नंतर तिच्यासाठी साडी ---------------------------- ----------------------------. मी वर्षभर पैसे साठवले आहेत.

शिक्षक – मंदार, तू का असा गप्प आहेस? तू काही ठरवलं नाहीस का?

मंदार – सर, मी ह्यावर विचारच केला नव्हता. पण पुढच्या वर्षी मी नक्कीच मी खूप काही तरी करेन. हो, मी आत्तापासूनच पैसे ----------------------------, छानसा बेत ---------------------------- आणि आईला खूश ----------------------------.

शिक्षक – उत्तम. पण एक लक्षात ठेवा. आईला खरा आनंद तुम्ही वर्षभर शहाण्यासारखे वागाल तेव्हाच होईल.

## १ खालील संवाद वाचा आणि त्याला योग्य ते शीर्षक द्या.

--------------------------------------------------------------------------



"विलास, मला समोर टपरीवर घेऊन चल."
"काही मागवू का? फोन केला तर पाठवतो चंदू ..."
"माहितेय, पण मला जायचंय. चल."
विलासनं मला खुर्चीत बसवलं.
मी टपरीवर पहिल्यांदाच जात होतो, पण चंदूनं कोण आलंय ते पाहायला मानही वर केली नाही. "दोन चहा, चंदूशेठ. एक कमी साखरेचा," विलास म्हणाला.
समोरच्या छोट्या बाकड्यावर बसलेल्या आजोबांकडे मी पाहिलं. ते दोन दिवसांपूर्वीचं शिळं वर्तमानपत्र वाचत होते.
"हळबेसाहेब!" चंदूनं हाक मारली.
सावकाश वर्तमानपत्राची घडी घालून आजोबांनी ते बाजूला ठेवलं. हात लांब करून चहाचा पेला घेताना त्यांचं लक्ष माझ्याकडे गेलं. मला पहिल्यांदा बघणाऱ्या बहुतेकांचं जे होतं तेच त्यांचंही झालं. पेला घेतलेला हात हवेतच राहिला आणि मनात नसताना लक्ष माझ्या तुटक्या पायांकडे, चाकाच्या खुर्चीकडे जात राहिलं. मी सवयीनं थोडं हसून म्हणालो, "नमस्कार."
"नमस्कार," ते पुटपुटले. एकट्यानंच चहा प्यावा की न प्यावा हे न कळून ते गोंधळले. "आपण चहा घ्या नं, प्लीज! माझा येईलच," मी म्हटलं. घुटमळत आजोबांनी लहानसा घोट घेतला. "मी काही महिन्यांपूर्वीच ह्या भागात राहायला आलोय. समोरच, पहिल्या मजल्यावर. रोज तुम्हाला, तुमच्या मित्रांना बाल्कनीतून बघतो. तुम्ही काय बोलत असाल, कशाबद्दल चर्चा करत असाल, हसता तेव्हा काय विनोद झाला असेल त्याची कल्पना करत बसतो. फार छान वाटतं मला, पाच-दहा वर्षांनी तरुण झाल्यासारखं," मी म्हणालो. आजोबा गालात हसले. "तल्लफ आली की मी इथून मागवतो चहा. आज म्हटलं प्रत्यक्ष जाऊनच घ्यावा. तुम्ही बऱ्याच वर्षांपासून इथं येत असाल, नाही?" आजोबांनी मान डोलावली.
आमचा चहा आला. थोडा वेळ न बोलता चहा संपवला.
"अगदी खरं सांगायचं तर तुमची ओळख करून घ्यायलाच मी आलोय." मी हात पुढे केला. "मी अरुण घोटीकर. एअर फोर्समध्ये होतो, स्क्वाड्रन लीडर. हा अपघात मात्र जमिनीवर आणि मी पूर्ण शुद्धीत असताना झाला," मी माझ्या पायांकडे बघत म्हणालो.
आजोबा मोकळं हसले आणि पुढे झुकून माझा हात हातात घेत म्हणाले, "यशवंत हळबे. तयार कपड्यांच्या धंद्यात होतो. सगळं मुलीवर सोपवून निवृत्त झालोय. आता सकाळी जाग आली की 'अरे वा! आणखी एक दिवस!' असं म्हणायचं आणि संध्याकाळ होण्याची वाट पाहायची." ते पुन्हा हसले.
"मीसुद्धा! मीसुद्धा दुपारचा चहा घेण्यासाठी वाट पाहतो. तुम्ही चहा मागवल्याचं पाहिलं की मगच हा विलास गॅस पेटवतो." आजोबा पुन्हा हसले.
मग जरा बिचकतच मी विचारलं, "हळबेसाहेब, गेले दोन दिवस बघतोय ... एकटेच?"

"हो, होतं असं कधी कधी," आजोबा स्वतःशीच बोलल्यासारखं म्हणाले.

"कुणाची प्रकृती वगैरे .... की गावाला गेलेत?" मी गडबडीनं सावरून घेत म्हणालो.

"माहीत नाही."

"पण मग ... फोन नाही केलात?"

दोन क्षण शांततेत गेले. मग एक मोठा श्वास घेऊन आजोबा म्हणाले, "आमच्यात एक करार झालाय. भेटायचं ते फक्त इथंच. वेळ शक्यतो चुकवायची नाही. सगळे पाळतात वेळ. पाच-दहा मिनिटं इकडेतिकडे, पण पाळतात. त्याहून उशीर झाला की वाट पाहणं बंद. कुणालाही फोन करायचा नाही, घरी जायचं नाही. शांतपणे दुसऱ्या दिवसाची वाट पाहायची."



"कुणी आजारी वगैरे असेल ...."

"तरीही वाट पाहायची. आता सगळ्यांचंच 'असले की अडचण' असं झालंय. कुणालाही करता काहीच येत नाही. म्हणून स्वस्थ राहावं. कुणात किंवा कशात जीव गुंतवण्याचं त्राण उरलंय का आता?" आजोबा माझ्याकडे पाहून छान हसले आणि उठत म्हणाले, "चला, निघावं आता. भेटलात, बरं वाटलं."

"उद्या?" मी नकळत विचारलं.

पाठमोऱ्या आजोबांनी नुसते खांदे उडवले. हळू हळू पावलं टाकत ते रस्त्याच्या टोकापर्यंत गेले, वळून दिसेनासे झाले.

**क. वरील उताऱ्यामधील ही वाक्ये काय म्हणत आहेत? वर्गात चर्चा करू या.**

अ. मला पहिल्यांदा बघणाऱ्या बहुतेकांचं जे होतं तेच त्यांचंही झालं.

आ. मी सवयीनं थोडं हसून म्हणालो, "नमस्कार."

इ. हा अपघात मात्र जमिनीवर आणि मी पूर्ण शुद्धीत असताना झाला.

ई. आता सकाळी जाग आली की 'अरे वा! आणखी एक दिवस!' असं म्हणायचं आणि संध्याकाळ होण्याची वाट पाहायची." ते पुन्हा हसले.

उ. आता सगळ्यांचंच 'असले की अडचण' असं झालंय.

**ख. पुढील अंश औपचारिक भाषेत लिहा.**

समोरच्या छोट्या बाकड्यावर ------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------ हसून म्हणालो, "नमस्कार".

**ग. पुढील वाक्यांचा अर्थ न बदलता त्यांची वेगळ्या प्रकारे रचना करण्याचा प्रयत्न करा. गरज वाटल्यास वेगळे शब्द वापरता येतील.**

उदा॰ मी टपरीवर पहिल्यांदाच जात होतो, पण चंदूनं कोण आलंय ते पाहायला मानही वर केली नाही.

- टपरीवर मी प्रथमच जात होतो, पण चंदूनं माझ्याकडे अजिबात लक्ष दिलं नाही / पण चंदूनं माझी दखलही घेतली नाही. / पण चंदूनं माझ्याकडे ढुंकूनही पाहिलं नाही.

अ. समोरच्या बाकड्यावर ... वर्तमानपत्र वाचत होते. ---------------------------
-------------------------------------------------------------------------
-------------------------------------------------------------------------



आ. सावकाश वर्तमानपत्राची घडी ... लक्ष माझ्याकडे गेलं. ----------------------
-------------------------------------------------------------------------
-------------------------------------------------------------------------



इ. तलफ आली की ... जाऊनच घ्यावा. ----------------------------------------
-------------------------------------------------------------------------
-------------------------------------------------------------------------



**घ. पुढील शब्दांचे किंवा शब्दसमूहांचे समानार्थी आणि विरुद्धार्थी शब्द लिहा.**

| | |
|---|---|
| उदा॰ कमी साखरेचा = अगोड X गोडमिट्ट | अ. शिळं = ------------------------ |
| आ. स्वस्थ = ------------------------ | इ. तुटक्या = ------------------------ |
| ई. नकळत = ------------------------ | उ. बिचकत = ------------------------ |

## २ पुढील कविता वाचा.

**खूप दिवसांनी दिसताय**

'खूप दिवसांनी दिसताय
कुठे होतात इतके दिवस?'
रोजच्या फिरण्याच्या ट्रॅकवर
कुणीतरी म्हणतं
तेवढ्यानंही जगणं
अर्थपूर्ण वाटायला लागतं ...! - (१)

चुरगळलेले कागद
साचलेलं पाणी
शेवाळलेला रस्ता
दुखणारी मान पाठ ...
सगळं नजरेआड करता येतं! - (२)

नेहमीचा दोन पायांवर उभा राहिलेला
घरातला घोडा
भिंतीवर लावलेल्या
पेंटिंगवरचं प्रेरक वाक्य
असलं सगळं खुणावू लागतं! - (३)
ध्यानस्थ बुद्धाची मूर्ती वेडावत नाही
बंद पडलेलं घड्याळ घाबरवत नाही
कानांवर आदळणाऱ्या
आवाजांचं ओझं
सहज पेलता येतं! - (४)

न वाचलेली पुस्तकं
ओढ लावतात
पत्रांना उत्तरं द्यावीशी वाटतात
'किती दिवसांनी भेटलात!'
आपणही कुणाला म्हणावं
असं आतून दाटून येतं
नव्यानं जगावं वाटू लागतं! - (५)

**- आसावरी काकडे**

**क. क्रियापदापासून बनलेली काही विशेषणे ह्या कवितेत वापरली आहेत. अशाच आणखी पाच जोड्या शोधून खाली लिहा.**

उदा॰ 'चुरगळलेले कागद'.

१. ------------------------------------------------------------
२. ------------------------------------------------------------
३. ------------------------------------------------------------
४. ------------------------------------------------------------
५. ------------------------------------------------------------



**ख. पुढे दिलेल्या नामांना वरीलपैकी योग्य ते विशेषण लावा.**

१. ---------------------------------- भिंती
२. ---------------------------------- डोकं
३. ---------------------------------- कविता
४. ---------------------------------- रस्ते
५. ---------------------------------- कचरा

**ग. कवितेतील विशेषण-नाम ह्यांच्या जोड्या वापरून वाक्ये बनवा.**

उदा॰ चुरगळलेल्या कागदाच्या कपट्यांनी खोली भरून गेली होती.

१. ----------------------------------------------------------------------------
२. ----------------------------------------------------------------------------
३. ----------------------------------------------------------------------------
४. ----------------------------------------------------------------------------
५. ----------------------------------------------------------------------------

**घ. उदाहरणाप्रमाणे रूपे बनवून वाक्यात उपयोग करा.**

उदा॰ ओझं पेलवतं – पेलवणारं ओझं, लहान मुलांनी पेलवणारं ओझं उचलावं.

१. गोष्टी खुणावतात. .................... ....................

२. मूर्ती वेडावते. .................... ....................

३. पुस्तकं ओढ लावतात. .................... ....................

## ३ खालील वाक्यांतील क्रियापद कर्त्याप्रमाणे चालते की कर्माप्रमाणे ते वाक्यापुढील कंसात लिहा.



उदा॰ भाग्यश्री चारचाकी गाडी चालवते. (कर्त्याप्रमाणे)
कालच तिने सोसायटीच्या आवारात गाडी चालवली. (कर्माप्रमाणे)

क. “रोहन नोकरी करतो?” (....................)
“नाही, त्याने कधीच नोकरी केली नाही.” (....................)

ख. आज तबल्याची साथ करत आहेत पंडित आनंदराव सातव. (....................)
त्यांनी पूर्वीही अनेकदा खांसाहेबांना साथ केली होती. (....................)



ग. संपदा दर रविवारी कपड्यांना इस्त्री करते. (....................)
आज सकाळीच तिने सगळ्या कपड्यांना इस्त्री केली. (....................)



घ. सकाळी उठल्याबरोबर नानासाहेब अंगण झाडतात, झाडांना पाणी घालतात आणि मगच चहा घेतात. (....................) आत्ताच त्यांनी अंगण झाडले, झाडांना पाणी घातले आणि चहा घेतला.
(....................)

च. सासूच्या आजारपणामुळे इच्छा असूनही आतिशाने ह्यावर्षी शिकवण्या घेतल्या नाहीत, (....................) नाही तर ती घरीच मुलांच्या शिकवण्या घेते.
(....................)

## ४ वर जी वाक्ये भूतकाळात लिहिलेली आहेत त्यांत काय बदल झाले आहेत ते खालील तक्त्यात लिहा.

| | कर्ता | कर्म | क्रियापद |
|---|---|---|---|
| | उदा॰ भाग्यश्री = तिने | गाडी | चालवते = चालवली |
| क. | | | |
| ख. | | | |
| ग. | | | |
| घ. | | | |
| च. | | | |

## ५ पुढील उतारा भूतकाळ आणि भविष्यकाळ वापरून पुन्हा लिहा.

आई एक मोठे कलिंगड आणते. दादा ते कापतो आणि त्याच्या आठ फोडी करतो. दादा प्रत्येकाला एक एक फोड देतो. मेधा तिची फोड संपवते आणि आणखी एक मागते. दादा तिला एक फोड देतो, नताशाला एक फोड देतो आणि स्वतः एक फोड घेतो. आई आणि बाबा दुसरी फोड घेत नाहीत.



क. आईने एक मोठे कलिंगड आणले. ------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

ख. आई एक मोठे कलिंगड आणेल. ------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

## ६ वरील वाक्ये वापरून उदाहरणाप्रमाणे तक्ते पूर्ण करा.

क.

| | काळ | कर्ता | कर्म | क्रियापद |
|---|---|---|---|---|
| | उदा॰ वर्तमानकाळ | आई | कलिंगड | आणते |
| अ. | | | | |
| आ. | | | | |
| इ. | | | | |
| ई. | | | | |
| उ. | | | | |

ख.

| | काळ | कर्ता | कर्म | क्रियापद |
|---|---|---|---|---|
| | उदा॰ भूतकाळ | आईने | कलिंगड | आणले |
| अ. | | | | |
| आ. | | | | |
| इ. | | | | |
| ई. | | | | |
| उ. | | | | |

ग.

| | काळ | कर्ता | कर्म | क्रियापद |
|---|---|---|---|---|
| | उदा॰ भविष्यकाळ | आई | कलिंगड | आणेल |
| अ. | | | | |
| आ. | | | | |
| इ. | | | | |
| ई. | | | | |
| उ. | | | | |
| ऊ. | | | | |

## ७ वर्गातला खेळ

विद्यार्थ्यांचे तीन गट करावेत. वर्गात पुढील बाजूस तीन जागा नक्की करून त्या जागांना कर्तरी, कर्मणी आणि भावे अशी नावे द्यावी.

- आता शिक्षक प्रत्येक गटाला एक एक वाक्य देतील. "जागा घ्या" अशी आज्ञा शिक्षकाने दिली, की गटातील विद्यार्थी आपल्याला मिळालेल्या वाक्यात कोणता प्रयोग आहे ते पाहून पटकन त्या जागी जाऊन उभे राहतील.

- आता शिक्षक "प्रयोग बदल" अशी आज्ञा देतील. गटातील विद्यार्थी पटकन हे वाक्य उरलेल्या दोन प्रयोगात बदलून दाखवतील आणि आता ते वाक्य ज्या प्रयोगात आहे त्या जागी जाऊन उभे राहतील.

- शिक्षक ह्या खेळाचे फळ्यावर गटानुसार गुण लिहितील. जो गट जास्तीत जास्त वाक्ये बरोबर तयार करेल आणि पटकन योग्य जागी जाऊन उभा राहील, तो गट जिंकेल. (शिक्षक वरील उताऱ्यातील वाक्ये देतील अथवा नवी स्वतंत्र वाक्ये देतील)

## ८ वाचा.

**माझी मोठी खरेदी**

सकाळी आठ-साडेआठची वेळ. नेहमीप्रमाणे सकाळचं फिरणं आटपून मी कॉफी हाउसमध्ये सुरेख कॉफीचे घुटके घेत एकटाच टेबलापाशी बसलो होतो. एवढ्यात कानावर शब्द पडले, "नमस्कार." वळून पाहिलं तर कोणी अनोळखी गृहस्थ. रंग गोरा. वय तिशीच्या पुढचं (...)

"नमस्कार."

कुठं बरं पाहिलं होतं ह्यांना? काही आठवत नाही.



"माझा आपला परिचय नाही, पण मी आपल्याला ओळखतो. माझं नाव माधव हेंदळे. मी दुर्मीळ पुस्तकांचा विक्रेता आहे."

मी यावर उगीचच बोललो, "अरे वा!"

"नुकताच माझ्याकडे शरदबाबूंच्या कादंबऱ्यांचा सगळा सेट आलाय. पाहिजे का तुम्हाला? अगदी कमी किमतीत देतो. मामा वरेरकरांनी केलेली भाषांतरं सगळी."

"माझ्याकडे आहेत सगळी भाषांतरं मामांनी केलेली."

"आहेत का? मग अरेबियन नाईटसचे खंड? भाषांतर नाही हं, बर्टनचे. सुरेख कार्डबोर्ड बाईडिंगमधले सगळे सोळा खंड?"

"काय किंमत आहे सोळा खंडांची?"

"अगदी डर्टचीप देतो आपल्याला. घरी पाठवू का?"

मी म्हणालो, "द्या पाठवून."

यानंतर तीन-चार दिवस गेले. बर्टनच्या खंडांची गोष्ट मी विसरूनही गेलो.

आणि एके दिवशी सायकलच्या हँडलला दोन भल्या मोठ्या पिशव्या लटकावून एक पोरगा पत्ता शोधत-शोधत आला. (...) त्या पोरापाशी तीनशे रुपयांचा चेक देऊन मी बर्टन ताब्यात घेतला. माझ्या स्टडीतल्या शेल्फवर लावला. शेल्फला भारदस्तपणा आलेलं अनुभवलं. (...)

पुढे चार-सहा महिने कॉफीहाउसवर कधी हेंदळे भेटले नाहीत. (...)

अचानक एकवार ते कॉफीहाउसमध्ये भेटले. तेच हसू. तोच प्रसन्न चेहरा. चिंचेनं घासलेल्या तांब्याच्या भांड्यासारखा चकचकीत.



मला म्हणाले, "साहेब, एक प्रशस्त, कातड्यानं मढवलेला कोच आहे. तुम्हाला वाचत बसायला अप्रतिम. पाठवू का?"(...)

एखाद्या जुन्या-पुराण्या फर्निचरच्या दुकानाची कळा यावी, तशी आता माझ्या घराला आलीय. अतोनात फर्निचर झालं आहे. तरीपण मी विचारलं, "काय किमतीचा कोच आहे हा, हेंदळे?"

"डर्टचीप साहेब. फक्त पावणे-दोनशे रुपये. बघा तरी. खूश व्हाल." (...)

आणि हातगाडीवर भला मोठा कोच टाकून एक पोरगा घरी आलासुद्धा. (...)



हा कोच दिल्यानंतर हेंदळ्यांनी हळूहळू मला अगदी स्वस्त असं एक मोठं पुस्तकांचं कपाट, एक अडीच बाय पाचचा पर्शियन गालिचा आणि एक डायना थर्टीफाईव्ह ही एअरगन, अशा तीन वस्तू दिल्या. (...)

आता हे हेंदळे आले की, त्यांना स्वच्छ सांगायचं, "हेंदळे, थँक्स. आत्तापर्यंत तुम्ही फार चांगल्या वस्तू मला फार स्वस्त अशा दिल्या. पण आत्ता मला काही नको."

पण मी असा निश्चय केल्यावर हेंदळे कधी भेटलेच नाहीत. ते भेटून वर्ष-दीड वर्ष झालं. मी झालंगेलं विसरलो.

आम्हा लेखक, कवी, चित्रकार, पत्रकार मित्रांचा अड्डा पुढे कॅम्पमधल्या क्वालिटी रेस्टॉरंटमध्ये जमू लागला. काही तरी निमित्त काढायचं : कुणाचं चित्रप्रदर्शन, कुणाचं पुस्तक प्रकाशन, कुणाचा वाढदिवस; आणि सात-आठ जणांनी रात्री क्वालिटीत जमायचं. मग गप्पा, खाणंपिणं, विनोद, भांडणतंटा, अबोला वगैरे वगैरे.

असेच एकदा कोजागिरी पौर्णिमेचं कारण काढून क्वालिटीत जमलो होतो. गप्पा खूप रंगल्या होत्या.



एवढ्यात माझ्या खांद्यावर बोट.

बघतो तर हेंदळे.

माझा चेहरा नुसता प्रश्नार्थक.

हेंदळे हसऱ्या चेहऱ्यानं म्हणाले, "फक्त पाच सेकंदच घेतो तुमची."

"आलोच हं!" असं मित्रांना सांगून मी बाजूला गेलो.

हेंदळे म्हणाले, "एक हत्ती आहे उत्तम, पाठवू का?"

"हत्ती?"

"हो, डर्टचीप, साहेब. सेकंडहँड व्हेस्पा स्कूटरसुद्धा येणार नाही एवढ्या किमतीत!"

यानंतर दोन-चार दिवस गेले. सकाळचे दहा वाजले होते. मी कामात गुंग होतो. आणि घरून फोन आला, "अहो, तुम्ही कुणाला हत्ती पाठवायला सांगितलं होतं का?" (...)

संध्याकाळी उशिरा घरी आलो. येताच वातावरणातला ताण जाणवला. आधी स्टडीत जाऊन मी एन्सायक्लोपिडीया काढला. एलिफंट. इंडियन एलिफंट. इतेफास मक्सिमस. रोज गवत किंवा झाडपाला – दोनशे पंचवीस किलोग्राम? बाप रे!

त्या काळी कर्वे रस्त्याच्या मटण मार्केटशेजारी असलेल्या गवतबाजारात जाऊन दोनशेपंचवीस किलो गवत घेऊन आलो. हत्तीपुढे टाकलं. आमची वादावादी झाली. बायको म्हणाली, "कशाला ही पीडा विकत आणली? त्याची भर करायला कोण आहे घरात? माझ्याच्यानं हे होत नाही."

"त्यात काय मोठंसं? शेजारच्या जगतापांनी एक जाफराबादी म्हैस आणलीय. ते दोघं मिळून तिचं करतात. तसं करू."

"पण म्हैस उद्या दूध तरी देईल. हत्ती काय दूध देणार आहे?" (...)

तीनच दिवस हत्तीचं करावं लागलं. तिसऱ्या दिवशी 'टाईम्स'मध्ये जाहिरात वाचली : असा-असा दिसणारा, इतक्या वयाचा, इतक्या वजनाचा हत्ती चुकला आहे. कोणाला सापडला असेल त्यांनी कृपा करून ७४७२७३२ या नंबरवर फोन करावा. झालेला खर्च आणि पारितोषिक देऊन हत्ती घेऊन जाऊ...

मी तत्काळ फोन केला.

हेंदळ्यांकडून आता काहीही घ्यायचं नाही असा निश्चय मी केला. पण हेंदळे वर्ष-दोन वर्षं कुठं दिसले नाहीत. एकवार मी मुंबईहून डेक्कन-क्वीननं पुण्याला येत होतो. चहा-टोस्टची ऑर्डर कॅन्टीनला देऊन मी वाट पाहत होतो, तर वेटरच्या मागोमाग हेच आले, हेंदळे. प्रसन्न हसून म्हणाले, “नमस्कार!”

“नमस्कार!”

“बरी गाठ पडली. एक अँटिक रेल्वे इंजीन आहे. ब्रास कॉपर, चकचकीत. फारच छान आहे. चीप देतो अगदी. पाठवू का?”

“रेल्वे इंजीन, हेंदळे?”

“हो, पीस आहे. खूश व्हाल बघून.”

मी थक्क होऊन हेंदळ्यांकडे बघत राहिलो. म्हणालो, “मी कळवतो, हेंदळे तुम्हाला!”

**- व्यंकटेश माडगूळकर**

**क. कथेमध्ये वापरलेले इंग्रजी शब्द आणि त्यांचे मराठी प्रतिशब्द किंवा अर्थ दिले आहेत. त्यांच्या जोड्या जुळवा.**

| **इंग्रजी** | **मराठी** |
|---|---|
| सेट | वापरलेले |
| कार्डबोर्ड बाईंडिंग | मूठ |
| डर्टचीप | ज्ञानकोश |
| हँडल | जुने व किमती |
| स्टडी | पुठ्ठा बांधणी |
| सेकंडहँड | मातीमोल |
| एन्सायक्लोपिडीया | संच |
| अँटिक | अभ्यासिका |

**ख. वर्णन करताना लेखकाने काही वाक्यांची क्रियापदे लिहिलेली नाहीत. अशी पाच वाक्ये निवडा. योग्य अर्थाच्या क्रियापदाचे योग्य काळातील रूप वापरून वाक्ये पूर्ण करा.**

उदा॰ सकाळी आठ-साडेआठची वेळ होती.

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

**ग. पुढील वाक्यांमधून गाळलेले शब्द कथेत आहेत. ते शोधून वाक्ये पूर्ण करा.**

अ. खानविलकरांकडे जुन्या नाटकांच्या काही दुर्मीळ जाहिराती आहेत.

आ. रविवारी सकाळी खांद्याला पिशवी ---------------------- मासे आणायला जाणारे नाईककाका आता पुन्हा दिसणार नाहीत.

इ. मियाँसाहेबांनी जुळवलेल्या तंबोऱ्यावरून नुसते बोट फिरवले, तरी मैफलीचे वातावरण ---------------------- होऊन जाई.




ई. दीपाला काही स्पॅनिश कादंबऱ्यांचे ---------------------- करण्यात रस आहे.

उ. उन्मेषच्या मित्रांनी त्याच्या खोलीला कचरापेटीची ---------------- आणली आहे.

ऊ. माझ्याकडे मराठी साहित्याच्या इतिहासाचे दोन्ही ---------------------- आहेत.

ए. मी ते ---------------------- जपत असतो.

ॲ. वाड्याच्या दिवाणखान्यातील सर्व खांब चांदीच्या पत्र्याने ---------------------- होते.

ऐ. भिंतीवर ---------------------- चित्रे काढली होती असे लोक सांगतात.

ओ. आज सोसायटीच्या बैठकीत पुन्हा ---------------------- दुरुस्त्यांचा विषय निघेल.

ऑ. पुन्हा जोरदार ---------------------- होईल.

९ **योग्य ती दोन वाक्ये निवडा आणि पुढीलपैकी योग्य ते परिणामबोधक उभयान्वयी अव्यय वापरून त्यांचे एक वाक्य बनवा. (एकापेक्षा जास्त जोड्या जमणे शक्य आहे.)**

**(म्हणून, तेव्हा, याकरिता, सबब, त्यामुळे)**

सांगितलेल्या वेळात मी हे काम पूर्ण करू शकलो नाही.

मी दिवसरात्र काम केले.

मी तुमची माफी मागतो.

मला आज रजा मंजूर करावी.

मी हे काम वेळेत पूर्ण करू शकलो.

आज संध्याकाळची सभा रद्द झाली आहे.

आमदारसाहेबांना आजची संध्याकाळ मोकळी आहे.

त्याचे पोट कायम बिघडलेले असते.

जयेशला उघड्यावरील पदार्थ खाण्याची सवय आहे.

प्रकृतिअस्वास्थ्यामुळे मी आज कामावर येऊ शकणार नाही.

त्याचे डोके सतत दुखत असते.

प्रमुख गायिकेचा घसा बसला आहे.

तो खूप काम करून पैसे साठवत आहे.

दिनेश आपल्या मुलांना उच्च शिक्षणासाठी परदेशी पाठवणार आहे.

पूर्वघोषित संगीत मैफिलीचा कार्यक्रम आज होऊ शकत नाही.

राजेश दिवसभर कॉम्प्युटरसमोर बसलेला असतो.

उदा. राजेश दिवसभर कॉम्प्युटरसमोर बसलेला असतो, त्यामुळे त्याचे डोके सतत दुखत असते.

क. ---

ख. ---

ग. ---

घ. ---

च. ---

छ. ---

ज. ---

**१० खाली दिलेल्यांपैकी योग्य ती कालवाचक क्रियाविशेषण अव्यये घालून रिकाम्या जागा भरा.**

(आता, अजून, लगेच, एरवी, आता, तेव्हा, पूर्वी, उद्या, ह्यावेळी, काल, तेव्हा, लगेच)

**बाबा** : तुला कॉलेजचा प्रवेशअर्ज भरायला सांगून आठ दिवस झाले. (क) .................... तू भरला नाहीस तो अर्ज? (ख) .................... काय करायचं? तारीख तर उलटून गेली. (ग) .................... मी तुला रागवत नाही. पण (घ) .................... अगदी कमाल झाली. मागच्या वर्षाचीच गोष्ट घे. (च) .................... ही तू असाच आळशीपणा केला होतास. (छ) .................... माझ्या मित्राने काही तरी ओळख काढून आपलं काम करून दिलं होतं. पण मी (ज) .................... त्याची मदत घेणार नाही. (झ) ..........जा कॉलेजात, अर्ज घेतायत का बघ, नाही तर बस ह्या वर्षी घरातच.

**सतेज** : बाबा, अहो किती बोलताय! मला उत्तर तरी देऊ दे! मी (ट) .................... अर्ज भरून दिलाय. (ठ ) .................... (ड) .................... पावती मिळायची. आता दोन दिवसांनी मिळते. मिळाली की (ढ) .................... तुम्हाला दाखवेन.

**११ डावीकडील रकान्यातील संवादात काही मोकळ्या जागा आहेत. उजवीकडील रकान्यातील योग्य ते कालवाचक क्रियाविशेषण अव्यय निवडून त्या जागा भरा. काही अव्यये एकापेक्षा जास्त जागी वापरता येतील. पण तुम्हाला सर्व अव्यये वापरून एक अर्थपूर्ण संवाद तयार करायचा आहे, ह्याकडे लक्ष द्या.**

**अ** : तू सिनेमा पाहतोस का?
**ब** : हो, पाहतो की .................... .
**अ** : .................... कधी पाहिलास?
**ब** : .................... पाहिला एक मराठी सिनेमा.
**अ** : मग? आवडला का?
**ब** : हो, छान होता. .................... मराठीतच चांगले सिनेमे येतात.
**अ** : असंच काही नाही. मी .................... एक मस्त हिंदी सिनेमा पाहिला. इंग्रजी सिनेमेपण पाहतो मी. चांगले चांगले इंग्रजी सिनेमे .......... येत असतात.
**ब** : हो, पुढल्या वर्षीपण काही इंग्रजी सिनेमे येणार आहेत. त्यांच्या जाहिराती .......... पासून चालू आहेत. .......... मित्रांत त्यांचीच चर्चा चालू आहे.
**अ** : अरे, पण तो सायन्स फिक्शन सिनेमा बुडवू नकोस हं! असे सिनेमे .................... येत नाहीत.
**ब** : तो सिनेमा मी बुडवणार? शक्यच नाही. तो तर मी .................... पाहीन.



आता,
नुकताच,
हल्ली,
सध्या,
परवा,
कधीकधी,
वारंवार,
परतपरत,
अलीकडे,
सतत

## १२ खाली दिलेल्या क्रियापदांपैकी योग्य त्या धातूला 'आयला' प्रत्यय लावून वाक्ये पूर्ण करा.

**(देणे, करणे, भरणे, आणणे, घेणे, पोहणे, कापणे, करणे, येणे, खाणे)**

**तुला काय आवडेल करायला?**

आई : मंदिरा, मला आज घरात खूप कामं आहेत. कॉलेजातून परत येताना विजेचं बिल भरशील का?



मंदिरा : नाही, बिल (क) ------------------------------ मला नाही जमणार.

आई : मग वाण्याची यादी देशील का?

मंदिरा : छे छे, याद्या वगैरे (ख) ------------------------------ मी काही कामवाली गंगूबाई आहे?

आई : मग नियाला शाळेतून आणशील?

मंदिरा : काय गं आई, फालतू कामं सांगतेस! मी नाही जाणार तिला (ग) ------------------------------.

आई : तू काहीच मदत करणार नाहीयेस का?

मंदिरा : जरा चांगली कामं सांग ना (घ) ------------------------------.

आई : म्हणजे कशी? काय जमेल आणि आवडेल तुला (च) ------------------------------?

मंदिरा : अंऽऽऽ, पण मलाही खूप कामं आहेत गं! आधी जायचंय निलूकडे, तिच्याकडून माझी वही (छ) ------------------------------. मग जाईन पार्लरमध्ये केस (ज) ------------------------------. नंतर तरणतलावावर (झ) ------------------------------, आणि नंतर आम्ही मैत्रिणी जाणार आहोत भेळ (ट) ------------------------------. मला उशीर होईल हं घरी (ठ) ------------------------------!

## १३ शब्दखेळ

**खालील संवादात काही शब्द लाल रंगात दिले आहेत आणि काही ठिकाणी मोकळ्या जागा आहेत. ह्या लाल शब्दांतील अक्षरांच्या जागा बदलल्यात तर तुम्हाला एक नवीन शब्द मिळेल. तो नवा शब्द कोणत्या रिकाम्या जागेत चपखल बसतोय ते बघा आणि मोकळ्या जागा भरा.**



जयेश : काय हो, गडावर चढायचा रस्ता हाच ना?

चिन्मय : हो, हाच. पण तुम्हाला गाडीनं वर जायचंय की आमच्यासारखं पायी वर चढायचं आहे?

जयेश : म्हणजे?

चिन्मय : चांगले तरुण दिसताय. चला आमच्याबरोबर. अनुभवा तरी गड चढायची मजा!

जयेश : अंऽऽ, बघतो.

चिन्मय : का? पायी गड चढण्यात रस नाही का तुम्हाला?

जयेश : तसं नाही हो, पण...

चिन्मय : चला चला, काही आढेवेढे घेऊ नका आता. एकदा का पायी गड (क) ---------------- केलात ना, की बघा तुम्हालाच किती छान वाटेल ते. आणि सगळा थकवा, शीण आमच्या टपरीवर पोचलात की पार पळून जाईल.

जयेश : का? काय आहे तिथे?

चिन्मय : अहो, एकदा का गडमाथ्यावर पोचलो, की टपरीवरची गरमगरम भजी खायची. बघा बघा, नुसत्या कल्पनेनंच माझी (ख) ---------------- कशी (ग) ---------------- खवळली आहे ते!

जयेश : इतकी चविष्ट असतात का?

चिन्मय : म्हणजे काय! अहो, माथ्यावर पोचल्या पोचल्या लोकांची नुसती रीघ लागते टपरीसमोर भज्यांसाठी!

जयेश : माझी आई करते (घ) ---------------- मस्त भजी.

चिन्मय : असेल हो, नक्की करत असेल. पण एकदा इथला आलं घातलेला चहा प्या भज्यांसोबत आणि मग बघा! (च) ---------------- अनुभव घ्यायला परत परत आला नाहीत इथे, तर नाव बदलीन माझं.

जयेश : असं म्हणताय? बरं, चला, येतो मी तुमच्याबरोबर. अंऽ, तुमचं नाव काय म्हणालात?

## १४ शब्दांची गंमत

**घाबरू नका. हा काही एकच शब्द नाही. ह्यात दडले आहेत एकूण आठ शब्द. आणि ते सर्व 'भेट' ह्या शब्दाशी निगडित आहेत. काढा शोधून आणि लिहा खाली दिलेल्या जागेत.**

**फेभेचटटानाव्हाकापाचारसडीबलाडमकवमंकळहिक्लबुट्टा**

उदा॰ भेट,

क. ----------------

ख. ----------------

ग. ----------------

घ. ----------------

च. ----------------

छ. ----------------

ज. ----------------

झ. ----------------

## १५ ह्या क्रियापदापासून कोणते नाम होते?

नाम, त्याचे लिंग आणि अनेकवचन लिहा.

| | क्रियापद | नाम |
|---|---|---|
| | उदा. बदलणे | तो बदल, ते - |
| क. | अनुभवणे | |
| ख. | वाचणे | |
| ग. | शिकवणे | |
| घ. | चालणे | |
| च. | सांभाळणे | |
| छ. | ओळखणे | |

## १६ शब्द ...

खाली काही शब्द दिले आहेत. ते लिहिताना काही चुकले आहे का?

| शब्द | दुरुस्त शब्द |
|---|---|
| रसता | |
| वरषाव | |
| पर्कर | |
| पुरसकार | |
| दरशन | |
| मान्सी | |
| अरथात | |
| कार्भार | |
| वायाम | |
| ओर्डाआर्डा | |



## १७ पुढील चित्रफीत बघा आणि काही प्रश्नांची उत्तरे द्या. (पहिली १० मिनिटे)

क. सुधा मूर्ती ह्यांची ओळख कोण म्हणून करून देता येईल?

अ. ------------------------ आ. ------------------------ इ. ------------------------ ई. ------------------------

ख. ह्यांपैकी कोणती ओळख सुधा मूर्तींना स्वतःला जास्त आवडते? का?

--------------------------------------------------------------------------------

ग. सुधा मूर्ती ह्यांच्या मराठी बोलण्याच्या पद्धतीवर कोणत्या शहराचा प्रभाव दिसतो?

--------------------------------------------------------------------------------

घ. सुधा मूर्ती ह्यांची किती पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत आणि त्या पुस्तकांच्या साधारण किती प्रती खपल्या आहेत?

--------------------------------------------------------------------------------

च. समाजातील कोणत्या वर्गातील लोकांचा सहवास त्यांना जास्त आवडतो?

--------------------------------------------------------------------------------

छ. दिलेल्या शब्दांच्या योग्य त्या क्रियापदाबरोबर जोड्या जमवा.

| | |
|---|---|
| ठसा | करणे |
| दिवा | वाटणे |
| घुसमट | लावणे |
| आधार | उमटवणे |
| मन मोकळे | देणे |



## १ पुढील शब्दसमूहांसाठी योग्य शब्द लिहा.

क. शैक्षणिक वर्षाची सांगता करणारी परीक्षा - ------------------------

ख. चालू शैक्षणिक वर्षात पहिल्या सहा महिन्यांनंतर येणारी परीक्षा - ------------------------



ग. वर्षातून साधारणपणे दोनदा घेतली जाणारी कमी गुणांसाठी असलेली परीक्षा - ------------------------

घ. महाराष्ट्रात दहावीनंतर दिली जाणारी परीक्षा - ------------------------

च. बारावीनंतर दिली जाणारी परीक्षा - ------------------------

## २ पुढील वाक्ये कोणत्या विषयांतर्गत येऊ शकतात ते लिहा.

(भाषा, भौतिकशास्त्र, भूगोल, रसायनशास्त्र, इतिहास, गणित)

क. १८५७ चा स्वातंत्र्यलढा हा भारताच्या स्वातंत्र्य चळवळीचा प्रेरणास्रोत ठरला. ------------------------

ख. कोलकाता हे शहर ८८° पूर्व रेखावृत्तावर आहे. ------------------------




ग. आसमंतात सुरांचे, शब्दांचे आणि आवाजांचे संमेलनच भरलेले असते. गावाला जाग आलेली असते.
------------------------

घ. कॅल्शिअम हायपोक्लोराइडची कार्बन डायऑक्साइडबरोबर अभिक्रिया होऊन कॅल्शिअम कार्बोनेट आणि क्लोरिन तयार होतात.
------------------------

च. कोणत्याही संख्येला शून्याने गुणले की उत्तर शून्यच असते. ------------------------

छ. दोन वेगवेगळ्या वस्तुमानाच्या वस्तू उंचावरून सोडल्यास एकाच वेळी जमिनीवर पडतात.
------------------------

## ३ खालील प्रश्नोत्तरांच्या योग्य जोड्या जुळवा.

| प्रश्न | उत्तरे |
| --- | --- |
| क. भारताच्या इतर राज्यांमधील शिक्षणव्यवस्था महाराष्ट्रातील शिक्षणव्यवस्थेसारखीच आहे का? | अ. सर्वसाधारणपणे सहा. |
| ख. प्राथमिक शिक्षणस्तरावर प्रवेश घेताना विद्यार्थ्याचे वय किती असावे लागते? | आ. हो, विविध शासकीय व खासगी विद्यापीठांमधून अनेक संधी उपलब्ध आहेत. |
| ग. दहावीनंतरच्या शिक्षणासाठी कोणत्या शाखा निवडण्याची सोय आहे? | इ. पदवीनंतर घेतले जाणारे शिक्षण. |
| घ. बारावीनंतर शिक्षणाचे कोणते मार्ग उपलब्ध आहेत? | ई. नाही, थोडेफार फरक आढळतात. |
| च. पदव्युत्तर शिक्षण म्हणजे काय? | उ. कला, वाणिज्य, विज्ञान. |
| छ. महाराष्ट्रात संशोधनाला प्राधान्य दिले जाते का? | ऊ. विविध व्यवसाय व शाखांमधील प्रमाणपत्र अभ्यासक्रम किंवा पदविका, पदवी, पदव्युत्तर पातळीचे शिक्षण, तसेच संशोधनात्मक कामाच्या संधी उपलब्ध आहेत. |

| क. | ख. | ग. | घ. | च. | छ. |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| | | | | | |

## ४ एक लघुपट पाहा व खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

महाराष्ट्रात आजही काही जाति-जमातींमधील लोकांपर्यंत ‘शिक्षण’ पोहोचलेले नाही. जिथे एकवेळचे अन्न मिळवतानाच नाकी नऊ येतात तिथे शिक्षण घेणे ही चैन समजली जाते. अशाच समाजाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या पण तरीही शिकण्याची तीव्र इच्छा असलेल्या पिस्तुल्या ह्या मुलाची गोष्ट पाहा.



क. पिस्तुल्याची आई काय विकत असते?

-----------------------------------------------

-----------------------------------------------

ख. शाळेतील मास्तर पिस्तुल्याला काय सांगतात?

ग. पिस्तुल्याच्या शिक्षणाबद्दल आईचे काय म्हणणे असते?

घ. पिस्तुल्याचे नातेवाईक त्याला काय करायला शिकवतात व त्याची परिणती कशात होते?

च. पिस्तुल्या या व्यक्तिरेखेचे वर्णन करा.

छ. "विद्येविना मति गेली । मतीविना नीति गेली ।
नीतिविना गति गेली । गतीविना वित्त गेले ।
वित्ताविना शूद्र खचले । एवढे अनर्थ एका अविद्येने केले ।"
ह्या ओळींचा तुम्हाला कळलेला अर्थ थोडक्यात लिहा.



## ५ पुढील उतारा वाचा आणि त्यावर विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

मुंबई विद्यापीठाच्या इतिहासात, तसेच भारतीय, विशेषत: मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थिनींच्या दृष्टीने, १८ जुलै, १९८८ हा सुवर्णाक्षरांनी लिहिण्यासारखा दिवस होता. मुंबई विद्यापीठाची (आणि भारतीय विद्यापीठांतील) पहिली महिला पदवीधर कार्नेलिया सोराबजी हिच्या पदवीग्रहणप्रसंगाचा तो शताब्दी दिन होता. या दिवशी तिच्या तैलचित्राचे अनावरण मुंबई विद्यापीठाच्या पहिल्या महिला कुलगुरू श्रीमती मेहरू बेंगाली यांच्या हस्ते विद्यापीठामध्ये करण्यात आले.



कार्नेलिया सोराबजी या महिलेने १८८८मध्ये मुंबई विद्यापीठाच्या इतिहासात पहिली महिला पदवीधर होण्याचा मान मिळवला आणि त्यानंतर अनेक महिलांना विद्यापीठात शिक्षण घेण्याची संधी प्राप्त झाली. १९०१मध्ये ७५ मुली महाविद्यालयीन शिक्षण घेत होत्या. ही संख्या मार्च १९८९ अखेर ९०,५९४ एवढी होती. १९०१पासूनच महाविद्यालयीन शिक्षणाबरोबरच शिक्षिका, प्राध्यापिका, वकील, डॉक्टर, परिचारिका, सुईणी, उद्योजक, संशोधक, वैज्ञानिक अशा व्यवसायांतील वेगवेगळी पदे भूषवीत अनेक क्षेत्रांत मुलींनी उल्लेखनीय यश मिळवले.



**क. योग्य पर्याय निवडा.**

अ. प्रस्तुत उताऱ्याचा विषय हा नाही :
   १) तैलचित्राचे अनावरण
   २) कार्नेलिया सोराबजी
   ३) भारतातील स्त्री-शिक्षणाचा पाया

आ. कोणत्या साली कार्नेलिया सोराबजी पदवीधर झाल्या?
   १) १८८८   २) १९८८   ३) १९८९

**ख. पुढील वाक्ये त्यांचा अर्थ न बदलता सोपी करून लिहा.**

अ. मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थिनींच्या दृष्टीने १८ जुलै, १९८८ हा दिवस सुवर्णाक्षरांनी लिहिण्यासारखा दिवस होता.

---

---

आ. हा दिवस मुंबई विद्यापीठाची आणि एकूणच भारतीय विद्यापीठांतील पहिली महिला पदवीधर कार्नेलिया सोराबजी हिच्या पदवीग्रहणप्रसंगाचा शताब्दी दिन होता.

---

---

इ. कार्नेलिया सोराबजी या महिलेने १८८८मध्ये मुंबई विद्यापीठाच्या इतिहासात पहिली महिला पदवीधर होण्याचा मान मिळवला.

---

---

६ **'शिक्षण' हा शब्द या पाठात कोणकोणत्या विशेषणांसोबत आला आहे? कोणतीही आठ विशेषणे खालील चौकटींत लिहा.**

शिक्षण

## ७ रिकाम्या जागी योग्य तो तुलनावाचक शब्द लिहा.

पेक्षा (२)
सर्वांत
मध्ये (२)

क. तुझ्या जुन्या घड्याळा ---------------- नवीन घड्याळच मला जास्त आवडतं.
ख. आई आणि बाबां ---------------- मला आईच जास्त आवडते.
ग. हल्ली ॲप डेव्हलपर्सना ---------------- जास्त मागणी आहे.
घ. लॉ शिकायचा असेल तर इथल्या ---------------- पुण्यात चांगली महाविद्यालयं आहेत.
च. त्या चौघां ---------------- लीनाच जास्त हुशार आहे.

## ८ उदाहरणात दाखवल्याप्रमाणे वाक्ये बनवा.

एव्हरेस्ट – कांचनगंगा – किलिमांजारो (उंच)

उदा॰ कांचनगंगा हे शिखर किलिमांजारोपेक्षा उंच आहे. पण एव्हरेस्ट सर्वांत उंच शिखर आहे.

क. मिसिसिपी – ॲमेझॉन – गंगा (मोठी)

--------------------------------------------------------------------------------

ख. गाडी – स्कूटर – सायकल (महाग)

--------------------------------------------------------------------------------

ग. ससा – कुत्रा – घोडा (लहान)

--------------------------------------------------------------------------------

घ. तांबे – चांदी – सोने (स्वस्त)

--------------------------------------------------------------------------------



## ९ खालील परिच्छेद वाचून उदाहरणात दाखवल्याप्रमाणे वाक्ये बनवा.

कवायतीसाठी वर्गातल्या मुलींना रांगेत उभे केले आहे. ही रांग उंचीप्रमाणे लावण्यात आली आहे. कमी उंचीच्या विद्यार्थिनीपासून रांग सुरू होते ती सर्वांत उंच विद्यार्थिनीपाशी संपते.

तन्वीच्या पुढे हीना उभी आहे. हीनाच्या पुढे साक्षी. रांगेत पहिली उभी आहे मायरा. मायराच्या मागे गार्गी आणि गार्गीच्या मागे साक्षी. शेवटी उभ्या असलेल्या बलजितच्या पुढे आएशा उभी आहे जी तन्वीच्या मागे उभ्या असलेल्या महकच्या मागे आहे.

आता या मुलींच्या उंचींचे 'उंच' आणि 'बुटकी' ही विशेषणे वापरून वर्णन करा. त्यासाठी योग्य तुलनावाचक शब्द वापरा.

उदा॰ मायरा – मायरा ही मुलींमध्ये सर्वांत बुटकी मुलगी आहे.

क. साक्षी, गार्गी – --------------------------------------------------------
ख. महक, हीना – --------------------------------------------------------
ग. बलजित - --------------------------------------------------------
घ. आएशा, तन्वी – --------------------------------------------------------

**१० महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या नवीन योजने अंतर्गत राबवण्यात येणाऱ्या कार्यक्रमांविषयी आपण यापूर्वी चर्चा केली आहेच. पुढे अपेक्षित गट व प्रशिक्षणाच्या विविध संधींविषयी माहिती दिली आहे. दिलेल्या संधींमधून एक संधी निवडा व तिचा युवकांना कशाप्रकारे फायदा होऊ शकतो यावर ५ ते ७ वाक्यांत लिहा.**

MSSDS
SKILLED YOUTH...EMPOWERED MAHARASHTRA

### युवकांसाठी / युवतीसाठी कौशल्य विकास प्रशिक्षणाच्या विविध संधी

नोकरीच्या शोधात असलात, शिक्षण मध्येच सोडलेले असेल, ग्रामीण अथवा शहरी भागातील असाल, तर 15 ते 45 वयोगटातील सर्वांसाठी सुवर्णसंधी. आपल्यासाठी खालील कौशल्य विकासाच्या विविध संधी उपलब्ध आहेत.

1. तुमच्या आवडीच्या क्षेत्रात प्रशिक्षण निवडीची संधी
2. कौशल्य प्रशिक्षण प्रमाणपत्र
3. नवीन कौशल्य विकास प्रशिक्षण

1. नोकरी करताना प्रशिक्षण
2. नोकरीच्या नवनवीन संधी
3. कौशल्यवर्धन संधी

1. समुपदेशन
2. स्वयंरोजगार प्रशिक्षण व साहाय्य
3. कौशल्यातून व्यक्तिमत्त्व विकास

## ११ रिकाम्या जागा भरा.

| | | |
|---|---|---|
| विभक्ती | आपण | स्वत: |
| प्रथमा | आपण | स्वत: |
| द्वितीया | ............, ............, आपल्यास, आपल्याला | स्वत:स, ............ |
| तृतीया | ............, आपल्याशी | स्वत:, ............ |
| चतुर्थी | आपणास, आपणाला, ............, ............ | ............, स्वत:ला |
| पंचमी | ............, आपल्याहून | स्वत:हून, (स्वत:कडून) |
| षष्ठी | आपला, ............, आपले / आपलं, ............, आपल्या, ............ | ............, स्वत:ची, ............ / स्वत:चं, स्वत:चे, ............, स्वत:ची |
| सप्तमी | आपणात / ............ | स्वत:त |

## १२ रिकाम्या जागा भरा.

क. जगाची चिंता करू नकोस. आपलं आ............ पटलं की झालं.

ख. नेहमी काय सांगायचं रे! जरा ............ काही करशील की नाही?

ग. जरा आमच्यातपण राहत जा. काय नेहमी स्व............ असतेस.

घ. ती दोघे सतत आपलं आ............ बघतात.

च. सगळे थकलेयत आता तुला समजावून. तू स्व............ समजावल्याशिवाय काहीच बदलणार नाहीये.

छ. काळजी घे स्व.............



## १३ खालील व्यक्तींना कोणते क्षेत्र सुचवाल?

क. मला अभ्यासात विशेष रुची नाही. पण लहानपणापासूनच स्वत:च्या तसेच इतरांच्या चेहऱ्यावर आणि केसांवर वेगवेगळे प्रयोग करून पाहायला आवडतं. ------------------------

ख. मी फावल्या वेळात बाबांच्या मित्राच्या गॅरेजमध्ये काम करतो. त्यामुळे वाहनांबद्दल बऱ्यापैकी माहिती आहे. ------------------------

ग. मला फिरण्याची प्रचंड आवड आहे. वेगवेगळ्या ठिकाणांची ऑनलाईन माहिती काढून एकटंच भटकायला आवडतं. ------------------------

घ. समाजसेवा करण्याची इच्छा आहे. विशेषत: रुग्णांसाठी, आजारी माणसांसाठी काहीतरी करायचंय. ------------------------

च. मला विद्युत उपकरणांची दुरुस्ती करणं जमतं. ------------------------

छ. मला शेतीविषयक एखादा अभ्यासक्रम करून त्याच क्षेत्रात काम करायची इच्छा आहे. ------------------------

ज. पेहेरावात नवनवीन प्रयोग करायला आवडतात. माझे कपडे मीच डिझाईन करते. ------------------------

झ. मला आईसारखंच टेलिकॉम ऑफिसर व्हायचंय. ------------------------

**प्रशिक्षणार्थ्यांना उपलब्ध असलेली प्राधान्याची क्षेत्रे (SECTORS)**

१ माहिती तंत्रज्ञान
२ ब्युटी कल्चर
३ स्पा व वेलनेस
४ वस्त्रनिर्मिती
५ इलेक्ट्रिकल व इलेक्ट्रॉनिक्स
६ बँकिंग व अकाउंटिंग
७ रत्ने व दागिने
८ अग्निशमन व सुरक्षा अभियांत्रिकी
९ वैद्यकीय व नर्सिंग
१० फॅशन डिझाईन
११ वाहनदुरुस्ती
१२ कापड व वस्त्रोद्योग
१३ अक्षय ऊर्जा
१४ पर्यटन व आदरातिथ्य
१५ उत्पादन व निर्मिती
१६ प्लास्टिक प्रक्रिया
१७ किरकोळ विक्री
१८ आरोग्य व तत्सम
१९ दूरसंचार
२० कृषी
२१ सुरक्षारक्षक
२२ हस्तनिर्मिती कागद व कागद उत्पादने
२३ रेफ्रिजरेशन व एअर कंडिशनिंग
२४ हस्तकला



**१४ खालील यशोगाथा वाचा व कोणतीही एक गाथा निवडून त्यावर एक बातमी तयार करा.**

**(क) दिव्यांग व घरची नाजूक परिस्थिती**

नाव : पल्लवी कांबळे, कोल्हापूर (दिव्यांग)

पार्श्वभूमी : ६० टक्के अपंग, घरची नाजूक परिस्थिती, स्वत:चा एखादा व्यवसाय सुरू करायची इच्छा

अभ्यासक्रम : हॅंडमेड पेपर व पेपर वस्तू

"मी अभ्यासक्रम पूर्ण केला व माझा स्वत:चा व्यवसाय सुरू केला. मी कागदाची पाकिटे बनवून विविध ठिकाणी पुरवठा करते ज्यामुळे मला दरमहा ३००० ते ४००० रु. मिळतात."

**(ख) करिअरच्या नवीन संधीच्या माहितीचा अभाव**

नाव : अजित कारंडे, सातारा

पार्श्वभूमी : १२वी पास, करिअरच्या नवीन संधींविषयी माहिती नव्हती, मित्राकडून माहिती मिळाली

अभ्यासक्रम : फिल्ड टेक्निशिअन कॉम्प्युटर कोर्स

"प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर भारत फोर्ज लि. कंपनीत निवड झाली. सध्या दरमहा १००८० रु. वेतनावर काम करतोय. माझा आत्मविश्वास यामुळे उंचावला आहे."

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

**१५ क. 'जर-तर' किंवा 'जरी-तरी' ह्या अव्ययांचा योग्य अर्थाने वापर करून परिच्छेद पूर्ण करा.**

महोदय,

तुमचे ई-पत्र मिळाले. तुम्हाला तातडीने हव्या असलेल्या पुस्तकांची यादी पाहिली. मी आमच्या संस्थेत ती सगळी पुस्तकं आहेत का पाहतो. ---------------------- सगळी पुस्तकं मिळाली, ---------------------- लगेच पाठवतोच. पण सगळी ---------------------- नसली, ---------------------- जितकी मिळतील तितकी पाठवण्याची व्यवस्था करतो. यापुढे मात्र तुम्ही थोडी काळजी घ्या. ---------------------- पुस्तकांची बरीच मोठी यादी असेल, ---------------------- शक्यतो किमान १५ दिवस आधी कळवलंत ---------------------- बरं होईल. म्हणजे यादीतली काही पुस्तकं




---------------------- आमच्याकडे नसली, -------------------------- आम्ही त्या प्रकाशन संस्थेकडून ती पुस्तकं मागवून तुमच्यापर्यंत पोहोचवू शकू आणि तुमचीही अडचण होणार नाही.

कळावे.
सरस्वती ग्रंथदालन.

**ख. पुढील वाक्ये 'जर-तर' किंवा 'जरी-तरी' ह्या अव्ययांचा वापर करून आणि आवश्यक बदल करून लिहून काढा.**

अ. मुलांना प्रायोगिक तत्त्वावर चालणाऱ्या शाळांमध्ये घातल्यास त्यांचा सर्वांगीण विकास होण्याची शक्यता वाढते.

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

आ. मुलांना एखाद्या विषयात रस नसतानाही त्या विषयाची गोडी लावण्याचं काम शिक्षकाचं असतं.

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

इ. पुन:पुन्हा आवाहन करूनही पालकांनी आपल्या पाल्याला परीक्षेचा ताण देणं कमी केलेलं नाही.

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

ई. चार भिंतींच्या बाहेरच्या जगात डोकावून पाहिल्यावर तुम्हाला शिक्षणाची आणि ज्ञानाची अगणित क्षेत्रं दिसतील.

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

उ. पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या तरुणांमध्येही संशोधनाची कळकळ दिसत नाही.

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

## १६ योग्य ते संकेतदर्शक उभयान्वयी अव्यय वापरा.

**(तर, की (२), म्हणजे)**

क. मी लिहून देतोय ते औषध घ्या ---------------- बरं वाटेल.

ख. पूर्वी ग्रॅज्युएशन झालं ------------------- नोकरी लागायची. हल्ली पोस्ट ग्रॅज्युएशननंतरपण नोकरीची शाश्वती नसते.

ग. सहामाही परीक्षेत पहिली आलीस ---------------- हिवाळी शिबिराला जाता येईल.

घ. शारीरिक शिक्षणाचा तास सुरू झाला --------------- मुलांच्या उत्साहाला आणखीनच उधाण येई.



## १७ खालील लेख वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे लिहा.

**ज्ञान मातृभाषेतून शिक्षण**

मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमध्ये या शैक्षणिक वर्षापासून द्विभाषिक शिक्षण देण्यात येणार आहे. हा प्रयोग स्तुत्य असला, तरी पहिलीत येणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रथम भाषा म्हणून इंग्रजी शिकवण्याचे आव्हान पालिका शिक्षक कसे पेलतात यावर सर्व अवलंबून आहे.

मुंबईसारख्या शहरात जेथे मिश्र लोकवस्ती आहे, तेथे मराठी आणि इतर प्रादेशिक भाषांच्या शाळांचा प्रश्न ऐरणीवरच आला आहे. पालिका शाळांचा अस्तित्वाचा लढा हा गेल्या दोन दशकांपासून सुरू आहे. चांगल्या सोयीसुविधा देण्यापासून ते चांगले शिक्षण देण्यापर्यंतचे आव्हान प्रशासनासमोर आहे. त्यासाठी विविध मार्गांनी प्रयत्न करत असतानाच विद्यार्थ्यांच्या हातात टॅब दिला आणि शालोपयोगी वस्तूंचे वाटपही सुरू झाले, तरीही विद्यार्थी येईनात. यामुळे आता द्विभाषिक शिक्षणाचा पर्याय समोर आला असून पालिका प्रशासन आणि सत्ताधारी यांनी त्याची अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली आहे. मागील शैक्षणिक वर्षात ५७ शाळांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर हा प्रयोग केल्यानंतर या शैक्षणिक वर्षापासून हा प्रयोग पालिकेच्या सर्वच शाळांमध्ये करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला. यामुळे विद्यार्थिसंख्या वाढेल यात दुमत नाही. याची अनेक उदाहरणे मुंबई शहरात आहे. बालमोहनसारख्या नामांकित शाळेने मुंबईत अशा शिक्षणाची पाळेमुळे रोवली. या शाळेने ज्यावेळेस पूर्व प्राथमिक वर्गापासून मराठी आणि इंग्रजी या दोन्ही प्रथम भाषा शिकवण्यास सुरुवात केली त्यावेळेस त्या शाळांमधील विद्यार्थी टिकून राहिले. इतकेच नव्हे, तर ते वाढूही लागले. हे सर्व होत असतानाच उपनगरातील अनेक मरणासन्न झालेल्या अनुदानित मराठी शाळांनी हा प्रयोग सुरू केला. त्यांना यात यश मिळू लागले. अर्थात, यानंतर इंग्रजी माध्यमाच्या शाळांचं पेव फुटण्याआधी जेवढी विद्यार्थिसंख्या होती तेवढी मिळवणे या शाळांना अद्याप शक्य झाले नसले, तरी विद्यार्थिसंख्या रोडावणे कमी झाले, तसेच काही प्रमाणात विद्यार्थी वाढूही लागले.




राजेंद्र दर्डा शिक्षणमंत्री असताना सरकारी शाळांमध्ये द्विभाषिक शिक्षण देण्याबाबत विचारमंथन सुरू झाले होते. शिक्षक आमदार कपिल पाटील यांनी विविध मुख्याध्यापकांची पथके विविध राज्यांमध्ये पाठवून तेथील शिक्षण व्यवस्था आणि आपली शिक्षण व्यवस्था यांतील तफावत काय हे जाणून घेऊन तत्कालीन सरकारला काही सूचना केल्या होत्या. यात मराठी शाळा द्विभाषिक करा ही एक महत्त्वाची सूचना होती. यावर त्यावेळी अंमलबजावणी होऊ शकली नाही. मात्र, काही खाजगी अनुदानित शाळांनी हा प्रयोग सुरू केला. गेल्या तीन वर्षांच्या कालावधीत शिक्षणमंत्री विनोद तावडे यांच्या शिक्षण विभागानेही जिल्हा परिषद शाळांमध्ये हा प्रयोग सुरू केला. यात यश इतके मिळाले, की अनेक इंग्रजी शाळांमधील विद्यार्थी या शाळांना पसंती देऊ लागले. हे सुरू झाल्यावर खरी टीका झाली ती म्हणजे 'एक ना धड भाराभर चिंध्या'. म्हणजे या मुलांना धड मराठीही येणार नाही आणि धड इंग्रजीही येणार नाही. पण प्रत्यक्ष परिस्थिती वेगळी होती. हे विद्यार्थी दोन्ही भाषांवर प्रभुत्व मिळवत होते. स्वातंत्र्यपूर्व काळात देशात द्विभाषिक शिक्षणाची परंपरा होती. तेव्हा पाचवीपासून मराठी आणि इंग्रजी दोन्ही प्रथम भाषा शिकवल्या जात होत्या. मात्र, स्वातंत्र्यानंतर सातवीपर्यंत इंग्रजी शिकवायचेच नाही असा




दंडक आला आणि तो काही काळ चालला. या सर्वात केंद्रीय शाळा मागे नव्हत्या. त्यांनी पहिल्यापासूनच हिंदी आणि इंग्रजी दोन्ही प्रथम भाषा शिकवण्याचे धोरण कायम ठेवले. पण जागतिकीकरणानंतर मातृभाषेवर ज्ञानभाषेचे आक्रमण होऊ लागले आणि या दोन्ही भाषांचा संगम करून ज्ञानमातृभाषा शिकवणे ही काळाची गरज वाटू लागली, तेव्हा मराठी शाळांच्या अभ्यासक्रमात पुन्हा खालच्या वर्गात इंग्रजीला प्राधान्य दिले जाऊ लागले. पण गेल्या पाच वर्षांत या मराठी शाळांच्या अस्तित्वाच्या लढाईत ज्ञानमातृभाषेला विशेष महत्त्व दिले जाऊ लागले आणि सरकारी शाळांमध्ये याची अंमलबजावणी सुरू होऊ लागली. मुंबई महापालिका शाळांच्या बाबतीत हा निर्णय घेत असताना एक वेगळेच आव्हान समोर होते ते राजकीय पक्षांचे. मात्र सत्ताधाऱ्यांसह मराठीसाठी झटणाऱ्या राजकीय पक्षांनीही याला विरोध न करता त्याचा पुरोगामी विचाराने स्वीकार करत मराठी मुलगा कुठल्याही स्पर्धेत मागे पडणार नाही यासाठी याची बिनविरोध अंमलबजाणी करण्यास मान्यता दिली. यामुळे महापालिका आयुक्त अजोय मेहता आणि शिक्षणाधिकारी महेश पालकर हे काम यशस्वीपणे करू शकले. परिणामी, शहरातील सर्व भाषांच्या पालिका शाळांमध्ये यंदा इंग्रजी प्रथम भाषा शिकवली जाणार आहे. यासाठी शिक्षकांनाही विशेष प्रशिक्षण देण्यात आले आहे. यामुळे विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे इंग्रजी उच्च दर्जानुसार शिकविले जाईल याची काळजीही घेण्यात आली आहे.

हे सर्व छान आणि स्वागतार्ह असले, तरी याची अंमलबजावणी करत असताना एक आव्हान आहे. ते म्हणजे हे शिक्षण देण्याची या यंत्रणांची सक्षमता. आता आपला अभ्यासक्रम जो आहे तो शब्दांकडून अक्षर ओळख करून देणारा आहे. विद्यार्थ्यांना मातृभाषेतील शब्द माहीत असतात. मात्र इंग्रजीतील शब्द किंवा त्या भाषेची अजिबात ओळख नसताना थेट इयत्ता पहिलीत प्रथम भाषा इंग्रजी शिकवणे हे थोडे चुकीचे आहे असे, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ॰ वसंत काळपांडे यांना वाटते. ज्या शाळांमध्ये पहिलीपासून प्रथम भाषा इंग्रजी शिकविली जाणार आहे, त्या शाळांमधील विद्यार्थ्यांना पूर्व प्राथमिक वर्गात इंग्रजीची ओळख करून देणेही आवश्यक आहे असे त्यांना वाटते. यामुळे पालिका शाळांमध्ये पूर्व प्राथमिक वर्ग सुरू झाल्यास त्यांच्या या प्रयोगाची फळे अधिक रसाळ मिळतील अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. शिक्षणक्षेत्रातील या प्रयोगांमध्ये विद्यार्थिहिताचे अनेक निर्णय होत आहेत. हे सर्व होत असताना त्यांची योग्य अंमलबजावणी करून शास्त्रीयदृष्ट्या अभ्यास करून घेतलेल्या निर्णयाचे फलित विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणे महत्त्वाचे आहे. तसे झाले, तर या निर्णयांचे आणि प्रयोगाचे खरे फलित मिळेल आणि आपण विद्यार्थ्यांना ज्ञानमातृभाषेतून शिक्षण देऊन जगासमोर एक नवा आदर्श ठेवू शकू. यासाठी यंत्रणा सक्षम करणे ही सरकारची जबाबदारी आहे. अन्यथा विद्यार्थी या नवीन प्रयोगाचे गिनिपिग होतील आणि त्यांच्या हाती काहीच येणार नाही. असे होऊ नये म्हणून या प्रयोगांना समाजातूनही पाठबळ मिळाले तर यात यश नक्कीच आहे. हे यश नक्की कोणाचे याचा श्रेयवाद होण्यापेक्षा सर्व यंत्रणांनी आपली जबाबदारी चोख पार पाडली आणि एक परिपक्व पिढी तयार केली, अशी भावना भविष्यात निर्माण होणे योग्य राहील.

**- नीरज पंडित**

**क. योग्य पर्याय निवडा.**

अ. 'प्रश्न ऐरणीवर येणे' म्हणजे -
१. प्रश्न पडणे
२. प्रश्न महत्त्वाचा होणे
३. प्रश्न विचारणे

आ. मागील शैक्षणिक वर्षात शाळांमध्ये कोणता प्रयोग केला गेला?
१. विद्यार्थ्यांना टॅब देण्याचा
२. द्विभाषिक शिक्षणाचा
३. शालोपयोगी वस्तू वाटपाचा



इ. 'द्विभाषिक शिक्षण' म्हणजे –
१. दोन भाषा शिकवणे
२. दोन भाषा प्रथम भाषा म्हणून शिकवणे
३. दोन परकीय भाषा शिकवणे

ई. नवीन प्रयोगाचा काय परिणाम झाला?
१. विद्यार्थी दोन्ही भाषांवर प्रभुत्व मिळवू लागले.
२. विद्यार्थ्यांना धड ज्ञानभाषा म्हणजेच इंग्रजी नीट येत नव्हती.
३. विद्यार्थी मातृभाषेत म्हणजेच मराठीत कच्चे राहत होते.

उ. कधीपासून इंग्रजीला पुन्हा प्राधान्य दिले जाऊ लागले?
१. भारताच्या स्वातंत्र्यानंतर लगेच.
२. जागतिकीकरणानंतर.
३. अलीकडेच.

ऊ. उताऱ्यात उल्लेख करण्यात आलेला प्रयोग कधी अधिक यशस्वी होईल असे शिक्षणतज्ज्ञांना वाटते?
१. जेव्हा पूर्व प्राथमिक वर्गापासूनच इंग्रजीची ओळख करून दिली जाईल तेव्हा.
२. मातृभाषेप्रमाणेच इंग्रजी भाषा शिकवली जाईल तेव्हा.
३. जेव्हा यंत्रणा सक्षम केल्या जातील तेव्हा.

**ख. रिकाम्या जागी लेखातील योग्य शब्द निवडून लिहा.**

अ. दोन भाषांमधून घेतले जाणारे शिक्षण - ..........................................

आ. करण्याजोगे परंतु कठीण - ..........................................

इ. योजनेची परिपूर्ती - ..........................................

ई. काळाला धरून केलेला विचार - ..........................................

उ. आनंदाने स्वीकार करता येण्याजोगे - ..........................................

ऊ. आधार देणे - ..........................................

ए. पूर्णपणे विकसित झालेला - ..........................................



## १८ क. पुढे दिलेल्या वाक्यांतील 'असो' या शब्दाचा योग्य अर्थ लिहा.

| उदाहरण | अर्थ |
|---|---|
| अ. महाराजांचा विजय असो! | ---------- |
| आ. ऊन असो वा पाऊस, बाबांचं रोजचं फिरणं काही चुकलं नाही. | ---------- |
| इ. कारण काहीही असो, सुट्टी मिळणार नाही! | ---------- |
| ई. असो! उशीर होतोय, मी निघते आता. | ---------- |
| उ. तुम्हां सगळ्यांच्या शुभेच्छा नेहमी माझ्यासोबत असोत. | ---------- |

**ख. गाळलेल्या जागी कंसातील योग्य शब्द भरा. (असो (२), तर, असोत (२), जर)**

अ. आजपासून परीक्षा. तुम्हां सगळ्यांचे आशीर्वाद माझ्या पाठीशी ----------.

आ. आतापासूनच एखादी परकीय भाषा शिकलास, ---------- पुढे अनेक वाटा खुल्या होतील.




इ. ----------! पुढे काय करायचं ते ठरवा आता.

ई. ---------- अभ्यासात रुची नसेल तर तिला दुसरं एखादं क्षेत्र निवडू दे.

उ. उद्याच्या तासाला कितीही विद्यार्थी ----------, तास होणारच.

ऊ. पेपर कितीही कठीण ----------, मी पैकीच्या पैकी गुण मिळवणारच.

## १९ पुढील कोष्टक पूर्ण करा.

| क्रियापदे | तो | ती | ते | ते | त्या | ती |
|---|---|---|---|---|---|---|
| देणे | देणारा | | | | | |
| चालणे | | चालणारी | | | | |
| बोलणे | | | बोलणारे / बोलणारं | | | |
| ओरडणे | | | | ओरडणारे | | |
| येणे | | | | | येणाऱ्या | |
| सांगणे | | | | | | सांगणारी |
| पिणे | | | | | | |

## २० पुढे दिलेला उतारा वाचा.

‘मुले आणि मुली म्हणजे मातीचा गोळा, आकार द्यावा तसे मडके घडते,’ या उक्तीला छेद देणाऱ्या प्रायोगिक तत्त्वावर चालवल्या जाणाऱ्या शाळा हा पारंपरिक शिक्षण देणाऱ्या शाळांना उत्तम पर्याय आहे. ज्यांची तत्त्वे आणि स्वप्ने पारंपरिक शिक्षणपद्धती नाकारतात, अशा अनेक शाळा जगभर आहेत. डेव्हिड ग्रिबल या ब्रिटिश लेखकाने जगभरातल्या अशा अनेक शाळांना भेटी देऊन त्यांची कार्यपद्धती समजून घेतली आणि या शाळांवर ‘रिअल एज्युकेशन : व्हरायटीज ऑफ फ्रीडम’ हे पुस्तक लिहिले. या पुस्तकाद्वारे पारंपरिक शाळा आणि आदर्श शाळा यांतील फरकाचे विश्लेषण त्यांनी केले आहे.




डेव्हिड यांच्या मते, ‘पारंपरिक शाळांमध्ये मुले-मुली अक्षरश: कैदी असतात. कायद्यानेच त्यांना बंदिवान केलेले असते. मुलामुलींच्या आवडीनिवडीला तिथे काहीही स्थान नसते; त्यांनी काय शिकावे हे त्यांना शिक्षक सांगतात. मुले त्याही परिस्थितीत आनंदी राहण्याचा प्रयत्न करतात आणि उत्साहाने शिकतात. परंतु ती सतत दुसऱ्या कोणाच्या तरी ताब्यात असतात. ती स्वत:च्या इच्छेप्रमाणे वागू शकत नाहीत आणि स्वत:च्या आवडीनिवडी जोपासू शकत नाहीत... केवळ अभ्यासविषयांची संख्या वाढवून किंवा मुलांच्या वारंवार चाचण्या घेऊन किंवा अधिक संगणकांची खरेदी करून किंवा शिक्षक-विद्यार्थी गुणोत्तर वाढवून शाळा आदर्श बनवता येत नाहीत...’ त्यांच्या मते आदर्श शाळेतून शिक्षण घेऊन बाहेर पडणारे आदर्श विद्यार्थी साक्षर आणि अंकज्ञान असणारे तर असतातच, पण त्याचबरोबर ते आनंदी, संवेदनशील, प्रामाणिक, उत्साही, सहिष्णू, आत्मविश्वास असलेले, सृजनशील युवक बनतात. त्यांना आपल्या आवडीनिवडीचं आणि भोवतालाचंही चांगलं भान असतं. याउलट पारंपरिक शाळेतून बाहेर पडणारे विद्यार्थी ‘स्वान्त: सुखाय’ प्रवृत्तीचे, भित्रे आणि धोपटमार्गी असतात. आपल्या आवडीनिवडींशी अजिबात संबंध नसलेली कौशल्ये आत्मसात करण्यात त्यांनी बराच काळ खर्च केलेला असल्याने आपल्या खऱ्या आवडीनिवडी आणि अंगभूत गुणांशी त्यांचा परिचयच होत नाही. शाळेत शिकून मुलांनी बाहेरच्या जगात जगण्यासाठी सक्षम बनावे अशी अपेक्षा असते. परंतु पारंपरिक शिक्षणातून मुले जे शिकतात त्यातले जवळजवळ सगळेच ते नंतरच्या आयुष्यात विसरतात. कित्येकदा त्या शिक्षणाचा प्रत्यक्ष आयुष्यात काहीही उपयोग होत नाही. अशा परिस्थितीत नव्या शिक्षणाचा पुरस्कार करणाऱ्या आदर्श शाळा मुलांच्या सर्वांगीण विकासाकडे लक्ष पुरवतात. मुलांना नैसर्गिकपणे वाढायला मदत करतात.




इंग्लंडमधील ‘समरहिल’, ‘डार्टिंग्टन हॉल स्कूल’, न्यूझीलंडमधील ‘तामारिकी’, इस्राईलमधील ‘द डेमोक्रेटिक स्कूल ऑफ हॅडेरा, जपानमधील ‘ग्लोबल फ्री स्कूल’, दिल्लीतील अरबिंदो यांनी सुरू केलेली ‘मिराम्बिका’, या आणि अशा किती तरी शाळा आदर्श

शिक्षणपद्धतीचा अवलंब करताना दिसतात... मुलामुलींना त्यांचे आयुष्य त्यांच्या मनासारखे जगू देणे हा या पद्धतीचा गाभा आहे. इथले जग मोठ्यांच्या जगाहून खूप वेगळे असते. नवनवीन कल्पना लढवून वस्तू तयार करणे आणि दुकानजत्रा भरवून त्या वस्तू विकणे, निसर्गाच्या सान्निध्यात राहून नवीन जागा शोधून त्यांची माहिती करून घेणे, रात्री आकाशनिरीक्षण करणे, स्वत: नाटके लिहून बसवून शिक्षकांच्या मदतीशिवाय ती सादर करणे, लोकशाही पद्धतीने मुलांनीच शाळा चालवणे, अशा किती तरी नावीन्यपूर्ण गोष्टी या शाळांमध्ये घडतात.



काळाच्या ओघात शिक्षणाची मूलतत्त्वे विसरलेल्या मराठी समाजात मोठ्या प्रमाणात इंग्रजी माध्यमाच्या शाळा अवतरल्या. वास्तविक पाहता मातृभाषा किंवा परिसरभाषा हेच शिक्षणासाठी योग्य माध्यम असते असे जगातील सर्व भाषातज्ज्ञ सांगत आले आहेत. त्याचप्रमाणे शिक्षणाचे स्वरूप आनंददायी असायला हवे याविषयीही सर्व शिक्षणतज्ज्ञांचे एकमत आहे. ही दोन सूत्रे गृहीत धरून पुण्यात 'अक्षरनंदन', 'आनंदक्षण', कोल्हापुरात 'सृजन-आनंद विद्यालय', नाशिकमध्ये 'आनंदनिकेतन' इ. आणि अन्य ठिकाणीही विविध संस्थांनी अशा शाळा सुरू केलेल्या आहेत. या शाळांच्या कामाच्या वेळा, कार्यपद्धती, अध्ययन-अध्यापन पद्धती, परीक्षापद्धती या सगळ्यातच वेगवेगळे प्रयोग होताना दिसतात. याबरोबरीनेच विविध तत्त्वज्ञानांचा आधार घेऊन गुरुकुल पद्धतीने शिक्षण देणाऱ्या जे. कृष्णमूर्ती वगैरेंसारख्या विचारवंतांच्या भूमिकांचे उपयोजन करणाऱ्या शाळाही अस्तित्वात आहेत. या शाळांमधून मुलांना परीक्षेत मिळणाऱ्या गुणांपेक्षा त्यांच्या मनाची कवाडे अधिकाधिक उघडी कशी राहतील याकडे लक्ष दिले जाते. महाराष्ट्रातील शैक्षणिक वातावरणातील ही हिरवीगार बेटेच आहेत.




प्रायोगिक तत्त्वावर चालवल्या जाणाऱ्या आणि खऱ्या शिक्षणाच्या शोधात असणाऱ्या या सगळ्या शाळा म्हणजे नव्या शैक्षणिक जगताची वाट दर्शवणारी दीपगृहे आहेत.

**उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**क. पुढील वाक्ये योग्य त्या रकान्यात भरा.**

अ. प्रायोगिक तत्त्वावर चालणाऱ्या शाळांची तत्त्वे आणि स्वप्ने पारंपरिक शिक्षणपद्धती नाकारतात.

आ. या प्रकारच्या शाळांमध्ये मुलांच्या सर्वांगीण विकासाकडे लक्ष पुरवले जाते.

इ. या शाळांमधील विद्यार्थ्यांना बऱ्याचदा स्वत:च्या आवडीनिवडी, स्वत:तील गुण लक्षातही येत नाहीत.

ई. या प्रकारच्या शाळांमधून बाहेर पडणारे विद्यार्थी काही वेगळे करायला धजावत नाहीत.

उ. या शाळांमध्ये कार्य-आधारित शिक्षणपद्धतीचा अवलंब केला जातो.

ऊ. इथून घेतलेल्या शिक्षणाचा बऱ्याचदा प्रत्यक्ष आयुष्यात काही उपयोग होत नाही.

ए. कामाच्या वेळा, पद्धती, परीक्षापद्धती यांमध्ये सतत वेगवेगळे प्रयोग करणाऱ्या शाळा

| पारंपरिक शाळा | आदर्श / प्रायोगिक शाळा |
|---|---|
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |

**ख. पुढील शब्दांसाठी उताऱ्यात आलेली नामे शोधून लिहा.**

अ. काम करण्याची शैली / पद्धत – ..............................

आ. एखाद्या गोष्टीच्या घटकांचे वेगवेगळे परीक्षण – ..............................

इ. ज्याला बंदिस्त करून ठेवले आहे असा – ..............................

ई. लिहिता, वाचता येणारा – ..............................

उ. मूळ – ..............................

ऊ. आपल्या भोवताली बोलली, वापरली जाणारी भाषा – ..............................

ए. वापर – ..............................

**ग. उताऱ्यात आलेले शब्द पुढील कोड्यातून शोधून दाखवा.**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आ | मि | रा | म्बि | का | र्श | न | ज | सृ |
| द | व | भा | र | सा | ग्लो | आ | ब | ज |
| र्श | शि | डी | अ | क्ष | र | नं | द | न |
| स | क्ष | म | नि | र | अ | द | प | शी |
| पे | ण | ज्यु | सं | व | प | क्ष | रि | ल |
| मा | त | फ्री | ड | म | डी | ण | वी | ता |
| शा | ज्ज्ञ | स | म | र | हि | ल | श | मा |
| सृ | ज | न | आ | नं | द | दा | यी | रि |
| भा | स | र्वां | गी | ण | वि | का | स | की |

# तोंडी परीक्षा

**एकूण गुण २०**

## १. वाचन आणि आकलन. (एकूण गुण ९)

**पुढील उतारा मोठ्याने वाचून दाखवा आणि त्यानंतर विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे द्या.**

**वाचन (गुण ३)**

माणसाने स्वतःचे विचार नोंदवून ठेवण्यासाठी प्रथम चित्रलिपीचा वापर केला; परंतु प्रत्येक वेळी चित्रे काढणे कठीण वाटल्यामुळे पुढे चित्रांची जागा निरनिराळ्या खुणांनी घेतली. ह्या खुणांमधूनच यथावकाश अक्षरे तयार झाली. आरंभी भूर्जपत्र, जनावरांची कातडी, मातीच्या विटा, कापड, दगड, धातूचे पत्रे वगैरेंच्या सपाट पृष्ठभागावर अक्षरे कोरली जात. दीर्घकाळ टिकणारे लेखन करायचे झाल्यास ते दगडावर केले जाई. लिहिण्यापूर्वी दगड घासून गुळगुळीत करण्यात येई. मग त्यावर शाईने किंवा खडूने मजकूर लिहिण्यात येई. नंतर छिन्नीने खोदून तो पक्का केला जाई.




कालांतराने कागदाचा शोध लागला. सुरुवातीस त्यावर लिहिण्याकरता कुंचल्याचा, म्हणजेच ब्रशाचा वापर केला जाई. नंतर बोरू किंवा पक्ष्याचे पीस तासून लेखणी तयार केली जाऊ लागली. अठराव्या शतकात धातूच्या टाकाचा शोध लागला आणि एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस फौंटन पेनाचा वापर मोठ्या प्रमाणात होऊ लागला. विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत सारे जग फौंटन पेनानेच लिहीत होते. त्यानंतर 'बॉलपेन' हा लेखणीचा सोयीस्कर प्रकार अस्तित्वात आला, आणि आजमितीस असंख्य तऱ्हांची पेने बाजारात उपलब्ध आहेत.

**(क, ख आणि ग – एकूण गुण ६)**

**क.** वरील उताऱ्यात बऱ्याच मोठ्या कालखंडात घडलेल्या घटना सांगताना अनेक कालवाचक क्रियाविशेषण अव्यये वापरली आहेत – उदा॰ पुढे

ह्यांपैकी निदान पाच अव्यये सांगा.

**ख.** लिहिण्यासाठी कोणकोणत्या साधनांचा वापर केला जात असे? कमीतकमी पाच नावे सांगा.

**ग.** कोणत्या सपाट पृष्ठभागांचा वापर लिहिण्याकरता करत? किमान पाच नावे सांगा.

## २. चित्रवर्णन. (एकूण गुण ५)

**खालीलपैकी कोणतेही एक चित्र निवडा आणि त्याचे सविस्तर वर्णन करा.**













## ३. चर्चा (एकूण गुण ६)

**पुढीलपैकी कोणताही एक विषय निवडून तुमच्या सहाध्यायाबरोबर चर्चा करा. हिरव्या पट्टीत दिलेले शब्द / शब्दसमूह तुम्ही मदत म्हणून वापरू शकता.**

(१)

तुमच्या मैत्रिणीला वाटते, की इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेतल्यास पुढे शिक्षणाच्या आणि करिअरच्या जास्त संधी उपलब्ध होतात. तुम्हाला तिचे हे म्हणणे पटत नाही. तुमच्यामते मातृभाषेतून घेतलेले शिक्षण जास्त प्रभावी असते.

इंग्रजी ही आंतरराष्ट्रीय ज्ञानभाषा झाली आहे. जगात बहुतेक देशांत ह्या भाषेतूनच शिक्षण दिले जाते. उच्च शिक्षणासाठी अनेक देशांची दारे उघडतात ...

मातृभाषेतून शिकल्यास जास्त सर्वांगीण प्रगती; सृजनशीलतेला वाव ...

②

शालेय शिक्षण समितीने शाळांतील बऱ्याच परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. तुम्हाला हा निर्णय आवडला आहे, पण तुमच्या सहाध्यायाला तो मंजूर नाही.

विद्यार्थ्यांना शिक्षणाचे दडपण येणार नाही; नापास होण्याची भीती दूर होईल; शाळेतील वातावरण आनंदी असेल ...

शिक्षणाचा दर्जा खालावेल; आपण किती शिकलो आणि काय शिकलो हेच कळणार नाही; शैक्षणिक प्रगती मोजण्याचे कोणतेच मापदंड नसतील ...

③

आंतरजालावरून होणाऱ्या नवीन ओळखी, भेटी आणि मैत्रीसंबंध तुम्हाला फार आवडतात आणि महत्त्वाच्या वाटतात. तुमच्या सहाध्यायाला ह्यात फक्त धोके दिसतात.

मैत्रीचे नवे जग उघडते; देश-विदेशातील लोकांशी संपर्क होतो; नवीन माहिती कळते; जीवन अधिक समृद्ध होते ...

आपण कोणाशी बोलतो आहोत हे नक्की माहीत नसते; आपल्या वैयक्तिक माहितीचा गैरवापर होऊ शकतो; आपण फसवले जाऊ शकतो ...

④

रस्त्यात, बागेत, कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी भेटणाऱ्या व्यक्तींशी तुमची गावातून आलेली आजी लगेच मोकळेपणाने गप्पा मारायला लागते. तिचा हा स्वभाव तुम्हाला अगदी आवडत नाही. ह्यातील धोके तुम्ही तिला सांगताय, तर ह्यातील फायदे ती तुम्हाला सांगतेय.

नव्या ओळखी होतात; माणसामाणसातला विश्वास जागा होतो; आपण चांगले असलो तर समोरचाही चांगलंच वागतो, एकमेकांना मदत होते

अनोळखी माणसांशी संपर्क ठेवणे धोक्याचे; शहर आणि गावातील नातेसंबंधात फरक; भोळेपणाचा फायदा घेणारे लोक; परक्यांवर जास्त विश्वास ठेवणे अयोग्य



# लेखी परीक्षा

**एकूण गुण ३०**

## १. खालील उतारे वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा. (एकूण गुण ९)

**क. उताऱ्यातील प्रत्येक परिच्छेदाला योग्य ते शीर्षक द्या. (गुण ५)**

अ. ------------------------------------------------------------------------

महाराष्ट्रातील प्रत्येक मुलामुलीला शालेय शिक्षण मिळावे हे शालेय शिक्षण विभागाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला दर्जेदार शिक्षण हाच प्रगतिशील महाराष्ट्राचा पाया आहे. त्या दृष्टीने सरकारने अनेक योजना आखल्या आहेत आणि त्यांची अंमलबजावणी होत आहे. या योजना प्रत्यक्षात आणण्यासाठी शालेय शिक्षण विभाग सतत कार्यरत आहे. शिक्षण हे केवळ पुस्तकांपुरते मर्यादित न राहता त्यातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, संपूर्ण महाराष्ट्रात, अगदी ग्रामीण भागातही जागतिक दर्जाचे शिक्षण उपलब्ध व्हावे यासाठी सरकार प्रयत्नशील आहे.

आ. ------------------------------------------------------------------------

शालेय शिक्षण विभागाने पारंपरिक शिक्षण पद्धतीत थोडेसे, पण नावीन्यपूर्ण बदल सुचविले आहेत. यापुढे तज्ज्ञांचा समावेश असलेली समिती अभ्यासक्रम निश्चित करेल. विद्यार्थ्यांचा गणित, विज्ञान आणि भाषा ह्या विषयांतील रस वाढावा यासाठी प्रयत्न केले जातील.

इ. ------------------------------------------------------------------------

विद्यार्थ्यांची मनोवृत्ती समजून घेत त्यांच्या मनात शिक्षणाबाबत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी त्यांना वाटणारी नापास होण्याची भीती कायमची दूर करण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे. महाराष्ट्रातील एकाही विद्यार्थ्याच्या दहावी अथवा बारावीच्या गुणपत्रिकेवर आता 'नापास' शिक्का असणार नाही. मुख्य परीक्षेत जे विद्यार्थी यशस्वी होऊ शकले नाहीत, त्यांना फेरपरीक्षेला बसण्याची संधी देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे एटीकेटी व कौशल्य विकास कार्यक्रम यांसारख्या उपक्रमांच्या मदतीने अनेक विद्यार्थी आपला शैक्षणिक प्रवास अखंडित ठेवू शकले आहेत.

ई. ------------------------------------------------------------------------

महाराष्ट्र राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने संपूर्ण राज्यभरात कलमापन चाचणीचे आयोजन केले होते. मार्च २०१६ मध्ये दहावीच्या परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांची शास्त्रोक्त कलमापन चाचणी घेण्यात आली. या उपक्रमात राज्यभरातील अनेक शाळा सहभागी झाल्या होत्या. शिक्षक, विद्यार्थी व पालकांकडून या उपक्रमाचे स्वागत झाले आणि या उपक्रमाला भरघोस प्रतिसाद मिळाला. मुलांच्या क्षमता व त्यांच्या आवडीनिवडी यांची सांगड घालून त्यानुसार त्यांच्यासाठी योग्य ठरतील असे करिअर पर्याय सुचवणे, हा यामागील उद्देश होता.

उ. ------------------------------------------------------------------------

शिक्षण अभ्यासक्रमापुरते मर्यादित राहू नये, विद्यार्थ्यांच्या अंगभूत गुणांना, कौशल्यांना वाव मिळावा यासाठी 'कौशल सेतू' ह्या कौशल्य विकास कार्यक्रमाची सुरुवात करून महाराष्ट्र राज्याने

अजून एक महत्वाचे पाऊल टाकले आहे. कौशल्य विकासावर आधारित शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना आपल्या करिअरविषयक महत्त्वाकांक्षा साध्य करता येतील. शालेय शिक्षणानंतर कौशल्यविकास अभ्यासक्रमासाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना यशस्वी करिअरकडे घेऊन जाणारा मार्ग खुला झाला आहे.

**ख. वरील उताऱ्यांच्या आधारे वाक्ये पूर्ण करा.** **(गुण ४)**

अ. शालेय शिक्षणाबाबत महाराष्ट्र शालेय शिक्षण विभागाची नवी भूमिका ...

---------------------------------------------

आ. विद्यार्थ्यांनी शिक्षणाबाबत सकारात्मक विचार करावा म्हणून ...

---------------------------------------------

इ. ‘कौशल सेतू’ ह्या विकास कार्यक्रमाचे उद्दिष्ट ...

---------------------------------------------

ई. कलमापन चाचणीचे उद्दिष्ट ...

---------------------------------------------

## २. व्याकरण **(एकूण गुण २१)**

**क. रिकाम्या जागी ‘पेक्षा, हून, मध्ये, सर्वांत’ हे शब्द घालून वाक्ये पूर्ण करा.** **(गुण ४)**

घरातल्या सर्व मुलांत खरं तर ------------ लहान मी. माझ्या ------------ मोठा अभयदादा आणि त्याच्या ------------ तीन वर्षांनी मोठी अनुताई. पण आजी म्हणायची की सगळ्यां ------------ जास्त शहाणपण देवानं मलाच दिलंय. दादा आणि ताई अगदी सूर्य डोक्यावर येईपर्यंत लोळत राहायचे. त्यांच्या ------------ लहान असूनही मीच ------------ आधी उठायची. भरभर सगळं आवरून तयार होण्यातही आम्हा तिघां ------------ माझाच पहिला नंबर असायचा. मग मला न्याहरी करायला जास्त वेळ मिळायचा आणि आजी काही तरी खास पदार्थ गुपचूप मला द्यायची. आजी त्या दोघां ------------ माझेच जास्त लाड करायची.

**ख. कंसात दिलेल्या उत्तरांपैकी योग्य त्या उत्तराची निवड करा.** **(गुण २)**

अ. मी काही ------------ गेले नव्हते त्यांच्याकडे मदत मागायला. ते ------------ आलेत.
(१. स्वतः / आपणहून, २. स्वतःला / आपणहून, ३. आपली / आपणहून )

आ. त्याला ------------ बोलायची सवय आहे. लोक हसतात त्याला त्याच्या ह्या सवयीमुळे.
(१. आपल्याला, २. त्याच्याशी, ३. स्वतःशीच)

इ. ------------ निवड बरोबर आहे ना, ह्याचा नीट विचार करून मगच निर्णय घ्यावा.
(१. आपण, २. आपली, ३. स्वतः)

**ग. जर–तर, जरी-तरी ह्यापैकी योग्य जोडी वापरून वाक्ये पूर्ण करा.** **(गुण २)**

अ. ------------ तू नियमितपणे व्यायाम केलास, ------------ तुझ्या प्रकृतीत लवकर सुधारणा होईल.

आ. ------------ तो नियमितपणे व्यायाम करत होता, ------------ त्याच्या प्रकृतीत काहीच सुधारणा नव्हती.

**घ. 'म्हणून, त्यामुळे, सबब, याकरिता' ह्यांपैकी योग्य ते अव्यय वापरून वाक्ये पूर्ण करा. (गुण २)**

अ. परीक्षेच्या आधी मी बराच आजारी होतो; ------------------ मला चांगले मार्क मिळाले नाहीत.

आ. ओळीने चार दिवस सलग सुट्ट्या आल्या. ------------------ मालाचे वितरण वेळेवर होऊ शकले नाही.

इ. रजेचा अर्ज न देता तुम्ही कामावर येत नाही. ------------------ तुमच्यावर कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येत आहे.

ई. वर्षअखेरीपर्यंत हे काम पूर्ण करणे जरुरीचे आहे. ------------------ सर्व कर्मचाऱ्यांनी ह्या आठवड्यात रोज दोन तास जास्त काम करावे अशी विनंती आहे.

**च. योग्य जागी योग्य ते शब्द वापरा. (गुण २)**

(आज, पूर्वी, ह्यापुढे, आजपर्यंत)

अ. ------------------ मोबाईल, आंतरजाल, व्हॉटसॲप अशा गोष्टी नव्हत्या, त्यामुळे जग फार मोठं वाटायचं.

आ. ------------------ तुम्ही जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात असणाऱ्या व्यक्तीला क्षणार्धात पाहू शकता, त्याच्याशी बोलू शकता.

इ. आपल्या पिढीने ------------------ बरेच नवीन शोध पहिले. ------------------ आणखी कोणते शोध लागतील कोण जाणे!

**छ. खालील 'अ' ते 'ऐ' ह्या वाक्यांतील कर्ता, कर्म आणि क्रियापद कोणते ते सांगा आणि क्रियापद कर्त्याप्रमाणे चालते की कर्माप्रमाणे ते सांगा. (गुण ९)**

गावातील शाळेत उद्या वार्षिक तपासणीसाठी तपासनीस येणार आहेत. आज दिवसभर सगळ्यांची लगबग चालू होती.

अ. बाई आणि सर हजेरीपुस्तकं तपासत होते.

आ. मेघनाने फळा स्वच्छ पुसला आणि त्यावर बोधवाक्य लिहिले.

इ. अमेयने छतावरची जळमटे काढली.

ई. श्लोक पुस्तकांचे कपाट नीट लावत होता.

उ. रचना स्वागतगीत पाठ करत होती.

ऊ. शिपाई गोविंद प्रवेशद्वार सजवत होता.

सगळे दमले होते. हेडसर म्हणाले –

ए. आता सर्व विद्यार्थी आणि शिक्षकांनी घरी जावे.

ॲ. शिक्षकांनी उद्या मनापासून शिकवावे.

ऐ. विद्यार्थ्यांनी मनापासून शिकावे.



**१ पुढीलपैकी प्रत्येक काळ्या अक्षरासाठी आतापर्यंत शिकलेला एक शब्द लिहा.**

उदा॰

| रा | ष्ट्र | भा | षा |
|---|---|---|---|
| | | र | |
| | | ती | |
| | | य | |
| | | सं | |
| | | स्कृ | |
| | | ती | |



| |
|---|
| वि |
| वि |
| ध |
| ता |

| |
|---|
| दे |
| वा |
| ण |
| घे |
| वा |
| ण |



**२ खालील संज्ञांचा अर्थ तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.**

क. सेव्हन सिस्टर्स – ----------------------------------------

ख. संगम – ----------------------------------------

ग. दळणवळण – ----------------------------------------

घ. लोकप्रिय – ----------------------------------------

च. भारतभ्रमण – ----------------------------------------

छ. विकसित – ----------------------------------------

## ३ त्रिकूट

**पुढे दिलेल्या प्रत्येक कोड्यामध्ये प्रश्नचिन्हाच्या जागी प्रत्येकी एकच अक्षर लिहायचे आहे. त्यामुळे तीन अर्थपूर्ण शब्द तयार होतील.**

उदा॰ प्र → , स्व → , अ → **भा** → व

क. व्या → , दु → , सु → ? → री

ख. भ → , भा → , सु → ? → त

ग. दा → , मो → , वा → ? → क

घ. बा → , पा → , चा → ? → क

च. आ → , पर् → , र → ? → या

## ४ क. ध्वनिफीत ऐकून रिकाम्या जागा भरा.

.................... भारत, अजिंक्य .................... ललकारत सारे

.................... विजयाचा उंच धरा रे

उंच धरा रे, उंच धरा रे, उंच धरा रे

मातीमधल्या कणांकणांतुन .................... घुमते गायन

.................... रे पाऊल पुढले संघटनेचा .................... जपा रे

भाग्यवान ते .................... सगळे हासत खेळत

.................... झुंजले

स्वातंत्र्यास्तव मरण .................... मान राखला .................... रे

इतिहासाच्या पानोपानी .................... घुमती गाणी

.................... रे देऊ उधळून पराक्रमाचे .................... गाउ या रे



**- योगेश्वर अभ्यंकर**

**ख. आता ध्वनिफीत पुन्हा ऐका व खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

अ. जिंकता येणार नाही असा - ---------------------- (अनेक शब्दांबद्दल एक शब्द लिहा.)

आ. झेंडा – ---------------------- (समानार्थी शब्द लिहा.)

इ. युद्धभूमी - ---------------------- (समानार्थी शब्द लिहा.)

ई. 'संघटनेचा मंत्र जपणे म्हणजे' - १. भारतीय घटनेची जपणूक करणे
२. संघटित, एकत्र होऊन राहणे

उ. 'स्वातंत्र्यासाठी' या अर्थाचा कवितेत आलेला शब्द कोणता? ----------------------

ऊ. स्वतःच्या देशासाठी कवितेत आलेला दुसरा शब्द कोणता? ----------------------

## ५ क. पुढील परिच्छेद वाचा.

**देशाटन**

दर वर्षी कुठे तरी फिरून यायचं, आपला देश पाहायचा हा माझा नेम.



गेल्या वर्षी उत्तर भारत फिरायला गेलो होतो मित्रांसोबत. गुजरातच्या सोमनाथ मंदिर आणि गीर अभयारण्यापासून सुरुवात केली. दूध आणि दुधाच्या पदार्थांवर ताव मारला. राजस्थानच्या वाळवंटात भटकलो. हवामहलच्या मागची कथा ऐकून विचारात पडलो. पंजाबच्या जालियनवाला बागेचं दर्शन घेताना तो इतिहास आठवून जनरल डायरबद्दलची चीड उफाळून आली. दिल्लीत लाल किल्ला आणि जामा मशीद पायी फिरून पाहताना थकून गेलो. आग्र्याला ताजमहालाचं सौंदर्य भर उन्हातही पाहिलं आणि चमचमत्या चांदण्यातही न्याहाळलं. मधाळ कोहळ्यापासून केलेला रसाळ पेठा खायला मात्र विसरलो नाही. तेव्हा भर मे महिन्यात गेलो होतो, त्यामुळे जिकडेतिकडे फळांचा राजा आंबा दिसत होता. तिकडचा आंबा कोकणातल्यासारखा नसला, तरी शेवटी ते राष्ट्रीय फळ आहे आपलं! राजा तो राजाच! वेगळा लागला चवीला, तरी खाल्ला. हिमालयाचं भव्य सौंदर्य पाहायला हिमाचल प्रदेशात फिरलो. उत्तराखंडातही हिमालय तेवढाच प्रेक्षणीय आहे. सरोवरांची नगरी नैनिताल म्हणजे निसर्गसौंदर्याची लयलूट! तिथून मुघल नवाबांच्या राज्यात म्हणजे उत्तर प्रदेशालाही भेट दिली.





यंदा दक्षिण भारत फिरलो. पूर्वीचं म्हैसूर राज्य म्हणजेच आजच्या कर्नाटकात म्हैसूरचा राजवाडा पाहताना म्हैसूर संस्थानाच्या जुन्या वैभवाची कल्पना आली आणि हम्पीचे भग्न अवशेष पाहताना विजयनगर साम्राज्याचीही. आंध्र प्रदेशात चारमिनार पाहिला आणि गोळकोंडा किल्लाही. अरे हो, पण तेलंगण वेगळं झाल्यामुळे आता गोळकोंडा तेलंगणात गेला आहे. भारताचं शेवटचं टोक, तीन सागरांचा संगम असलेल्या कन्याकुमारीला उभा राहून अंतर्मुख झालो. अंदमानच्या सेल्युलर जेलला भेट दिली तेव्हा स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या स्मृतींनी अंगावर रोमांच उभे राहिले.



पुढच्या वर्षी पूर्वेला जाणार. ओडिशाचं कोणार्क, कोलकात्याचा हावडा पूल, आसामचे चहाचे मळे अरुणाचल प्रदेशातल्या डोंगर-दऱ्या हे सगळं पहायचंय.

या सगळ्यात आपला महाराष्ट्र कसा राहून जाईल? तो तर पायांखालचा. शहाजीराजांच्या पुत्राने, शिवबाने लढवलेल्या गडांवर पाय ठेवताना ऊर भरून येतो. पेशव्यांच्या पुण्यात, कर्मवीरांच्या साताऱ्यात, आमटे कुटुंबीयांच्याच झालेल्या विदर्भात, अप्रतिम लेण्यांच्या वेरूळ-अजिंठ्याच्या मराठवाड्यात, देवळांच्या आणि तांबड्या-पांढऱ्या रश्श्याच्या कोल्हापुरात, द्राक्षांचे मळे फुलवणाऱ्या नाशकात... सगळीकडे फिरलोय.

कालच कोकणातून मुंबईत परतलो. आज कृष्णजन्म. म्हणजे उद्या गोपाळकाला. धम्माल, मस्ती आणि 'गोविंदा रे गोपाळा'च्या ललकाऱ्या! आईने आज दहीपोहे केले. बरं वाटलं जरा. नाही तर गेले काही दिवस रोज भात खाऊन खाऊन कंटाळा आला होता. भारतात सर्वाधिक घेतलं जाणारं आणि महाराष्ट्राचं मुख्य पीक असलं म्हणून काय झालं? रोज रोज किती तांदूळ शिजवायचा! गम्मत म्हणजे, भारतातलं सगळ्यात छोटं राज्य गोवा, तिथेही भातच! मासेखाऊ बंगाली लोकही भातावर खूप प्रेम करतात. आणि जवळजवळ सगळ्या दक्षिण भारताला पोसणाऱ्या कावेरी नदीच्या पाण्यावरही तांदूळच पिकतो.

देश पाहणं, वेगवेगळ्या प्रांतांमधले रीतिरिवाज अनुभवणं, त्या त्या ठिकाणचे वैशिष्ट्यपूर्ण पदार्थ चाखणं, सांस्कृतिक विविधता न्याहाळणं म्हणजे साधं काम नव्हे, महाराजा! तो एक यज्ञच असतो. ऋषिमुनी यज्ञ करत तो देवाला, निसर्गाला किंवा आश्रयदात्या राजाला प्रसन्न करण्यासाठी. मी यज्ञ करतो आत्मिक समाधानासाठी, माझा देश जवळून ओळखण्यासाठी!

**ख. आता वरील परिच्छेद आणि पुढे दिलेल्या सूत्रांच्या आधारे शब्दकोडे सोडवा.**

| आडवे शब्द | उभे शब्द |
|---|---|
| २. कृष्णजन्माच्या दुसऱ्या दिवशी महाराष्ट्रात साजरा होणारा सण | १. महाराष्ट्राच्या दक्षिण सीमेवरील एक राज्य. याचे पूर्वीचे नाव म्हैसूर राज्य होते. |
| ५. कोहळा या फळभाजीपासून तयार केली जाणारी आग्र्याची प्रसिद्ध मिठाई  | २. क्षेत्रफळाच्या दृष्टीने भारतातील सर्वांत लहान निसर्गसंपन्न राज्य. |
| ७. सौंदर्य आणि स्थापत्य यांचा अनोखा संगम, जागतिक आश्चर्यांपैकी एक - ---------------------- महाल | ३. दक्षिण भारताला संपन्न करणारी एक प्रमुख पण वादग्रस्त नदी |
| ८. अरबी समुद्र, हिंदी महासागर व बंगालचा उपसागर यांच्या संगमाचे, भारताच्या दक्षिणेकडील टोक. | ४. उत्तराखंड राज्यातील निसर्गरम्य सरोवरांचा जिल्हा |
| ९. राजघराण्यातील स्त्रियांसाठी भर रस्त्यावर बांधलेला जयपूरमधील एक प्रसिध्द महाल. | ५. मराठा साम्राज्याचे छत्रपतींच्या काळातील पंतप्रधान |
| ११. भारत-पाकिस्तान सीमेजवळील एक वाळवंटी राज्य | ६. भारतातील सर्वाधिक जलविद्युत प्रकल्प असलेले हिमालयाच्या कुशीतील राज्य |
| १३. दक्षिणेकडील एक राज्य. या राज्याचे विभाजन होऊन तेलंगण हे नवीन राज्य तयार झाले. | ९. विजयनगर साम्राज्याचे अवशेष दाखवणारे, युनेस्कोद्वारे जागतिक वारसा म्हणून घोषित शहर. |
| १५. कोलकात्याचा प्रसिद्ध पूल. याच नावाचे रेल्वे स्थानकही आहे. | १०. भारताच्या आर्थिक राजधानीचे, लोकसंख्येच्या दृष्टीने दुसरे आणि क्षेत्रफळाच्या दृष्टीने तिसरे, पश्चिम किनाऱ्यावरील राज्य. |
| १६. राष्ट्र. ‘भारत माझा ------------- आहे.’ | १२. मुघल रियासतीत सन्मानार्थ दिली जाणारी एक उपाधी. |
| १८. प्राचीन काळी ऋषिमुनी करत असलेला एक विधी. | १३. भारताचे राष्ट्रीय फळ. |
| २०. मुघल बादशहा शहाजहान याने बांधलेली ही दिल्लीतील एक प्रसिद्ध मशीद आहे. | १४. छत्रपती शिवाजीराजांचे वडील. |
| २२. गुजरात राज्य या उत्पादनासाठी प्रसिद्ध आहे. | १७. जालियनवाला बागेत जमावाचे हत्याकांड याने घडवले होते. |

| | |
|---|---|
| २३. अंदमान बेटावरील या ठिकाणी स्वातंत्र्यवीर सावरकरांना कैदेत ठेवले होते. | १९. भारतात सर्वाधिक घेतले जाणारे पीक. |
| २४. 'आधी कळस, मग पाया' असे बांधलेले कैलास मंदिर येथे आहे. | २१. हे कोळ्याच्या जाळ्यात अडकतात आणि बंगाली लोकांचे जेवण यांच्याशिवाय पूर्ण होत नाही. |




## ६ विद्यार्थ्यांचे तीन गट करा. एका गटाने एक परिच्छेद निवडा. आपला परिच्छेद इतर तीन गटांसमोर खालील मुद्द्यांच्या आधारे सादर करा.

- विषय
- भारताबद्दलचे किंवा भारतीय समाजजीवनाविषयीचे कोणते पैलू प्रस्तुत परिच्छेदातून दिसून येतात?
- प्रस्तुत विषयाबद्दल तुम्हाला आणखी माहिती आहे का?
- तुमच्या मते प्रस्तुत विषय पुढे कसा मांडला गेला असेल?

**क. भारतीय क्रिकेटला वेग देणाऱ्या टी-२० विश्वचषक विजयाची ११ वर्षे आणि धोनी**

जोगींदर शर्माच्या फुल टॉस चेंडूवर पाकिस्तानच्या मिसाब-उल-हकने उलटा मारलेला फटका श्रीशांतच्या हातात विसावला आणि भारतीय क्रिकेट संघाने टी-२० क्रिकेटचा श्रीगणेशा थेट जेतेपदावर नाव कोरून केला. या विजयाबरोबरच भारतीय क्रिकेटमध्ये झटपट क्रिकेटचे नवीन पर्व सुरू झाले. अर्थात आयपीएलने या झटपट क्रिकेटला ग्लॅमर मिळवून देण्यास मदत केली. मात्र या विजयानंतर आणखी एक गोष्ट भारताला गवसली आणि ती म्हणजे महेंद्रसिंग धोनीच्या रूपात एक प्रभावी नेतृत्व...



**ख. #Section377: 'स्वच्छंदपणे आणि सर्वांसमोर ताठ मानेने वावरण्याचं स्वातंत्र्य'**

भारत हे एक लोकशाही आणि धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे. देशातील विविधतेबद्दल मला प्रचंड अभिमान आहे. मुळात ही विविधताच भारताला त्याचं वेगळेपण देऊन जाते. पण, आता काळानुरूप काही बदल झाले आहेत. विविधतेत एकता असं म्हणत ज्या गोष्टींचा आपल्याला अभिमान वाटतो त्या गोष्टींच्या कक्षा आता रुंदावण्याची गरज आहे. माननीय सर्वोच्च न्यायालयाने आम्हाला आपलं माणूस निवडण्याचं आणि त्या आपल्या माणसाबरोबर ताठ मानेने वावरण्याचं स्वातंत्र्य बहाल केलंय. माणूस म्हणून जगताना आजवर लैंगिकतेच्या मुद्द्यावरून जो अन्याय सहन करावा लागला तो आता सहन करावा लागणार नाही, आम्हीही माणसाचीच लेकरं आहोत, माणसंच आहोत हे आता सांगावं लागणार नाही, अशी आशा आहे...



**ग. मुंबईतील चित्रशाळेत बाप्पा घडवणारे उत्तर भारतीय हात**

मुंबईचा गणेशोत्सव आणि या उत्सवातील भव्यता हा नेहमीच आकर्षणाचा विषय असतो. गणरायाच्या आगमनाला अवघे काही दिवस उरले आहेत. त्यामुळे चित्रशाळेत मोठी गडबड सुरू आहे. मुंबईच्या गणेशोत्सवात मंडळाच्या भव्य गणेश मूर्ती हा नेहमीच आकर्षणाचा विषय असतो. अमुक एका मंडळाची मूर्ती किंवा अमुक एका मूर्तिकारानं ती घडवली आहे, इतकीच ओळख आपल्याला असते. प्रत्यक्षात मात्र यामागे शेकडो हात असतात, जे काही महिन्यांपासून दिवसरात्र राबून बाप्पांची मूर्ती साकारत असतात. आपल्या भक्तीला आकार देणारे हे हात आहेत तरी कोणाचे, असा प्रश्न कधी पडलाय का तुम्हाला?



जशी या व्यवसायात अनेक मराठी कुटुंबं आहेत, तसे परराज्यातून आलेले अनेक कारागीरही आहेत. गणेशोत्सवाला काही महिने शिल्लक असताना आपलं घरदार सोडून हे कारागीर मुंबईत येतात. भव्य मूर्ती घडवण्याच्या कामात यांचाही वाटा मोलाचा असतो. बिहारवरून आलेला विनय भगत गेल्या १० वर्षांपासून कै. विजय खातूंच्या चित्रशाळेत काम करत आहे. साधारण मे महिन्याच्या आसपास तो मुंबईत येतो. मूर्ती घडवण्याच्या कलेत तो आता पारंगत झाला आहे...

७ **खालील दिलेल्या जंगल सफारीबद्दलची माहिती वाचा व त्याआधारे शचीच्या ई-पत्राला उत्तर द्या. या माहितीच्या व्यतिरिक्तही आणखी मुद्दे तुम्ही घालू शकता.**

# ताडोबा जंगल सफारी (जंगलसफारीचा अविस्मरणीय अनुभव)

**२१ एप्रिल ते २६ एप्रिल २०१९**

नैसर्गिक जैववविविधतेने समृद्ध असे महाराष्ट्रातील चंद्रपूर जिल्ह्यात वसलेले ताडोबा अभयारण्य पाहण्याची व ताडोबा अंधारी व्याघ्रप्रकल्प अनुभवण्याची सुवर्णसंधी घेऊन येत आहेत नैसर्गिक पर्यटनक्षेत्रातील दांडगा अनुभव असलेले 'निसर्ग-भ्रमंती टूर्स'.



वाघ, बिबट्या, रानडुक्कर, नीलगाय, काळवीट, चितळ तसेच विविध पक्षी असे वन्यजीवन अनुभवण्याची व निसर्गाच्या सान्निध्यात राहण्याची संधी दवडू नका. प्रवासाची व राहण्याची उत्तम व्यवस्था केली जाईल.

**नोंदणी दिनांक** : ३० नोव्हेंबर २०१८ पर्यंत
**नोंदणीसाठी संपर्क** : ९२४६८१३५७९

## उत्तर

**प्रति :** शची पडवळ <shachip@gmail.com>

**विषय :** भारतभ्रमण

.................................................................................

.................................................................................

.................................................................................

.................................................................................

.................................................................................

.................................................................................

.................................................................................

.................................................................................

.................................................................................

पाठवा →

८ **क. उदाहरणात दाखवल्याप्रमाणे उद्देशदर्शक उभयान्वयी अव्यय वापरून वाक्ये तयार करा.**

उदा॰ सैनिक होणे – देशसेवा करता येणे
देशसेवा करता यावी म्हणून मला सैनिक व्हायचंय / म्हणून मी सैनिक झालो / झाले.

अ. इतिहासकार होणे – देशाच्या प्राचीन काळाचा अभ्यास करता येणे

आ. देशातील विविध भाषा शिकणे – भाषांद्वारे संस्कृतीची ओळख होणे

इ. ऑलिम्पिक्समध्ये सुवर्णपदक मिळवणे – देशाचे नाव होणे



ई. समाजातील वंचित घटकांना मोफत शिक्षण देणे – देशाचा सर्वांगीण विकास होणे

उ. जबाबदार नागरिक होणे – वाहतुकीचे नियम पाळणे



**ख. उदाहरणात दाखवल्याप्रमाणे उद्देशदर्शक उभयान्वयी अव्यय वापरून वाक्ये तयार करा.**

उदा॰ चांगल्या नोकरीसाठी लोक स्थलांतर करतात.
चांगली नोकरी मिळावी म्हणून लोक स्थलांतर करतात.

अ. ताजमहाल पाहण्यासाठी भारताच्या कोनाकोपऱ्यातून लोक दरवर्षी आग्र्याला येतात.

आ. दिवाळी मजेत साजरी करायला आम्ही सर्व जण एकत्र जमतो.

इ. कशासाठी आलायस तू आज इथे?

ई. आपली संस्कृती जपायची असेल तर काही परंपरा या पाळाव्याच लागतात.

उ. देशाच्या स्वातंत्र्यासाठी अनेक भारतीयांनी आपल्या प्राणांची आहुती दिली.

## ९ ‘म्हणून’चा वापर करून आणि योग्य जोड्या जुळवून वाक्ये तयार करा.

| | | | |
|---|---|---|---|
| क. | रागिणी लवकरच एक यशस्वी गायिका | | आम्ही कथ्थक शिकू शकलो. |
| ख. | मी परागला काही काम सांगायला | | निवेदिकेने निरोप घेतला. |
| ग. | आमच्या पालकांनी आम्हाला शिकवणी लावली | म्हणून | नावारूपाला आली. |
| घ. | “याबरोबरच आजच्या बातम्या संपल्या,” असं  | | माझी बाहुली घेतली?” |
| च. | अदिती गाल फुगवून म्हणाली, “तिने काय | | गेले तर तो पळूनच गेला. |

## १० क. वाचा.

**भारतीय नृत्य परंपरा**





भारतीय नृत्यशैलींची पाळेमुळे प्राचीन परंपरेत दिसून येतात. इतर कला आणि संस्कृतीप्रमाणेच भारतीय नृत्याचेही दोन प्रमुख विभाग पडतात. शास्त्रीय नृत्य आणि लोकनृत्य. कोणताही विभाग असला, तरी भारतीय नृत्यशैलींचा प्रसार सगळ्या जगात झालेला आहे. मोठ्या संख्येने परदेशी स्त्री-पुरुष भारतीय संगीत आणि नृत्य यांचे रीतसर प्रशिक्षण घेताना दिसतात. भारताच्या भौगोलिक विविधतेची परिणती सांस्कृतिक वैविध्यात झालेली दिसते. ती नृत्यातही आहेच. लोकनृत्यच नव्हे, तर शास्त्रीय नृत्यप्रकारही विशिष्ट भौगोलिक प्रांतांशी निगडित आहेत.





एकूण आठ प्रमुख शास्त्रीय नृत्यशैलींपैकी प्रत्येक शैली कोणत्या ना कोणत्या प्रांताशी, तिथल्या लोकसमूहाच्या प्राचीन परंपरांशी संबंधित असलेली आढळते. यांपैकी भरतनाट्यम् (तामिळनाडू), कथकली (केरळ), मोहिनीअट्टम (केरळ), कुचिपुडी (आंध्र प्रदेश) आणि कुटियाट्टम (केरळ) हे दक्षिणी राज्यांशी संबंधित नृत्यप्रकार आहेत. कथ्थक नृत्यशैली उत्तर भारतात रुजली आणि मोगलांच्या राज्यात बहरली. पूर्वेकडील ओदिशा ह्या राज्यातील मंदिरांमधील पारंपरिक नृत्यप्रकार म्हणजे ओडिसी, तर ईशान्येकडील मणिपूर या राज्याचे शास्त्रीय नृत्य म्हणजे मणिपुरी. या सगळ्या नृत्यप्रकारांमध्ये एक समान धागा आहे तो





हिंदू पौराणिक कथांचा. या नृत्यांचे विषय हे रामायण, महाभारत, विष्णुपुराण, भागवतपुराण इ.मधून घेतलेले दिसतात. याखेरीज भरतनाट्यम्मध्ये नायक-नायिकांचे प्रसंग, कथक नृत्यात पर्शियन व उर्दू कवितांवर रचलेल्या कथा आणि कुटियाट्टममध्ये संस्कृत नाटकांवर आधारित सादरीकरण असेही विषय असतात. यांच्यापैकी कित्येक नृत्यप्रकार हे प्राचीन काळात केवळ देवदासींनी सादर करण्याचे असूनही नंतरच्या काळात राजाश्रयामुळे दरबारात आणि आधुनिक काळात लोकाश्रयामुळे घरा-घरांत पोहोचले.

**ख. वरील उताऱ्याच्या आधारे पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

अ. पुढीलपैकी कोणती विधाने चूक आहेत?

१. अनेक परदेशी लोक भारतीय संगीत-नृत्य शिकतात.

२. शास्त्रीय नृत्याचे विषय पौराणिक असतात.

३. पूर्वेकडील राज्यातून एकही नृत्यप्रकार आलेला नाही.

४. दक्षिणेकडील राज्यांमधून पाच नृत्यप्रकार आले आहेत.



आ. वरील प्रश्नातील चूक असलेले विधान सुधारून लिहा.

---------------------------------------------------------------------------------------------------------------------

इ. 'भर' हे शब्दयोगी पद वापरून पुढील वाक्य पुन्हा लिहा.
भारतीय नृत्यशैलींचा प्रसार सगळ्या जगात झालेला आहे.

---------------------------------------------------------------------------------------------------------------------

## ११ क. खालील कोष्टक पूर्ण करा.

| | | | |
|---|---|---|---|
| एक | पहिला, पहिली, पहिले | तीन | ---------------, ---------------, --------------- |
| सात | ---------------, सातवी, --------------- | नऊ | ---------------, ---------------, --------------- |
| अकरा | ---------------, ---------------, अकरावे | चौदा | ---------------, ---------------, --------------- |
| एकोणीस | ---------------, ---------------, --------------- | पंचवीस | ---------------, ---------------, --------------- |
| अठ्ठावीस | ---------------, ---------------, --------------- | तेहतीस | ---------------, ---------------, --------------- |
| छत्तीस | ---------------, ---------------, --------------- | बेचाळीस | ---------------, ---------------, --------------- |
| पन्नास | ---------------, ---------------, --------------- | सत्तावन्न | ---------------, ---------------, --------------- |
| एकसष्ट | ---------------, ---------------, --------------- | शाहत्तर | ---------------, ---------------, --------------- |
| पंच्याऐंशी | ---------------, ---------------, --------------- | नव्वद | ---------------, ---------------, --------------- |
| ब्याण्णव | ---------------, ---------------, --------------- | शंभर | ---------------, ---------------, --------------- |

**ख. उदाहरणात दाखवल्याप्रमाणे वाक्ये बनवा.**

उदा. मी चार पुस्तकं वाचली. - मी चौथं पुस्तक वाचलं.

अ. चैतालीने दोन घरं बांधली. - ---------------------------------------------------------------

आ. आलोकने शैशवचे पाच पतंग कापले. ---------------------------------------------------



इ. रीनाने सहा आंबे खाल्ले. ---------------------------------------------------------------

ई. अंजूच्या तीन गाड्या मी आज पाहिल्या. ---------------------------------------------------

उ. अनुरागने काढलेले वीसही फोटो चांगले आहेत. -------------------------------------------

ऊ. तू आजपर्यंत माझी पंचवीस पेनं हरवलीयस. तू आज ------------------------------------

ग. पुढे काही व्यक्ती आपसांत बोलत आहेत. एक व्यक्ती जे बोलते त्याचा दुसरी व्यक्ती अर्थ सांगते. मूळ वाक्य बोलणारी व्यक्ती आणि त्याचा अचूक अर्थ सांगणारी व्यक्ती यांच्या जोड्या लावा.



















---------------------------------------------- ---------------------------------------------- ----------------------------------------------

## १२ आधी / पूर्वी / भर ही शब्दयोगी पदे वापरून आवश्यक तो बदल करून वाक्ये पुन्हा लिहा.

क. आनंदीने विनूला सगळ्या घरात शोधलं, पण तो कुठेच सापडला नाही.

----------------------------------------------------------------------------------------------------

ख. तरी तिने बाहेर पडताना विनूला बजावून सांगितलं होतं की कुठेही जायचं नाही. मगच ती बाहेर पडली.

----------------------------------------------------------------------------------------------------

ग. अभ्यास न करता सगळ्या गावात भटकायचं हाच विनूचा नेहमीचा उद्योग आनंदीला चांगलाच माहीत होता.

----------------------------------------------------------------------------------------------------

घ. गेले दोन दिवस तो लवकर घरी येत होता. आनंदी त्याच्यानंतर पोहोचत होती.

----------------------------------------------------------------------------------------------------

च. संपूर्ण दिवस काम करून थकल्यामुळे आनंदी विनूवर खूपच चिडली होती.

----------------------------------------------------------------------------------------------------

छ. जयंता आनंदीला म्हणाला, “विनू घरी येईल तेव्हा तू नीट विचार कर आणि मगच त्याला रागव.”

----------------------------------------------------------------------------------------------------



१३ नियम समजून घेऊन, फासा आणि सोंगट्या घेऊन एक खेळ खेळू या.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सुरुवात → | मीनाक्षी मंदिर | बुद्ध गया | काशी विश्वनाथ मंदिर | |
| चार मिनार | | | | |
| दल सरोवर | | | | |
| लेक पॅलेस | | | | |
| कन्याकुमारी | | | | |
| काझिरंगा राष्ट्रीय उद्यान | | | | |
| सेल्युलर जेल | | | | |
| गेट वे ऑफ इंडिया | हम्पी | महाबळेश्वर | ताजमहाल | |

## नियम १

प्रत्येक खेळाडूला ५०० गुण दिलेले असतील.
या गुणांचा वापर करूनच त्याला घर विकत घेता येईल.
हिरवे घर = १०० गुण
गुलाबी घर = १५० गुण
जांभळे घर = २०० गुण

## नियम ३

### पिवळे घर

१, ३, ५ चे दान पडल्यास खेळाडूला १० गुण जास्त मिळतील.
तसेच
२, ४, ६ चे दान पडल्यास खेळाडूला २ घरे मागे जावे लागेल.

कुतुब-मिनार

जिम कॉर्बेट राष्ट्रीय उद्यान

साबरमती आश्रम

दार्जिलिंग

# नियम २

एखादा खेळाडू आधीच विकल्या गेलेल्या घरात आल्यास त्याला तिथे स्वतःच्या गुणांपैकी २५ गुण गमवावे लागतील.

सांचीचा स्तूप

लाल किल्ला

कोणार्क सूर्य मंदिर

# नियम ४

## निळे घर

१, ३, ५ चे दान पडल्यास खेळाडूचे १० गुण कमी केले जातील.
तसेच
२, ४, ६ चे दान पडल्यास खेळाडूला २ घरे मागे जावे लागेल.

खजुराहो

गोवा

हवामहल

हावडा पूल

सुवर्ण मंदिर

अजिंठा लेणी

नैनिताल

## १ घर या नामासाठी पाठात आलेली क्रियापदे लिहा.






## २ उदाहरणाप्रमाणे सोडवा.

उदा॰ रागावणे – रागावणारी माणसं

क. कष्ट घेणे - ----------------------------------------

ख. प्रेम करणे - ----------------------------------------

ग. त्रास देणे - ----------------------------------------

घ. काळजी घेणे - ----------------------------------------

च. वाट पाहणे - ----------------------------------------

छ. ओरडणे - ----------------------------------------

ज. लाड करणे - ----------------------------------------

झ. घराला घरपण देणे - ----------------------------------------

## ३ खालील उतारा वाचा व त्याखालील प्रश्न सोडवा.

### जिना



दिवाळी अगदी तोंडावर आली होती. परीक्षा आटोपल्यामुळे अभ्यासाचा ससेमिरा संपला होता. त्यामुळे सगळी बच्चेकंपनी किल्ला करण्यात दंग झाली होती. किल्ला बांधून झाल्यावर बघता बघता वरपर्यंत पायऱ्या तयार झाल्या. त्या बघताना मनात विचार आला की, जिन्याची कल्पना अशीच सुचली असेल का? डोंगर काढताना सपाट जागा बघून त्यावर पाय टाकून वरती जायचं म्हणजे नैसर्गिक जिनाच की!

**जिन्याचा इतिहास** : प्रगतीच्या एका टप्प्यावर घराला आडवं पसरणं काही कारणानं शक्य नसेल, मर्यादा असतील, तेव्हा 'वर' जाण्याची कल्पना सुचली असेल. पण 'वर' जायचं कसं, याचं उत्तर डोंगराच्या पायऱ्यांनी बनलेल्या 'जिन्यानं' दिलं असेल आणि 'तिरका' जिना अस्तित्वात आला असेल. 'मोबाइल' शिडी म्हणजे हलणारा जिना, हे त्याचं पहिलं स्वरूप असेल. मग सोईच्या,

सुलभतेच्या, सुरक्षेच्या विचाराने तो वास्तुरचनेचा आवश्यक भाग झाला असेल.

आपल्याला सरळ रेषेत वर-खाली करता यावं म्हणून नेहमी तिरका राहणारा हा जिना घराला चिकटलेला असतो. सर्वसाधारणपणे बंगला असला की गच्ची असतेच; आणि मग घरातून किंवा बाहेरून जिना हवाच. घराची उंची वाढत गेली की याला पर्यायच नाही, असा हा आवश्यक घटक. हा जिना लाकडी, लोखंडी, जास्त करून सिमेंटचा असतो.

**घरातला जिना** : घरातले जिने कधी कधी थोडेसे अरुंद आणि जरा उभे असतात. नक्षीकाम केलेल्या लोखंडी स्प्रिंगसारख्या जिन्यावरून जाताना 'जपून टाक पाऊल जरा' हे ध्यानात ठेवावं लागतं. मालिकांमधील रुंद, देखणे, गुळगुळीत पायऱ्यांचे वळणदार जिने बघताना काळजाचा ठोकाच चुकतो. घरातला जिना तर जणू बैठक व्यवस्थेचा एक भाग असतो. त्याच्या कठड्यावरून घसरगुंडी करणं हा बाळगोपाळांचा आवडता खेळ. लहानग्याला पाय फुटले की त्याचा मोर्चा सतत या जिन्याकडेच असतो. मग पाय वर करून



वरची पायरी गाठण्याचा अगदी आटापिटा चालतो. घरातल्यांचा डोळा चुकवून हे साहस करायचं. मग पडझड. कावळा-चिमणीची गोष्ट सांगत पायऱ्यांवर वर-खाली करणाऱ्या छोट्याची पोटपूजा या जिन्याच्या साक्षीनेच होत राहते. छोटेच कशाला, मोठेही जिन्याच्या पायरीवर 'टेकणं' पसंत करतात. जिवाभावाच्या सख्या, बहिणी, आजीच्या लेकी, नाती यांच्या कानगोष्टींसाठी ही एक निवांत जागा असते.

**माणसाळलेला जिना** : जिना बाहेर असला तरी माणसाळलेला असतोच. कंटाळा आला की जिन्यावर बसायचं, हा नियम. घरात धुसफुस झाली की वातावरण निवळेपर्यंत सासुरवाशिणींना जिन्याची हक्काची सोबत असते. भर दुपारच्या वेळी फारशी वर्दळ नसताना आणि घरातल्यांना शांत झोप हवी म्हणून भातुकलीचा डाव या जिन्यातच रंगतो. तसेच चोरट्या भेटी, नजरेची शोधमोहीम यांचा हा साक्षीदार असतो. जिन्याच्या चार पायऱ्या उतरून कठड्यावर रेलून खालच्या मजल्याचा अंदाज घेणं, निरोपाची देवघेव याच्यामुळे शक्य होते.

**चढ-उतार** : जिना चढण्याची आणि उतरण्याची एक शैली असते. तिचं वयाशी घट्ट नातं असतं. प्रत्येकाची 'स्टाइल' वेगळी. केवळ या पदरवाने जिन्यावरून कोण चाललंय, त्याचा अंदाज बांधता येतो.

जिन्याने आपण वरखाली जा-ये करत असलो तरी जिना म्हणजे प्रगती अशी खूणगाठ मनाशी पक्की आहे. म्हणूनच आपण 'यशाच्या' पायऱ्या चढत जातो.

**एकाकी जिने** : अर्धशतकाचा उंबरठा ओलांडून मागे पाहिले तर इमारतींना तीन ते चार मजलेच दिसून येतात. त्यामुळे पर्याय नव्हता. परंतु काळाच्या ओघात कमीतकमी जागेत जास्तीत जास्त माणसं सामावून घेण्याची वेळ आल्यामुळे उंच उंच मनोरे रचले गेले. त्यात लिफ्टमुळे सगळेच सहज, सुलभ झालं. परिणामी जिने बिचारे एकाकी पडले. पण असं असलं, तरी जिन्यांच्या अस्तित्वावर कधीच गदा येणार नाही. त्यांचा वापर होणार नाही इतकंच. लिफ्ट सर्वांना फुलासारखं उचलून नेईल. क्वचित कधी विजेने 'राम' म्हटला तरच जिन्यांवर पायधूळ झाडली जाईल, तेवढाच 'तो' सुखावेल.



**क. 'जिना' या नामासाठी उताऱ्यात आलेली जास्तीत जास्त विशेषणे लिहा.**

---

---

---

**ख. उताऱ्यात आलेल्या पुढील शब्दसमूहांचा अचूक अर्थ ओळखा.**

अ. ससेमिरा -
१. ससा पकडणे    २. ससा मारणे    ३. नकोशा गोष्टी मागे लागणे

आ. 'राम' म्हणणे -
१. देवाचे नाव घेणे    २. मरणे / संपणे / बंद पडणे    ३. रामायण वाचणे

इ. पदरव -
१. पायांचा आवाज    २. पडण्याचा आवाज    ३. पळण्याचा आवाज

ई. पायधूळ झाडणे -
१. केर काढणे    २. भेट देणे    ३. स्वच्छता ठेवणे

उ. आटापिटा करणे -
१. पीठ मळणे    २. खूप प्रयत्न करणे    ३. पाठलाग करणे

ऊ. काळजाचा ठोका चुकणे
१. धक्का बसणे    २. हृदयविकाराचा झटका येणे    ३. हृदय बंद पडणे

**ग. खाली दिलेली क्रियापदे पुढील कोणत्या नामांबरोबर येतील?**

| | | | |
|---|---|---|---|
| **अ.** | बनवणे | | आधार |
| **आ.** | करणे | | आसरा |
| **इ.** | देणे | | घरदार |
| **ई.** | सोडणे | | देखरेख |
| **उ.** | घेणे | | वास्तव्य |
| | | | नंदनवन |

**घ. वसंत बापट यांची 'जिना' ही कविता मिळवून वाचा आणि वर्गात सादर करा.**

## ४ पुढील पत्र वाचा आणि त्याच्या आधारे प्रश्न सोडवा.




प्रिय बेला,

इथे आल्यापासून पत्र लिहायचं म्हणतेय तुला, पण मुहूर्तच सापडेना. आधीच इतक्या घाईने मुंबईसारख्या मोठ्या शहरात आपलं बस्तान हलवायचं अन् तेही खेड-चिपळूणसारख्या तालुक्याच्या गावाहून; त्यात नव्या नोकरीवर लगेचच रुजू व्हायचं. या सगळ्या धबडग्यात घर लावायलाही पुरेसा वेळ मिळाला नाही. कसाबसा नित्य दिनक्रम सुरू झाला आता. नवं शहर, नवं घर, नवी नोकरी, नवा शेजार... म्हणायला शेजार काही अजून कळला नाहीये नीट. चढाउतरायला चार-चार लिफ्ट्स. त्यामुळे कोणाचं तोंड मुश्किलीनेच दिसतं. इथे सगळ्यांचीच दारं बंद आणि तिकडे गावच्या घरांना कुलुपं असली तरी कधी ती लावायची वेळ आली नाही. खुशाल शेजाऱ्यांवर घर सोपवून द्यावं. त्या कुलुपाची चावी कधी मिळायचीच नाही त्यामुळे. त्यातल्यात्यात आमच्याच मजल्यावरच्या छोट्या आराध्यशी आणिक छोटुकल्या आर्याशी ओळख झाली. या नव्या जागेत झालेले हे माझे पहिले दोस्त.

इथल्या वातावरणाची सवय व्हायला थोडा वेळ लागेल. खेडमधलं घर आठवतं सारखं. ते घरच आहे गं. इथे मात्र फ्लॅट, अपार्टमेंट आहेत. खेडमध्ये अख्खी वाडी म्हणजे आपलंच घर असल्यासारखी. अशा आजूबाजूने एकमेकांना लगटून, पण मधून जाण्या-येण्यापुरतं अंतर ठेवून असलेल्या त्या सगळ्या घरांची एक वाडी. सण साजरा करायचा तर तो घरात नाही, अख्ख्या वाडीत! पूर्वी मुंबई-पुण्यासारख्या शहरांमध्ये आणि आसपासच्या उपनगरांमध्ये अशा वाड्या असत म्हणे. आता मात्र अशा वाड्या गावालाच राहिल्या.



इथल्या बांधकामातून सज्जा हद्दपारच झालाय आता. आपल्या घराच्या पुढ्यातलं अंगण आठवतं. फुलझाडं, फळझाडं न् भाज्या यांनी सजलेलं. अंगणात उगवती-मावळतीची रेंगाळणारी उन्हं न् त्या उन्हात बागडणारी पाखरं. पावसाळ्यात छपराच्या पागोळ्यांनी साचणारी छोटी छोटी डबकी न् त्यात घरातल्या लहानग्यांची स्वप्नं घेऊन तरंगणाऱ्या कागदी नावा. घराच्या पुढे अंगण, मग ओसरी, घरात शिरल्यावर दिसते ती पडवी, तिच्यापुढे आत माजघर, मागे परसू अन् वर गच्ची. उन्हाळ्यात रात्री अंगणात किंवा गच्चीत बाज टाकून त्यावर गप्पा मारत केलेली जागरणं आठवतात का गं तुला? आणिक माडीवर बसून खेळलेली भातुकली आठवते? किती भांडणं व्हायची खेळताना! पण तू नि मी मात्र नेहमी एकमेकींच्या बाजूच्या असायचो. अगदी परसातल्या मोरीत जायची वेळ आली तरी एकमेकींचा हात धरूनच जायचो.

एक ना दोन, कितीतरी आठवणी. शहरातल्या या गजबजाटात गावाकडचं घर आणिक तिथली हवीहवीशी शांतता जास्तच आठवते. ओढ लागते त्या शांत वातावरणाची. सुट्टी मिळेल तेव्हा येऊच. तेव्हा कळवीनच तुला.

काका-काकू, आत्या आणि दादा-वहिनींना माझा नमस्कार सांग.

तुझी सखी.

**क. पुढे दिलेल्या शब्दसमूहासाठी उताऱ्यात आलेले शब्द शोधा आणि शब्दकोडे सोडवा.**

| आडवे शब्द | उभे शब्द |
|---|---|
| २. बैठ्या घराच्या पुढील मोकळी जागा | १. बैठ्या घराचा प्रवेशाचा भाग |
| ४. घराचा गॅलरीसारखा भाग | ३. घराचा सगळ्यात वरचा मोकळा भाग |
| ५. न्हाणीघर, हातपाय धुण्याची, अंघोळीची जागा | ६. दाराचं कुलूप उघडायला ही लागते. |
| ८. घरातील बैठकीची जागा | ७. लाकूड आणि काथ्याचा दोर यांनी बनलेला पलंग |
| ९. घराचा मध्यभाग | ८. बैठ्या घराच्या मागे असलेली मोकळी जागा |
| १०. अनेक बैठ्या घरांचा एकत्रित समुदाय | ९. बैठ्या घराचा लाकडाने बांधलेला मजला |






**ख. पुढील वाक्यांपैकी चुकीचे वाक्य ओळखा.**

अ. बेला आणि सखी यांची शहरात आल्यावर मैत्री झाली.

आ. बेला आणि सखी लहानपणापासून एकमेकींच्या खूप चांगल्या मैत्रिणी आहेत.

इ. बेला आणि सखी यांनी गप्पा मारत रात्रीची जागरणं केली आहेत.

**ग. पुढे काही शब्द आणि त्यांच्या पुढे त्यांचे तीन अर्थ दिले आहेत. त्यांपैकी योग्य अर्थाच्या पुढे (✓) अशी खूण करा.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अ. | बस्तान | खोका ☐ | दप्तर ☐ | स्थिर जागा ☐ |
| आ. | धबडगा | मोठा आवाज ☐ | खूप काम ☐ | धडपड ☐ |
| इ. | भातुकली | लहान मुला-मुलींचा खेळ ☐ | भाताचे भांडे ☐ | भाताचं पीक ☐ |

५ **क. पुढीलपैकी काही वाक्यांमध्ये मूळ क्रियापद तर काही वाक्यांमध्ये प्रयोजक क्रियापद वापरले आहे. उदाहरणात दाखवल्याप्रमाणे त्या क्रियापदांची दोन्ही रूपे दाखवा.**

| | | |
|---|---|---|
| उदा. | कोकणात प्रत्येक घरात गणपती बसवतात. | बसणे - बसवणे |
| अ. | मिहीर, फार सुंदर रंगवलंयस हं चित्र!  | |
| आ. | आज आम्ही श्रोत्यांना ८०च्या दशकातली गाणी ऐकवणार आहोत. | |
| इ. | मूर्तिकाराने एक सुंदर मूर्ती घडवली. | |
| ई. | माझी सुंदर आणि महाग फुलदाणी फोडली तुमच्या बोक्याने. | |
| उ. | घराचा दरवाजा नीट लावलात ना? | |
| ऊ. | प्रयोगशाळेत प्रयोग करताना भोक पडलं माझ्या कोटाला. | |

**ख. पुढे दिलेल्या धातूंची योग्य प्रयोजक रूपे लिहा.**

| | | | |
|---|---|---|---|
| अ. चाल | ........................ | उ. बघ | ........................ |
| आ. ये | ........................ | ऊ. शिक | ........................ |
| इ. पी | ........................ | ए. जग | ........................ |
| ई. खा | ........................ | ॲ. पळ | ........................ |

**ग. खालील कोष्टक पूर्ण करा.**

| बसणे | बसले | बसवले | बसायला लावले | बसायला भाग पाडले |
|---|---|---|---|---|
| ऐकणे | | | | |
| खाणे  | | | | |
| बघणे  | | | | |
| झोपणे  | | | | |
| पिणे  | | | | |
| येणे | | | | |

**घ. आता चार विद्यार्थ्यांचा एक अशा प्रकारे गट करा. प्रत्येक गटाला वरीलपैकी एक क्रियापद दिले जाईल. गटातील विद्यार्थी वरीलप्रमाणे त्या क्रियापदाची रूपे विचारात घेऊन त्यांचा वाक्यांत योग्य प्रकारे वापर करतील.**

उदा॰ गट १ – बसणे

विद्यार्थी १ – बाळ खुर्चीवर बसले.

विद्यार्थी २ – आईने बाळाला खुर्चीवर बसवले.

विद्यार्थी ३ – बाबांनी बाळाला शांत बसायला लावले.

विद्यार्थी ४ – बागुलबुवाच्या भीतीने बाळाला शांत बसायला भाग पाडले.

## ६ रिकाम्या जागी योग्य ते नाम लिहा.

उदा॰ धार्मिक : धर्म

क. नैतिक : ............ ख. सामाजिक : ............

ग. लैंगिक : ............ घ. मानसिक : ............

च. आर्थिक : ............ छ. सांस्कृतिक : ............

ज. भौगोलिक : ............ झ. वांशिक : ............

## ७ पुढील वाक्ये 'आधीच... तशात / त्यात' यांचा वापर करून पुन्हा लिहा.

उदा॰ सकाळपासून काही खाल्लं नव्हतं आणि प्राचार्यांनी तातडीची बैठक बोलावली.
आधीच सकाळपासून काही खाल्लं नव्हतं, त्यात प्राचार्यांनी तातडीची बैठक बोलावली.

क. परीक्षेचे दिवस आहेत आणि घरचे माझ्या लग्नाच्या मागे लागले आहेत.

---

ख. इंधनाचे भाव दिवसाला वाढतायत आणि मला दिवसाआड पुणे-नगर प्रवास करावा लागतोय.

---

ग. इथे अभ्यासात लक्ष लागत नाहीये आणि शेजाऱ्यांचा टी.व्ही. मोठ्या आवाजात चालूये.

---



घ. थंडी पडायला लागलीये आणि तू कुल्फी खातोयस?

---

च. लहानपणापासून विजूचा ओढा अभ्यासापेक्षा कबड्डीकडेच अधिक आणि तिचा काका कबड्डीचा प्रशिक्षक.

---

## ८ खाली काही संवाद दिले आहेत आणि त्यापुढे काही जाहिराती आहेत. संवाद आणि जाहिराती यांच्या जोड्या जुळवा.

| | |
|---|---|
| **क.**<br>"आम्ही दोघेही नोकरी करणारे. नोकरीच्या ठिकाणापासून घर जवळच असावं, प्रवासात जीव अर्धा होऊ नये असं आम्हा दोघांचंही मत आहे. एखाद्या नवीन टाऊनशिपमध्ये चांगला ऐसपैस चार खोल्यांचा ब्लॉक हे आमचं स्वप्न आहे." | **अ.**<br>'कोकणातील घर' - निसर्गसुंदर कोकणातील लांजा येथील टुमदार घराचे स्वप्न केवळ तुमच्या एका कॉलने पूर्ण होणार...<br>टोल फ्री नं. 18001209010. |
| **ख.**<br>"आम्ही परदेशी स्थायिक होण्यासाठी जात आहोत. जाण्याआधी आम्हाला आमचे मुंबईतले घर विकायचे आहे. हातात वेळ कमी असल्यामुळे काही ठिकाणी जाहिरात दिलेली बरी असे वाटते." | **आ.**<br>तळेगाव स्टेशनपासून चालत १० मिनिटांच्या अंतरावर 'यशवंतनगर'मध्ये, लिफ्टची सुविधा असलेल्या बिल्डींगमध्ये १बीएचके फ्लॅटस (५९५/६२०चौ.फू.) उपलब्ध. सॅम्पल फ्लॅट तयार. कर्जाची सोय.<br>**खेडेकर रिॲल्टर्स,**<br>**९१६७४०७१२५/०२५१-२३२२६०५** |

| | |
|---|---|
| **ग.**<br>“घरी आम्ही दोघेही कमावणारे, पण घर घेणं ही काही वाटते तितकी सोपी बाब राहिलेली नाही. कर्ज तर घ्यावं लागेलच, पण लवकरात लवकर घराचं बुकिंग करायचं असल्याकारणाने कर्जही लवकर मिळावं अशी अपेक्षा.” | **इ.**<br>**जागा भाड्याने देणे आहे**<br>कैलास सोसायटी, हंसानगर, ठाणे प. येथील ४८० चौ.फूट कार्पेट असणारी जागा ऑफिससाठी भाडेतत्त्वावर देणे आहे.<br>**फोन: ९००४४३७५५५, ९८२१२०७६७२** |
| **घ.**<br>“घर कितीही साफ ठेवलं तरी झुरळं कुठून येतात कोण जाणे. काही तरी कायमचा बंदोबस्त करायचाय या झुरळांचा.” | **ई.**<br><br> |
| **च.**<br>“३४ वर्षे नोकरी केली. आता आणखी दोन वर्षांनी निवृत्त होईन. कोकणात घर घेऊन निवृत्तीनंतरचा काळ शेती करून घालवायचा मानस आहे. कंटाळा आला शहराचा.” | **उ.**<br>**फोन फिरवा - लोन मिळवा**<br>सर्व प्रकारचे लोन उपलब्ध, ३% वार्षिक व्याज, सोपे हप्ते, १२ तासात उपलब्ध.<br>**संपर्क: 07042285354 / 09599610497** |
| **छ.**<br>“आमच्या ‘देशाटन टूर्स’चं नवं ऑफिस जरा मोठं असणार आहे. बिझनेस वाढतोय ना आमचा! सध्या जागा विकत घेणं परवडणार नाही. म्हणून भाड्यानेच बघतोय. पुढे पसारा वाढला की घेऊ मालकीचा गाळा.” | **ऊ.**<br>**पेस्ट कंट्रोल**<br>अल्फा पेस्ट कंट्रोल सर्व्हिसेस (सरकारमान्य) झुरळे, मुंग्या, वाळवी, ढेकूण यावर शास्त्रीय पद्धतीने उपाय. १००% खात्री. दादर - ८४५२०७६८०४, घाटकोपर - ८९७५९६८४२२, ठाणे - ८४३३२४२६३०, कल्याण - ८०९७२३७२३०, बदलापूर - ८५५१८८९०६३४ |

| ज. | ए. |
| --- | --- |
| “माझे आईवडील आता थकलेत. दोघांनाही गुडघ्यांचं दुखणं आहे. त्यांच्यासाठी एखाद्या शांत निसर्गरम्य ठिकाणी सगळ्या सोयी आणि वैद्यकीय सुविधा जवळपास असतील असं घर पाहतेय मी.”<br> | 'लोकसत्तासह सर्व वर्तमानपत्रांत, विवाहविषयक, जागाविषयक, दु:खद निधन, पुण्यस्मरण, पब्लिक नोटीस, यात्रासहल, हॉटेल रिसॉर्टस, शैक्षणिक, व्यवसायविषयक इ. - सर्व प्रकारच्या जाहिरातींसाठी घरपोच सेवा वर्तमानपत्राच्या दरात, अद्वैत ॲडव्हर्टायझिंग, ठाणे - २५३८८०८० / २५३४५३९७, मुलुंड - ९८३३६७५६३२, दादर - ९९६७२२०२७२ |

## ९ दोघांचे गट करून प्रत्येक गटाने पुढीलपैकी एका प्रसंगावर वादविवाद करा.

**क** प्रियाचं कुटुंब मोठं. घरात जवळजवळ १२ माणसं, शिवाय पाहुण्यांचंही सतत येणं-जाणं. त्यामुळे प्रियाचा युपीएससीचा अभ्यास नीट होत नाहीये. प्रियाकडे आता शेवटची संधी आहे कारण तिची एकच संधी शिल्लक राहिलीय. तिचीही आयएएस बनण्याची तीव्र इच्छा आहे आणि मेहनत घेण्याची तयारी. प्रियाचा काही महिने एका हॉस्टेलमध्ये राहण्याचा मानस आहे, पण घरचे म्हणतायत, ‘स्वत:चं घर असताना हॉस्टेलमध्ये राहण्याची काय गरज?’

**ख** घराच्या नूतनीकरणाचं काम चालू असल्यामुळे खूप धूळ, कचरा आणि पसारा असतो. त्यात आजीला दम्याचा त्रास. तिला घरात ठेवलं तर तिचा त्रास आणखी वाढणार. तुम्ही तिला काही दिवस तिच्या एका मैत्रिणीकडे राहण्याचा सल्ला देता. तीही आनंदाने तयार होते, पण तुमच्या आई-वडिलांना हे मान्य नाही. लोक काय म्हणतील याची भीती त्यांना वाटते.

**ग** सुबोध आणि मृगाचा प्रेमविवाह. पण त्यांना मूल नको आहे. त्यांना प्राण्यांची भारी आवड असल्याने घरात दोन कुत्रे आणि एक मांजर असं त्यांचं पाच जणांचं कुटुंब. पण दोघांच्याही पालकांना हे आवडलेलं नाही. स्वत:चं एखादं तरी मूल असावंच असा त्यांचा आग्रह आहे.

# तोंडी परीक्षा

**एकूण गुण २०**

## १. वाचन व आकलन (एकूण गुण ६)

**क. खालील उतारा मोठयाने वाचून दाखवा. (गुण २)**

झोपाळा ही घरातील इतर वस्तूंप्रमाणे असणारी एक वस्तूच. झोका, हिंदोळा, झूला अशा विविध नावांनी ओळखला जाणारा हा झोपाळा हे घरातल्या प्रत्येक व्यक्तीच्या आवडीचं ठिकाण. मग ती व्यक्ती कोणत्याही वयोगटातली असो. या झोपाळ्यावर काही जण विसावण्यासाठी येतात तर काही जण विरंगुळा म्हणून. इथेच काहींना एखादी कविता सुचते तर काही आठवणींत रमतात. सर्वांच्या आवडीचा असा हा झोपाळा मुंबईसारख्या शहरात जागेच्या कमतरतेमुळे हळू-हळू नाहीसा होताना दिसतो. तर पुणे, नागपूर, सातार्‍यासारख्या शहरांत आजही काही घरांमध्ये आढळतो. कोकणात तर पडवीत झोपाळा नसलेलं घर क्वचितच सापडेल असं म्हटलं तर अतिशयोक्ती वाटू नये. तर, असा हा बालपणीच सवय झालेला झोका आमच्या मुंबईतल्या घराचा – हो मुंबईतल्या – अगदी अविभाज्य घटक झाला. जसजशी घरं बदलली तसतसे झोकेही बदलत गेले. आमच्या चाळीतल्या घरातील झोपाळ्याचं लहानसं रूप फ्लॅटमधील थोड्या मोठ्या झोपाळ्यात बदललं. पण, अजूनही आमचं झोपाळ्याचं वेड काही कमी झालेलं नाही. अजूनही मी आणि आई याच झोपाळ्यावर बसून चहा घेतो, बाबाला इथेच बसून पेपर वाचायला आवडतं आणि माझ्या मांजरालाही या झोपाळ्यावरच शांत झोप लागते. असं हे आमचं चार जणांचं कुटुंब.

**ख. खालील प्रश्नांची उत्तरे द्या. (गुण ४)**

अ. झोपाळ्याला समानार्थी शब्द सांगा.
आ. लेखिकेच्या मते कोणत्या शहरातून झोपाळा नाहीसा होताना दिसतो? का?
इ. लेखिकेचे झोपाळ्याशी नाते लेखात कशा प्रकारे चित्रित झाले आहे?
ई. लेखिकेच्या कुटुंबात किती सदस्य आहेत? त्यांची नावे सांगा.

## २. चित्रवर्णन (एकूण गुण ५)

**क. पर्यटनक्षेत्रात कार्यरत असणाऱ्या एका कंपनीत तुम्ही कामाला आहात व तुमच्या कंपनीच्या भारतातील पर्यटन ह्या कार्यक्रमासाठी माहितीपत्रक बनविण्याची जबाबदारी तुमच्यावर आहे. खालीलपैकी कोणते चित्र तुम्ही माहितीपत्रकासाठी निवडाल? तुमची निवड सकारण स्पष्ट करा.**












**३. पुढीलपैकी कोणत्याही दोन प्रसंगांवर आपल्या जोडीदाराबरोबर संवाद साधा. संवादात 'आधीच ... तशात / त्यात' हे शब्द वापरा.** **(एकूण गुण ४)**

क. उन्हाळ्यात दक्षिण भारतात फिरायला जाण्याचा बेत असणे. दक्षिण भारतातील उन्हाळा भयंकर असणे.

ख. भाड्याच्या घरात नव्याने राहायला आल्याने डिपॉझिटची रक्कम द्यावी लागणे. घरासाठी नवीन फर्निचर खरेदी करणे.

ग. दिल्लीसारख्या प्रदूषित शहरात नोकरीसाठी जावे लागणे. स्वत:ला दम्याचा त्रास असणे.

घ. सात जणांच्या कुटुंबाला जागा न पुरणे. कुत्र्याचं पिलू दत्तक घेणे.

**४. पुढीलपैकी कोणत्याही एका विषयावर आपल्या जोडीदाराबरोबर चर्चा / वादविवाद करा.** **(एकूण गुण ५)**

क. तुमच्या देशावर ओढवलेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे जीवितहानी झाली तसेच देशाचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसानही झाले. अशा परिस्थितीत झालेली जीवित व वित्तहानी भरून काढण्यासाठी इतर देशांची मदत घ्यावी की स्वत:च्या हिंमतीवर या परिस्थितीशी सामना करावा?

ख. प्रत्यूष समलिंगी आहे. त्याला समजून घेईल असा साथीदारही त्याला भेटलाय. प्रत्यूषच्या घरी दोघांना एकत्र राहता यावं अशी प्रत्यूषची इच्छा आहे. पण त्याच्या कुटुंबाचा याला विरोध आहे. प्रत्यूषला कुटुंबीयांनाही दुखवायचं नाही. अशा परिस्थितीत त्याने काय करावं?

# लेखी परीक्षा

**एकूण गुण ३०**

## १. वाचन व आकलन (एकूण गुण ५)

**चहा आणि भारत**

चहाच्या क्षेत्रातली चीनची मक्तेदारी मोडून काढण्यासाठी ब्रिटिशांनी भारतात चहाची लागवड सुरू केली आणि भारतीयांना खऱ्या अर्थाने चहाचा परिचय झाला. असं असलं, तरी भारतात चहा अगदीच माहीत नव्हता असं नाही. काही भागांत त्याचा फक्त औषधी वापर होत होता इतकंच. ब्रिटिशांनी आसामच्या खोऱ्यात आणि दार्जिलिंगच्या डोंगरांमध्ये चहाची लागवड सुरू केली. १४ वर्षांच्या अथक प्रयत्नांनंतर भारतात चहाचं उत्पादन जोर धरू लागलं. हळूहळू चीनइतकाच चहा भारतात तयार होऊ लागला. आज भारत चीननंतरचा म्हणजे दुसऱ्या क्रमांकाचा चहा उत्पादक देश आहे.

भारतात आसाममध्ये कॅमेलिया सिनेसिस जातीच्या चिनी प्रकारच्या चहासारखं उत्पादन होऊ शकतं याचा शोध सर्वप्रथम रॉबर्ट ब्रूस याला १८२३ मध्ये लागला. मणीराम दिवाण या स्थानिक व्यापाऱ्याने ब्रूसची गाठ सिंगफो या जमातीशी घालून दिली. या जमातीतले लोक चहाशी साधर्म्य असणारे एक पेय पीत. ते एका विशिष्ट जंगली झुडपाची कोवळी पानं उन्हात वाळवत. तीन दिवस या पानांवर दव पडेल अशी ती ठेवली जात. त्यानंतर ती पोकळ बांबूत ठेवून दिली जात. त्यांचा चांगला वास येईपर्यंत त्यांना धुरी दिली जात असे. ब्रूसने त्या पेयाची चव घेतली, तर ती चहाशी मिळतीजुळती आहे असं त्याच्या लक्षात आलं. त्याने या पानांचे नमुने गोळा केले. पण त्याच दरम्यान १८३० मध्ये त्याचा मृत्यू झाला. मग त्याच्या भावाने, चार्ल्सने पाठपुरावा करत हे नमुने कोलकात्याला पाठवले. त्यात असं आढळलं, की ती चहाचीच पानं होती, पण ती चिनी चहापेक्षा वेगळी होती. त्यांचं नाव असामिका ठेवण्यात आलं. याच दरम्यान चहाच्या क्षेत्रातली चीनची जागतिक मक्तेदारी मोडून काढण्यासाठी ईस्ट इंडिया कंपनीचे प्रयत्न सुरू होते. त्यासाठी ब्रिटिशांच्या वसाहतींमध्ये चहाची लागवड करता येईल का याची चाचपणी सुरू होती. त्यासाठी चीनमधून चहाच्या बिया चोरून भारत, श्रीलंका या वसाहतींमध्ये आणल्या जात. त्यांच्यावर प्रयोग केले जात. या चिनी बिया इथल्या मातीत नीट रुजत नव्हत्या. याच दरम्यान ब्रूसला सापडलेली ही नवी जात सगळ्यांपुढे आली. त्यावरच्या अथक प्रयोगांनंतर ब्रिटिशांनी अप्पर आसाममधल्या चबुआ इथं चहाची व्यावसायिक लागवड सुरू केली. १८४० च्या दशकाच्या सुरुवातीला भारतात चहाच्या व्यवसायाने पाय रोवायला सुरुवात केली. चिनरी ही जात आधी आसाममध्ये आणि नंतर दार्जिलिंग तसंच कांगरामध्ये लावली गेली. ती तिथे चांगलीच रुजली. दार्जिलिंगचा पहिला सुपरिटेंडंट आर्चिबाल्ड कॅम्पबेल याने दार्जिलिंगमध्ये १८४१ साली आपल्या घराजवळ चिनारीची रोपं लावली. त्याचं बघून इतरांनीही रोपं लावायला सुरुवात केली. १८४७ साली अधिकृतरीत्या चहाच्या रोपांची नर्सरी सुरू झाली. त्यानंतर लौकरच तुकवर टी इस्टेटमध्ये १८५० साली चहाची व्यावसायिक लागवड सुरू झाली.

भारतात चहा लोकप्रिय करण्यासाठी ब्रिटिशांनी खूप प्रयत्न केले. ठिकठिकाणी चहाचे स्टॉल उभे



केले गेले. वेगवेगळ्या कारखान्यांमधून चहाची सुट्टी ठेवली जाई. घरोघरी जाऊन चहा कसा करायचा याची प्रात्यक्षिकं दाखवली जात. रेल्वेचं आगमन झाल्यावर रेल्वे स्टेशनवर चहाचे ठेले उभारले गेले. दुसऱ्या महायुद्धानंतर भारतात चहा लक्षणीय प्रमाणात लोकप्रिय झाला. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी भारतात उत्पादित होणाऱ्या एकूण चहापैकी ७१ टक्के चहा भारतातच विकला जात होता. आज भारतात चहाचे दोन हजार उत्पादक आहेत. त्यात महत्त्वाच्या बागा आसाम, पश्चिम बंगाल, तमीळनाडू आणि केरळमध्ये आहेत. इथे सगळीकडेच उत्तम दर्जाचा चहा तयार होतो आणि या चहा उत्पादकांनी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्वत:चं स्थान निर्माण केलं आहे. आज भारतात चहाच्या उद्यागातून २० लाख लोकांना रोजगार मिळतो आहे.

**क. कंसातील सूचनेप्रमाणे पुढील प्रश्न सोडवा.**

अ. ब्रिटिशांनी भारतात चहाची लागवड का सुरू केली? (एका वाक्यात उत्तर लिहा.)

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------.

आ. भारतात आसाममध्ये कॅमेलिया सिनेसिस जातीच्या चिनी प्रकारच्या चहासारखं उत्पादन होऊ शकतं याचा शोध सर्वप्रथम रॉबर्ट ब्रूस याला १८२३ मध्ये लागला. ('शतक' हा शब्द वापरून वाक्य पुन्हा लिहा.)

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------.

इ. वर्चस्व – ------------------------

सारखेपणा – ------------------------ (या शब्दांसाठी उताऱ्यात आलेले समानार्थी शब्द लिहा.)

ई. भारतात चहा लोकप्रिय करण्यासाठी ब्रिटिशांनी खूप प्रयत्न केले. ('म्हणून' हे उभयान्वयी अव्यय वापरून वाक्य पुन्हा लिहा.)

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------.

उ. 'जम बसवणे' या अर्थाचा उताऱ्यात आलेला वाक्‌प्रचार लिहा.

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------.

## २. शब्दसंपदा (एकूण गुण ३)

**क. पुढील शब्दसमूहांसाठी योग्य ते विशेषण लिहा. (गुण १)**

अ. ज्याची तुलना करता येणार नाही असा - ------------------------

आ. समाजाचा - ------------------------

**ख. पुढील वाक्प्रचारांचा वाक्यांत उपयोग करा.** **(गुण २)**

अ. आधार देणे - ------------------------------------------------

------------------------------------------------.

आ. भरभराटीस येणे - ------------------------------------------------

------------------------------------------------.

## ३. व्याकरण **(एकूण गुण २२)**

**क. योग्य जोड्या लावा व योग्य ते उभयान्वयी अव्यय वापरून पुढील वाक्ये जोडा.** **(१०)**

| | |
|---|---|
| अ. भारतात एकूण २९ राज्ये आहेत. | १. भारतीयांनी शर्थीचे प्रयत्न केले. |
| आ. घराची सजावट करण्यासाठी | २. बेलाचं घर हवेशीर आहे. |
| इ. बेलाचं घर मोठं आहे. | ३. आम्ही रात्रीचं जेवण एकत्र घेतो. |
| ई. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी | ४. भारतात एकूण ७ केंद्रशासित प्रदेश आहेत. |
| उ. दिवसातून एकदा तरी एकत्र येण्यासाठी | ५. तिने आज सुट्टी घेतली. |

अ. ------------------------------------------------

------------------------------------------------.

आ. ------------------------------------------------

------------------------------------------------.

इ. ------------------------------------------------

------------------------------------------------.

ई. ------------------------------------------------

------------------------------------------------.

उ. ------------------------------------------------

------------------------------------------------.

**ख. पुढील वाक्यांतील क्रियापदांच्या जागी त्यांची प्रयोजक रूपे वापरून वाक्ये पुन्हा लिहा. वाक्यांत आवश्यक ते बदल करा.** **(५)**

अ. स्वयंपाकघरात नेहमीच पाणी सांडलेले असते. (सई)

------------------------------------------------

------------------------------------------------

आ. कप-बशी कशी फुटली? (कोणी)

------------------------------------------------

------------------------------------------------

इ. नवरा-नवरीला उद्या हळद लागेल. (सगळे)

------------------------------------------------

ई. आज मुलं हसत खेळत कविता शिकली. (शिक्षक)

उ. संपला इतक्यातच दिवाळीचा फराळ? (मुलांनी)

**ग. पुढील शब्दांना कंसातील शब्दयोगी पद जोडून तयार होणारे रूप लिहा व ते रूप वापरून प्रत्येकी एक वाक्य बनवा. (३)**

अ. तीन वर्षे (पूर्वी) -

आ. महिना (भर) -

इ. येणे (आधी) -

**घ. खालील ऐतिहासिक घटना कोणत्या शतकात घडल्या ते एका वाक्यात लिहा. (४)**

दूरध्वनीचा शोध – १८७६

उदा. एकोणिसाव्या शतकात दूरध्वनीचा शोध लागला. / दूरध्वनीचा शोध एकोणिसाव्या शतकात लागला.

अ. दुसरे महायुद्ध – १९३९-१९४५

आ. जोहान्स गुटेनबर्गद्वारा छपाई यंत्राचा शोध – १४५०

इ. भारतात ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना – १६००

ई. भारताची मंगळयान मोहीम – २०१४



## १ खालील तक्त्यात काही शब्द दिले आहेत.

**क. ते ओळखा.**

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| बु | सा | ट | न्या | हा | ळ | णे | सं | जो | री |
| लं | रू | फ | णे | ए | पु | ते | व | व | ल |
| ग | का | ज | डे | गो | रा | घा | र्ध | मि | पु |
| व | स | ड | इ | न्या | त | ळ | न | क्ष | त्र |
| स्म | र | णा | र्थ | रा | त्वी | या | त | सु | त |
| ना | स | ग | को | तो | य | ले | दु | स्मृ | त्वी |
| चे | क | प | वि | हा | र | झा | शा | ति | य |
| सा | ट | र | के | व | शे | र | व | शि | का |
| र | का | चे | खं | का | त | ळ | शि | ला | प |

**ख. प्रकारानुसार त्यांचे वर्गीकरण करा.**

| नाम | क्रियापद | विशेषण / क्रियाविशेषण |
|---|---|---|
| | | |

## २ पुढील चित्रफीत पाहून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

**क. एका शब्दात उत्तरे लिहा.**



अ. चित्रफितीत दाखवण्यात आलेला गड. ------------------------

आ. गडावरील हॉटस्पॉट. ------------------------

**ख. योग्य पर्याय निवडा.**

अ. चित्रफितीत प्रामुख्याने काय दाखवले आहे? १. इंद्रधनुष्य २. इंद्रवज्र

आ. ढग दरीत ------------------------. १. गडगडतायत २. अडकलेयत

**ग. 'सुंदर', 'अप्रतिम' या अर्थाचे चित्रफितीत आलेले तरुणाईच्या भाषेतील शब्द कोणते?**

------------------------

**घ. पुढील नामांसाठी चित्रफितीत आलेली विशेषणे लिहा.**

अ. पाऊस ------------------------------------------------

आ. वारा ------------------------------------------------

इ. थंडी ------------------------------------------------

**च. इंद्रवज्र म्हणजे काय? सविस्तर उत्तर लिहा.**

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

## ३ 'गड-किल्ले संवर्धन : समज- गैरसमज' या लेखाचा पुढील भाग वाचा व त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाच्या कोणत्याही किल्ल्यांचे संवर्धन करण्यासाठी तीन मुख्य पायऱ्यांचा वापर करणे गरजेचे आहे.

१. वास्तूंचे अत्याधुनिक पद्धतीने सर्वेक्षण २. वास्तूंची दुरुस्ती ३. वास्तूंचे जतन आणि संवर्धन

**वास्तूंचे सर्वेक्षण**

संवर्धनातली पहिली पायरी ही वास्तूंचे अत्याधुनिक पद्धतीने सर्वेक्षण करणे ही आहे. सर्वेक्षणाच्या वेगवेगळ्या पद्धती आहेत. सहा महत्त्वाच्या पण वेगवेगळ्या पद्धतींनी किल्ल्यांचे सर्वेक्षण करता येऊ शकते. पुरातत्त्वीय सर्वेक्षण, जीआयएस (जिओग्राफिक इन्फॉर्मेशन सिस्टीम), जीपीएस : ग्लोबल पोझिशनिंग सिस्टीम (अक्षांश व रेखांश यांद्वारे ऐतिहासिक वास्तूंचा अभ्यास), गुगल अर्थ (या संकेतस्थळाच्या माध्यमातून ऐतिहासिक वास्तूंचा अभ्यास), टोटल स्टेशन सर्व्हे (वास्तूंचे निश्चित नकाशे बनविण्यासाठी वापरण्यात येणारे यंत्र) आणि रेखाटने (किल्ल्यावरील दरवाजे, वास्तू यांची मोजमापे घेऊन रेखाटने करणे) या सगळ्या साधनांचा एकत्रित वापर केला असता, योग्य प्रकारे सर्वेक्षण होऊ शकते.



दुर्गसंवर्धन सुरू करीत असताना आपण ज्या किल्ल्यावर काम करण्याचे ठरवले आहे, त्या किल्ल्याची सर्वप्रथम ऐतिहासिक माहिती गोळा केली पाहिजे. त्या माहितीच्या आधारे किल्ल्यावरील पुरातन वास्तू, स्थळे यांचा शोध घ्यायला हवा. त्या किल्ल्यावर कोणकोणत्या ऐतिहासिक वास्तू आहेत याची लेखी नोंद ठेवली पाहिजे. अशा वास्तूंची स्थाननिश्चिती जीपीएस या आधुनिक उपकरणाच्या साहाय्याने केली जावी. त्या वास्तू कोणत्या स्थितीत आहेत, त्यांची किती पडझड झालेली आहे याची पूर्ण माहिती लिखित व छायाचित्र स्वरूपात ठेवणे गरजेचे आहे. अशा प्रकारची माहिती संकलित करीत असताना जीपीएस या यंत्रणेचा वापर करावा. संगणकावर इतर सॉफ्टवेअर वापरून किल्ल्यांचा पक्का नकाशा बनविता येऊ शकतो.

किल्ल्यांवरील ज्या वास्तू प्रत्यक्ष सर्वेक्षणामध्ये दिसून येत नाहीत, त्या वास्तूंच्या उपग्रहाद्वारे

घेतलेल्या छायाचित्रांच्या माध्यमातून शोध घेता येतो. www.googleearth.com या संकेतस्थळावर उपग्रहाद्वारे घेतलेली छायाचित्रे मोफत उपलब्ध होऊ शकतात. उत्तम प्रतीची छायाचित्रे हवी असतील तर, गुगल अर्थ हे संगणकीय माध्यम विकत घेता येते. किल्ल्यांवरील सर्व वास्तूंची स्थाननिश्चिती जीपीएस व उपग्रहाद्वारे मिळालेल्या छायाचित्रातून झाल्यावर त्या वास्तूंची मोजमापे सुरू करावीत. मोजमापे घेण्यासाठी टोटल स्टेशन या सर्वेक्षणासाठी वापरण्यात येणाऱ्या अत्याधुनिक यंत्राचा वापर केला तर गडावरील विविध वास्तूंची अचूक मोजमापे मिळू शकतात. आजपर्यंत महाराष्ट्रातील फक्त दहा गडांचे टोटल स्टेशनच्या माध्यमातून सर्वेक्षण झालेले आहे.
किल्ल्यांचे अशा पद्धतीने सर्वेक्षण झाले तर तेथील वास्तूंचे मूळ स्वरूप, त्यांची मोजमापे याबाबतची माहिती संकलित होऊ शकते आणि याच माहितीचा उपयोग करून किल्ल्यांचे जतन करता येते. त्यानंतर आर्किटेक्चरल ड्राफ्टसमनच्या मदतीने गडावरील दरवाजे, तोफा व बंदुकांचा मारा करण्याच्या जागा, वाड्याची जोती, धार्मिक स्थळे याची मोजमापे घेऊन रेखाटन करून घ्यावीत. पडलेल्या वास्तूंचे संवर्धन करताना त्याचा उपयोग होऊ शकतो.

**वास्तूंची दुरुस्ती**

गडांवरील पडलेल्या वास्तूंच्या दुरुस्तीबाबत संवर्धनाचे काही नियम केंद्रीय पुरातत्त्व विभागाने करून ठेवलेले आहेत. या नियमांनुसारच किल्ल्यांवरील वास्तूंचे संवर्धन केले गेले पाहिजे. प्रचलित शास्त्रीय पद्धत सोडून भावनिक दृष्टिकोनातून जर दुरुस्ती करायला गेलो, तर त्या वास्तूंचे विद्रूपीकरण होईल; तसेच कदाचित वास्तू जपल्या जाण्यापेक्षा त्या जास्त मोडकळीस येतील. वास्तूंची दुरुस्ती करण्यापूर्वी त्या वास्तूचा अभ्यास करायला हवा. ती वास्तू किती मोठी आहे, तळखडे आहेत का, भिंती किती पडलेल्या आहेत याचे सर्वेक्षण करावे. दुरुस्तीची गरज खरेच कोठे आहे हे पाहावे. तटबंदीची दुरुस्ती असेल तर, प्रथम पाणी जाण्यासाठी केलेल्या वाटा मोकळ्या कराव्यात.




कारण वास्तूजवळ पाणी साचून राहिले, तर ती वास्तू पडण्याचा संभव असतो. कोणत्याही वास्तूची दुरुस्ती करताना नव्याने किंवा वाढीव बांधकाम करू नये. त्या वास्तूला आधार देण्याइतकेच बांधकाम करावे. गडावर पोहोचण्याच्या वाटा सर्वात शेवटी कराव्यात.

**वास्तूंचे जतन**

गडाची दुरुस्ती आणि संवर्धन पूर्ण झाल्यावर सर्वात शेवटी गडावरील वास्तूंचे जतन आणि सुशोभीकरण हा भाग येतो. कोणत्याही गड-किल्ल्यांवरील महत्त्वाची आणि मोठी वास्तू म्हणजे तटबंदी. तटबंदीतून पाणी गडाबाहेर जाण्यासाठी ठिकठिकाणी जागा असाव्यात. म्हणजे तटबंदीच्या पायामध्ये ओल राहत नाही. किल्ल्यांच्या दरवाजाची दुरुस्ती झाल्यावर तेथेही पाण्याचा निचरा व्यवस्थित होईल, अशी सोय करायला पाहिजे.
गडावरील धार्मिक वास्तूंची डागडुजी करावी; पण ते करीत असताना ते बांधकाम गडाच्या वातावरणाला शोभेल असे असावे. त्यामध्ये भडक रंग वापरू नये. मूळ बांधकामासारखे करण्याचा प्रयत्न असावा. गडावरील शिलालेखाचे जतन करण्यासाठी प्रथम त्याचे वाचन करून घेऊन ते प्रसिद्ध करावे. त्यानंतर कागदाच्या लगद्याचा वापर करून त्याचे ठसे घ्यावेत. शिलालेखावर पावसाचे पाणी पडणार नाही, अशी व्यवस्था करावी. ज्या रसायनांची शिलालेखाच्या दगडावर

प्रक्रिया होणार नाही अशीच रसायने वापरावीत, जेणेकरून वातावरण बदलाचा थेट परिणाम शिलालेखावर होणार नाही.



गडाच्या सुशोभीकरणासाठी कोणती झाडे लावावीत, याचे मार्गदर्शन वनविभागातील अधिकाऱ्यांकडून घ्यावे. आपल्याला वाटतील ती झाडे आणून गडावर लावू नयेत. झाडे लावण्याचे ठिकाण हे वास्तूपासून दूर असावे. गडावरील ऐतिहासिक स्थळापर्यंत पोहोचण्यासाठी मार्ग असावेत. गडाच्या सौंदर्याला बाधा येणार नाही अशा ठिकाणी शौचालय बांधावे. गडावर ठिकठिकाणी गडाच्या इतिहासाची; तसेच गडावरील वास्तूंची माहिती देणारे फलक असावेत. गडाचा एक मोठा नकाशा दृश्य ठिकाणी लावावा, जेणेकरून पर्यटकांना गडावर फिरताना त्रास होणार नाही.

**- डॉ॰ सचिन जोशी**
(महाराष्ट्र राज्याच्या 'गड-किल्ले संवर्धन समिती'चे सदस्य)

**क. वरील लेखात नमूद केलेल्या दुर्गसंवर्धनाच्या पायऱ्या योग्य क्रमाने लिहा.**

| | |
|---|---|
| | दुर्गसंवर्धन करत असलेल्या किल्ल्याची सर्वप्रथम ऐतिहासिक माहिती गोळा करणे. |
| | गडावरील धार्मिक वास्तूंची डागडुजी करणे. |
| | गडाच्या दृश्य ठिकाणी गडाचा मोठा नकाशा लावणे. |
| | तटबंदीची दुरुस्ती करताना पाणी जाण्यासाठी केलेल्या वाटा मोकळ्या करणे. |
| | किल्ल्यावरील ऐतिहासिक वास्तूंची लेखी नोंद ठेवणे. |
| | किल्ल्यावरील दरवाजे, तोफा व बंदुकांचा मारा करण्याच्या जागा, वाड्याची जोती इ॰ ची मोजमापे घेऊन रेखाटन करून घेणे. |
| | गडावरील शिलालेखाचे वाचन करून घेऊन ते प्रसिद्ध करणे. |

**ख. आता दोन दोन विद्यार्थ्यांचे गट करा व वरीलपैकी कोणतीही एक पायरी निवडून तिचा सारांश लिहा.**

**४ तुमच्या एका गिरिप्रेमी मित्राला दुर्गसंवर्धन या विषयासंदर्भात थोडे मार्गदर्शन हवे आहे. खालील वाक्ये 'म्हणजे'चा वापर करून आज्ञार्थात लिहा.**

क. जर एखाद्या किल्ल्याची ऐतिहासिक माहिती गोळा केली तर त्या किल्ल्यावरील वास्तू, स्थळे यांचा शोध घेणे सोपे जाते.

ख. जर मोजमापे घेण्यासाठी टोटल स्टेशन या सर्वेक्षणासाठी वापरण्यात येणाऱ्या अत्याधुनिक यंत्राचा वापर केला तर गडावरील विविध वास्तूंची अचूक मोजमापे मिळू शकतात.

ग. आर्किटेक्चरल ड्राफ्टसमनच्या मदतीने गडावरील दरवाजे, तोफा व बंदुकांचा मारा करण्याच्या जागा, वाड्याची जोती, धार्मिक स्थळे यांची मोजमापे घेऊन रेखाटन करून घेतल्यास पडलेल्या वास्तूंचे संवर्धन करताना त्याचा उपयोग होऊ शकतो.

घ. जर तटबंदीतून पाणी गडाबाहेर जाण्यासाठी ठिकठिकाणी जागा ठेवल्या, तर तटबंदीच्या पायामध्ये ओल राहत नाही.

च. गडाचा एक मोठा नकाशा दृश्य ठिकाणी लावल्यास पर्यटकांना गडावर फिरताना त्याचा उपयोग होईल.



## ५ उदाहरणात दाखवल्याप्रमाणे वाक्ये बनवा. 'पण', 'परंतु', 'परि' या उभयान्वयी अव्ययांचा वापर योग्य ठिकाणी करा.



एखाद्या किल्ल्याला भेट देणे – सह्याद्रीतील गिर्यारोहणाची भीती वाटणे

उदा॰ एखाद्या किल्ल्याला भेट द्यायचीये, पण सह्याद्रीतील गिर्यारोहणाची भीती वाटते.

क. आजपर्यंत दोन-तीन किल्ले पाहणे – नुसतीच पायपीट होणे (भूत॰)

---

ख. महाराष्ट्रातील किल्ल्यांवरील नुकताच वाचण्यात आलेला लेख माहितीपूर्ण असणे – रूक्ष असणे

---

ग. धावतपळत किल्ले बघून एखादा विक्रम करता येणे – किल्ल्याचा अपमान असणे

---

घ. दुर्गसंवर्धनाचे काम महत्त्वाचे असणे – जिकिरीचे असणे

---

## ६ क. खालील उताऱ्यात उभयान्वयी अव्ययांची जागा चुकली आहे, ती योग्य जागी योजून उतारा पुन्हा लिहा.

पहिल्या सूर्यकिरणांनी प्रवाशाला जाग आली, आणि त्याने डोळे काही उघडले नाहीत. काही क्षण तो तसाच पडून राहिला. मग त्याने हात लांब करून चाचपून पहिले. हाताला काहीच लागले नाही, परंतु मात्र तो दचकला पण तटकन उठून बसला. छोटा सोम आपल्या जागेवर नव्हता. त्याच्या अंगावर पांघरलेले भरजरी वस्त्र तेवढे बाजूला पडलेले होते.

प्रवाशाने सभोवार दृष्टी फिरवली, तेव्हा फेर धरल्यासारखा गोल करून उभ्या असलेल्या काही

ठेंगण्या टेकड्यांखेरीज त्याला दुसरे काही दिसले नाही. तो उठला कारण वेड्यासारखा स्वतःभोवती गरगर फिरला. रात्रीचा तो भव्य महाल जणू अंतर्धान पावला होता. प्रवाशाला खात्री होती, म्हणून आपल्याला भास झाला नाही जर स्वप्नही पडले नाही; आणि महालाच्या द्वारपालानेच आतून आणून दिलेल्या सुग्रास अन्नाची चव आपल्या जिभेवर अजूनही रेंगाळते आहे. रात्रीच्या वेळी परक्या व्यक्तीला महालात प्रवेश देता येत नाही, की आपल्याला इथे झोपण्याची सूचना त्या द्वारपालानेच केली. सोमच्या अंगावर पांघरण्यासाठी स्वतःच्या खांद्यावरचे वस्त्र दिले. ही सगळी किंवा भुताटकी असेल, त्याप्रमाणेच मग हे भरजरी वस्त्र कुठून आले? जेमतेम रांगता येणारा सोम कुठे गेला? भिक्षुणीने त्याचे भविष्य सांगितले होते, तर सारे घडते आहे. सोमचा शोध घ्यावा वा त्याचा नाद सोडवा?
हे स्वप्न असो की भुताटकी असो; झाले तेवढे पुरे झाले, असा विचार करून प्रवासी निघाला.

**ख. खालील उताऱ्यात योग्य जागी उभयान्वयी अव्यये वापरून पुन्हा लिहा.**
(कारण, आणि, म्हणून, की, पण, आणि, तेव्हा)
मधुराणीने पलंगावरून खाली उडी मारली. हलणाऱ्या सावल्या कशाच्या आहेत ते तिला पाहायचे होते. पावलांचा आवाज न करता ती खिडकीपाशी आली. तिने खिडकीतून खाली डोकावून पाहिले. रस्त्यातून एक मिरवणूक जाताना तिला दिसली. तिला नवल वाटले. मिरवणुकीत खूप माणसे होती; काही नाचत होती, काही वाद्ये वाजवत होती. कसलाही आवाज मात्र येत नव्हता. इतक्यात तिला चंपक बोका मिरवणुकीत शांतपणे चालताना दिसला. तिने त्याला हाक मारली. तिच्या घशातून फक्त 'चिव् चिव्' असा बारीक आवाज निघाला. त्याबरोबर मिरवणूक जागच्याजागी थांबली. सगळे जण माना वर करून खिडकीच्या दिशेने पाहू लागले. चंपक इतका तंद्रीत होता! तो आपला सरळ चालतच राहिला.
"कट्टी!" मधुराणी ओरडली.

**ग. खालील वाक्यांचा कारण आणि परिणाम अशा दोन्ही भूमिकांमध्ये वापर करायचा आहे. म्हणजे एकच वाक्य दोनदा लिहायचे. एकदा ते कारण आहे असे धरून त्याचा परिणाम सांगणारे वाक्य कल्पनेने लिहायचे. पुन्हा तेच वाक्य परिणाम आहे, असे धरून त्याचे कारण कल्पनेने लिहायचे.**

उदा॰ रात्रभर कुत्री भुंकत होती. कारण गावाजवळच धनगरांची पाले पडली आहेत.
रात्रभर कुत्री भुंकत होती. त्यामुळे / म्हणून माणसे सावध होती.

अ. आज बाजारात फारशी भाजीच नव्हती.



------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

आ. ही सीडी उपयोगाची नाही.



------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

इ. गाण्याच्या कार्यक्रमाला आज अजिबात गर्दी नव्हती.

ई. सरपंचांनी सर्व ग्रामस्थांची सभा बोलावली आहे.

उ. ताईला आज जागचे उठवतही नाही आहे.

ऊ. सकाळी सात वाजल्यापासूनच उकाडा जाणवू लागतो.



ए. बाण्याचा मोबाईल लागला नाही.



ऐ. लोकांना राजकारणाविषयी तिटकारा वाटतो.

ओ. मला पालेभाजी आवडत नाही.



औ. मोहन एकदम गप्प झाला.

अं. कीर्तीने केटरिंगचा कोर्स करण्याचे ठरवले.

अः. अनिशाला मनापासून वाईट वाटले.



**घ. खालील वाक्यांमध्ये 'म्हणजे'चा वापर संकेतदर्शक की स्वरूपदर्शक उभयान्वयी अव्यय म्हणून झाला आहे ते लिहा.**

उदा॰ प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम असतं, तुमचं आणि आमचं सेम असतं. – स्वरूपदर्शक

अ. "हा एकटेपणा म्हणजे नक्की असतो तरी काय?"

आ. "स्वतःचा उद्योग सुरू करणं म्हणजे काही सोपी गोष्ट नाही!"

इ. संस्कार करणे म्हणजे चांगल्या सवयी लावणे.

ई. "आपला माणूस दूर गेला म्हणजे कळेल त्याचे महत्त्व."

उ. "एकदा माझ्यासारखा घरी बसून घरकाम करून बघ, म्हणजे कळेल तुला."

## ७ तृतीयेचा प्रत्यय '-ने'

**क. उदाहरणाप्रमाणे प्रत्येकी तीन वाक्ये लिहा.**



उदा॰ एकच असत्य वारंवार सांगितल्याने सत्य ठरत नाही.

१. एकच असत्य वारंवार सांगितल्यामुळे सत्य ठरत नाही.

२. एकच असत्य वारंवार सांगितले, की ते सत्य ठरत नाही.

३. एकच असत्य वारंवार सांगितले म्हणजे ते सत्य ठरत नाही.

अ. ओरडून वाद घातल्याने आपला मुद्दा खरा ठरत नाही.

---

---

---

आ. घाबरल्याने समस्येवरील उपाय सापडत नाही.

---

---

---

इ. शिकल्याने नोकरी मिळतेच असे नाही.

---

---

---

ई. भीक मागितल्याने गरिबी संपत नाही.



---

---

---

उ. गुन्हेगाराला फाशी दिल्याने गुन्हेगारी संपत नाही.

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

ऊ. कमी खाल्ल्याने वजन कमी होतेच असे नाही.



--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

**ख. योग्य शब्द निवडून उदाहरणाप्रमाणे रिकाम्या जागा भरा.**

(नवल, मित्र, उदार, चोर, शूर, ~~गंभीर~~)

उदा॰ गंभीर - सीमा लढ्यातील हुतात्म्यांना गांभीर्याने अभिवादन करण्याचा निर्णय कार्यकर्त्यांच्या बैठकीत एकमुखाने घेण्यात आला.

अ. झाशीच्या राणीला तिच्या अलौकिक ------------------ भारताच्या इतिहासात महत्त्वाचे स्थान मिळवून दिले.

आ. “सगळ्यांशी ---------------- वाग आणि सगळ्यांना, विशेषतः वयस्कर व्यक्तींना मदत कर.”

इ. शाळेतला सुरुवातीचा काळ नव्याच्या ------------------ पुढे सरकतो. नवीन दप्तर, नवीन सदरा, नवीन पुस्तके, नवीन मित्र वगैरे.

ई. दान करणाऱ्याने दुःखी मनाने नाही, तर सढळ हाताने, ------------------ दान करावे.

उ. “आजची बातमी वाचलीस का? दहा रुपयांच्या ------------- बालकाला घडवला तुरुंगवास.”

## ८ खालीलपैकी एक चित्र निवडा. प्रस्तुत कार्यक्रम पार पडला आहे अशी कल्पना करा व त्याचे वर्णन करणारा एक लेख / बातमी तयार करा.






------------------------------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------------------------

## ९ खालील माहिती वाचा व तीखालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

**बौध्द लेणी**

बौध्द लेण्यांत प्रामुख्याने चैत्यगृह (पूजेची जागा), विहार (राहण्याची जागा), भोजन मंडप, स्मशाने, न्हाणपोढी (अंघोळीची पाण्याची टाकी), पाणपोढी (पिण्याच्या पाण्याची टाकी), कोढी (पूजेचे कोनाडे), बाकाचे कट्टे यांचा अंतर्भाव होतो. चैत्यगृह म्हणजे पूज्य वस्तूंच्या उपासनेसाठी निर्माण झालेल्या बांधीव स्तूपमंदिराच्या प्रतिकृती आहेत, तर विहार हे भिक्षूंच्या निवासासाठी बांधण्यात आलेल्या कुटिरांच्या प्रतिकृती आहेत. हीनयानपंथीय बौद्धांच्या लेण्यात स्तूपाव्यतिरिक्त कोणत्याही प्रकारची पूजा होत नसे. बुद्धाची प्रतिमाही लेण्यात नव्हती. त्याचे अस्तित्व प्रतीकांद्वारे दाखवण्यात येत असे. पुढे गुप्तकाळात महायान बौद्धांनी वेरूळ, औरंगाबाद येथे चैत्य व विहार संमिश्र पद्धतीने खोदले व द्वारपालादी इतर भव्य मूर्तींनी लेणी सुशोभित करण्यास सुरुवात केली. जुन्या प्रथा मोडीत काढून नव्या, अधिक आकर्षक व परिणामकारक शैलीचे प्रतिबिंब सर्वत्र दिसू लागले. बौद्ध वास्तुशैलीत नवे प्रयोग व आमूलाग्र परिवर्तन येत असतानाच गुप्त-वाकाटकांच्या काळात हिंदू लेणी खोदण्यास आरंभ झाला.

**हिंदू लेणी**

वेरुळचे रामेश्वर लेणे हे सर्वप्रथम खोदण्यात आले. त्याची आखणी संमिश्र आहे. बौध्द व हिंदू दैवतांच्या संकल्पनेत फार मोठा फरक असल्यामुळे वास्तुतज्ज्ञांनी अंधानुकरण झुगारून हिंदू गुहारचनेत महत्त्वाचे बदल घडवून आणले. समोर प्रांगण, स्तंभयुक्त दीर्घिका, मध्यवर्ती मोठे दालन (मंडप) व तिन्ही बाजूंना चौरस विस्तृत दालने निर्माण करण्यात आली. मधल्या दालनाच्या पाठच्या भागात गाभारा आला व त्याला प्रदक्षिणा घालण्यासाठी विशेष



सोय करण्यात आली. हिंदू शैलगृहात भव्य प्रासादातील सजावटीप्रमाणे सर्व बाजूंच्या भिंतींत मोठमोठ्या चौकटी, कपाटे, देवळ्या व कोनाडे खोदण्यात येऊन त्यात प्रचंड आकाराचे शिल्पपट, पौराणिक दृश्ये व वेगवेगळ्या आकृती कोरून उभ्या केल्या गेल्या. हिंदू लेण्यांना ब्राह्मणी लेणी असेही म्हणतात. हिंदू लेण्यांवर शैव व वैष्णव प्रणालींचा मोठा प्रभाव पडलेला दिसून येतो. ह्यांतील काही लेणी पूर्णपणे शैव देवतांची आहेत, तर काही शैव व वैष्णव अशी मिश्र आहेत. वेरूळ येथे हिंदू लेण्यांची संख्या सर्वात जास्त आहे.

**जैन लेणी**

जैन वास्तुविशारदांनी बौद्ध व हिंदू लेण्यांचे अनुकरण केलेले दिसून येते. ती रचनात्मकदृष्ट्या हिंदू लेण्यांच्या अधिक जवळची वाटतात. स्तंभाधिष्ठित दर्शनी मंडप, मार्गिका, त्यालगत सभामंडप, ओवऱ्या व गाभारा अशी साधारणतः ह्या लेण्यांची आखणी दिसून येते. लेण्यांत तीर्थंकर व जैन दैवते आपापल्या गोतावळ्यासह खोदलेली आढळतात. परंपरेनुसार तीर्थंकरांच्या मूर्तिव्यतिरिक्त इतर मूर्ती ह्या आकाराने लहान पण पूर्णपणे अलंकृत दाखवण्यात येतात. जैन कलाकारांनी मानवी मूर्तीबरोबर मृग, हत्ती, सिंह, अश्व इत्यादी प्राणी कोरलेले आहेत. त्या कामी बारीक, नाजूक कलाकुसरीकडे लक्ष पुरवलेले आहे. विविध प्रकारच्या वेलाबुट्टया, भौमितिक आकृती, पाने-फुले ह्यांचा वाहता प्रवाह जैन लेण्यांच्या अलंकरणातून दिसून येतो.

**क. खालील शब्द कोणत्या गटात येतील?**

स्तंभयुक्त दीर्घिका स्तंभाधिष्ठित दर्शनी मंडप चैत्यगृह
कोठी अलंकृत मूर्ती पौराणिक दृश्ये कोरलेल्या भिंती
नाजूक कलाकुसर केलेल्या मूर्ती विहार विस्तृत दालने

| बौध्द लेणी | हिंदू लेणी | जैन लेणी |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |

**ख. एका शब्दात उत्तरे लिहा.**

अ. हिंदू लेण्यांची जास्त संख्या असलेले ठिकाण - ----------

आ. पूज्य वस्तूंच्या उपासनेसाठी निर्माण झालेल्या बांधीव स्तूपमंदिराच्या प्रतिकृती – ----------

इ. रचनेच्या दृष्टीने हिंदू लेण्यांच्या अधिक जवळची वाटणारी लेणी – ----------

ई. समोर प्रांगण, स्तंभयुक्त दीर्घिका, मध्यवर्ती मोठे दालन (मंडप) व तिन्ही बाजूंना चौरस विस्तृत दालने अशी आखणी असलेली लेणी – ----------

उ. या प्रकारच्या लेण्यांत फक्त स्तूपाची पूजा केली जाई - ----------

## १ खालील उतारा वाचा आणि पाठ्यपुस्तकात वाचलेल्या प्रांतांची व पदार्थांची यादी करा.

**क. खाद्यसंस्कृती महाराष्ट्राची !**

दर बारा कोसांवर भाषा बदलते असं म्हणतात. महाराष्ट्रापुरतं बोलायचं झालं तर इथे फक्त भाषाच नाही, तर खाण्यापिण्याच्या रीतिभातीही बदलतात. महाराष्ट्राला जसा संपन्न ऐतिहासिक वारसा लाभला आहे, तसंच या राज्याला स्थिर, संपन्नता देणारं भौगोलिक स्थानही लाभलं आहे.

---

## २ प्रत्येक परिच्छेदाला योग्य ते शीर्षक द्या.

(महाराष्ट्रातील सुपीकता : खाद्यान्नातील विविधता / मराठवाड्याची चारीठाव खाद्यसंस्कृती / विदर्भ आणि शाकाहार / खाद्यसंस्कृतीची परंपरा आणि आपुलकी)

क. ------------------------------------------------



गहू हे मुख्य अन्न असलेली उत्तरेकडची राज्यं आणि केवळ भाताच्या विविध पदार्थांवर भूक भागवणारी दक्षिणेकडची राज्यं यांच्या मधोमध महाराष्ट्राचं स्थान असल्यामुळे चौरस आहार ही संकल्पना मराठी माणसाच्या रोजच्या साध्या जेवणातही प्रत्यक्षात उतरली आहे. सुपीक जमीन, अनुकूल हवामान यामुळे महाराष्ट्र अन्नधान्याच्या बाबतीत संपन्न आहे. महाराष्ट्रात सगळ्या प्रकारची फळं, धान्यं, कडधान्यं, तेलबिया यांचं उत्पादन घेतलं जातं. या साऱ्या अनुकूलतेमुळे महाराष्ट्रीय खाद्यसंस्कृती विविधांगांनी बदलली आहे. बांद्यापासून चांद्यापर्यंत प्रत्येक प्रदेशाची त्याची स्वत:ची अशी खाद्यसंस्कृती आहे आणि ती त्या त्या मातीत इतकी रुजली आहे, की इथली मुलं शिक्षण-नोकरीनिमित्त परदेशात गेलीच, तर जाताना पापड, लोणची, भाजणी, मेतकूट यांच्याबरोबरच त्यांच्या जिभेचे चोचले पुरवणाऱ्या असंख्य वस्तूंचं ओझं हसत हसत घेऊन जातात.

ख. ------------------------------------------------



महाराष्ट्राच्या प्रशासकीय विभागाच्या सीमारेषा ह्या नुसत्या भौगोलिक नाहीत, तर सांस्कृतिकही आहेत. विभागांच्या या सीमारेषांच्या परिघात एक वैशिष्ट्यपूर्ण विभागीय खाद्य संस्कृती उदयाला आली आहे. यामध्ये खाद्यसंस्कृतीच्या रुचिकेंद्रांनी मिळून महाराष्ट्राची खाद्यसंस्कृती समृध्द बनवली आहे. हे सांस्कृतिक बदल जाणवण्याइतके स्पष्ट आहेत. खाद्यसंस्कृतीचा संबंध तिथलं हवामान, पीकपाणी आणि आर्थिक संपन्नता यांच्याशी असतो. त्या भागात पिकणारं अन्नधान्य हाच त्या भागातल्या लोकांच्या खाण्याचा मुख्य भाग असतो. याबाबतीत महाराष्ट्रात विविधता आहे.

ग. ------------------------------------------------------------



भाज्या, फळे यांतील विविधतेमुळे इथली खाद्यसंस्कृती मूलत: शाकाहारी आहे. मसालेदार तिखट भाज्या, घट्ट वरण, चटण्या-कोशिंबिरी... पानातून ओसंडून वाहतात की काय अशी शंका यावी इतके प्रकार! लोणची, पापड, आणि हो, वडे, भजी, बोंडे यांचे अनेक प्रकार इथेच चाखायला मिळतात. पुरणाची पोळी महाराष्ट्रभर केली आणि खाल्ली जाते, पण विदर्भातली पुरणपोळी पुरणाने गच्च भरलेली आणि मऊसूत असते. आवरण अगदी पातळ असते आणि गृहिणींचे कसब हे, की अशा पुरणपोळीतून कुठेही पुरण इकडून तिकडून बाहेर डोकावत नाही. आंबट, तिखट, गोड, या टोकाच्या चवी वैदर्भीय खाद्यसंस्कृतीत गुण्यागोविंदाने नांदतात.

घ. ------------------------------------------------------------



मराठवाड्याची संस्कृतीही थोडीफार चमचमीत म्हणावी अशीच. हा मराठवाडा तेलबियांच्या बाबतीत समृद्ध आहे. शेंगदाणा, तीळ, जवस यांचा भरपूर वापर इथल्या स्वयंपाकात करतात. चटण्या हा मराठवाड्याच्या खाद्यसंस्कृतीचा अविभाज्य भाग. चारीठाव म्हणावी अशी ही खाद्यसंस्कृती आहे. वरण, भात, भाजी, पोळी, चटणी असे चारीठाव जेवण मराठवाड्यात केले जाते. पुरणपोळीबरोबर भुरका मारायला कटाची आमटी हे इथले वैशिष्ट्य. आमरस, कुरडया, पापड्या, याबरोबरच जिलबी, बुंदी, सुधारस, गव्हाची खीर आणि फराळाचे असंख्य पदार्थ केले जातात.

**बरोबर ते निवडा.**

१. मराठी माणसाचा आहार चौरस असतो.

अ. महाराष्ट्रीय लोक चपाती, भाजी, आमटी, भात, चटणी, कोशिंबीर हे अन्न आवडीने खातात.

आ. मराठी माणूस नेहमी चार भाज्या खातो.

इ. मराठी माणसाला पापड, लोणची, भाजणी, मेतकूट हे चार पदार्थ आवडतात.

२. सुपीक जमीन, अनुकूल हवामान यामुळे महाराष्ट्र अन्नधान्याच्या बाबतीत इतर राज्यांपेक्षा अधिक संपन्न आहे.

अ. महाराष्ट्रामध्ये पावसाची सुबत्ता आहे.

आ. महाराष्ट्राची भौगोलिक रचना शेतीतील विविधतेसाठी योग्य आहे.

इ. महाराष्ट्रात दोनच प्रकारची पिके घेतली जातात.

३. गृहिणींचे कसब हे की अशा पुरणपोळीतून कुठेही पुरण इकडून तिकडून बाहेर डोकावत नाही.
   अ. पुरणपोळी हा करायला अगदी सोपा पदार्थ आहे.
   आ. स्वयंपाक करण्यात तरबेज असणाऱ्या स्त्रीने केलेली पुरणपोळी कधी फाटत नाही.
   इ. सगळ्यांनाच पुरणपोळी झटपट करता येते.

## ३ खालील नामसाधित विशेषणे वापरून रिकाम्या जागा भरू या.

**(पंजाबी / सातारी / मालवणी / काश्मिरी / कोल्हापुरी / बंगाली / गुजराती)**

क. ---------------- मसाला घालून केलेले काळ्या वाटाण्याचे सांबारे आणि वडे या जेवणाच्या बेताने तोंडाला पाणी सुटते.

ख. मुंबईत नुकत्याच झालेल्या खाद्यमहोत्सवात ---------------- छोल्यांना खाद्यप्रेमींची विशेष पसंती होती.

ग. सुरती उपाहारगृहाची ---------------- थाळी खूप प्रसिद्ध आहे.

घ. ---------------- कंदी पेढे ही ह्या ठिकाणाची खासियत आहे.

च. केशर आणि सुक्या मेव्यामुळे ---------------- पुलावाची लज्जत वाढते.

छ. मिष्टी दही हा ---------------- मिठाईमधला चविष्ट प्रकार आहे.

ज. कोल्हापूरला जाऊनही ---------------- तांबड्या आणि पांढऱ्या रश्शावर ताव न मारणारा अरसिकच म्हटला पाहिजे.

## ४ क. खालील उतारा वाचा आणि दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

खानदेशी जेवण म्हटले की वरण बट्टी आठवते. गावाकडच्या लग्नकार्यांमध्ये केला जाणारा हा पदार्थ म्हणजे थोडा राजस्थानी दालबाटीचाच एक वेगळा प्रकार. गहू जाडसर दळतात. त्यात ओवा, मीठ, हळद, तेल घालून मळतात. मळलेल्या पिठाचे गोळे पाण्यात उकळतात. मग त्याचे काप करून तेलात अथवा तुपात तळून घेतात. गावाप्रमाणे, किंवा घराप्रमाणे म्हटले तरी चालेल, प्रत्येक पदार्थाच्या बनवण्याच्या पद्धतीत खूप फरक पडतो. याच बट्ट्या काही ठिकाणी निखाऱ्यामध्ये भाजून घेतात. आणि यासोबत तूरडाळीचे पातळ बिनफोडणीचे वरण आणि हिरव्या वांग्यांची घोटलेली भाजी. आणि तेही हिरव्यागार केळीच्या पानावर. वरून त्यात साजूक तुपाची धार... अहाहा! पाणी सुटले न तोंडाला?

या निखाऱ्यात भाजलेल्या बट्ट्या. अप्रतिम चव असते यांची. गावाकडे लग्नकार्य, मान, नवस, जावळ असले की याचीच पंगत असते. जेव्हा भरपूर प्रमाणात बट्ट्या बनवायच्या असतात तेव्हा शक्यतो उकडून, तळणे टाळून जमिनीत लाकडांचा जाळ करून अशा पद्धतीने बट्ट्या भाजल्या जातात. पण चूल किंवा जाळ करणे शक्य नसेल तर सरळ वाफवून किंवा उकडून तळणे हा उपाय आहे.

खानदेशी घरांमध्ये कुणी पाहुणे म्हणून गेले, की त्यांना हमखास शेवभाजी खाऊ घातली जाते. हो, खरेच शेवभाजी हा खास खानदेशातील प्रत्येक घरी होणारा प्रकार आहे. मस्त काळ्या मसाल्याची भाजी... (भाजी??? हो. रस्सा फक्त पुण्यामुंबईत म्हणतात. आम्ही चिकनचीही भाजीच

करतो) त्यात खास भाजीसाठी तुर्खाटी शेव, सोबत भाकरी. अजून काय हवे...! याच काळ्या मसाल्याच्या भाजीत (रश्शात) पातोड्या म्हणजेच चण्याच्या पिठात हळद, तिखट, ओवा, मीठ टाकून ते वाफवून त्याच्या वड्या करतात आणि त्या भाजीत सोडतात. तसेच, अजून झटपट करायचे असतील, तर सरळ भज्यांच्या पिठाप्रमाणे पीठ भिजवून भाजीला उकळी आली की त्यात या पिठाची भजी हाताने सोडायची. ती टाकताना डुबुक डुबुक आवाज येत असल्याने कदाचित याचे नाव डुबुक वडे असे पडले असावे.

<table>
<tr><td>मान देणे</td><td>(कोणाचा तरी) आदर / प्रतिष्ठा राखणे</td><td rowspan="3">खानदेशात गावाकडे या प्रसंगांना गावातल्या लोकांना समारंभपूर्वक जेवण दिले जाते.</td></tr>
<tr><td>नवस बोलणे<br><br>नवस फेडणे</td><td>एखादी गोष्ट घडावी म्हणून देवाला विनंती करणे आणि त्यासाठी काही वचन देणे<br>ती गोष्ट तशी घडली तर देवाला दिलेले वचन पूर्ण करणे</td></tr>
<tr><td>जावळ काढणे</td><td>छोट्या बाळाचे केस प्रथमच काढणे</td></tr>
</table>

अ. वरील उताऱ्यात कोणकोणते खानदेशी पदार्थ आले आहेत?

-----------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------

आ. उताऱ्यातील धातुसाधिते शोधा.

-----------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------

## ५ आता खालील उतारा वाचा.



गणेश चतुर्थी, संकष्टी, विनायकी, एकादशी निमित्ताने मोदक हवेतच. बाप्पा आणि त्याचे प्रिय मोदक यांचं नातं पक्कं आहे. एकाच वेळी, एक गोड पदार्थ म्हणून, धार्मिक कार्यातील नैवेद्याचा भाग म्हणून आणि अस्सल मराठमोळ्या खाद्यसंस्कृतीचा राजदूत म्हणून इतका मान लाभलेला अन्य पदार्थ नसावा.

मोदक वळता येणं ही कला आहे. पाककौशल्यात सुबकपणाचा निकष ठेवला, तर मोदक आपली छान परीक्षा घेतो. महाराष्ट्रातल्या प्रत्येक घरात मोदक होतात, पण योग्य ती उकड, गोलसर पारी, कंजूषपणा झळकेल इतकं कमीही नाही व मोदक मोडेल इतकं जास्तही नाही असं सारण, रेखीवपणे जुळत जाणाऱ्या पाकळ्या व अखेर तो कोचदार तुरा हे काही सगळ्यांनाच जमत नाही. काही घरांत लाडवाचा भाऊ शोभेल असा तो गोल गोळा होतो, तर काही घरात एकेक पाकळी मोजून घ्यावी इतका तो देखणा दिसतो.





गणपतीबाप्पांच्या या लाडक्या नैवेद्याचं सध्या होणारं जागतिकीकरण खूप सुखावणारं आहे. अनेक लग्नांमध्ये पक्वान्न म्हणून मोदकांची वर्णी लागते. मराठी लग्नातच नव्हे, तर पंजाबी, गुजराती लग्नांतही मोदकांची मागणी वाढतेय. लग्नाच्या केटरिंगमधल्या काकूंचं झटपट मोदक करण्याचं कसब अनेकांना अचंबित करतंय. गुलाबजाम, अंगुरबासुंदी, जिलेबी यांच्या जोडीला आपले मोदकराव तुपाच्या धारेसोबत पंगतीची शोभा वाढवताना दिसू लागले आहेत. हा बदल खरंच खूप आश्वासक आहे.

हिरवंगार केळीचं पान, त्यावर छान डावं-उजवं करून वाढलेला नैवेद्य आणि जोडीला सुबक, पांढरेशुभ्र, रेखीव मोदक पाहताना मिळणारा आनंद वेगळाच असतो. त्यात सात्त्विक भाव असतो. समोर गणरायाची मूर्ती, तिच्या डोळ्यातली ती ऊर्जा, तो शांत भाव हे सारे अनुभवत तुपाच्या धारेत न्हालेल्या मोदकाचा आतलं सारण सांभाळत घेतलेला घास जी अनुभूती देतो त्याने पोटच नाही, तर मन भरतं. म्हणूनच खऱ्याखुऱ्या अर्थाने तो मोद, आनंद देणारा 'मोद-क' आहे.

**– रश्मी वारंग**

**क. वरील उताऱ्यात खाली दिलेल्या अर्थांचे शब्द शोधा.**

अ. मोदक करण्याकरिता शिजवलेले तांदूळ वगैरेचे पीठ ...

आ. करंजी, पुरी इत्यादी पक्वान्नात भरण्याचा, गूळ-खोबऱ्याचा किंवा इतर मसाला ...

इ. निमुळते टोक ...

ई. परिस्थितीतील बदल ...

उ. आश्चर्यचकित ...

ऊ. जेवायला बसलेल्यांची ओळ ...

ए. आनंददायक ...

## ६ जोड्या लावा.

| | | | |
|---|---|---|---|
| क. | पिकलेला | अ. | लोणचे |
| ख. | तळलेले | आ. | मसाला |
| ग. | मुरलेले | इ. | पदार्थ |
| घ. | कुटलेला | ई. | खोबरे |

| | | | |
|---|---|---|---|
| च. | खोवलेला | उ. | आंबा |
| छ. | किसलेले | ऊ. | नारळ |
| ज. | घुसळलेले | ए. | कणिक |
| झ. | तिंबलेली | ॲ. | ताक |

## ७ रिकाम्या जागा भरा.

विरघळलेल्या, धावती, पळती, वाहता, हसरे, खारवलेले, गोठवलेले, लावलेले, फेटलेली



क. ............ गाडी पकडताना काकांचा अंदाज चुकला आणि ते फलाटावर तोंडावर पडले.

ख. आगगाडीत बसून ............ झाडे मोजण्याचा खेळ लहानपणी खेळताना मजा यायची.

ग. अंगारकी चतुर्थीला सिद्धिविनायक मंदिरासमोरचा ............ रस्ता गणेशदर्शनासाठी येणाऱ्या भक्तांनी फुललेला असतो.

घ. ............ मूल पाहिल्यावर कोणालाही त्याला उचलून घेण्याचा मोह होतोच.

च. ............ मासे, गरमागरम कुळथाची पिठी आणि भात असल्यावर पक्वान्नही फिके पडते.



छ. पाच ............ अंडी घालून केलेला केक अतिशय हलका झाला.

ज. आजीने मातीच्या भांड्यात ............ घट्ट दही थालीपिठाबरोबर खाण्याची मज्जा काही औरच.

झ. हल्ली बाजारात ............ मटार, पनीर वगैरे सहज मिळतात.

ट. ............ साखरेत वेलची पूड घातल्यामुळे नारळाच्या वड्यांचा सुवास घरभर दरवळला होता.

## ८ रिकाम्या जागी योग्य विशेषण भरा.

चटपटीत, लडबडलेली, चुरचुरीत, झणझणीत, कुरकुरीत, फळफळीत, खुसखुशीत, बुळबुळीत, सरसरीत, रसरशीत





तुपात तळलेल्या (क) ............ शंकरपाळ्या आणि पांढऱ्याशुभ्र (ख) ............ चिकवड्या (ग) ............ जुईने हवाबंद डब्यात भरून ठेवल्या. ती स्वयंपाकघरात आली, आईने काळ्या मसाल्यासाठी कांदे (घ) ............ तळले होते. मटणाचा (च) ............ रस्सा चुलीवर रटारटा शिजत होता. टोपलीत वाफाळलेला (छ) ............ भात उपसून ठेवला होता. पिवळीधम्मक (ज) ............ लिंबं जुईने सकाळीच अंगणातल्या झाडावरून तोडून ओट्यावर आणून ठेवली होती. पाहुणे येण्याअगोदर अर्ध्याहून अधिक स्वयंपाक तयार झाला होता. ताई (झ) ............ पांढरा रस्सा बनवून नुकतीच विहिरीवर पाणी आणायला गेली होती. पाणी आणताना (ट) ............ झालेल्या दगडावरून तिचा पाय घसरला आणि ती पडली. तिच्या विव्हळण्यामुळे आई आणि जुई धावतच विहिरीवर गेल्या. त्यांनी ताईला हाताला धरून उठवले, तिच्या हातातली (ठ) ............ कळशी स्वच्छ धुतली. ताईचं तोंड स्वच्छ धुऊन तिला हळदीचा लेप लावला. जखम मोठी नव्हती. सगळ्यांनी 'हुश्श' केलं.



## ९ पान वाढू या.

**क. खालील कोड्यातील क्रियापदे ओळखा.**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पु | बी | ने | की | भ | रे | सि | गे | नि |
| चि | र | णे | सा | र | वि | कू | की | व |
| ब | व | री | कां | ड | ळ | ने | दा | ड |
| फो | णी | ळ | ची | णे | ली | ठे | च | णे |
| त | रु | वा | णे | सो | के | ला | भ | र |
| णे | कां | खे | जे | री | बो | वे | ट | ले |
| ल | बां | ड | शा | खी | शि | ज | व | णे |
| फा | था | प | णे | मो | फी | पी | चो | की |
| कू | गा | चा | सो | ल | णे | टो | ते | वी |

**ख. ‘पान’ संकल्पना. संवाद ऐकू या आणि आणि खालील पानाच्या आकृतीत योग्य पदार्थ योग्य ठिकाणी वाढू या.**




अ. तूप, वरण भात / भाताचे प्रकार
आ. कोशिंबीर
इ. भाज्या
ई. रायते
उ. मीठ
ऊ. लिंबू
ए. पोळी / भाकरी / पुऱ्या
ॲ. गोड पदार्थ
ऐ. चटणी

**ग. देशमुखांकडे आज पाहुणे जेवायला येणार आहेत. सौ. देशमुखांनी खास मराठमोळा स्वयंपाक केला आहे. सर्व प्रकारचे पदार्थ तयार करता करता त्यांची गडबड उडाली आहे. आपण त्यांना थोडी मदत करू या. पाहुणे आल्यावर त्यांना पानं वाढायला मदत करू या.**

पाहुण्यांसाठी केलेला खास बेत पुढीलप्रमाणे :
वरण, काकडीची कोशिंबीर, बासुंदी, पुऱ्या, भोपळ्याचे गोड घारगे, भात, लोणचे, मीठ, मेतकूट, वालाचे बिरडे, बटाट्याची भाजी, ताकाची कढी, लिंबू, अळूवडी, पापड, चटणी

आता पानातलं डावं – उजवं पाहून नीट वाढू या.

| | |
|---|---|
| पानात डावीकडे वाढायचे पदार्थ | |
| पानात उजवीकडे वाढायचे पदार्थ | |
| पानात मध्यभागी वाढायचे पदार्थ | |

## १० खालील संवाद वाचा.

**खवय्यांच्या गप्पा**



“परवा मी एक मस्त कॉम्बिनेशन ट्राय केलं बघ.” गुरवांच्या हॉटेलात भजी आणि चटणी खाताना मोहन सांगू लागला. तो असल्या खाण्याच्या गमती सांगू लागला की फक्त ऐकतच राहावं. पठ्ठ्या चांगलाच खवय्या आहे. तो एक एक सांगत जातो आणि ते ऐकताना आपल्या डोळ्यासमोर ते तरळू लागतं आणि भूक चाळवली जाते.

“काय खाल्लंस सांग तरी!” त्याचं ते नवीन ‘कॉम्बिनेशन’ ऐकायला कानांपेक्षा माझी जीभ आतुर झाली होती.

“परवा बाजूच्या राणेकाकूंनी मस्त शिरा केला होता. असले नुसते बदाम-बेदाणे त्यात! आणि तूप तर काय विचारूच नकोस. रव्याचा नुसता कण न् कण आकंठ बुडाला असेल त्यात.”

हातातली भजी तोंडात टाकायची सोडून हातातच राहिली. राणेकाकूंच्या शिऱ्याची ताटली माझ्या नजरेसमोर नाचू लागली.

माझी ती तंद्री लक्षात घेऊन मोहन म्हणाला, “अरे, इतक्यात काय विरघळलास? खरी गंमत तर पुढे आहे.”

“अरे हो,” मीपण तंद्रीतून बाहेर आलो. याचं कॉम्बिनेशन तर अजून आलंच नाहीये. बदाम-बेदाणे-तूप तर राणेकाकूंचं कॉम्बिनेशन...

“तर, मी काय केलं ते सांगतो. शिऱ्याची ताटली ही अशी. माझ्या खोलीत त्यांनी आणून दिल्यावर नुसता घमघमाट सुटलेला. काकूंकडून ती घेतली. खोलीत आलो आणि...

“मस्त गरमागरम शिऱ्याचा घास घेतलास,” जणू काही मीच घास घेतल्याप्रमाणे बोललो.

“नाही रे, ऐक तर! नुसता शिरा खायचा होय? मजा बघ. शिऱ्यावर ताव मारण्याआधी आईने दिलेली लोणच्याची बरणी बाहेर काढली. शिऱ्यावर मस्तपैकी लोणच्याचा खार घातला आणि खाल्ला. कसलं भारी लागत होतं तुला सांगतो!”



इतक्यात त्या छान सात्त्विक तुपातल्या शिऱ्याचं स्वप्न रंगवणारा मी पटकन जागा झालो. “शिऱ्याशी लोणचं? वेगळंच आहे बुवा. मी तर पहिल्यांदाच ऐकतोय.”

“अरे, ही तर खरी मजा आहे. असलं काही तरी वेगळं खायचं बघ. तेच तेच खाण्यात काय मजा आहे? तुला सांगतो, गावाकडे आम्ही काय

काय खायचो.”
‘चला, आता आणखी थोडी मेजवानी मिळणार’, मी मनातच म्हणालो. मोहन्या पुढे सांगू लागला.
“गरम गरम भाकरी अशी फुगलेली असेल ना, तर अशीच वरून फोडायची आणि आत मिरचीचा ठेचा भरायचा. आणि मग भाजीसोबत खायचा. पुरणपोळी पण तुमच्यासारखी दुधा-तुपात बुडवून नाही खात आम्ही;... झणझणीत कटाच्या आमटीत बुडवून खातो. कोंबडीचा रस्सा इतका तिखट करायचा आणि त्यात मस्त ज्वारीचा वडा भिजवून खायचा. वांग्याचं भरीत बाजरीच्या भाकरीसोबत खाऊन बघ कधीतरी. बोटं चुपत राहशील. आमच्या गावडेकाकूंच्या हातचं मटन खाशील आणि वर सोलकढी पिशील ना, तर सगळं विसरशील.”
माझ्या डोळ्यांना एक एक पदार्थ दिसू लागला. पोटात कावळे ओरडू लागले.
“त्या समोरच्या सांडूकडे साबुदाण्याची खिचडी घे आणि त्यावर दह्याची वाटी ओतून खा. हे असलं काही खाल्लं आहेस का कधी? फक्त सवयीचं नाही खायचं रे बन्या. साधंसुधं खाल्लं तरी त्यात असं काही तरी मिसळून जिभेचे चोचले पुरवायचे. काय? कळलं की नाही?”



मी मानेनेच हो म्हटलं.
“ती भजी संपव आधी. कधीची चिवडत बसलाएस. माझ्या तीन प्लेटी झाल्या.”
“ए पिंट्या, ही चटणी संपली बघ. आणखी आण की बेट्या!” हॉटेलातल्या पिंट्याला ऑर्डर देत मोहन भजी खाऊ लागला. मी आपला विचार करतोय, आज रात्रीच्या जेवणात मी कसलं कॉम्बिनेशन करू बरं? आताच भूक लागलीये मला.

**क. जोड्या लावा.**

| | |
|---|---|
| अ. डोळ्यासमोर तरळणे | १. सुवास पसरणे |
| आ. आकंठ बुडणे | २. खूप जास्त भूक लागणे |
| इ. घमघमाट सुटणे | ३. उत्सुक होणे |
| ई. बोटं चुपणे | ४. कल्पना करणे |
| उ. भूक चाळवणे | ५. पूर्णपणे बुडणे / मिसळून जाणे |
| ऊ. ताव मारणे | ६. बोटं चाटणे |
| ए. आतुर होणे | ७. दिसणे |
| ॲ. स्वप्न रंगवणे | ८. फस्त करणे |
| ऐ. पाठ थोपटणे | ९. आवडीनिवडी पुरवणे |
| ओ. चोचले पुरवणे | १०. शाबासकी देणे |

**ख. खालील उताऱ्यात “क” मधील जोड्या वापरून वाक्य पुन्हा लिहा.**

मीना रोज न चुकता दुपारी ‘खाऊ खुशाल’ कार्यक्रम बघते. कधी एकदा घड्याळात दोन वाजतायत यासाठी ती उत्सुक झालेली असते. तो कार्यक्रम लागला, की त्यात ती पूर्णपणे हरवून जाते. कार्यक्रम टीव्हीवर असला तरी हिच्या खोलीत त्या पदार्थांचा सुवास पसरलेला असतो. कार्यक्रम संपला तरी ते पदार्थ दिसत राहतात. जणू काही आपणच तो पदार्थ बनवतो आहोत अशी ती कल्पना करू लागते. नव्या पाककृती पाहून तिला जास्तच भूक लागते. मग संध्याकाळच्या न्याहारीसाठी त्यातलाच एखादा पदार्थ ती करते. एकटीच बनवते आणि एकटीच तो फस्त करते. आपल्या आवडीनिवडी आपणच पुरवते आणि मग बोटं चाटत स्वतःला शाबासकी देते.

**ग. ‘आकंठ बुडणे’ चे अजून काही वापर शोधून चर्चा करा.**

## ११ कशाबरोबर काय खातात?



लोणी – थालीपीठ, भाकरी, पाव
भाजी – पोळी / चपाती, भाकरी
भात – वरण, आमटी, सार, कालवण, रस्सा, कढी

तुम्ही कशाबरोबर काय खाता?



## १२ कंसातील शब्द वापरून रिकाम्या जागा भरा.

(की (२), किंवा, वा, अगर, नाही तर, अथवा)

जाधवकाकांच्या साठीच्या कार्यक्रमासाठी काय बेत ठरवायचा हा जाधवकाकूंना मोठा प्रश्न पडला होता. शाकाहारी बेत आखायचा (क).................... मांसाहारी? शाकाहारी करायचं म्हटलं तर भरपूर प्रकार करावे लागतील. (ख).................... मांसाहारी केलं, तर मग सगळ्यांनाच चालेल असंही नाही. (ग).................... असं केलं तर? शाकाहारीच ठेवू, पण मोजकेच पदार्थ. काकांच्या आवडीचंच करू. मग गोडाचं काय करायचं? खीर (घ).................... बासुंदी? त्यांना तर दोन्ही आवडतात. पण जर खीर (च).................... बासुंदी असा पर्याय दिला ना, तर ते हमखास बासुंदीच म्हणतील. एवढ्यावरच ते जास्त खूश होतील. मग बाकी पूर्ण जेवण असो (छ).................... नसो. त्यांना विचारलं तर ते म्हणतील, साग्रसंगीत जेवण करा (ज).................... नका करू; मला फक्त बासुंदी पुरी दिलीत तरी चालेल. मला तेवढंच पुरे.

## १३ म्हणींचे जग

**क. खालील वाक्यांमध्ये माणसाचा स्वभाव दर्शवणारे शब्द अधोरेखित करा व त्यांचे अर्थ लावण्याचा प्रयत्न करा.**

अ. नामूकाका धंद्यात चांगलेच मुरलेले. आवळा देऊन कोहळा कसा काढावा हे त्यांच्याकडूनच शिकावे.

आ. अर्धी लाकडं मसणांत गेली तरी तात्यांचा संशयी स्वभाव काही बदलला नाही.

इ. समोरची व्यक्ती मामींशी कितीही प्रेमाने वागली तरी त्या मात्र रागातच बोलतात. कडू कारलं तुपात तळलं, साखरेत घोळलं तरी कडू ते कडूच.

ई. ऑफिसमध्ये बॉसशी झालेल्या भांडणाचा राग सीमाने घरी येऊन बहिणीवर काढला. वड्याचं तेल वांग्यावर काढायची तिची सवय जुनीच आहे.

उ. मुंबईत रोज नोकरीसाठी लोकलचे धक्के खाताना काय हाल होतात, ते गावात राहणार्‍यांना नाही कळायचं. अळवाची खाज, अळवालाच ठाऊक!

**अर्थ :**

१. ज्याचे दुःख त्यालाच ठाऊक
२. छोट्या गोष्टीच्या बदल्यात मोठ्या गोष्ट मिळवणे
३. चुकीच्या गोष्टींबद्दल भलत्याच गोष्टींना जबाबदार धरणे
४. अत्यंत म्हातारे होणे
५. कितीही बदलण्याचा प्रयत्न केला तरी मूळ स्वभावात फरक न पडणे

**ख. वरीलपैकी एखादी म्हण वापरून एक छोटासा संवाद तयार करा.**

## १४ खालील म्हणींचे अर्थ लिहा आणि वाक्यात प्रयोग करा.

आधी पोटोबा मग विठोबा.
कोल्हा काकडीला राजी.
ताट द्यावं पण पाट देऊ नये.
वड्याचं तेल वांग्यावर.
मनात मांडे नि पदरात धोंडे.
कामापुरता मामा नि ताकापुरती आजीबाई.





## १५ रिकाम्या जागा भरा.

उदा. फक्त स्वयंपाक करता आला म्हणजे कुणी विष्णु मनोहर होतो असं नाही, तर स्वयंपाकाची पूर्वतयारी, ओटा साफ करणं, भांडी घासणंही त्यात येतं / त्यात आलं.

क. अभिनय आला म्हणजे ---------------------------------------- त्यात आलं.

ख. क्रिकेट खेळता येतं म्हणजे ---------------------------------------- त्यात येतं.

ग. गाडी चालवता आली म्हणजे ---------------------------------------- त्यात आलं.

घ. मराठी भाषा येते म्हणजे ---------------------------------------- त्यात येतं.

## १६ खालील क्रियापदांची योग्य काळातील रूपे वापरून रिकाम्या जागा भरा.

**जमणे (५), येणे, समजणे, आवडणे (२), देणे इ.**

हृषिकेश – हॅलो विवेक, शनिवारी तुला (क) ---------- तर माझ्या घरी येऊ शकशील का?

विवेक – हो, (ख) ---------- की. पण काय काम होतं?



हृषिकेश – अरे, मला तुमच्याकडे सोलकढी करतात तशीच करायची होती. मी खूप वेळा प्रयत्न केला, पण ती तुमच्या कढीप्रमाणे (ग) ---------- नाहीये. ती कशी करतात ते दाखवशील का?

विवेक – हो, मी नक्की येईन. आणि येताना मी आईकडून ती पाककृती लिहून घेईन आणि तुला (घ) ----------, म्हणजे तुला नीट (च) ---------- आणि पुढच्या वेळी कधी करायची झालीच तर तुला ती पाहून नीट करताही (छ) ----------.

हृषिकेश – हो, ते बरंच होईल बघ. अरे, मागे तुमच्याकडे सोलकढी प्यायलो तेव्हा मला ती खूप (ज) ---------- होती. म्हणून आता मला ती करून पाहायची आहे. तू ये. आपण करून पाहू या. आणि मग तुमच्यासारखी (झ) ----------, तर जाताना काकूंसाठीही घेऊन जा. त्यांना (ट) ---------- तरच (ठ) ---------- म्हणायची.

विवेक – हो, नक्की. येतोच मी शनिवारी.

## १७ खालील पत्र वाचा आणि चुका सुधारा.

प्रीय वाचक,

हिवाळा, उन्हाळा, पावसाळा या तीन ऋतूंमध्ये हिवाळा सर्वांत उत्तम समजला जातो. कारण हिवाळ्यात भूक भरपूर लागतो आणि खाल्लेले अन्न पचते. शरीराला ऊर्जा भरपूर मिळते. परंतु त्या मानाने ती कमी खर्च होते. कारण हिवाळ्यात कितिही काम केले तरी थकवा येत नाही. परंतु उन्हाळ्यात मात्र भूक कमी लागते, पचन मंद होते, अन्न कमी जाते, ऊर्जा कमी निरमाण होते; पण थकवा लवकर येत असल्यामुळे ऊर्जा भरपूर लागते. म्हणूनच उन्हाळ्यामध्ये लागणाऱ्या ज्यादा ऊर्जेचा साठा हिवाळ्यातच केला जातो. म्हणून एका अर्थाने हिवाळा हा ऊर्जा साठवण्याचा महिना मानला जातो. थोडे तेल अधीक असलेले खाद्यपदार्थ खाऊन ऊर्जा साठवता येते. त्यातून शरीरात थोडी चरबी निर्माण झाली. हीच चरबी उन्हाळ्यात खर्ची पडते. दिवाळीला हिवाळा सुरू होतो तेव्हा चकल्या, करंज्या, कडबोळी असे तळलेले पदार्थ खाण्याची परवानगी असते. पचनही होतात आणि त्यातली चर्बी साठवली जाईल. हे हिवाळ्यातले तेल खाणे संक्रांतीपर्यंत आणि नंतरच्या रथसप्तमीपर्यंत सुरू राहतो. संक्रांतीत तिळाचे पदार्थ खाल्ले जातात. म्हणून हिवाळ्यामध्ये आहार घेताना काही गोष्टी आवर्जून कराव्यात.

**आपला**
**डॉ. पराग पटेल**

<u>प्रिय</u>

क. ------------------------

ख. ------------------------

ग. ------------------------

घ. ------------------------

च. ------------------------

छ. ------------------------

ज. ------------------------

झ. ------------------------

ट. ------------------------

ठ. ------------------------

## १८ शब्दकोडे



| आडवे शब्द | उभे शब्द |
|---|---|
| २ कोकणात न्याहारीत ह्या पदार्थाचा समावेश असतो. | १ नाचणीचे पीठ आंबवून केला जाणारा एक पदार्थ |
| ४ साताऱ्याचे प्रसिद्ध ------- पेढे | ३ मुंबईतील एक लोकप्रिय पदार्थ |
| ५ एक म्हण 'मनातले ------- मनातच खाणे' | ७ होळीला पुरणपोळीबरोबर ही आमटी देखील केली जाते. |
| ६ कोकम आणि नारळाच्या दुधाची कढी | ८ आंबा, मिरची, आवळा, लिंबू इ. पासून बनवलेला साठवणीचा, तोंडी लावण्याचा पदार्थ. |
| ९ नागपुरी भाताचा प्रसिद्ध प्रकार | १० खानदेशात केला जाणारा वांग्याचा प्रकार. वांग्याचं ------- |
| १२ विदर्भात कोथिंबिरीला ------- म्हणतात. | ११ भोपळ्यापासून केला जाणारा गोड पदार्थ |
| १३ नारळीपौर्णिमेला कोकणात भाताचा हा प्रकार केला जातो. | १२ डाळी वाटून तयार केला जाणारा साठवणीतला एक पदार्थ |
| १५ पोळीला असेही म्हटले जाते. | १४ वालाच्या उसळीला ------- उसळ असेही म्हणतात. |
| १६ कोल्हापुरातील प्रसिद्ध '-------पांढरा' रस्सा | १५ तोंडी लावण्याचा, वाटून केला जाणारा एक पदार्थ. |
| १७ गणपतीला ह्यांचा नैवेद्य दाखवतात. | १६ कोकणातील मुख्य पीक. |
| १९ नागपूरचा ------- मसाला प्रसिद्ध आहे. | १८ (दिवाळीत केला जाणारा) एक गोड पदार्थ |

## १९ रिकाम्या जागा भरा.

**मिसळ / वांगं / कोथिंबीर / मसाला / ठेचा / मिरच्या / चिकन / भरीत**



आज आम्ही रात्रीच्या जेवणासाठी वेगवेगळे पदार्थ करणार आहोत. मी खानदेशी पद्धतीचं (क) ------------------------- करेन म्हणते. त्यासाठी भाजलेलं (ख) ------------------------------ नीट सोलून ठेवलं आहे. वऱ्हाडी पद्धतीचा (ग) ----------------------- करणार आहे. त्यासाठी मला खूप कुटलेल्या (घ) ------------------------- लागतील. ते काम आई करील. बाबांना कोल्हापुरी (च) ----------------- आवडते. मिसळीवर चिरलेली (छ) ---------------------- पसरवणार आहे, म्हणजे दिसायला सुंदर दिसते. सगळं कसं प्रत्येकाच्या आवडीचं! खरं तर काही तरी झणझणीत म्हणून आम्ही मालवणी (ज) -----------------------च करणार होतो, पण नेमका



आमचा कुटलेला (झ) ------------------------------------ संपला होता. म्हणून हा वेगळा बेत आखला. पण हरकत नाही... तो बेत पुन्हा कधी तरी!

## २० वाचा आणि प्रश्न सोडवा.

**क. खालील परिच्छेद क्रमाने लावा.**

अ. ☐ डिसेंबरच्या नाताळच्या सुट्टीत मी गुहागरला होते. आमच्या आळीतील अनुराधा माझ्या घरी आली. म्हणाली, ‘‘आजी उद्या माझ्याकडे दहा पाहुणे उतरणार आहेत. त्यांना ‘एक्सक्लुझिव्ह कोकण’चं जेवण हवे आहे. मोदक मुळीच नकोत, असं सांगितलंय. मला टेन्शनच आलंय.’’

आ. ☐ कोकणात आता नागर संस्कृती रुजली आहे. आवडनिवड बदलते आहे आणि ही प्रक्रिया स्वाभाविकच म्हणायला हवी. कोकणात पर्यटनही वाढते आहे. शहरातून आलेली माणसे कोकणात घरोघरी उतरतात. प्रत्येक घरच येणाऱ्या पर्यटकांचे स्वागत करणारे. त्यातील काही माणसांना यातील जुन्या पदार्थांचे अप्रूप असते. नवीन संसार सुरू करणाऱ्या मुलींना हे पदार्थ माहीत नसतात. शहरातून कोकणात आलेली सून तर या पदार्थांविषयी अनभिज्ञच असते. घरात सासू, आजेसासू असेल तर काम सोपे असते; पण काही वेळा घरात कुणाचाच आधार नसलेली मुलगी मग या पदार्थाचा शोध घेते; पण आलेल्या पाहुण्यांना लगेच तो पदार्थ पुरवता न आल्याने खट्टू होते.

इ. ☐ तांदळाची उकड घालून पोळीत भरायची माहीत आहे ना? तुमचा कॅनिंगचा धंदा. मग चार आंब्यांचे डबे फोडून आमरस वाढ. भातसुद्धा तूप आणि तमालपत्र घालून छान मऊ मोकळा असू दे. पाहा, खूश होतील माणसे. रात्री बाळवांगी, बाळ कांदे, ओले पावटे घालून खिचडी कर, खांडवी कर आणि झक्कास नारळाचे दूध घातलेला मठ्ठा.’’ अनुराधा खूश झाली. मी खांडव्यांच्या दोन वड्या तिच्यापुढे ठेवल्या. चार दिवसांनी परत आली. म्हणाली, ‘‘पाहुणे खूश झाले.’’

ई. ☐ मी म्हटलं, ‘‘काळजी नको करूस. कोमट पाण्यात काजू भिजत घाल. म्हणजे ओल्या काजूची मस्त उसळ होईल. डाव्या हाताला खोबऱ्याची चटणी, पंचामृत आणि मोहरीचा आंबा वाढ. पातळ म्हणून भजी (बुटके) घालून ताकाची कढी कर (शेवटी त्यात नारळाचे दूध घालून केलेली) आणि साध्या पोळ्यांऐवजी उकड घालून पोळ्या कर.

उ. ६. हरवत चाललेले हे छान पदार्थ आता तुम्ही मुलांनी परत पुढे आणायला हवेत. शोधा म्हणजे खूप खाद्यपदार्थ कळतील. घरात आजी असेल तर तिच्यासाठी हलका आहार हवा. ‘सोजी’, ‘दशमी’, ‘कोळ्याच्या पिठाचा तुकडा’ (थालीपीठ), ‘आरारूट’ची किंवा साबुदाण्याची लापशी, शिंगाड्याची धिरडी सहज केली जात. पूर्वी घरात माणसांचा राबता असे. घरात हातावर सहज ठेवण्यासाठी खाद्यपदार्थ तयार असत. कोहळ्याच्या वड्या, गूळ-दाण्याचे लाडू, साखरपाऱ्याच्या वड्या, गूळपापडी, पोह्याचे लाडू, अळिवाचे लाडू, लाह्यांच्या पिठाचे गूळ, तूप घालून केलेले लाडू. अत्यंत पौष्टिक असे हे पदार्थ लुप्त झाले खरे! खूप पदार्थ हरवलेत. त्यातील काही पदार्थांचे हे दर्शन. तुम्ही मनात आणलं तर नक्की जपू शकाल हा खाद्यसंस्कृतीचा ठेवा!

ऊ. १. कोणत्याही प्रदेशाची खाद्यसंस्कृती ही त्या त्या भूमीशी निगडित असते. कोकणाची म्हणून विशिष्ट खाद्यसंस्कृती आहे. ती येथील पिके, फळे, येथील वैशिष्ट्यपूर्ण भाज्या यातून साकारते. कोकणात प्रमुख अन्न भात; त्याचबरोबर नाचणी, वरी, हुलगा (कुळीथ), हरभरे, कडवे वाल, पावटे ही कडधान्ये पिकतात. आंबा, फणस, काजू ही येथील विशेष फळे. याव्यतिरिक्त करवंदे, तोरणे, अळू (फळ), कोकम, पेरू, अननस, डाळिंब, रामफळ, सीताफळ, पपनस, चिकू या फळांच्या बागा येथे असतात. पण आज ती खाद्यसंस्कृती हरवत चालली आहे. अनेक पदार्थ काळाच्या पडद्याआड गेले आहेत. काही विस्मृतीत जाऊ पाहत आहेत. खरं तर आपली इतकी मोठी संस्कृती असताना आपल्याच भल्यासाठी तिचं जतन कसं करता येईल हे पाहायला हवं. निदान आपल्या घरापासून सुरुवात करायला काय हरकत आहे?

**ख. आता वरील उतारा परत वाचा आणि पुढील विधाने चूक की बरोबर ते लिहा.**

| | चूक | बरोबर |
|---|---|---|
| अ. आंबा, फणस, काजू या कोकणातील विशेष फळभाज्या आहेत. | | |
| आ. आजही सगळे पदार्थ प्रत्येक घरात बनवले जातात. | | |
| इ. बऱ्याच घरांत पर्यटकांचे स्वागत होते. | | |
| ई. अनुराधाला फक्त मोदक बनवता येतात. | | |
| उ. अनुराधाचा कॅनिंगचा व्यवसाय आहे. | | |
| ऊ. खिचडी आणि मछ्याचा बेत पाहुण्यांना आवडतो. | | |

**ग. जोड्या लावा.**

| | |
|---|---|
| अ. प्रत्येक प्रदेशाची खाद्यसंस्कृती | १. जुन्या पदार्थांचे अप्रूप असते. |
| आ. पर्यटकांना | २. आता बनवले जात नाहीत. |
| इ. करवंदे, तोरणे, अळू (फळ), कोकम, पेरू, अननस, डाळिंब, रामफळ, सीताफळ, पपनस, चिकू  | ३. त्या प्रांताच्या भूगोलाशी निगडित असते. |
| ई. अनेक पदार्थ | ४. पर्यटन वाढत आहे. |
| उ. कोकणात | ५. या फळांच्या बागा येथे असतात. |








२१ खालील ऋतुचक्रात तुम्हाला माहीत असलेली माहिती भरा.



# तोंडी परीक्षा

**एकूण गुण २०**

## १. वाचन व आकलन (एकूण गुण ५)

**क. खालील उतारा मोठयाने वाचून दाखवा.** **(२)**

रविवार, २५ नोव्हेंबरला अनेक वृत्तवाहिन्यांवर 'कोकणकड्यावर ट्रेकर अडकले' अशी ब्रेकिंग न्यूज झळकली. त्यानंतर फक्त गिर्यारोहणाच्याच क्षेत्रात नव्हे, तर सर्वसामान्यांमध्येदेखील चर्चेला उधाण आले. हरिश्चंद्रगडावरून कोकणकड्याच्या माथ्यावर सहज जाता येते, तेथे अडकण्याचा संभव नसतो. त्यामुळे हे ट्रेकर नेमके कुठे अडकले हे शोधण्यात बराच वेळ गेला. ट्रेकर कड्यावर अडकले नव्हते, तर ते रॅपलिंग करताना अर्ध्या वाटेत अंधार झाल्यामुळे मध्येच अडकले होते, असे नंतर समजले. दुसऱ्या दिवशी सायंकाळपर्यंत ते पायथ्याशी पोहोचले.

या घटनेमुळे डोंगरात भटकंती करताना होणारे अपघात, सुरक्षा आणि बचाव या चर्चेचे गुऱ्हाळ पुन्हा एकदा सुरू झाले. याला गुऱ्हाळच म्हणावे लागणार आहे. कारण गेल्या दहा वर्षांत अनेक कारणांमुळे डोंगरभटक्यांच्या संख्येत झालेल्या वाढीबरोबरच अपघात, असे अडकण्याच्या घटना वारंवार होताना दिसत आहेत. असे काही घडले की चार दिवस त्याचे चर्वितचर्वण केले जाते आणि पुन्हा पहिले पाढे पंचावन्न अशीच परिस्थिती होते. २०१२ मध्ये डोंगरातील एका अपघाती मृत्यूनंतर दाखल केलेल्या जनहित याचिकेनंतर मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशामुळे साहसी खेळांसाठी मार्गदर्शक तत्त्वांची आखणी करण्याचे आणखी एक घोंगडे भिजत घातले गेले. ते आत्ता कुठे जरा आकार धरू पाहात आहे, तोच कोकणकड्याची ही बातमी आली. पण या घटना वारंवार का होतात, त्यावर ठोस उपाय का सापडत नाही आणि त्यातून एकूणच गिर्यारोहण क्षेत्राची एक विचित्र अशी बाजू वारंवार का उघडी पडते, याचा कधी तरी विचार करावाच लागेल.

**क. खालील प्रश्नांची उत्तरे द्या.** **(३)**

अ. वरील उताऱ्यात कोणता विषय मांडला आहे?

आ. 'वारंवार सांगून, दाखवूनही परिस्थितीत काहीच बदल, सुधारणा न होणे' या अर्थाचा उताऱ्यात आलेला वाक्प्रचार सांगा.

## २. चित्रवर्णन (एकूण गुण ५)

**पुढीलपैकी कोणतेही एक चित्र निवडा व दिलेल्या प्रश्नांच्या आधारे तुमची निवड स्पष्ट करा.**

- तुम्ही निवडलेल्या चित्रात काय दिसत आहे?
- तुम्ही हेच चित्र का निवडले?
- चित्रात मांडण्यात आलेल्या विषयाशी / दाखवण्यात आलेल्या गोष्टीशी तुमचा प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष संबंध आला आहे का?



क.


ख.

३. **पुढीलपैकी कोणतेही दोन शब्द निवडा. ते वापरून दोन प्रश्न आपल्या जोडीदाराला विचारा. जोडीदाराच्या उत्तरातही तो शब्द यायला हवा.** (एकूण गुण ४)

| | |
|---|---|
| किंवा | गिरिदुर्ग |
| म्हणजे | कशाबरोबर |
| खाद्यप्रेमी | चटपटीत |

४. **पुढे काही म्हणींचे अर्थ दिले आहेत. कोणत्याही दोन अर्थांसाठी योग्य त्या म्हणी सांगा.** (एकूण गुण २)

क. भोजनाला प्राधान्य देणे, नंतर इतर कामे करणे.

ख. क्षुल्लक गोष्टीसाठी मोठा खर्च करणे.

ग. कितीही बदलण्याचा प्रयत्न केला तरी मूळ स्वभावात फरक न पडणे.

घ. एकाचा राग दुसऱ्यावर काढणे.

च. मामुली गोष्ट द्यावी, पण महत्त्वाची गोष्ट राखून ठेवावी.

५. **पुढीलपैकी कोणतेही एक विधान स्वत:च्या शब्दांत स्पष्ट करा.** (एकूण गुण ४)

क. गड कसा पाहावा, याचं एक तंत्र आहे.

ख. महाराष्ट्रात दर कोसावर खाण्यापिण्याच्या रीतिभाती बदलतात.

# लेखी परीक्षा

**एकूण गुण ३०**

## १. वाचन व आकलन **(एकूण गुण ७)**

पुराणप्रियता आणि पुरणप्रियता हे महाराष्ट्राचे वैशिष्ट्य आहे. आम्ही नव्याचा स्वीकार सावधपणे करतो. म्हणूनच टिकून आहोत. नवेदेखील चांगले वापरून जुने झाल्याखेरीज आम्हाला आवडत नाही. पण जुन्यातले जुने जर काही टिकून राहणार असेल, तर पुरणपोळी. ज्या घरात वर्षातून एकदा तरी पुरणपोळी म्हणून झाली नाही, ते घर मराठी नव्हे! महाराष्ट्रातल्या चारी वर्णांनी आणि साऱ्या जाती-जमातींनी जर एकमताने मान्य केलेली गोष्ट कुठली असेल, तर पुरणपोळी! हीसुद्धा जसजशी अधिक शिळी होत जाते, तसतशी तिची चव वाढते. ती दुधाबरोबर खावी, तुपाबरोबर खावी, किंवा कोरडी खावी. महाराष्ट्राच्या सीमा ठरविताना पुरणपोळीचा निकष वापरायला पाहिजे होता. मात्र हे नाजूक हाताचे काम नव्हे. चांगल्या पुरणपोळीला चांगले तीस-पस्तीस वर्षांचे तव्याचे चटके खाल्लेला हात हवा. म्हणूनच आज्जीने केलेल्या पुरणाच्या पोळीची सर आईच्या हाताला येत नाही; पत्नीच्या तर नाहीच नाही. वडीलधाऱ्यांनी ती करावी आणि लहानांनी खावी!

**क. चूक की बरोबर ते लिहा.** **(२)**

अ. पुरणपोळी हा अलीकडेच लोकप्रिय झालेला पदार्थ आहे.

आ. पुरणपोळी केल्यानंतर एक-दोन दिवसांनी खाल्ली की अधिक चविष्ट लागते.

**ख. कंसातील सूचनेप्रमाणे बदल करून वाक्ये पुन्हा लिहा.** **(२)**

अ. महाराष्ट्रातल्या चारी वर्णांनी आणि साऱ्या जाती-जमातींनी जर एकमताने मान्य केलेली गोष्ट कुठली असेल, तर पुरणपोळी ! ('एकमत होणे' ही नाम-क्रियापद जोडी वापरून वाक्य पुन्हा लिहा.)

आ. चांगल्या पुरणपोळीला चांगले तीस-पस्तीस वर्षांचे तव्याचे चटके खाल्लेला हात हवा. ('अनुभवी हात' वापरून वाक्य पुन्हा लिहा.)

**ग. तुमच्या आवडत्या / तुम्ही खाल्लेल्या एखाद्या महाराष्ट्रीय पदार्थाबद्दल थोडक्यात लिहा.** **(३)**

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

## २. शब्दसंपदा (एकूण गुण ६)

**क. संबंध ओळखून अचूक शब्द लिहा.** **(३)**

अ. कंधार : भुईकोट :: सिंधुदुर्ग : ..........

आ. उसऱ्या : मराठवाडा :: मांडे : ..........

इ. किल्ल्याच्या पायथ्याशी असलेले गाव : घेरा :: किल्ल्यातील सर्वात उंच व संरक्षित भाग : ..........

ई. वऱ्हाडी : ठेचा :: सातारी : ..........

उ. न्याहाळणे : क्रियापद :: बुरूज : ..........

ऊ. दाणे : भरडणे :: तांदूळ : ..........



**ख. जोड्या लावा.** **(३)**

| | |
|---|---|
| अ. खोवलेला | १. मटार |
| आ. संरक्षक | २. थंडी |
| इ. निसरडी | ३. शेंगा |
| ई. वाफवलेले | ४. नारळ |
| उ. सोललेल्या | ५. भिंत |
| ऊ. बोचणारी | ६. वाट |

अ. .......... आ. ..........

इ. .......... ई. ..........

उ. .......... ऊ. ..........

## ३. व्याकरण (एकूण गुण १७)

**क. पुढे दिलेली उभयान्वयी अव्यये व क्रियापदे यांचा वापर करून वाक्ये बनवा.** **(१०)**

अ. आवडणे – की

..........

..........

आ. जमणे – पण

..........

..........

इ. येणे – परंतु

---------------------------------------------

---------------------------------------------.

ई. समजणे – नाही तर

---------------------------------------------

---------------------------------------------.

उ. देणे – अथवा

---------------------------------------------

---------------------------------------------.

**ख. 'जरासा'च्या वेगवेगळ्या रूपांचा वापर करून गाळलेल्या जागा भरा. (३)**

अ. भाजी अळणी झालीये. ------------------ मीठ घालावं लागेल.

आ. सोहमला ------------------च रस्सा वाढ. तिखट झालाय.

इ. मला जास्त भूक नाहीये. ------------------ खिचडी खाईन.



**ग. खालील वाक्यांचा कारण आणि परिणाम अशा दोन्ही भूमिकांमध्ये वापर करा. म्हणजे एकच वाक्य दोनदा लिहा. एकदा ते कारण आहे असे धरून त्याचा परिणाम सांगणारे वाक्य कल्पनेने लिहा. पुन्हा तेच वाक्य परिणाम आहे, असे धरून त्याचे कारण कल्पनेने लिहा. (४)**

अ. आज दिगूला यायला खूप उशीर झाला.

---------------------------------------------

---------------------------------------------.

आ. प्रांजलीने नोकरी न सोडण्याचे पक्के केले.

---------------------------------------------

---------------------------------------------.

## १ लॉजिस्टिक हबने बदलेल नागपूरचे अर्थशास्त्र.

**क. बातमी ऐकून स्वाध्याय सोडवा.**



देशाचे मध्यवर्ती ठिकाण असलेल्या नागपूरचे (अ) ------------------ बदलविण्याची ताकद लॉजिस्टिक हबमध्ये आहे. मात्र शहराचे अर्थशास्त्र बदलविण्यासाठी पायाभूत (आ) ------------------ विशेष भर देण्याची गरज आहे. मेट्रोसारखे महत्त्वाकांक्षी (इ) ------------------ नागपुरात उभे राहत आहेत. त्यामुळे विकासाचे मॉडेल म्हणून नागपूरचा (ई) ------------------ देशपातळीवर उमटेल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

**ख. प्रत्येक परिच्छेदाला योग्य ते शीर्षक द्या.**

(लवकरच शहर आराखडा / इकोसिस्टीमवर भर / संत्र्यांची मागणी वाढेल / नदीविकासाचे मानक / कान्हाला टाकले मागे / नवीन विमानतळाचे काम लवकरच / हिरव्या नागपूरचा घेऊ शोध)

या कामांना गती...

अ. ------------------------------------------------

मिहानमध्ये एसईझेड तयार करण्यात आला आहे. मात्र, नवीन विमानतळ नसल्याने या योजनेला गती मिळू शकली नाही. मात्र, आता नवीन विमानतळाची निविदा काढण्यात आली आहे.

आ. ------------------------------------------------

मल्टीमॉडेल कॉरिडॉर तयार करण्यात येत आहे. नागपूर-मुंबई एक्स्प्रेसवे साकारण्यात येत आहे. वर्धा येथे ड्राय पोर्ट तयार करण्यात येत आहे. यामुळे विकासाला गती मिळेल. उद्योग, लॉजिस्टिक आणि पर्यटन यासाठी इको सिस्टीम तयार करण्यात येईल.

इ. ------------------------------------------------

मध्यप्रदेशातील कान्हा व्याघ्रप्रकल्पाला विदर्भाने मागे टाकले आहे. पर्यटनात भरारी घेऊ शकेल, एवढी क्षमता विदर्भात आहे. गोरेवाडा प्रकल्प उभा राहत असून, यासाठी ६०० कोटींचे काम सुरू आहे. पर्यटन सर्किट तयार करण्यावर विशेष भर देण्यात येत आहे. दीक्षाभूमीच्या विकासासाठी १०० कोटी रुपये देण्यात आले आहेत.

ई. ------------------------------------------------

मेट्रो रीजनचा विकास करण्यासाठी एनएमआरडीएची (नागपूर महानगर विकास प्राधिकरण) स्थापना करून आराखडा तयार करण्यात आला आहे. शहराचा आराखडा तयार करण्यासाठी लवकरच पावले उचलण्यात येणार आहेत.

उ. ------------------------------------------------------------

खळखळ वाहणारी नदी, हे विकासाचे मानक आहे. नागनाल्याची नागनदी दिसेल, असा विकास गाठायचा आहे. जपान इंटरनॅशनल कॉर्पोरेशन एजन्सी (जायका) यांनी कमी व्याजदरात कर्ज देण्याची तयारी दर्शविली आहे.

ऊ. ------------------------------------------------------------

नागपूर दुसरे हिरवे शहर म्हणून ओळखले जाते. ५० कोटी वृक्ष लागवड करण्यात येणार आहे.

ए. ------------------------------------------------------------

संत्र्यांची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी उत्पादनही वाढवावे लागेल. अमरावती येथील टेक्स्टाइल पार्क यशस्वी झाला.

**ग. नागपूर – तल्या / तली / तला / तलं चे योग्य रूप वापरून रिकाम्या जागा भरा.**



अ. आम्ही -------------------- ताडोबा व्याघ्र प्रकल्पाला भेट दिलीच आहे.

आ. दक्षिण, उत्तर, पूर्व, पश्चिम दिशांनी भारताला जोडणारं -------------------- डायमंड क्रॉसिंग म्हणजे तंत्रज्ञानाची कमाल आहे.

इ. -------------------- मिहान (MIHAN) अत्याधुनिक कार्गो हब पाहिलं का? नक्की बघाच.

ई. संत्र्याची बर्फी खावी तर -------------------- .

**घ. रिकाम्या जागा भरा.**

नागपुरातल्या, देशभरातील, नागपुरातील, शहरातल्या, राज्यातील, जगातील, नाशकातल्या, नागपुरातले

अ. यंदा आम्ही -------------------- सीताबर्डी किल्ल्याला भेट देणार आहोत.

आ. -------------------- सर्व शिक्षकांसाठी येत्या सोमवारी कार्यशाळा आयोजित केली आहे.

इ. -------------------- सर्व घडामोडींची माहिती ह्या वृत्तवाहिनीवर मिळते.

ई. सुधीर त्यांचे -------------------- घर विकून औरंगाबादला गेला.

उ. नाशिकच्या कुंभमेळ्यात -------------------- अनेक यात्रेकरू येतात.

ऊ. -------------------- संत्र्याची बर्फी प्रसिद्ध आहे.

ए. -------------------- काळाराम मंदिरात रामनवमीचा मोठा उत्सव असतो.

ॲ. बुर्ज खलिफा ही -------------------- सर्वात उंच इमारत आहे.

**च. रिकाम्या जागा भरा.**

अ. (जगभर) ------------------------ तज्ज्ञांनी पर्यटनाच्या समस्यांवर परिषदेत चर्चा केली.

आ. (परिसर) ------------------------ पर्यटन विकासासाठी प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात येणार आहे.

इ. (पर्यटनक्षेत्र) ------------------------ मान्य आंतरराष्ट्रीय मानकांचा वापर सर्व देशांनी केला पाहिजे.

## २ नाशिक : खालील उतारे वाचा व स्वाध्याय सोडवा.

**पंचवटी**

काळाराम मंदिराजवळ पाच वटवृक्षांचा समूह असल्याने या परिसराला 'पंचवटी' असे म्हणतात.



नाशिक शहरात पंचवटी परिसर हा गोदावरी नदीच्या डावीकडच्या तीरावर आहे. 'पंच' म्हणजे पाच व 'वट' म्हणजे वडाचे झाड.

**कुशावर्त तीर्थ**



कुशावर्त तीर्थ हे २१ फूट खोलीचे नैसर्गिक पाण्याचे झरे असलेले कुंड आहे. गोदावरी नदी ब्रम्हगिरी पर्वतावरून लुप्त झाल्यानंतर ह्या ठिकाणी प्रकट होते अशी काही लोकांची श्रध्दा आहे. या कुशावर्तात स्नान करून भाविक त्र्यंबकेश्वर मंदिरात दर्शनाला जातात. गौतम ऋषींनी प्राचीन काळी येथेच गंगेला अडवले होते व तीर्थात पुण्यस्नान केले होते अशी पौराणिक कथा आहे.

**पांडव लेणी**

नाशिकच्या अलीकडे दक्षिणेस सुमारे ८ किलोमीटरवर डोंगरात कोरलेली लेणी आहेत. ती सुमारे इ॰ स॰ पूर्व १०० ते ११० या वर्षी खोदलेली असावीत. येथे जो पाली भाषेतील शिलालेख आहे त्यावरून ही लेणी २००० वर्षांपूर्वीचीच असल्याचे निश्चित समजले जाते. पांडवलेणी ही सातवाहन आणि क्षत्रप राजवटीच्या कालखंडात खोदली गेली. इथल्या कोरीव मूर्तींना पांडव समजले गेले, तसेच हे अद्भुत काम पांडवांशिवाय कोणीही करू शकत नाही हा पूर्वापार समज आहे. यामुळेच या बौद्ध लेण्यांना पांडवलेणी हे नाव पडले. येथे एकूण २९ गुंफा आहेत. शालिवाहन या हिंदू राजाने प्रवासी बौद्ध भिख्खूंसाठी विश्रांतिस्थान म्हणून ही लेणी बांधली. भारत सरकारने या लेण्यांना महाराष्ट्रातील राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून घोषित केले आहे.



**काळाराम मंदिर**

नाशिक क्षेत्रातील हे प्रमुख मंदिर मानले जाते. काळाराम मंदिर सरदार रंगराव ओढेकर यांनी सन १७८२ मध्ये जुन्या लाकडी मंदिराच्या जागेवर बांधले. प्रभु रामचंद्र आपल्या वनवासादरम्यान ज्या जागी राहिले त्या ठिकाणी हे मंदिर होते, असे मानले जाते. मंदिराची संपूर्ण बांधणी काळ्या पाषाणात असून बांधकामाची शैली नागर आहे. मंदिरातील श्रीरामाची मूर्तीही काळ्या दगडातीलच आहे. म्हणूनच त्याला काळाराम असे म्हणतात. या मंदिराची बांधणी अशी काही आहे, की एकावर दुसरा पाषाण रचून त्याचे संतुलन साधण्यात आले आहे. पाषाण जोडण्यासाठी सिमेंट किंवा चुन्याचा वापर केलेला नाही, तर खोबणीद्वारे दगड एकमेकांत अडकवले आहेत. त्यामुळेच मंदिराचे स्थापत्य आगळेवेगळे ठरते. चैत्र महिन्यात येथे रामनवमीचा उत्सव आयोजित करण्यात येतो. बहुजनसमाजाला या मंदिरात प्रवेश मिळावा यासाठी डॉ॰ बाबासाहेब आंबेडकरांनी १९३० साली येथे सत्याग्रह केला होता.



**क. योग्य पर्याय निवडू या.**

अ. गोदावरी नदीच्या डावीकडच्या तीरावर, काळाराम मंदिराजवळ असलेला वटवृक्षांचा समूह म्हणजेच...

१. पंचवटी　　२. कुशावर्त तीर्थ　　३. पांडव लेणी

आ. प्रभु रामचंद्र आपल्या वनवासादरम्यान या ठिकाणी राहिले होते. हे मंदिर संपूर्ण काळ्या पाषाणात बांधले आहे. मंदिरातील श्रीरामाची मूर्तीही काळ्या दगडातीलच आहे.

१. त्र्यंबकेश्वर　　२. सीतागुंफा　　३. काळाराम मंदिर

इ. पौराणिक कथेनुसार, कुशावर्त तीर्थ येथे एका ऋषींनी प्राचीन काळी गंगेला अडवले होते व तीर्थात पुण्यस्नान केले होते. त्या ऋषींचे नाव काय?

१. अगस्ती　　२. गौतम　　३. विश्वामित्र

ई. पांडव लेणी ही २००० वर्षांपूर्वीची आहेत असे तेथे सापडलेल्या पाली भाषेतील शिलालेखावरून निश्चित होते. ही लेणी कोणत्या राजवटीच्या कालखंडात खोदली गेली आहेत?

१. सातवाहन आणि क्षत्रप　　२. वाकाटक　　३. यादव

**ख. रिकाम्या जागा भरा.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| परिश्रमांना | जनक | रणगाडे | प्रशिक्षण | तोफखाना |
| चित्रपट | पहिला | खंडातील | सैन्य | जाते |

**दादासाहेब फाळके संग्रहालय**



भारतीय चित्रपटसृष्टीचे (अ) ..................... म्हणून दादासाहेब फाळके यांना ओळखले (आ) ...........................। त्यांचा जन्म नाशिक येथे ३० एप्रिल, १८७० रोजी झाला. सन १९१३ मध्ये

त्यांनी भारतातील (इ) ---------------------------- चित्रपट ‘राजा हरिश्चंद्र’ हा निर्माण केला. नाशिकच्या स्टुडीओमध्ये १९३२ पर्यंत त्यांनी ९५ (ई) ---------------------------- व २६ डॉक्युमेंटरी चित्रपट बनविले. हे संग्रहालय दादासाहेब फाळके यांनी भारतीय चित्रपटसृष्टीसाठी केलेल्या (उ) ------------------ नम्र श्रद्धांजली म्हणून निर्माण करण्यात आलेले आहे.

**तोफखाना केंद्र**



देवळाली (ऊ) ------------------------- हे नाशिक शहरातील नाशिक रोड या ठिकाणी आहे. या ठिकाणी कॅन्टोनमेंट बोर्डदेखील आहे. तसेच या ठिकाणी (ए) ---------------------------- / तोफखाना संग्रहालय आहे. आशिया (ॲ) ---------------------------- हे सर्वात मोठे तोफखाना केंद्र आहे. भारतीय (ऐ) ---------------------------- दलातील अधिकारी तसेच जवानांना या ठिकाणी प्रशिक्षण दिले जाते. तसेच बोफोर्स तोफांचेदेखील या ठिकाणी (ओ) ----------------------- दिले जाते.

**ग. खालील कोड्यात आलेले शब्द ओळखा आणि दिलेल्या तक्त्यात भरा.**

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| का | वे | सी | ता | गुं | फा | रं | ग | सं | त्र |
| अं | ल | ता | दि | बे | का | च | ली | क | बो |
| बा | खो | ब | ना | दी | नू | अं | ते | ट | द्रा |
| झ | बे | डी | क | के | क्षा | मी | ग | जा | क्ष |
| री | नू | दा | ष | फा | ड | भू | सै | लं | फे |
| त | रे | पं | ची | रु | गं | तो | मी | न | सू |
| ला | चो | के | च | जी | से | रा | म | टे | क |
| व | ळा | ले | रो | व | डी | म | क्ष | क | र |
| सो | रा | है | ग | भा | टी | कुं | ची | वा | चे |
| त्र्यं | ब | के | श्व | र | शे | ड | सि | णे | फा |



| नागपूरशी संबंधित | नाशिकशी संबंधित |
|---|---|
| | |

## ३ खालील संवाद क्रमाने लावा.

☐ क. गिरिजा – हो, चालेल ना! मी फोन करेन तुला.

☐ ख. शर्वरी – गिरिजा, आपण उद्या चौपाटीला जाऊ या का?

☐ ग. गिरिजा – घ्या! आता क्लास आहे म्हणून काय झालं? सुटल्यावर येऊ शकते मी.

☐ घ. शर्वरी – तुझा क्लास आहे तर राहू दे मग. नंतर जाऊ.

☐ च. गिरिजा – हो, जाऊ की! माझा भरतकामाचा क्लास आहे. तो सुटल्यावर जाऊ.

☐ छ. शर्वरी – अच्छा. मग नक्की जाऊ या. तू मला सांग कुठे भेटायचं ते. मग मी तिथे भेटेन.



## ४ बोलीभाषा ... नागपूर

*नागपुरी बोली* हा डॉ. व. कृ. वऱ्हाडपांड्यांचा प्रबंध. त्याच्या आधारे या बोलीचे स्वरूप लक्षात घेताना तिचे वऱ्हाडी बोलीशी असलेले साम्य नजरेत भरते. या बोलीतही ‘मले-तुले’ ही सर्वनामांची द्वितीया-चतुर्थी या विभक्तींची रूपे आहेत. मी, तू, या सर्वांना तृतीयेचा ‘ने / नं’ प्रत्यय लागून ‘मीने / मीनं’, ‘तुने / तुनं’ अशी रूपे या बोलीत साधली जातात. प्रमाण मराठीतील ‘मी गेले’ ऐवजी ‘मी गेली’ असा ‘ली’ प्रत्यय भूतकाळ दर्शवितो. ‘पाहून राह्यली’, ‘करून राह्यली’ या रूपातही वऱ्हाडीशी साम्य आहे, पण ‘शान’ किंवा ‘शानी’ ऐवजी ‘करूनसन्या’, ‘म्हूनसन्या’ अशी रूपे रूढ आहेत. वऱ्हाडीवर जसा हिंदीचा प्रभाव आहे तसाच नागपुरी बोलीवरही आहे.

**वरील उताऱ्यात तुम्हाला आढळलेले प्रमाण मराठीतील व बोलीभाषेतील फरक लिहा.**

---------------------------------------------------

---------------------------------------------------

---------------------------------------------------

## ५ ‘गुगल’ले लागली ‘अहिराणी’नी गोडी

खानदेशी लोकांची बोलीभाषा असलेल्या 'अहिराणी'चा गुगल की-बोर्डमध्ये समावेश करण्यात आला आहे. यामुळे अहिराणी लोकसाहित्याचा वारसा जतन करणे अधिक सोपे झाले आहे. तसेच खानदेशातील लोकांना आपल्या बोलीभाषेत इंटरनेटच्या माध्यमातून व्यक्त होण्याची संधी या की-बोर्डच्या माध्यमातून मिळाली आहे.

खानदेशातील नागरिकांचे शिक्षण, रोजगार, व्यापारानिमित्त शहरांकडे स्थलांतर वाढले आहे. मात्र आपला प्रांत सोडला की परप्रांतात पुन्हा आपली अहिराणी बोलीभाषा बोलायची संधी

मिळत नाही. त्यामुळे अहिराणी भाषेचा वापर कमी होत आहे. गुगल की-बोर्डच्या नव्या फीचरच्या माध्यमातून अहिराणी भाषेचा जगभरात प्रचार-प्रसार होणार आहे. या की-बोर्डमध्ये अहिराणी भाषेचा समावेश झाल्याने अहिराणी भाषकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

**खालील उतारा वाचून चूक की बरोबर ते लिहा.**

क. गुगल की-बोर्डमुळे आता अहिराणी भाषेत लिहिता येऊ शकेल.

ख. अहिराणी ही खानदेशी लोकांची बोलीभाषा आहे.

ग. खानदेशातील लोकांचे शहरांकडे स्थलांतर कमी झाले आहे.

## ६ खालील वाक्ये पूर्ण करा.

**क. इतका, इतकी, इतके / इतकं की, ...**

अ. नागपुरात उन्हाळ्यात ---------- उकाडा असतो, की वातानुकूलन यंत्रेही बिघडतात.

आ. नाशिकची आत्या ---------- द्राक्षं आणते, की आम्ही आठवडाभर तीच खात असतो.

इ. नाशकात धार्मिक स्थळे ---------- आहेत, की सर्वांना भेट देण्यासाठी चांगले २-३ दिवस तरी हवेतच.

ई. नागपूरचे पदार्थ ---------- तिखट असतात, की त्यावर उतारा म्हणून मी संत्र्याच्या बर्फीचा अख्खा पुडा संपवला.

**ख. इतका, इतकी, इतके / इतकं की, ...**

अ. मला गुलाबजाम आवडतात. मी एका वेळी पंचवीसपण खाऊ शकते.



----------

----------

----------

आ. शेजारच्या घरात बंड्र दंगा करत होता. त्यामुळे पाटीलकाकूंची झोप मोडली.

----------

----------

----------

इ. विनय घरी मोठ्या आवाजात टीव्ही लावतो. आमचा बंद असला तरी मालिकेत काय होतंय ते आम्हाला कळतं.

----------

----------

----------

ई. केतकीला ही कादंबरी आवडली. ती सारखी तीच वाचत बसलेली असते.

उ. मिनूला मांजरीचं पिल्लू आवडलं. ती त्याला घरी घेऊन आली.



**ग. तसा, तशी, तसे / तसं ... पण**

अ. पर्यटनासाठी नाशिकमधला गोदाघाट चांगलाच प्रसिद्ध आहे, पण तरुणाईची पसंती द्राक्षांच्या मळ्यातल्या रिसॉर्ट्सना असते.

आ. संत्रे हे फळ लोकप्रिय आहे. पण नागपूरच्या फळांची चव विसरता येणं अशक्य आहे.



इ. उत्तरेतल्या काशीमध्ये कुंभमेळा भरतो. दक्षिण काशी असलेल्या नाशिकमध्ये भरणाऱ्या कुंभमेळ्यालाही आगळंच महत्त्व आहे.

ई. पुणे ही महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी मानली जाते, तरी विकासाचे प्रारूप म्हणून आज नागपूरकडेच पाहिले जात आहे.

**घ. खालील वाक्ये पूर्ण करा.**

अ. ते गाव तसं मोठं आहे, पण ..........................................................................

आ. मी प्रवासाची तशी सगळी तयारी केली आहेच, पण ..........................................................................

इ. एकदा बसलो की तसा गृहपाठ पूर्ण होतो, पण ..........................................................................

ई. ह्या वर्षी पाऊस तसा बरा होता, पण ..........................................................................



उ. मला पेपर तसे सोप्पेच गेले, पण ..........................................................................

## ७ रिकाम्या जागेत 'चालवून घेतले, चालवून घेणार नाही, चालणार नाही, चालवून घेतले / घेतलं जाणार नाही' पैकी योग्य ते उत्तर भरा.

"अहो मॅडम, तुम्ही भाजी घेण्यासाठी प्लास्टिकची पिशवी आणली आहे. हे (क) .............................. . भारत सरकारकडून प्लास्टिक-बंदी धोरण अंमलात आणले गेले आहे. आम्ही पर्यावरणस्नेही तुमची प्लास्टिक वापरण्याची मनमानी (ख) .............................. . पर्यावरणाचे बिघडणारे संतुलन इतकी वर्षे (ग) .............................. . यापुढे मात्र (घ) .............................. . तुमची प्लास्टिकची पिशवी द्या आमच्याकडे आणि ही टिकाऊ, पर्यावरणप्रेमी कापडी पिशवी घ्या."

## ८ 'की' चा वापर.

क. वरुण - तुझं काम झालं <u>की</u> सांग मला, संपदा. मला थोडं महत्त्वाचं बोलायचं होतं.

ख. संपदा – नाही, बोल <u>की</u>! मी नंतर करेन काम माझं.

वरुण – बरं. मी गेल्या आठवड्यापासून विचार करतोय, पण काही सुचत नाहीये.

ग. संपदा – अरे पण कशाबद्दल? स्पष्ट सांगशील <u>की</u> नाही?

वरुण – अगं, आई-बाबांचा लग्नाचा वाढदिवस आहे ना पुढच्या आठवड्यात, त्यांना काही तरी चांगली भेटवस्तू द्यायची असं माझ्या मनात होतं.

घ. संपदा – हो. मग त्यात काय! घेऊ आपण. अजून एक आठवडा आहे की!

च. वरूण – अगं हो! मी म्हणालो होतो ना तुला, की बाबांसाठी एक चांगली आरामखुर्ची पाहून ठेवली आहे, तीच घ्यायचा विचार होता. पण ती नाहीये आता. विकली गेली. मग आता काय घ्यायचं हाच प्रश्न पडलाय मला.

संपदा – मी परवाच आपल्या नाक्यावरच्या दुकानात एक मस्त पुस्तकांचं कपाट पाहिलं. ते देऊ शकतो आपण.

छ. वरुण – वा ! हीदेखील चांगली कल्पना आहे. आपण आज संध्याकाळी जाऊन पाहून येऊ. बरं, ते कपाट मोठं आहे की लहान आहे?

ज. संपदा – तसं जास्त मोठं नाही. तीन की चार फुटांचं असेल उंचीला.

वरुण – मग बरंच आहे. तेच घेऊ. त्यांची पुस्तकं सगळी व्यवस्थित राहतील त्यात.

संपदा – हो, नक्की. अरे, आईला काय घ्यायचं ठरवलंस?

झ. वरुण – मला वाटलं की ते तू बघणार आहेस.

ट. संपदा – हो का? मग दोघांनी एकत्रच घेऊ की! त्या दुकानात खूप काही मिळतं.

**वरील उताऱ्यात 'की' कोणत्या अर्थाने आले आहे ते खालील कोष्टकात लिहा.**

| विकल्पबोधक | समुच्चयबोधक | परिणामबोधक | पूरक केवलप्रयोगी | संकेतदर्शक |
|---|---|---|---|---|
| उदा॰ छ | | | | |

## ९ खालील पत्र वाचून त्यातील चुका दुरुस्त करा.

प्रिय वृषाली,

गेल्या आठवड्यातच मी तुला आमच्या नाशिकला सहलीबद्दल कळवले होते. आम्ही सोमवारीच उतरलो नाशकात. आईच्या मामांकडेच देवळालीला मुक्कामालं आहोत. आईची कित्येक वर्षांची इच्छा होती. तिने बालपणातला काही काळ इथे घालवल्यामुळे तिला इथलं खूप काही माहिती आहे. त्यामुळे काय काय पाहायचं आहे हे नक्की झालोय. तीर्थयात्रापण होईल आणि प्रेक्षणीय स्थळेही पाहून होतील.

सोमवारी सकाळी आलो ते एक बरंच झालं. आईने सर्वात आधी त्र्यंबकेश्वरलाच जायचं होतं. त्यामुळे आल्यावर आम्ही आवरून पुन्हा निघालो आणि त्र्यंबकेश्वरची वाट धरली. पण ते देवळालीपासून जास्त दूर नाही. खूप छान मंदिर आहे. तुला माहितेय, मंदिरात जाण्यापूर्वी जवळच असलेल्या कुशावर्त तीर्थात स्नान करावं लागतं. आईला हे सगळं नीट माहीत होतं. तिने सांगितल्याप्रमाणे आम्ही कसं केलं. मग थोडा वेळ तिथल्या परिसरात बसलो. खूप प्रसन्न वाटले होतं.




क. ..............................

ख. ..............................

ग. ..............................

त्या दिवशी घरी परतल्यावर मग कुठे गेलो नाही. दुसऱ्या दिवशी पंचवटी परिसर बघण्याचं ठरवलं होतं. त्याप्रमाणे पहाटेच निघालो. पंचवटी परिसर खूप सुंदर आहे. पहाटेच गेल्यामुळे छान गारवा होता. आधी आम्ही काळाराम मंदिरात गेलो. हे मंदिर काळ्या दगडात बांधलं आहे. भिंतीना हात लावल्याकडे इतकं गारगार वाटत होतं... गाभारासुद्धा तसाच. खूप वेळ तिथेच बसून होतो. मूर्तीही खूप छान आहेत. या मंदिराविषयी आईने आम्हाला खूप माहिती सांगितली. तुला भेटल्यावर सांगेनच. नंतर आम्ही पंचवटी, सीतागुंफा यांना भेट दिली. या परिसरात खूप मंदिरे आहेत. इथून घरी जाऊच नये असंच वाटत होतं. आम्ही फोटोसुद्धा खूप काढलेत.

माझ्या मामेभावानेही आम्हाला खूप फिरवलं. पांडवलेणीही खूप सुंदर आहेत. वेदांग तर अवाक् झाला होता. पूर्ण लेणी तो एकटाच किती तरी वेळ निरखत चालला होता. नंतर घरी परतलेली आम्हाला म्हणतो, "मी मोठा झाल्यावर अशा लेण्यांचा अभ्यास करणार. मला खूप आवडलं ताई हे सर्व." त्याच्या डोळ्यात समाधान दिसत होतं. खरंच किती तरी दिवसांनी असे निवांत क्षण आम्ही अनुभवत होतो. तिथून आम्ही देवळालीचं तोफखानाकेंद्र पाहिलं.

नाशिकला दक्षिण काशी म्हणतात हे खरंच आहे. किती धार्मिक स्थळं आहेत इथे. सर्व निसर्गाच्या कुशीत वसलेली. सर्व ताणतणाव विसरायला लावणारी. मग ते त्र्यंबकेश्वरपेक्षा प्रसिद्ध ज्योतिर्लिंग असो किंवा वणीचं सप्तश्रृंगी मंदिर. खूप काही पाहायला मिळालं. आई अजूनही बालपणीच्या आठवणीत का रमते ते आता पटतंय मला. आपण सुद्धा एकदा इथे येऊ. सगळ्यांना खूप आवडेल. मला तर तुला खूप काय काय सांगायचंय. पत्राद्वारे तुला त्यामागचा आनंद दाखवता झाला नाही.

लवकरच भेटू.

तुझीच,

मनाली

घ. ............................

च. ............................

छ. ............................

ज. ............................

झ. ............................

ट. ............................

ठ. ............................

## १० आता तुम्ही पाहिलेल्या ठिकाणाचे वर्णन आपल्या मित्र / मैत्रिणीला पत्राद्वारे कळवा. खालील प्रश्नांची मदत घ्या.

- ठिकाण कुठले?
- काय काय पहिले?
- वातावरण कसे होते?
- कुठे राहिलात?
- कोणाबरोबर व कसे गेलात?



## ११ शब्दकोडे




| आडवे शब्द | उभे शब्द |
|---|---|
| १. नागपूर येथे या संस्कृत कवीचा महोत्सव साजरा केला जातो. | २. महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांपैकी 'अर्ध शक्तिपीठ' |
| ४. कुशावर्त हे नैसर्गिक झऱ्यांचे ------------ आहे. | ३. वनवासकाळात रामाचे वास्तव्य येथे होते असे म्हटले जाते. |
| ५. नाशिकजवळ ही प्राचीन लेणी आहेत. | ४. नाशिक येथे दर बारा वर्षांनी सिंहस्थ ------------ भरतो. |
| ६. संत्री प्रामुख्याने या रंगाची असतात | ८. नागपुरातील एक किल्ला |
| ७. काळ्या पाषाणात बांधलेले नाशिकचे प्रसिद्ध मंदिर | ९. नाशिकमधील ------------ येथे नाणे संग्रहालय आहे. |
| ९. नागपुरातील एक तलाव | |
| १०. बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक | |
| ११. भारताचा भौगोलिक दृष्ट्या केंद्रबिंदू म्हणजे ------------ माईल स्टोन. | |
| १२. दक्षिणगंगा म्हणून ओळखली जाणारी नदी | |

## १२ खेळ

**साहित्य : रंगीबेरंगी सोंगट्या आणि फासा**

- प्रत्येक खेळाडूने रंगानुसार सोंगट्या निवडायच्या.
- 'घर' असे लिहिलेल्या चौकोनात आपापल्या सोंगट्या ठेवायच्या. फाशात तीनचे दान पडल्यावर एक सोंगटी दिलेल्या दिशेने बाहेर काढायची. फाशात पडलेल्या दानाप्रमाणे सोंगटी पुढे पुढे सरकवायची.
- एक एक करून उरलेल्या सोंगट्याही बाहेर काढायच्या.
- पूर्ण चौकोन फिरून आपल्या घराच्या प्रवेशद्वारात आल्यावर तिथून आत जांभळ्या घरात जायचे. ज्याच्या सर्व सोंगट्या जांभळ्या घरात जातील तो खेळाडू जिंकेल.
- खेळाडू जर गुलाबी घरात आला तर जेवढे दान पडले असेल त्या अंकानुसार दिलेले वर्णन मोठ्याने वाचून उत्तर द्यायचे. उत्तर बरोबर आले तर थेट पुढच्या गुलाबी घरात जाता येईल.
- एखादा खेळाडू दुसऱ्या खेळाडूच्या प्रवेशघरात आला तर त्याला पुन्हा त्याच्या घरात जावे लागेल. आणि पुन्हा तीनचे दान पडेपर्यंत बाहेर पडता येणार नाही.

| | |
|---|---|
| **दान १**<br>नाशकातल्या ह्या मंदिरात रामनवमीचा मोठा उत्सव करतात. | **दान २**<br>देवीचे हे देऊळ गडावर असून ते साडेतीन शक्तिपीठांपैकी एक मानले जाते. |
| **दान ३**<br>नाशिकजवळची प्राचीन लेणी | **दान ४**<br>बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक |
| **दान ५**<br>ह्या २१ फुटी कुंडात नैसर्गिक पाण्याचे झरे आहेत | **दान ६**<br>हे स्थळ पाच वटवृक्षांचा समूह म्हणून ओळखले जाते |




१
घर
घर
घर
घर

१ क. शीर्षक आणि चित्रांच्या जोड्या लावा.

अ 

आ 

इ 

ई 

उ 

ऊ 

१ मूर्ख मित्र

२ तहानलेला कावळा

३ माकडाचे काळीज

४ रिकामी कुंडी

५ नव्या झऱ्याचा शोध

६ ओक वृक्ष आणि लव्हाळे

**ख. खाली दिलेल्या शब्दांपैकी योग्य शब्दांच्या मदतीने बोधकथेतील रिकाम्या जागा भरा.**

वाळलेली निरुपयोगी इच्छितो भलेमोठे नेण्याचा
आणण्याचा शंभर आपल्याला आम्हाला एवढं यांपैकी
कशाला पिसावर कुजवून भलीमोठी उपयोगी

प्राचीन काळाची गोष्ट आहे. एका ऋषीच्या आश्रमात (अ) ------------------------ विद्यार्थी विद्यासंपादन करत होते. गुरू शिकवत होते, शिष्य शिकत होते. शिष्यांचे अध्ययन संपल्यावर दीक्षान्त समारंभात गुरुदक्षिणा द्यायची असते. शिष्यांनी गुरुवर्यांना विचारले, “गुरुवर्य, आपण आम्हाला (आ) ------------------------ ज्ञान दिलंत, आम्ही आपल्याला गुरुदक्षिणा देऊ (इ) ------------------------; पण आपण त्यागी आहात. आपणाला आम्ही गुरुदक्षिणा म्हणून काय

देऊ? आपण सांगावे." "शिष्यवृन्दहो, मला गुरुदक्षिणा म्हणून अशी वस्तू आणा, जी जगात कोणाच्याही उपयोगाची नाही. निरुपयोगी वस्तू हीच माझी गुरुदक्षिणा!"

मग शिष्य निरुपयोगी वस्तू शोधायला लागले. द्रव्य, वस्त्र, पात्र, धान्य (ई) ------------------ काहीही नको. कारण या सर्वांचा उपयोग असतोच.

एका शिष्याला एका झाडाखाली (उ) ------------------ पाने दिसली. तो म्हणाला, "ही वाळलेली पाने निरुपयोगी आहेत. तीच आपण गुरुदक्षिणा म्हणून देऊ." शिष्य पाने नेऊ लागले, तेवढ्यात एक शेतकरी आला. तो म्हणाला, "कशाला नेता ही पानं? ती (ऊ) ------------------ मी खत म्हणून वापरतो. शेताला उपयोगी पडतात."



शिष्य पुढे गेले. त्यांना काही वाळलेल्या काड्या दिसल्या. त्यांची मोळी बांधून नेणार, एवढ्यात काही स्त्रिया आल्या. म्हणाल्या, "(ए) ------------------ नेता ह्या काड्या? त्यांवर आमचा स्वयंपाक होतो."

शिष्य पुढे गेले. एक जण म्हणाला, "आपण मातीच नेऊ या."

"अरे बाबा, माती तर सर्वात उपयुक्त आहे. मातीतूनच वृक्ष उगवतात."

मग माती (ॲ) ------------------ विचार त्यांनी रद्द केला. ते अजून पुढे जात होते. एका लहानशा ओढ्याकाठी ते आले. त्या ओढ्याच्या प्रवाहात एका पक्ष्याचे (ऐ) ------------------ पीस वाहत येताना दूरवरून त्यांनी पाहिले. एक शिष्य म्हणाला, "हे पीसच आपण देऊ या. ते निरुपयोगी आहे". पीस जवळ आल्यावर त्यांनी पाहिलं, तर त्या (ओ) ------------------ काही मुंग्या होत्या. त्या म्हणाल्या, "आमचं वारूळ फुटलं. आम्हाला पलीकडे जायचं होतं. आम्ही मिळून हे पीस ओढलं आणि त्यावर बसलो. हे पीस (ऑ) ------------------ उपयुक्त आहे."



शिष्यांना समजले, कोणतीही वस्तू निरुपयोगी नाही. शिष्य निराश मनाने परतले.

गुरुवर्य म्हणाले, "जगात कोणतीच वस्तू (औ) ------------------ नाही, हे ज्ञान तुम्हाला झालं, हीच माझी गुरुदक्षिणा!"

**ग. पुढील अर्थाचे जोडशब्द सांगा.**

अ. खरेदी = ------------------ आ. प्रत्येक पानावर = ------------------

इ. पद्धती = ------------------ ई. निराळे = ------------------

**घ. पुढील वाक्यांमध्ये योग्य क्रियाविशेषणे लिहा.**

अ. ------------------ सुटलेल्या वाऱ्याने पिल्लू घाबरले. (त्वरित / अचानक)

आ. "मला हवा लोण्याचा गोळा," दोन्ही मांजरे ------------------ ओरडली. (एकदम / इतक्यात)

इ. उंदीर सिंहाच्या अंगावरून उड्या मारत नाचत होता. ------------------ सिंह जागा झाला. (इतक्यात / ताबडतोब)

ई. ------------------ कावळ्याला एक पाण्याचा घडा दिसला. (त्वरित / इतक्यात)

## २ खालील उतारा वाचा आणि स्वाध्याय सोडवा.





सर्व बौद्ध धर्मीयांच्या देशांत लोकांना नैतिक शिकवण देण्यासाठी जातक कथा हे प्रमुख माध्यम होते. भिक्षूंनी आणि प्रचारकांनी या कथा मोठ्या प्रमाणात वापरल्या. अनुराधापूर येथे राजा दुतुगेमुनू (इसवी सन पूर्व दुसऱ्या शतकात) यांनी बुद्धांचा उपदेश व धम्म प्रसारासाठी त्यांना पैसे दिले. ते सामान्यत: या कथा त्यांच्या उपदेशांमध्ये वापरतात. भगवान बुद्ध यांनीदेखील त्यांच्या शिकवणीत या कथांचा वापर केला आणि त्यांच्या अनुयायांनी समाजात त्यांचा प्रचार केला. पूर्वीदेखील वैदिक साहित्यात अशाच प्रकारच्या कथा होत्या.

ग्रीक पौराणिक कथा, तसेच इसापकथा यांना वेद आणि बौद्ध धर्म यांतून प्रेरणा मिळाली. नंतरच्या काळात इंग्लंडमधील चॉसर आणि इटलीतील बोकॅसीओच्या कथांवरही त्यांचा प्रभाव दिसून येतो. जातककथा विविध उद्देशांसाठी वापरल्या गेल्या. संस्कृतमध्ये पंचतंत्रात कायदा व अर्थशास्त्र शिकवण्यासाठी, तसेच कथासरित्सागरात ज्ञान देण्यासाठी त्यांचा उपयोग केला गेला. या गोष्टी वाचून, मुले आणि प्रौढ स्वतःचे ज्ञान विकसित करू शकतात आणि आधुनिक जीवनातील कठीण समस्यांशी सामना कसा करावा हे शिकू शकतात. वाचकांच्या नैतिक मूल्यांचा विकास करणे हा या कथांचा मुख्य उद्देश आहे.

**क. वरील उताऱ्यात खाली दिलेल्या अर्थांचे शब्द शोधा.**

अ. शिष्य : ............................

आ. सल्ला : ............................

इ. पूर्वीच्या पिढ्यांतील लोकांकडून मिळणारे : ............................

ई. हेतू : ............................

उ. छाप : ............................

**ख. चूक की बरोबर ते लिहा.**

अ. धम्म म्हणजे गौतम बुद्धांची शिकवण. ............................

आ. बुद्धांनी स्वतः पंचतंत्र कथा सांगितल्या. ............................

इ. इसापकथांना जातककथांमधून प्रेरणा मिळाली. ............................

ई. कायदा व अर्थशास्त्राशी संबंधित अनेक उपदेश जातककथांतून मिळतात. ............................

**ग. अ. खालील जातककथा योग्य क्रमाने लावा.**

| | | |
|---|---|---|
| क. | सकाळ झाल्यावर सर्वांच्याच लक्षात येऊन प्रवासी रडू लागतात. कारण त्यांच्याकडचे पाणी संपलेले असते. ते मार्गदर्शकाला दोष देऊ लागतात. त्यावेळी तांड्याचा प्रमुख धीर न सोडता मार्ग शोधायला येरझाऱ्या घालू लागतो. त्याची नजर त्या रखरखीत वाळवंटात चिमुकल्या हिरव्या गवतावर जाते व त्याच्या मनात विचार येतो, इथे नक्कीच पाणी असले पाहिजे. |  |
| ख. | दगड फोडताक्षणी मधुर पाण्याचे कारंजे उसळून बाहेर येते. सर्व प्रवासी बैलांना न्हाऊ माखू घालतात, मनसोक्त पाणी पितात, अन्न शिजवतात. पुढील मुक्कामाला निघताना ते त्या जागी “या वाळवंटात इथे मधुर पाण्याचा झरा आहे ” असा फलक लावतात. |  |
| २ ग. | तांड्याचा प्रमुख पुढील प्रवासाच्या मार्गदर्शनासाठी स्थानिक मार्गदर्शकाला सोबत घेतो, जो आकाशातील ताऱ्यांच्या ठिकाणाप्रमाणे मार्गक्रमण करीत असतो. तांडा शेवटच्या टप्प्यावर येतो, मार्गदर्शक निश्चिंत होऊन झोपतो, परंतु बैलगाडीच्या बैलांना त्याने झोपण्यापूर्वी मार्गदर्शन केलेले नसल्याने ते पुन्हा मूळ ठिकाणी येतात. |  |
| घ. | तो तांड्यातील उत्साही प्रवाशाला तिथे खणण्यास सांगतो. बरेच खणल्यावरही पाणी लागत नाही. उलट त्या जागी दगड लागतो. त्याही स्थितीत अन्य प्रवाशांची दूषणे ऐकत प्रमुख खाली उतरून दगडाला कान लावतो तेव्हा त्याला दगडाखालून पाण्याच्या प्रवाहाचा आवाज येतो. तो हातोडीने दगड फोडण्यास सांगतो. |  |
| च. | एकदा व्यापाऱ्यांचा एक तांडा प्रवासी, बैलगाड्या, बैल यांसह प्रवासाला निघालेला असतो. वाटेत त्या तांड्याला रखरखीत वाळवंट लागते. सकाळच्या प्रहरात उन्हाच्या तीव्र तडाख्याने निखाऱ्याप्रमाणे तापणाऱ्या वाळूत प्रवास करणे त्या तांड्याला शक्य नसते. म्हणून ते रात्रीचा प्रवास करायचे ठरवतात. |  |

**आ. आता ह्या कथेसाठी योग्य शीर्षक निवडा.**

☐ नव्या झऱ्याचा शोध    ☐ नदी सापडली

**इ. कथेचे खालीलपैकी कुठले तात्पर्य योग्य आहे?**

☐ उद्दिष्टांच्या जवळ जायला काम करावेच लागते असे नाही.

☐ आपल्या उद्दिष्टांपर्यंत पोहचेपर्यंत कोणतेही काम कितीही अडचणी आल्या तरी अर्धवट सोडू नये.

**घ. पुढे दिलेल्या वाक्यांमधील केवलप्रयोगी अव्ययांच्या योग्य अर्थाशी जोड्या जुळवा.**

| | | |
|---|---|---|
| अ. अरे वा:! काम न करताच पगार वाढवून पाहिजे म्हणजे काय? | | १. हर्ष |
| आ. छी:! कोणाशी कसं बोलावं, काही कळत नाही तुम्हाला! | | २. तिरस्कार / घृणा |
| इ. वा:! मस्त झालीये भाजी! | | ३. प्रशंसा |
| ई. छी:! चिखलानं माखलाय त्याचा शर्ट. | | ४. विरोध |
| उ. अरे वा:! आज ठरवल्याप्रमाणे सगळी कामं झाली. | | ५. विरोध |

## ३ पंचतंत्रातील पाच बोधकथा पुढे दिल्या आहेत.

**क. कथेतील चुकीचे पर्याय खोडा. प्रत्येक कथेचे तात्पर्यही लिहा.**



अ. एक व्यापारी जंगलाने (१) वेढलेल्या / वसलेल्या गावात राहत होता. त्या जंगलात एक राक्षस राहत असे. एकदा व्यापारी जंगलातून एकटाच जात असताना राक्षस त्याच्या मानगुटीवर बसला. "मी म्हणेन ते ऐक. नाहीतर मी तुला (२) खाऊन / घेऊन टाकीन", असे राक्षसाने त्याला बजावले. राक्षसाच्या हुकुमाप्रमाणे त्याला पाठीवर घेऊन चालताना व्यापाऱ्याच्या लक्षात आले, की त्याचे (३) तळपाय / पायथा खूपच नाजूक व मऊ आहेत. म्हणून त्याने जिज्ञासेपोटी राक्षसाला त्याविषयी विचारले. राक्षसाने सांगितले, "ओल्या पायांनी जमिनीला स्पर्श करायचा नाही अशी मी शपथ घेतली आहे." नंतर राक्षसाला तळ्यात अंघोळ करण्याची इच्छा झाली. म्हणून त्याने व्यापाऱ्याला तळ्यात घेऊन जाण्याचा हुकूम (४) धाडला / सोडला. अंघोळीसाठी राक्षस तळ्यात उतरला तेव्हा व्यापाऱ्याने विचार केला, 'आता हा बाहेर आल्यावर मला पुन्हा त्रास देत (५) राहील / राहणार आणि कधीतरी नक्कीच खाऊन टाकेल.' तेवढ्यात त्याला राक्षसाची प्रतिज्ञा आठवली. 'हा ओल्या पायांनी काही पाण्यातून बाहेर येणार नाही', असा विचार करून तो पळून गेला व त्याने आपला जीव वाचवला.

पंचतंत्रातील विभाग : ------------------------------------------------

तात्पर्य : ------------------------------------------------

आ. एक राजा होता आणि त्याचे एक आवडते माकड होते. ते माकड इमानेइतबारे राजाची सर्व कामे करत असे. राजा झोपला (१) कि / की माकड त्याला वारा घालत असे. एकदा राजा गाढ झोपला असताना त्याच्या छातीवर एक माशी (२) बसलेली / झोपलेली माकडाने पाहिली. माकडाने ती माशी (३) पकडण्याचा / हाकलण्याचा खूप प्रयत्न केला; पण ती पुन:पुन्हा राजाच्या अंगावर बसत राहिली. शेवटी माकडाने माशीचा सोक्षमोक्ष लावायचे ठरवले. म्हणून त्या माशीला (४) फेकण्यासाठी / मारण्यासाठी



माकडाने राजाची तलवार घेतली. पुढच्या खेपेला माशी नेमकी राजाच्या नाकावर बसली. माकडाने त्या माशीला मारण्यासाठी तलवारीचा एकच (५) वार / मार केला. माशी काही मेली नाही, पण राजाचे नाक मात्र कापले गेले.

पंचतंत्रातील विभाग : ------------------------------------------------

तात्पर्य : ------------------------------------------------

इ. एकदा काही कबुतरे अन्नाच्या शोधात उडत उडत एका छोट्याशा गावात (१) पोहोचली / शिरली. तिथे एका घराच्या अंगणात खूप धान्य (२) सांडलेले / फेकलेले दिसले. आनंदाने सर्व कबुतरे ते दाणे (३) टिपू / खाऊ लागली. पण त्या दाण्यांखाली पारध्याने आपले जाळे पसरले होते. सर्व कबुतरे त्या जाळ्यात अडकली.



त्यांना सुटका करून घेणे जमेना. मग त्यातल्या एका कबुतराने इतर कबुतरांना शांत केले आणि ते म्हणाले, “आपण सगळे जोर लावून (४) जाळ्यासकट / जाळ्याबरोबर एकदम उडायचा प्रयत्न करू आणि पारध्यापासून दूर निघून जाऊ.” त्याचा सल्ला ऐकून सर्व कबुतरांनी जाळ्यासकट उड्डाण केले आणि आपले प्राण वाचवले. दूरच्या जंगलात जाऊन ती जमिनीवर (५) उतरली / पडली. त्यांच्या विनंतीवरून तिथल्या एका उंदराने ते जाळे कुरतडून सर्व कबुतरांची सुटका केली.

पंचतंत्रातील विभाग : ------------------------------------------------

तात्पर्य : ------------------------------------------------

**ख. रिकाम्या जागी योग्य वाक्यांश लिहा.**

**अ.**

त्याने एक युक्ती / सिंहानेच आवाज बदलून आतून / गुहेच्या बाहेर सिंहाची / नेहमी प्रतिसाद देत / खूप दिवस शिकार

एका म्हाताऱ्या सिंहाला १. ------------------------ मिळाली नाही. थकून तो भुकेला सिंह एका कोल्ह्याच्या गुहेत जाऊन लपला. कोल्हा गुहेकडे परतला तेव्हा त्याला २. ------------------------ पावलं दिसली. पण ती गुहेत जाणारी पावलं होती. बाहेर येणारी पावलं त्यात नव्हती. कोल्ह्याने ओळखलं की सिंह गुहेत बसून आपल्याला मारण्यासाठी वाट पाहतोय. म्हणून ३. ------------------------ केली. तो बाहेरून ओरडला, “हे गुहे, हे गुहे!” थोडा वेळ थांबून पुन्हा ओरडला, “हे गुहे, तू उत्तर का देत नाहीस? तू उत्तर दिल्याशिवाय मी आत येत नाही, हे तुला माहीत आहे ना?” सिंहाला वाटले, हा कोल्ह्याचा दिनक्रम असावा. आणि ही गुहा त्याला ४. ------------------------ असावी. पण आता आपल्याला घाबरून उत्तर देत नसावी. त्यामुळे ५. ------------------------ उत्तर दिलं, “आत ये, आत ये.” कोल्ह्याने सिंहाचा आवाज ओळखला आणि त्याने तिथून पळ काढला.



**आ.**

बेडूक विहिरीबाहेर / आपल्याशी भांडलेल्या बेडकांना / बेडकाला सापाने / एका बेडकाचे इतर बेडकांशी / आनंदाने अट

एका विहिरीत काही बेडूक राहत होते. त्यातल्या १. ------------------------------------------ कडाक्याचे भांडण झाले. रागावून तो २. ---------------------------------- येऊन बसला. तिथे एक साप त्याला खायला आला. बेडकाने त्या सापाकडे जीवदान मागितले. सापाने अट घातली, "तू मला या विहिरीतल्या बिळात लपू दिलेस आणि रोज बेडूक आणून दिलेस तर मी तुला खाणार नाही." बेडकाने ३. ---------------------------------- स्वीकारली. त्या दिवसापासून साप विहिरीच्या बिळात राहू लागला आणि बेडूक एकेक करून ४. ---------------------------------- त्या सापाचे भक्ष्य बनवून सूड उगवू लागला. पण हळूहळू विहिरीतले बेडूक संपू लागले आणि अखेर त्याही ५. ---------------------------------- खाऊन टाकले.



**ग. पुढील बोधकथांमध्ये अधोरेखित केलेल्या क्रियापदांच्या ऐवजी शक्य क्रियापदे योजून तेवढीच वाक्ये पुन्हा लिहा.**

अ. एका शेतकऱ्याचे तीन मुलगे फारच भांडखोर होते. ते सतत आपसांत भांडत असत. हे तो म्हातारा शेतकरी पाहू शकत नसे. एके दिवशी त्याने आपल्या मुलांना बोलावून सांगितले, "मी आता थोडेच दिवस काम करू शकेन. नंतर काही करू शकणार नाही. तेव्हा आता तुम्ही नीट एकत्र राहा, आपापली जबाबदारी सांभाळा आणि मला आराम करू द्या." पण मुलांचे एकमेकांशी पटत नसल्याने ती एकमेकांचे तोंडही बघू शकत नव्हती. मग शेतकऱ्याने प्रत्येकाला लाकडाची एकेक काठी दिली आणि ती तोडायला सांगितले. प्रत्येक मुलगा सहज आपापली काठी तोडू शकला. मग शेतकऱ्याने तशाच अनेक काठ्यांची एक मोळी त्यांना दिली आणि ती मोळी तोडायला सांगितले. आता मात्र खूप प्रयत्न करूनही एकही मुलगा ती मोळी तोडू शकला नाही. हे पाहून शेतकरी त्यांना म्हणाला, "एकटे असाल तर कोणीही तुम्हाला सहज तोडू शकेल, पण एकत्र राहाल तर कोणीही तुम्हाला तोडू शकणार नाही."



------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------

आ. एकदा एका ब्राह्मणाला त्याच्या यजमानाने एक बोकड भेट दिला. ब्राह्मण तर शाकाहारी होता. पण यजमानाने इतका आग्रह केला, की ब्राह्मण त्याचा आग्रह मोडू शकला नाही. शेवटी, आपण तो बोकड कोणाला तरी विकून पैसे मिळवू, असा विचार करून त्याने तो बोकड घेतला व तो आपल्या गावी निघाला. बोकडाला धरून ब्राह्मणाला चालता येईना. म्हणून त्याने त्या बोकडाला आपल्या खांद्यावर घेतले व तो पुढे चालू लागला. वाटेत त्याला तीन चोरांनी पाहिले. तो धष्टपुष्ट बोकड पाहून तिघांच्याही तोंडाला पाणी सुटले.



त्यांना राहवले नाही व ब्राम्हणाला फसवून तो बोकड मिळवायचे त्यांनी ठरवले. एक चोर ब्राह्मणाच्या समोर गेला व त्याने म्हटले, “अहो, तुम्ही तर ब्राह्मण! तुम्ही या कुत्र्याला खांद्यावरून घेऊन जात आहात हे मी पाहू शकत नाही.” “तो बोकड आहे, कुत्रा नाही,” असे म्हणून रागाने ब्राह्मण पुढे गेला. याच पद्धतीने एकेका चोराने ब्राह्मणाला अडवून प्रश्न विचारले. दुसऱ्या चोराने म्हटले, “का हो त्या मृत वासराला घेऊन निघालात? घाण वास घेणे शक्य नाही अगदी!” ब्राह्मण रागाने म्हणाला, “तो बोकड आहे, वासरू नाही.”

पुढे गेल्यावर त्याला तिसरा चोर भेटला. तो म्हणाला, “का हो भटजीबुवा, एवढे मोठे गाढव खांद्यावर उचलू कसे शकलात तुम्ही?” आता मात्र ब्राह्मण ते ऐकू शकला नाही. हा खरेच बोकड नाही की काय, असा विचार करून करून तो वैतागला. त्याला आणखी धीर धरता आला नाही आणि तो बोकड तिथेच सोडून देऊन तो आपल्या वाटेने निघून गेला. त्या चोरांनी मात्र यथेच्छ मेजवानी झोडली.

---------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------

४ **क. चो मराठी शिकते आहे आणि तिने शीतलला पत्र लिहिले आहे. पण त्यात तिने खूप चुका केल्या आहेत. त्या सुधारून ती वाक्ये पुन्हा लिहा.**

प्रिय शीतल,

तू मला विचारलं होतास ना चिनी लोककथानबद्दल, तर मी माझ्या आईला विचारलं. तिने सांगितलं,




चीनी लोककथामध्ये गाणी, कविता, नृत्य, कळसूत्री बाहुल्या आणि कहाण्यांचा समावेश आहे. हे नेहमी मानवी निसर्ग, ऐतिहासिक किंवा पौराणिक घटना, प्रेम, आणि अलौकिक गोष्टी, किंवा नैसर्गिक घटनांचे वर्णन करणारे कथा आणि विशिष्ट ठिकाणांची कथा सांगते. चिनी लोकप्रिय पौराणिक कथा चिनी संस्कृतीमध्ये एक महत्त्वाचा घटक आहे. मुख्य चिनी प्रभाव ताओवाद, कन्फ्यूशियनिझम आणि बौद्ध धर्म आहे.

लोककथातील लोककथांमध्ये वस्तू आणि प्राणी यांच्यासाठी अनेक प्रतीकात्मक अर्थ आहेत.

मला आवडणारी कथा म्हणजे “रिकामी कुंडी”. कदाचित तू वाचली असशील. तुला कोणती गोष्ट आवडते. कळव.

तुझीच,

चो.

---

## ५ क. उतारा वाचून महत्त्वाचे मुद्दे अधोरेखित करा.

पाईपरची गोष्ट जरी प्रत्येक लेखकाने आपल्या शैलीत गोष्टीचा शेवट न करता वाढवली असली आणि अनुवादित केली असली, तरी या गोष्टीची उत्कृष्ट आवृत्ती १८१६ मध्ये छापलेल्या 'जर्मन लेजंड्स' या ग्रीम्स ब्रदर्स कलेक्शनमध्ये दिसून येते. या भावांनी या गोष्टीला नाव दिले 'द चिल्ड्रन ऑफ हामेल्न'.



१२८४ साली हामेल्नमध्ये एक रहस्यमय माणूस अवतीर्ण झाला. लाल शर्ट, निळे जाकीट, हिरवी पँट आणि पिवळी टोपी असे रंगीबेरंगी कपडे घातलेल्या माणसाची ओळख त्याने घातलेल्या पोशाखावरून पाईड पाईपर अशी होती. तो स्वतःला उंदीर पकडणारा म्हणवत होता. त्याने काही रकमेच्या बदल्यात शहरातील सगळ्या उंदीर-घुशींपासून शहरवासीयांची मुक्तता करण्याचे वचन दिले. शहरवासीयांनी ते मान्य केले.

त्याने कोटातून पाईप काढून वाजवायला सुरुवात केल्यावर घराघरातून उंदीर बाहेर पडून त्याच्याभोवती जमा झाले. तो पाईप वाजवत वेजर नदीपाशी आला. त्याने आपले कपडे काढले आणि तो नदीच्या पाण्यात उतरला. पाठोपाठ सारे उंदीर त्याच्या मागोमाग आले आणि नदीत वाहून गेले.

आता संपूर्ण शहर उंदरांपासून आणि प्लेगपासून मुक्त झाले. पण याच वेळी त्या शहरवासीयांनी पाईड पाईपरला मंजूर केलेली रक्कम देण्याचे नाकारले. या घटनेने क्रोधित होऊन पाईड पाईपर शहरातून निघून गेला.

तो २६ जूनला पुन्हा शहरात परतला. या वेळी त्याने शिकाऱ्याचा वेष परिधान केला होता. त्याचे रूपही भयंकर होते. त्याने डोक्यावर चमत्कारिक लाल टोपी घातली होती. त्याने रस्त्यावर आपला पाईप वाजवायला सुरुवात केली. पण या वेळी त्याच्या अवतीभवती उंदीर-घुशी न जमता शहरातील मुले-मुली मोठ्या संख्येने जमली. यात नगरप्रमुखांची मुलगीही होती. हे सगळे त्याच्या मागोमाग मंत्रमुग्ध होऊन चालू लागले. ते एका पर्वतापर्यंत गेले जिथे तो मुलांसकट अदृश्य झाला. ही सगळी १३० मुले होती. या दुर्घटनेतून दोनच मुले मागे परतली. एकाला दिसत नव्हते व दुसरा मूकबधिर होता.

शहरातल्या ज्या रस्त्यावरून ही मुलं गेली आणि पुढे अदृश्य झाली, त्या रस्त्यावर आजही कोणतेही वाद्य वाजवले जाऊ नये असा रिवाज आहे.

**ख. उताऱ्यात आलेल्या रंगविशेषणांना तीव्रतादर्शक शब्द जोडून लिहा.**

उदा॰ लाल शर्ट – लालभडक शर्ट

अ. निळे जाकीट - ..............................

आ. हिरवी पँट - ..............................

इ. पिवळी टोपी - ..............................

**ग. पुढील अर्थांसाठी उताऱ्यात आलेले शब्दसमूह शोधा.**

| | | |
|---|---|---|
| अ. | अचानक आगमन होणे = | ---------- |
| आ. | सुटका होणे = | ---------- |
| इ. | कपडे घालणे = | ---------- |
| ई. | प्रभावित होणे = | ---------- |
| उ. | दिसेनासे होणे = | ---------- |

## ६ क. ला फोन्तेनची एक कथा वाचा.

**ओक वृक्ष आणि लव्हाळे**



एक भव्य ओक वृक्ष लव्हाळ्याला म्हणाला, “निसर्गानं तुमच्यावर जरा अन्यायच केला आहे. चिमुकल्या पाखराचंही ओझं वाटावं इतके तुम्ही नाजूक आहात. पाण्यावर जेमतेम बारीक तरंग उमटवू शकणारी वाऱ्याची झुळूकही तुम्हाला वाकवू शकते. पण माझं मस्तक केवळ सूर्यकिरणांनाच थोपवून धरत नाही, तर वादळालाही आव्हान देतं. तुमच्यासाठी लहानसहान संकटंही जिवावरची असतात, तर माझ्यासाठी सगळंच किरकोळ असतं. जर तुम्ही माझ्या पर्णछायेखाली जन्म घेतलात, तर तुम्हाला त्रास सोसावा लागणार नाही. वादळवाऱ्यापासून मी तुमचं रक्षण करीन. पण बरेचदा तुम्ही वाऱ्याच्या राज्यात दमट किनाऱ्यांवर उगवता. मला वाटतं, की निसर्ग तुमच्यावर फारच अन्याय करतो.”

“तुमचं हे कनवाळू बोलणं तुमच्या भल्या स्वभावातूनच आलं आहे,” लव्हाळे म्हणाले, “पण तुम्ही ही चिंता सोडून द्या. आम्ही वाकतो; मोडत नाही. आमच्यापेक्षा तुम्हालाच वादळवाऱ्यापासून अधिक धोका असतो. आजवर तुम्ही न झुकता त्याचे तडाखे झेलले आहेत. पण थोडं आणखी थांबा आणि पहा.”

लव्हाळे एवढे म्हणत होते तोच उत्तरेकडील क्षितिजाकडून भीषण वादळ सोसाट्याने झेपावत येऊ लागले. वृक्ष ताठ उभा राहिला आणि लव्हाळ्यांनी मान तुकवली. वादळाने आपला वेग वाढवला. इतका, की ज्याचे मस्तक आकाशाला टेकत होते आणि ज्याची मुळे जमिनीखालील मृत्यूच्या साम्राज्यापर्यंत पोहचत होती, तो वृक्ष उन्मळून भुईसपाट झाला.

**शब्दार्थ**

थोपवून धरणे – अडवणे; अडवून धरणे; पुढे जाऊ न देणे
जिवावरची – जीवघेणी; प्राणघातक
पर्णछाया – पानांची सावली
कनवाळू – दयाळू
तुकवणे – वाकवणे; झुकवणे
भुईसपाट – जमिनीवर आडवा

**ख. या कथेला शीर्षक द्या व तिचे तात्पर्य लिहा.**

शीर्षक ------------------------------------------------------------

तात्पर्य ------------------------------------------------------------

**ग. वरील कथेचा आशय स्पष्ट करा.**

------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------

## ७ पुढील वाक्यांमध्ये योग्य संख्यावाचक विशेषणे लिहा.

(दहा-सव्वादहाला, सगळे, अर्धा-अर्धा, पाचा-पाचाची)

क. आपापली तिकिटे दाखवण्यासाठी ---------------- रांगेत उभे राहिले.

ख. ---------------- नाणी जमवून तिने एकूण दोनशे रुपये जमवले.

ग. वडे सहा आणि खाणारे बारा. म्हणून प्रत्येकाने ---------------- वडा खाल्ला.

घ. साधारण ---------------- दुकान बंद होतं आमचं.



**८ खालील वाक्ये आणि क्रियापदे यांच्या योग्य जोड्या लावा आणि त्या क्रियापदाचे योग्य रूप रिकाम्या जागी लिहा.**

| | |
|---|---|
| क. हिवाळ्यात सकाळी उशिरा ------------------------------------------------ | मळमळणे |
| ख. घाटातल्या वळणांमुळे मला फारच -------------------------------------- | गडगडणे |
| ग. नली आईवडिलांशिवाय पहिल्यांदाच परगावी राहिली, पण आजीमुळे तिला ------------------------------------------------------------------ | उजाडणे |
| घ. आता परतीचा पाऊस, त्यामुळे हल्ली रोजच संध्याकाळी ------------------------------------------------------------------ | अंधारणे |
| च. इथे उशिरा ------------------------------, त्यामुळे रात्र झालेली कळत नाही. | करमणे |





# तोंडी परीक्षा

**एकूण गुण २०**

## १. वाचन व आकलन (७)

**क. पुढील बातमी मोठ्याने वाचा.** **(३)**

**९९ वे अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन नागपुरात**

**नाट्य परिषदेच्या नियामक मंडळाच्या बैठकीत शिक्कामोर्तब; २२ ते २५ फेब्रुवारीदरम्यान आयोजन**

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या वतीने आयोजित ९९ वे अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन यंदा नागपूरमध्ये २२ ते २५ फेब्रुवारीदरम्यान होणार आहे. मुंबईत झालेल्या नाट्य परिषदेच्या नियामक मंडळाच्या बैठकीत ही घोषणा करण्यात आली. ३३ वर्षांनी नाट्य संमेलन आयोजित करण्याचा मान विदर्भाला मिळाला आहे.

नाट्य संमेलनाच्या अध्यक्षांची घोषणा झाली, परंतु स्थळाबाबत निर्णय झाला नव्हता. यावर्षी नाट्य संमेलनासाठी ९ प्रस्ताव आले होते. त्यापैकी सात स्थळांनी प्रस्ताव आधीच मागे घेतले. त्यामुळे लातूर आणि नागपूर अशी दोन स्थळे स्पर्धेत होती. आज गुरुवारी नाट्य परिषदेच्या मध्यवर्ती शाखेच्या नियामक मंडळाच्या बैठकीत नागपूरवर शिक्कामोर्तब करण्यात आले. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद नागपूर शाखा या संमेलनाचे आयोजन करणार आहे.

दरम्यान, नाट्य संमेलन नागपूरला घेण्याचे निश्चित झाले असून शहरातील कलावंतांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. कुठलेही वाद न होता सर्वांना विश्वासात घेऊन नाट्य संमेलन यशस्वी करू, असा विश्वास नाट्य परिषद नागपूर शाखेचे अध्यक्ष प्रफुल फरकसे आणि मध्यवर्ती शाखेचे उपाध्यक्ष नरेश गडेकर यांनी व्यक्त केला. नागपुरात सुरेश भट सभागृह आणि रेशीमबाग मैदान या ठिकाणी नाट्य संमेलन होणार आहे.

**३३ वर्षांनंतर पुन्हा बहुमान**

विदर्भात १९९२मध्ये मो. वि. जोशी यांच्या अध्यक्षतेखाली अमरावतीला, १९३९ मध्ये कारखानीस यांच्या अध्यक्षतेखाली नागपूरला, १९६२ मध्ये शं. नी. चाफेकर यांच्या अध्यक्षतेखाली नागपूरला, १९७५ मध्ये भालचंद्र पेंढारकर यांच्या अध्यक्षतेखाली यवतमाळला, १९८२ मध्ये पं. वसंतराव देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली अकोल्याला आणि १९८५ मध्ये प्रभाकर पणशीकर यांच्या अध्यक्षतेखाली नागपूरला संमेलन झाले होते. १९८५ नंतर विदर्भात २२ ते २५ फेब्रुवारी २०१९ मध्ये ज्येष्ठ नाटककार प्रेमानंद गज्वी यांच्या अध्यक्षतेखाली ३३ वर्षांनंतर नाट्य संमेलन झाले.

**नागपूरकर संमेलन यशस्वी करतील**

९९ व्या नाट्य संमेलनासाठी लातूर आणि नागपूर असे दोन प्रस्ताव होते. दोन्ही शहरांतील पदाधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात आली. दोन्ही संमेलन स्थळांची पाहणी यापूर्वीच करण्यात आल्यामुळे नागपूरचे नाव जाहीर करण्यात आले. नागपुरातील सर्व कलावंत एकत्र येऊन नाट्य संमेलन यशस्वी करतील, असा विश्वास आहे. मध्यवर्ती शाखेचे सर्व पदाधिकारी आणि कलावंत त्यासाठी मेहनत घेतील.

**– प्रसाद कांबळी, अध्यक्ष, अ. भा. मराठी नाट्य परिषद**

**ख. कंसातील सूचनेप्रमाणे प्रश्न सोडवा.** **(४)**

अ. नागपूरमध्ये झालेल्या साहित्य परिषदेच्या नियामक मंडळाच्या बैठकीत ३२ व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाबाबतची घोषणा करण्यात आली. (वाक्यातील चुका दुरुस्त करून बरोबर वाक्य बोलून दाखवा.) (२)

आ. 'अनेक पर्यायांमधून एक पर्याय निवडणे' या अर्थाचा वरील बातमीत आलेला वाक्प्रचार कोणता? (१)

इ. नागपूरमध्ये चौथ्यांदा अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन होत आहे. (यंदाचे अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन हे ... आवश्यक ते बदल करून वाक्य पूर्ण करा.) (१)

## २. कोणत्याही एका चित्राचे वर्णन करा. **(४)**

क.



ख.



## ३. खालील चिठ्ठ्यांमधून कोणत्याही दोन चिठ्ठ्या निवडा व त्यातील केवलप्रयोगी अव्ययाचा दिलेला अर्थ स्पष्ट होईल असे वाक्य बनवा. **(४)**

- अरे वा ! (विरोध)
- वा ! (प्रशंसा)
- शी ! (विरोध)
- शी ! (घृणा)

## ४. तुम्हाला आवडलेली एखादी बोधकथा मराठीत थोडक्यात सांगा. त्या कथेतून तुम्ही काय शिकलात तेही सांगा. **(५)**

# लेखी परीक्षा

एकूण गुण ३०

## १. व्याकरण (एकूण गुण ११)

**क. खालील तक्ता पूर्ण करा.** **(६)**

| वर्तमानकाळ | भूतकाळ | भविष्यकाळ |
| --- | --- | --- |
| ---------------- | माकडाला झाडावर चढवले नाही. | ---------------- |
| ---------------- | ---------------- | कावळ्याला पाणी पिववणार नाही. |
| वाघाला बायकोचे मन मोडवत नाही. | ---------------- | ---------------- |

**ख. कंसातील सूचनेप्रमाणे बदल करून उत्तरे लिहा.** **(५)**

अ. गार्गीला सिनेमा पाहण्याचं भारी वेड. ती जवळपास दररोज एक सिनेमा पाहते. ('इतका, इतकी, इतके / इतकं ... की' वापरून वाक्य पुन्हा लिहा.)

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

आ. आज सकाळी उशिरा ---------------------- (योग्य अकर्तृक क्रियापद वापरा.)

इ. ते शहर चांगलं पण असुरक्षित आहे. ('तसा, तशी, तसे तसं ... पण' वापरून वाक्य पुन्हा लिहा. 'पण' ने सुरू होणारे वाक्य नकारार्थी असावे.)

ई. रिक्षासाठी सुटे पैसे हवेत. जरा ------------------------------ काही नोटा दे. (योग्य संख्याविशेषण वापरा.)

उ. ------------------ पाऊस सुरू झाला. (लगेच, अचानक यांपैकी योग्य क्रियाविशेषण वापरा.)

## २. शब्दसंपदा (१४)

**क. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.** **(५)**

अ. समुद्र : निळाशार :: पाणी : ----------------------------

आ. पुतळा : भलामोठा :: इमारत : ----------------------------

इ. नागपूर : नागपुरातल्या :: नाशिक : ----------------------------

ई. नाशिक : श्री सप्तश्रृंगी गड :: नागपूर : ----------------------------

उ. नाट्यपूर्ण कहाणी : फेबल :: संदेशाचे आध्यात्मिक व पारलौकिक स्वरूप : ----------------

**ख. खालील नाम-क्रियापद जोड्यांच्या त्यांच्या अर्थाशी जोड्या लावा.** **(३)**

| | |
|---|---|
| अ. बोध घेणे | १. लक्षपूर्वक ऐकणे |
| आ. कान देऊन ऐकणे | २. पवित्र होणे |
| इ. उत्सुकता ताणणे | ३. शिकवण घेणे |
| ई. पावन होणे | ४. स्वीकृती मिळणे |
| उ. मान्यता मिळणे | ५. अधीर होणे |

**ग. वरीलपैकी कोणत्याही तीन जोड्यांचा वाक्यात उपयोग करा.** **(६)**

१. ------------------------------------------------

------------------------------------------------

२. ------------------------------------------------

------------------------------------------------

३. ------------------------------------------------

------------------------------------------------

## ३. लेखन

**(एकूण गुण ५)**

**खालील गोष्ट तुम्ही कशी पूर्ण कराल?**

आईबाबांशी भांडून, त्यांच्यावर रागावून एकदा छोटा गोगी घरातून निघून जातो. आपली सायकल घेऊन. वाट फुटेल तिकडे सायकल चालवत राहतो. नवा खेळ आणला नाही म्हणून आईबाबांशी भांडणाऱ्या गोगीला कुठे ठाऊक असतं की एक वेगळाच खराखुरा, साहसी खेळ वाटेत त्याची वाट बघतोय...

------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

# तोंडी परीक्षा

(एकूण गुण २५)

## १. खालील गोष्ट मोठ्याने वाचून दाखवा आणि त्यापुढील प्रश्नांची उत्तरे द्या.

(एकूण गुण ९)

**शेतकरी आणि कोल्हा** **(वाचन गुण ३)**

एक कोल्हा एका शेतकऱ्याच्या पिकाची फार नासाडी करत असे. शेतकऱ्याचं फार नुकसान होत असे. आता मात्र कोल्ह्याचा कायमचा बंदोबस्त करायचाच, असं एकदा शेतकऱ्यानं ठरवलं. नवं पीक शेतात उभं राहिलं. कोल्ह्याला पकडण्यासाठी शेतकऱ्यानं जाळं लावलं आणि तो वाट बघू लागला. अखेर एक दिवस कोल्हा त्यात सापडला. शेतकऱ्याला आनंद झाला. कोल्ह्याला जन्माची अद्दल घडवावी ह्या उद्देशानं शेतकऱ्यानं त्याच्या शेपटाला कापडाच्या चिंध्या गुंडाळल्या, त्यावर तेल ओतलं आणि पेटवून दिलं. कोल्हा घाबरला आणि सैरावैरा पळू लागला. पळता पळता तो शेतकऱ्याच्या घरात शिरला. घराला आग लागली. शेतकऱ्यानं त्याला बाहेर हुसकलं आणि तो आग विझवण्याची खटपट करू लागला. इकडे भांबावलेला कोल्हा शेतातील उभ्या पिकात शिरला आणि त्यानं शेतही पेटवून दिलं. हे पाहून शेतकरी शेताकडे धावला. अखेर घर नष्ट झालं आणि पीकही जळून गेलं. कोल्ह्याचं शेपटीवर निभावलं, पण शेतकऱ्याचं मात्र सर्वस्व गेलं.



**(क, ख, ग – प्रत्येकी २ गुण)**

१. वरील कथेत शेतकऱ्याने केलेल्या काही गोष्टींचा परिणाम म्हणून पुढील काही घटना घडतात. शक्य तिथे परिणामबोधक अव्यये 'म्हणून, त्यामुळे, ...' वापरून ही कथा परत सांगा.
(उदा॰ शेतकऱ्याने जाळं लावलं, म्हणून... )

२. आता हीच कथा शक्य तिथे 'जर-तर' वापरून सांगा.
(उदा॰ जर शेतकऱ्याने जाळं लावलं नसतं, ... )

३. ह्या कथेपासून तुम्ही काय बोध घ्याल? एका वाक्यात सांगा.

## २. चित्रवर्णन

(एकूण गुण ५)

खाली काही चित्रांच्या जोड्या दिल्या आहेत. परीक्षार्थ्यांच्या जोड्या करा. जोडीतील प्रत्येकाला चित्रांच्या जोडीतील एक चित्र मिळेल. पुढे दिलेल्या प्रश्नांच्या मदतीने आपल्याला मिळालेल्या चित्राचे वर्णन करून एकमेकांशी संवाद साधा.

परीक्षार्थी १









परीक्षार्थी २









सहाध्यायाला विचारण्यासाठी प्रश्न : चित्रामध्ये काय दिसत आहे? चित्रामध्ये कोणता विषय हाताळला आहे? ह्या विषयावर तुमचे काय मत आहे? ...

## ३. संवादकौशल्य **(एकूण ६ गुण)**

चर्चेसाठी काही विषय पुढे दिले आहेत. प्रत्येक विषयाच्या दोन चिठ्ठ्या आहेत. परीक्षार्थ्यांच्या जोड्या करा. जोडीतील प्रत्येकाला एका विषयाची एक चिठ्ठी मिळेल. चिठ्ठीत दिलेल्या सूचनेनुसार आपल्या सहाध्यायाशी संवाद साधा आणि चर्चेतून आपले मत पटवून द्यायचा प्रयत्न करा. मदतीसाठी काही मुद्दे दिले आहेत. एकट्याने तयारी करण्यासाठी १० मिनिटे वेळ आहे. तुम्ही टिपणे काढू शकता, पण नंतर ती न वाचता बोला.

| | परीक्षार्थी १ | परीक्षार्थी २ |
|---|---|---|
| क. | तुम्हाला चित्रपटगृहात जाऊन चित्रपट पाहायला आवडतं. तसं तर टीव्हीवर, आयपॅडवर आणि अगदी मोबाईलवरही सिनेमा पाहता येतो. पण ...<br>मुद्दे – चित्रपटगृहात जाऊनच सिनेमा का पाहावा? तुमचं मत आणि त्याची कारणं. | तुम्हाला घरात बसून टीव्हीवर सिनेमा बघायला आवडतं. सिनेमा बघताना चित्रपटगृहात बरेच व्यत्यय येतात असं तुम्हाला वाटतं आणि कोणतेही व्यत्यय आलेले तुम्हाला चालत नाहीत.<br>मुद्दे – कोणते आणि कसे व्यत्यय येतात आणि त्यांचा परिणाम काय होतो? |
| ख. | तुम्हाला गावात निसर्गाच्या सान्निध्यात एका टुमदार कौलारू घरात राहायला आवडेल. शहरातलं प्रदूषण आणि गर्दी-गडबड टाळण्यासाठी तुम्ही इतर अनेक गैरसोयी स्वीकारायला तयार आहात.<br>मुद्दे – स्वच्छ हवा, शांतता, मनःशांती ... | तुम्ही पक्के शहरी आहात. शहरातल्या सुखसोयी आणि सुविधा ह्यांची किंमत म्हणून ध्वनी आणि वायुप्रदूषण ह्यांचा स्वीकार करायला तुम्ही तयार आहात.<br>मुद्दे – चांगली शाळा-कॉलेजं, हॉटेलं, इतर आधुनिक सोयीसुविधा ... |
| ग. | उच्च शिक्षणासाठी भारतापेक्षा परदेशात जास्त वाव आहे असं तुम्हाला वाटतं. परदेशातील पदवी असेल तर नोकरीच्या संधीही जास्त चांगल्या असतात असं तुमचं मत आहे.<br>मुद्दे – म्हणूनच दरवर्षी हजारो भारतीय विद्यार्थी उच्चशिक्षणासाठी परदेशी जातात... | भारतातही चांगल्या दर्जाचं शिक्षण मिळतं आणि त्यानंतर देशात आणि परदेशातही खूप चांगल्या नोकऱ्या मिळू शकतात.<br>मुद्दे – बरेच परदेशी विद्यार्थी शिक्षणासाठी भारतात येतात आणि इथली पदवी घेऊन परदेशात चांगल्या नोकऱ्या मिळवतात. |
| | तुम्हाला मित्र आणि सहकाऱ्यांबरोबर काम करायला आवडतं. त्यामुळे काम अधिक वेगानं आणि तत्परतेनं होतं असं तुम्हाला वाटतं.<br>मुद्दे – अडचण आल्यास सल्लामसलत करता येते; अनुभवांची देवाणघेवाण होते ... | तुम्हाला शक्यतो एकट्यानं काम करायला आवडतं. एकांतात काम जास्त चांगलं आणि मनासारखं करता येतं.<br>मुद्दे – वादविवाद टळतात; कामावर लक्ष जास्त केंद्रित करता येतं ... |

## ४. प्रतिक्रिया द्या. (एकूण गुण ५)

शिक्षक काही विधाने करतील. त्या विधानांवर खालील वाक्प्रचार / म्हणी वापरून प्रतिक्रिया द्या.

उदा॰ तिला ऑफिसात जायला एक स्कूटर हवी होती. आज अचानक एका लॉटरीत तिला एक चार चाकी गाडी बक्षीस मिळाली.

उत्तर- अरे वा! ह्याला म्हणतात 'आंधळा मागतो एक डोळा आणि देव देतो दोन'!

१. वड्याचं तेल वांग्यावर

२. लोकां सांगे ब्रह्मज्ञान, स्वतः कोरडे पाषाण

३. कोल्हा काकडीला राजी

४. खाईन तर तुपाशी, नाही तर उपाशी

५. आधी पोटोबा मग विठोबा

क. हे काम पूर्ण झाल्यावर मगच आपण जेवायला जाऊ या. चालेल ना?

ख. माझ्या आईची शेजारीण रोज मोठ्याने गाणी लावते. माझ्या आईला फार त्रास होतो. आता मीपण तिच्या म्हाताऱ्या आईच्या घराजवळ खूप आवाज करणारे फटाके लावणार आहे.

ग. आमच्या विभागातला नगरसेवक रोज पाणी वाचवा म्हणून सांगत असतो. त्याच्या घरातील नळ मात्र सतत वाहत असतो.

घ. तिला हवी तशी डिझायनर साडी काही कुठे मिळत नव्हती. शेवटी तिने एक फारशी न आवडलेली साडी तोंड वाकडं करत घेऊन टाकली.

च. हे बघ, मला आयफोनच हवाय. देणार आहेस का? नाही तर मग फोनच नको.



# लेखी परीक्षा

**एकूण १०० गुण**

## १. वाचन आणि आकलन (एकूण गुण १०)

**पश्चिम घाट – जागतिक वारसा**

जागतिक वारसा म्हणून घोषित झालेला हा पश्चिम घाट आहे तरी कसा? उंच उंच डोंगर, घनदाट जंगले, विविध प्रकारचे प्राणी आणि पक्षी, हजारो प्रकारच्या वनस्पती ... ही आहे भारतातली महान भौगोलिक पर्वतशृंखला. संयुक्त राष्ट्रसंघाच्या शैक्षणिक,वैज्ञानिक आणि सांस्कृतिक संघटनेनं पश्चिम घाटाला दुर्मीळ जागतिक वारसा म्हणून घोषित केलं आहे.

भारताच्या नकाशावर डावीकडे महाराष्ट्र, गुजरात आणि गोव्यापासून खाली कन्याकुमारीपर्यंत जाणारी एक रेषा दिसते. ही रेषा म्हणजे पश्चिम घाट असून १६०० किलोमीटर लांबीचा आणि १०० किलोमीटर रुंदीचा हा परिसर आहे. जैवविविधतेने संपन्न असलेला हा परिसर जागतिक हॉटस्पॉट (अतिसंवेदनशील) म्हणून ओळखला जातो. हिमालय पर्वतरांगांपेक्षाही पश्चिम घाट जुना असून भारतातील २४ कोटी जनतेची तहान भागवण्याचे काम पश्चिम घाट वर्षानुवर्षे करत आहे. पश्चिम घाट परिसरात मोठ्या प्रमाणात वन्यजीवसंपदा असून १३९ प्रकारचे सस्तन प्राणी, १७९ जातींचे उभयचर प्राणी, ५०८ जातींचे पक्षी आढळतात. पश्चिम घाटाचे वैशिष्ट्य म्हणजे ह्यापैकी ६ प्रकारचे सस्तन प्राणी, १६ जातींचे पक्षी आणि ८४ प्रजातीचे उभयचर केवळ ह्याच प्रदेशात आढळतात. त्यामध्ये काही फुलपाखरे आणि सापांच्या जातींचा समावेश आहे.



पश्चिम घाटाला महाराष्ट्रात सुरुवात होते. त्यामध्ये माथेरान, लोणावळा, खंडाळा, महाबळेश्वर, पांचगणी, आंबोली घाट ह्यांचा समावेश आहे. ह्या पर्वतरांगेच्या महाराष्ट्रातील भागाला 'सह्याद्री पर्वत' म्हणून ओळखतात, तर पुढे कर्नाटक आणि केरळात 'साह्या पर्वतम्' म्हटले जाते.

रिओ द जानेरो येथे झालेल्या 'जागतिक वसुंधरा' परिषदेमध्ये (१९९२) पश्चिम घाटाची गणना जगातील अठरा अतिसंवेदनशील अशा पर्यावरणीय क्षेत्रांमध्ये करण्यात आली आहे. भारत सरकारने येथील जैवविविधतेचे जतन व संवर्धन करण्यासाठी अनेक उपाययोजना केल्या आहेत. त्यासाठी दोन राखीव प्रदेश, १३ राष्ट्रीय उद्याने, अनेक वन्यप्राणी अभयारण्ये व राखीव जंगलांची घोषणा केली आहे.

**क. शब्द आणि अर्थ ह्यांच्या जोड्या लावा.** (गुण ४)

| | शब्द | | अर्थ |
|---|---|---|---|
| १ | सस्तन | क | जमीन व पाणी या दोन्ही ठिकाणी राहू शकणारा प्राणी |
| २ | उभयचर | ख | अनेक प्रकारच्या सजीवांचे अस्तित्व असणारा प्रदेश |
| ३ | जैवविविधता | ग | जिथे वन्यप्राणी सुखरूप जगू शकतील असा राखीव प्रदेश |
| ४ | अभयारण्य | घ | आपल्या पिलांना अंगावर दूध पाजणारा प्राणी |

**ख. पश्चिम घाटाची चार वैशिष्ट्ये सांगा :** **(गुण २)**

१. ---------------- २. ----------------

३. ---------------- ४. ----------------

**ग. बरोबर की चूक ते सांगा.** **(गुण ४)**

| | बरोबर | चूक |
|---|---|---|
| १. पश्चिम घाट म्हणून संबोधल्या जाणाऱ्या प्रदेशात फक्त महाराष्ट्र, गुजरात आणि गोवा ही राज्ये येतात. | ☐ | ☐ |
| २. पश्चिम घाटाला महाराष्ट्रात सह्याद्री पर्वत आणि कर्नाटक आणि केरळात 'साह्या पर्वतम्' म्हटले जाते. | ☐ | ☐ |
| ३. 'पश्चिम घाट' जगातील अतिसंवेदनशील पर्यावरण असलेल्या प्रदेशांपैकी एक प्रदेश आहे. | ☐ | ☐ |
| ४. संयुक्त राष्ट्रसंघाने येथील जैवविविधतेचे जतन व संवर्धन करण्यासाठी अनेक उपाययोजना केल्या आहेत | ☐ | ☐ |

## २. लेखन **(एकूण १० गुण)**

**पुढीलपैकी कोणत्याही एका विषयावर १२ ते १५ ओळींचे ई-मेल लिहा.**

क. तुम्ही महाराष्ट्रातल्या ---------- शहराला नुकतीच भेट दिलीत. ह्या शहराबद्दल तुमच्या मित्राला/मैत्रिणीला एक छोटेसं ई-मेल लिहून माहिती द्या. (१२ ते १५ ओळी)
त्यात पुढील गोष्टींचा उल्लेख असू दे –
१. भौगोलिक स्थान २. हवामान ३. माणसे ४. प्रेक्षणीय स्थळे ५. इतर वैशिष्ट्ये

ख. तुमच्या मराठी मैत्रिणीने तुम्हाला काल जेवायला बोलावलं होतं. तिला आभाराचं ई-मेल लिहा (१२ ते १५ ओळी) आणि तुम्हाला जेवण का आवडलं तेही थोडक्यात सांगा.
त्यात पुढील गोष्टींचा उल्लेख असू दे –
१. जेवणाच्या ताटाची रचना २. पदार्थांची चव आणि वैविध्य
३. संतुलित आहाराचा विचार ४. इतर वैशिष्ट्ये

## ३. व्याकरण **(एकूण ६५ गुण)**

**१. साहाय्यक क्रियापद आणि धातुसाधित क्रियापद यांच्या योग्य त्या जोड्या निवडा.** **(गुण ५)**

क. बरेच पोपट बोलतात. आमचा पोपट तर चार भाषा ---------- ----------.
१. बोलू म्हणतो २. बोलू पाहतो ३. बोलू शकतो

ख. त्या खानावळीतला आचारी प्रत्येक पदार्थ आधी स्वतः ---------- ----------.
१. चाखून टाकतो  २. चाखून बघतो  ३. चाखून ठेवतो

ग. उंच टाचांच्या बुटांची तुला सवय नाहीये. आधी जरा ---------- ----------, जमतंय का ते.
१. चालून बघ  २. चालून घे  ३. चालून ठेव

घ. तब्येत चांगली ठेवायची असेल तर रोज ताज्या भाज्या आणि फळे ---------- ----------.
१. खाल्ली हवीत  २. खाल्ली पाहिजेत  ३. खाल्ली असावीत

**च.** हे यश मिळण्यासाठी मला बरीच मेहेनत ---------- ----------.
१. घ्यावी वाटली  २. घ्यावी लागली  ३. घ्यावी म्हटली

**२. योग्य ते साहाय्यक क्रियापद निवडून त्याचे योग्य ते रूप लिहा. (गुण ५)**

क. तिने ते पत्र माझ्या हातात दिले आणि काहीही न बोलता ती चालती ----------.
१. होणे  **२.** जाणे  **३.** निघणे

ख. आमची वाट न पाहता आजोबा एकटेच डोंगर चढायला ----------.
१. घेणे  २. होणे  **३.** लागणे

ग. तिच्याकडे ओळखपत्र नव्हते, तरी दारवानाने तिला सभागृहात जाऊ ----------.
१. घेणे  **२.** शकणे  **३.** देणे

घ. लहान मुलांना रोज एक तास टीव्ही बघू ----------.
१. पाहणे  २. लागणे  ३. देणे



च. त्याच चुका तुम्ही परतपरत कशा करत ----------?
१. राहणे  २. शकणे  ३. येणे

**३. कालवाचक विशेषण की क्रियाविशेषण? योग्य ते रूप निवडून रिकाम्या जागा भरा. (गुण ४)**

(सकाळी, सकाळच्या, दुपारी, दुपारच्या, संध्याकाळी, संध्याकाळचा, रात्री, रात्रीच्या)

---------- वेळी कोवळ्या उन्हात फिरायला जाणे चांगले असते. महिमा तेच करते. निकिता मात्र ---------- वेळी कडकडीत उन्हात घराबाहेर पडते. ---------- केलेल्या चालण्याच्या व्यायामाने महिमाला दिवसभर उत्साही वाटतं. निकिता मात्र ---------- केलेल्या दगदगीने थकून जाते. महिमा ---------- परत मैत्रिणींबरोबर फिरून येते आणि मग ---------- स्वयंपाकाला लागते. निकिता ---------- वेळ घरातच घालवते. मग कसाबसा स्वयंपाक उरकते आणि ---------- लवकर झोपते.

**४. उजव्या रकान्यात दिलेल्या क्रियापद-नामांपैकी योग्य नाम निवडा आणि त्याचे सप्तमीचे रूप करून रिकाम्या जागा भरा.** **(गुण ४)**

| | |
|---|---|
| बहुतेक स्त्रिया लग्नानंतरचा आपला जास्त वेळ घरकाम .........., स्वयंपाक .........., मुले झाली की त्यांना .........., त्यांचा अभ्यास घेण्यात घालवतात. सचिनला हे अगदी मान्य नव्हते. आपल्या बायकोने आपल्याला धंद्यात मदत करावी, धंदा .......... .......... तिचा बरोबरीचा वाटा असावा, असे त्याला वाटे. म्हणूनच उच्चशिक्षित विदिशाशी त्याने लग्न केले.<br>मात्र लग्नानंतर जेव्हा विदिशा सर्व फावला वेळ मित्रमंडळींबरोबर सिनेमे .......... आणि .......... घालवू लागली तेव्हा मात्र निर्णय .......... आपण चुकलो की काय, असा विचार त्याच्या मनात आला. | करणे<br>वाढवणे<br>भटकणे<br>पाहणे<br>सांभाळणे<br>चालवणे<br>घेणे<br>करणे |

**५. योग्य जागी जर-तर किंवा जरी-तरी भरा.** **(गुण २)**

१. “.......... सिनेमांच्या तिकिटांचा दर कमी झाला, .......... प्रेक्षक सिनेमागृहांकडे वळतील”.
“मला नाही वाटत तसं. .......... तिकिटे खूप स्वस्त झाली, .......... लिंक डाऊनलोड करून फुकट सिनेमे बघण्याकडेच लोकांचा कल असेल”.

२. “.......... जनतेने काटकसरीने पाणी वापरले, .......... धरणातले पाणी वर्षभर पुरू शकेल”.
“हो ना! पण .......... सरकार ‘पाणी जपून वापरा’ असे आवाहन सतत करत असले, .......... बहुतेक लोक त्याकडे लक्षच देत नाहीत”.



**६. उद्देशार्थक वाक्ये बनवा.** **(गुण ५)**

**उच्चशिक्षणासाठी फ्रान्सला जाण्याआधी ज्युली काय काय करणार आहे?**

१. फ्रेंच भाषा शिकणे. ...................................................................... .
२. तिथल्या वसतिगृहात जागा मिळवणे. ...................................................................... .
३. गाडी चालवायला शिकणे. ...................................................................... .
४. गरम कपडे शिवून घेणे. ...................................................................... .
५. पैशाची व्यवस्था करणे. ...................................................................... .

**७. योग्य ते प्रयोजक क्रियापद वापरून वाक्य पूर्ण करा.** **(गुण ३)**

१. चिनूने स्वतःच्या हाताने सगळी खीर खाल्ली का? नाही, त्याला आईने .......... .
२. मांजर दूध पीतच नव्हतं. मधूने त्याला .......... .
३. बाळ आपणहून चालत नव्हतं. बाबांनी त्याला .......... .
४. अरे, ही इतकी महागाईची फुलदाणी कशी फुटली? नीरजने .......... .

५. मला काही ती गोष्ट ऐकायची नव्हती, पण मनीषने जबरदस्तीने ..................... .

६. अझीझचा नवा मोबाईल तू पाहिलास का? नाही, त्याने नाही ..................... .

**८. पुढे दिलेल्या क्रियापदांतून योग्य ते क्रियापद निवडा, त्याचे योग्य ते धातुसाधित विशेषणाचे रूप करा आणि रिकाम्या जागा भरा. (गुण ५)**

(मिळणे, आवरणे, घालणे, दिसणे, तळणे)



क. अंथोनीकाका आज सकाळपासून खोकतायत. ..................... पदार्थ जरा जास्त खाल्ले, की त्यांचा खोकला वाढतोच.

ख. छोटी नताशा हातातली बाहुली मिरवत फिरते आहे. तिला ..................... पहिलंच बक्षीस आहे ना हे!

ग. संगीता येता-जाता आरशात पाहते आहे. तिनं ..................... नवीन कपड्यांकडे अजून कोणाचं लक्षच जात नाहीये!

घ. अमन विचार करतोय. त्याला सकाळी घरासमोर ..................... विचित्र माणूसच तर त्याचा नवीन शेजारी नसेल?

च. सारा आपल्या ..................... खोलीकडे आश्चर्याने पाहतेय. कोणाचं काम असेल हे?

**९. उजवीकडील चौकटीत दिलेले नाम आणि क्रियापद किंवा इतर शब्द आणि क्रियापद योग्य जागी योग्य रूपे वापरून लिहा. (६ गुण)**

| | |
|---|---|
| मी पाककला स्पर्धेत भाग घ्यायचं ठरवलं आणि जोडीदार म्हणून आईचं नाव दिलं. आईनं ह्या गोष्टीचा .......... .......... . स्पर्धेला अजून चार महिने बाकी होते, पण तिच्या मनावर आत्तापासूनच त्याचं .......... .......... होतं. खरं तर स्वयंपाकात आईचा .......... .......... . त्यात तिचा .......... .......... कोणालाही कठीणच गेलं असतं. पण आई कधीच घरातून बाहेर पडली नव्हती. त्यामुळे तिच्यात जराही आत्मविश्वास नव्हता. या स्पर्धेत तिला भाग घ्यायला लावण्यामागे तिला घराबाहेर पडायला लावणं आणि तिच्यात थोडाफार तरी चांगला बदल घडवून आणणं हाच माझा उद्देश होता. | हातखंडा असणे<br>धसका घेणे<br>दडपण येणे<br>हात धरणे |
| माझ्या ह्या बेताला बाबांचा पूर्ण .......... .......... . आई हे .......... .........., की आयत्या वेळेला .......... .......... ? मी कोणताही .......... .......... तयार नव्हते. आता मलाच .......... .......... कामाला लागायला हवं होतं. काय करायचं हे मी आधीच ठरवलं होतं. आईला तिचा एक खास पदार्थ करायला लावायचा, माझ्या कॉलेजातील काही प्राध्यापकांना तो खायला बोलवायचं. त्यांनी त्या पदार्थावर .......... .........., तिच्या पाककौशल्याची .......... .......... की ती नक्कीच खूश होईल. तिचा आत्मविश्वास वाढेल. मग ती ह्या स्पर्धेच्या आव्हानाला आनंदाने .......... .......... . | सामोरे जाणे<br>दखल घेणे<br>आळस झटकणे<br>माघार घेणे<br>पाठिंबा असणे<br>आव्हान स्वीकारणे<br>ताव मारणे<br>धोका पत्करणे |

**१०. योग्य ठिकाणी पुढीलपैकी योग्य शब्द भरून वाक्ये पूर्ण करा. एका शब्दाचा एकाहून जास्त वेळा वापर होऊ शकतो.** **(गुण ४)**

**(-पेक्षा, सगळ्यांत, सर्वांत, -हून, -मध्ये)**

माया : तुला काय वाटतं, मी कोणता अभ्यासक्रम निवडू? केटरिंगला वाणिज्यशाखे.......... अभ्यास कमी असेल ना?

नाझ : असं कोण म्हणतं? दोन्ही विषयांना सारखाच अभ्यास असणार. तुला वाणिज्यशाखे.......... केटरिंग आवडतं का?

माया : तसं नाही, पण वाणिज्यशाखे.......... आणि शास्त्रशाखे.......... गणित असतं ना, ते अवघड जातं मला.

नाझ : मग तसं सांग ना! मला तर .......... पदार्थविज्ञानाची भीती वाटते. पण काय करणार! शास्त्रशाखा निवडली, की सगळे विषय शिकावे लागणारच. कशा.......... काय सोपं आणि .......... अवघड काय ह्याचा विचार कशाला करायचा? जो विषय .......... कठीण वाटतो त्याचा जास्त अभ्यास करायचा, की झालं!

माया : खरं आहे तुझं. आता हा तुझा कानमंत्र लक्षात ठेवून मी बिनधास्त कॉमर्सला प्रवेश घेते.

**११. कंसात काही महत्त्वाचे दिवस दिले आहेत, ते वर्षाच्या कितव्या तिमाहीत आणि महिन्याच्या कोणत्या दिवशी येतात?** **(गुण ४)**

**(स्वातंत्र्यदिन, ख्रिसमस, महाराष्ट्रदिन, प्रजासत्ताकदिन)**



क. जानेवारी – फेब्रुवारी – मार्च

..........................................................................................

ख. एप्रिल – मे – जून

..........................................................................................

ग. जुलै – ऑगस्ट – सप्टेंबर

..........................................................................................

घ. ऑक्टोबर – नोव्हेंबर – डिसेंबर

..........................................................................................

**१२. खाली दिलेल्या क्रियापदांपासून होणारी योग्य ती धातुसाधित विशेषणे लिहून वाक्ये पूर्ण करा.** **(गुण ३)**

**(मोडणे, नसणे, उडणे, पडणे, बिघडणे, घेणे)**

अरेरे! काय ह्या वर्गाची अवस्था! .......... बाके, रंग .......... फळा, भोके .......... छत, तावदाने .......... खिडक्या आणि .......... पंखे. निदान योग्य प्रशिक्षण .......... शिक्षक तरी आहेत ना इथे?

**१३. कंसात दिलेल्या क्रियापदांपासून होणारी शक्य क्रियापदाची रूपे वापरून उतारा पूर्ण करा. (गुण ५)**

पैजेखातर एवढा मोठा किल्ला नंदू धावत चढून आला खरा, पण त्याला धड श्वासही घेता येत नव्हता. तो धपकन खाली बसला. मधूने त्याला पाणी दिलं, पण त्याला तेही (पिणे) --------------------. कसाबसा एक घोट घेऊन त्याने पेला टाकून दिला आणि तो आडवाच झाला. त्याला जाम धाप लागली होती. धड (उठणे) ------------------------ नव्हतं की (बसणे) ---------------------- नव्हतं. “अरे, काय होतंय तुला?” सगळे विचारत होते, पण त्याला एक शब्दही (बोलणे) -------------------- नव्हता. “पडू दे रे त्याला जरा शांत,” रघू म्हणाला, “आत्ता त्याला डोळेही (उघडणे) ------------------------- नाहीयेत. जरा वेळानं त्याचा दम परत आला की होईल तो नीट, नका करू काळजी.”

**१४. योग्य अर्थाचे भावकर्तृक क्रियापद वापरून वाक्ये परत लिहा. (गुण ५)**

क. उन्हाळ्यात सूर्य लवकर उगवतो = उन्हाळ्यात लवकर ------------------------.

ख. थंडीत लवकर अंधार पडतो = थंडीत लवकर ------------------------.



ग. पावसाआधी बऱ्याचदा ढगांचा मोठ्ठा आवाज येतो = पावसाआधी मोठ्यानं --------------------.

घ. आज इतक्या लवकर कशी संध्याकाळ झाली? = आज इतक्या लवकर कसं ---------------------.

च. बोटीत बसल्यामुळे माझ्या पोटात ढवळलं. = बोटीत बसल्यामुळे मला ------------------------------.

**१५. ‘तर’ किंवा ‘तरी’ योग्य जागी भरा. (गुण ५)**

तू कितीही प्रयत्न केलास -------------------- हे काम तुझ्या एकटयाच्याने होणार नाही. माझी मदत --------------- तुला घ्यावीच लागेल.तुला ऐकायचं नसेल ------------- नको ऐकूस, पण नंतर तुलाच वाटेल, की महेशचं ऐकायला हवं होतं. हो, पण नंतर जो पसारा होणार आहे, तो आवरायला ------------- मलाच यावं लागेल ना? तेव्हा ------------- बोलावशील ना मला? तू काही कोणा बाहेरच्याची मदत घेणार नाहीस. बरोबरच आहे, बाहेरच्यांना ----------- का त्रास द्यायचा? आणि ते ------------- का येतील त्यांची कामं सोडून तुझ्या मदतीला! हं, पैसे मोजलेस ------------- येतील कदाचित, पण पैसे ----------- तू देणार नाहीस. तेव्हा विचार कर. आत्ताच मोकळेपणानं मला थांबायला सांगितलंस ------------- मला घरी तसं कळवता येईल.

## ४. शब्दसंपदा (एकूण १५ गुण)

१. आधी नाम आणि क्रियापदाची बरोबर जोडी लावा आणि नंतर त्यापासून एक वाक्य बनवा. (गुण ५)

| | नाम | क्रियापद | वाक्य |
|---|---|---|---|
| १ | फडशा | उडणे | |
| २ | फन्ना | असणे | |
| ३ | झुंबड | पाडणे | |
| ४ | ठसा | असणे | |
| ५ | खडा न् खडा माहिती | उडवणे | |

२. शब्दाचा उरलेला भाग लिहून शब्द पूर्ण करा. (गुण २)

भडक, गार, कुट्ट, शार



१. तळ्यातले पाणी खूप निळे होते. अगदी निळे ---------- पाणी.

२. ही साडी जरा जास्तच लाल नाही वाटत? अगदी लाल ---------- आहे ही साडी.

३. पावसाळ्यात सगळी झाडे हिरवी होतात. अगदी हिरवा ---------- रंग दिसतो सगळीकडे.

४. तो बोका पाहिलास का, किती काळा आहे! हो ना! अगदी काळा ----------.

३. तुम्ही कोणते विशेषण कशाला लावाल? जोड्या लावा. (गुण ४)

| | विशेषण | पदार्थ |
|---|---|---|
| १ | झणझणीत | पोळ्या |
| २ | चमचमीत | पापड |
| ३ | लुशलुशीत | मिसळ |
| ४ | कुरकुरीत | जेवण |

४. विरुद्ध अर्थ लिहा. (गुण ४)

१. त्वरित करणे = ----------

२. बेभान होणे = ----------

३. गंभीरपणे घेणे = ----------

४. पारा चढणे = ----------

# दृक-श्राव्य परीक्षा

**एकूण २५ गुण**

## १. श्रवणकौशल्य (एकूण गुण १०)

**बांधा घर चार तासांत, एका लाखात!**

**१. ध्वनिफीत ऐका आणि खाली दिलेली विधाने बरोबर की चूक ते लिहा. (५ गुण)**

बरोबर चूक

क. ही घरं फक्त मुंबई आणि पुण्यातच बांधता येतील.

ख. ह्या घरांवर आधारित बरेच सिनेमे निघाले आहेत.

ग. वेगवेगळ्या आपत्तींमुळे लोक बेघर होतात.

घ. आयकिया कंपनी हे घर बांधून देते.

प. आयकिया कंपनी घराबरोबर फर्निचरही देते.



**२. कंसात दिलेल्या शब्दांपैकी योग्य तो शब्द रिकाम्या जागेत भरा. (५ गुण)**

क. या घरासाठी एकूण ------------------------------ सुटे भाग लागतात. (अडुसष्ट, अडतीस)

ख. हे घर दोनशे चौरस ------------------------------ आकाराचं आहे. (फूट, मीटर)

ग. ह्या घराचं छप्पर आणि भिंती ------------------------------च्या आहेत. (प्लास्टिक, सिमेंट)

घ. ह्या घराचा सांगाडा ------------------------------ आहे. (लाकडी, स्टीलचा)

च. ही घरं ------------------------------ आहेत. (तकलादू, भक्कम)

## २. श्रुतलेखन (एकूण गुण ५)

**(परीक्षकासाठी उतारा शेवटी दिला आहे.)**

## ३. दृक्श्राव्य (एकूण गुण १०)

**आता एक छोटीशी व्हिडीओ क्लिप पाहा आणि पुढील प्रश्नांची उत्तरे द्या.**

१. व्हिडीओतील सुरुवातीच्या गाण्यात कोणत्या तीन शालेय परीक्षा पद्धतींची नावे ऐकू येतात? (गुण ३)

क. ------------------------------ ख. ------------------------------ ग. ------------------------------

२. ह्या व्हिडीओमध्ये कोणता विषय हाताळलेला आहे? (गुण ३)

क. मुलांचे आजारपण

ख. मुलांचे शिक्षण

ग. मुलांपुढील करिअर पर्याय

३. व्हिडीओतील मुलाला पुढे काय करण्याची इच्छा आहे? (गुण १)

------------------------------------------------------------

४. मुलाच्या वडिलांची काय इच्छा आहे? (गुण १)

------------------------------------------------------------

५. शिक्षण पद्धतीतील दोष दाखवण्यासाठी मुलाचे वडील शिक्षिकेला कोणते प्रश्न विचारतात? (गुण प्रत्येकी १)

क. ------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

ख. ------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

**श्रुतलेखनासाठी उतारा**

ही पर्वताची रांग दूरवरून मोठी मोहक दिसत आहे. तिचे जवळून दर्शन घेण्याचा मोह टाळता येत नाही. पण जसजसे जवळ जावे तसतसे तिचे उग्र आणि रौद्र रूप जाणवून छातीत धडकी भरते आहे.

आम्ही एका कड्याच्या टोकावर उभे आहोत. खाली खोल दरी आहे आणि नदीचा प्रवाह वळणे घेत वाहतो आहे. तो कुठे ऐसपैस पसरलेला दिसत आहे, तर कुठे त्याने अंग चोरले आहे. सूर्याचे बिंब तांबूस होऊ लागले आहे आणि संध्याकाळचा हलका गारवा हवेत जाणवत आहे.

आता खाली उतरायचे आहे. ह्या डोंगरात चालताना पाय ठरत नाही. कुठे वाळू, तर कुठे गोटे वाटेत येत आहेत. पुढे टाकण्यासाठी एक पाय उचलला की दुसरा घसरत आहे. आधाराला एखादा गवताचा झुबका मिळत आहे; पण तोच उपटून हातात येईल अशी भीती वाटत आहे. आमच्या धसमुसळ्या हालचालींनी दचकलेली पाखरे पंख फडफडावत आकाशात भरारी घेत आहेत आणि आपली नाराजी प्रकट करत आहेत. जीव मुठीत धरून आणि आठवेल त्या देवाचे नाव घेऊन आम्ही एकेक पाऊल उचलत आहोत.



# पातळी ४ – उत्तरसंच

## मागील भागात

१. → समस्या, स्पर्श, पूर्वी, न्यायव्यवस्था, स्थान, अर्धा, पर्व, बुद्धी, आग्रह, ताल, दगदग, थाळी, सहज, नैवेद्य, बासुंदी, काम, गार, कामगार, सुविधा, मस्का, टिपण, कर्ज, हावभाव, हाव, भाव, वर, ऋषी, कार, केर, वारा, परंतु, तुलना, भूल, लस, कण, कणखर, बुद्धिमत्ता, असहिष्णुता, वक्र, खाण, सिद्धांत, निरक्षरता, ऊर्जा, ऊर्जामंत्री, मंत्री, शोषण, निवारण, रण, यंत्र, मानव, यंत्रमानव, कार्य, कार्यप्रणाली, प्रणाली, लिंग, लिंगभेद, भेद, भावना, भाव, साडी ↓ सकाळ, विघटन, वेध, सुधीर, धीर, मत, सत्ता, स्पर्धा, केक, कण, आनंदी, नंदी, भर, अक्षर, पूर्वग्रह, ग्रह, क्षमता, ताजी, जीवन, वन, शैली, न्यायालय, चांगुलपणा, यथातथा, रंग, व्यत्यय, ऋतुचक्र, मंत्र, वन, खात्री, प्रवाह, हर, काना, बाण, अर्ज, आवडीनिवडी ↘ काम, व्याधी, ताक, खरा, काळी, सर, पण, लिंग, खाऊ, नार, माथाडी ↗ सर, कर, पूर्णता, काप, नाव, गुण, मासा, समृद्धी, ताव, गद्य, सण, क्षण, निवारा

२. क. दुप्पट ख. पुरेशी ग. इतका, पुष्कळ घ. किंचित च. प्रमाणात, दुपदरी छ. पटींनी

३. क. काळानुसार थोडे अधिक पुढे जाऊन विचार करण्याची जबाबदारी साहित्यकारांची असते, असे माझे मत आहे.
ख. तो इतका लहान आहे, पण तरीही आपल्या वयापेक्षा मोठ्या माणसांशीच त्याची जास्त मैत्री होते.
ग. त्याची उंची मध्यम उंचीपेक्षा किंचित जास्त होती.
घ. मला गाण्यातलं फार काही समजतं असं नाहीये, पण तरीही शास्त्रीय संगीत नेमाने ऐकतो मी.

४. क) ऋषी ख) ऋतू ग) अक्षर घ) क्षण च) पक्ष छ) ज्ञान ज) विज्ञान झ) ज्ञानेश्वर

५. क) कृती ख) पदार्थ ग) पर्याय घ) ध्रुवतारा च) महाराष्ट्र छ) तऱ्हा

६. क. जीव – जीवदान
ख. नाटक – नाटककार
ग. धार – धारदार
घ. शिल्प – शिल्पकार
च. काम – कामगार

७. क. सर्वाधिक, निम्म्याहून अधिक ख. दुप्पट ग. पुष्कळ, काही घ. किंचित च. कित्येक पटींनी

८. (क) त्यांची, महत्त्वाची (ख) त्यांनी, आपले (ग) हाडाचा (घ) आपले, त्याला, मंडळींना, आपल्या (च) आमच्या, शाळेवर वर्गात (छ) मुख्याध्यापिकेला, मला, वर्गात (ज) असलेल्या (झ) चमच्यांपैकी, ह्याची, मनाने (ट) कपांचे, त्यांना (ठ) चमच्यांच्या, वर्गाबाहेर, त्यांना, प्रत्यक्षात (ड) आपले, त्यांना, इकडचीतिकडची, ओट्यामागची (ढ) शाळेतले, माझे, छोटासा (त) त्यांच्यावरून (थ) पुढच्या, रांगेत (द) बाकीच्यांना (ध) त्यांची (न) त्यांना (प) घासण्याची, शिक्षिकेला, ह्याची (फ) मागच्या, त्यांना (ब) त्याची, माळ्यावरच्या (भ) मनासारखा (म) माझी (य) तिथली

१०. क. उन्हातून ख. घरातून ग. कचऱ्यातून घ. कढईतून च. बोलण्यातून छ. अन्नातून ज. खिडकीतून झ. घरट्यातून ट. खोलीतून ठ. बाजारातून ड. चष्म्यातून ढ. घशातून त. पाण्यातून थ. बंगल्यातून द. शाळेतून

११. **क.** असं, कसं, तसला, असलं, तसला, कसले **ख.** तसं, बऱ्या, अमका, तमक्या, अशा **ग.** असल्या, हे, जी, तसला, अमुक, जिचं, इतकं, तसं, तसलं, कसलं **घ.** असं, असं, इतक्या, तसं **च.** कशी, अशी, अशी, तशी

१२. (क) केला (ख) नाही (ग) होता (घ) होती (च) केली (छ) केली (ज) मिळाला (झ) राहत होत्या (ट) गेला (ठ) होतं (ड) सुचली (ढ) केली (त) होतं

१३. क. "हे काय, तू काम करतोयस का? चालू दे, त्यानंतर चहा प्यायला जाऊ या."
ख. "हे काय, तुम्ही अजून गप्पा मारताय का? चालू दे, त्यानंतर बाहेर पडू या."
ग. "हे काय? तू अजून खेळतेयस का? चालू दे, त्यानंतर अभ्यासाला बसू या."
घ. "हे काय? तुम्ही अजून बोलताय का? चालू दे, त्यानंतर खेळू या."
च. "हे काय? तू अजून वाचतोयस का? चालू दे, त्यानंतर गप्पा मारू या."
छ. "हे काय? तुम्ही उठताय का? चालू दे, नंतर चर्चा करू या.

१४. क. मयूरी खूप खूश होती, कारण ती परीक्षेत उत्तीर्ण झाली होती.
ख. धनेश खूप नाराज होता, कारण त्याच्या मित्राने त्याला फसवलं होतं.
ग. प्राध्यापक दामले खूप चिडले होते, कारण आज विद्यार्थ्यांनी गृहपाठ केला नव्हता.
घ. त्या अनोळखी शहरात तो फार गोंधळला होता, कारण तो रस्ता चुकला होता.
च. पिंटू आनंदाने उड्या मारत होता, कारण आज शाळा लवकर सुटली होती.

१५. क. मृण्मयी संसाराला फार कंटाळली होती, म्हणून शेवटी तिनं घटस्फोट घेतला.
ख. काही तरी नवीन शिकावं, असं मेहरून्निसाला वाटत होतं, म्हणून तिनं एका नाट्यकार्यशाळेसाठी आपलं नाव नोंदवलं.
ग. विकी रात्रभर पार्टीत नाचत होता, म्हणून दुसऱ्या दिवशी त्याचा पाय दुखायला लागला.
घ. शेजाऱ्यांच्या घराला आग लागली होती, म्हणून त्यांनी अग्निशामक दलाला फोन करून बोलावलं.
च. त्याच्या मित्राला लेखनासाठी मोठा पुरस्कार मिळाला होता, म्हणून तो मित्रासाठी एक मोठा फुलांचा गुच्छ घेऊन आला.

